
# मुन्नी

अरुणा सबाने



# मुन्नी

अरुणा सबाने

ई साहित्य प्रतिष्ठान

# मुन्नी

## लेखिका:- **अरुणा सबाने.**

ए-५०६, गणेश गौरी, गुमास्ता ले आउट
कोतवाल नगर,
नागपूर, - १५
भ्रमणध्वनी: ९९७००९५५६२
ईमेल: arunasabane123@gmail.com

मुखपृष्ठ – चंद्रमोहन कुलकर्णी, पुणे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**मुन्नी-मूळ छापील आवृत्ती**

पहिली आवृत्तीः 13 मार्च 2010

दुसरी आवृत्ती - 1 जानेवारी 2011

तिसरी आवृत्ती - 12/12/2012

I.S.B.N.-81-903716-8-1

आकांक्षा प्रकाशन

ए 506, गणेश गौरी,

गुमास्ता ले आऊट,

कोतवाल नगर, नागपूर-15.

(0712) 2247884 / 9970095562.

मुद्रक : अंकुर एन्टरप्रायजेस, नागपूर

अक्षरजुळवणी : मनीषा कांदे, नागपूर

मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी, पुणे

किंमत : 300/- रुपये

a

या पुस्तकाच्या छापील आवृत्तीचे प्रकाशक **आकांक्षा प्रकाशन** यांनी आम्हाला ई आवृत्तीची परवानगी दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

ई प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव WhatsApp वर कळवा)

प्रकाशन :- २६ मार्च २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

इथल्या
शोषणव्यवस्थेला बळी पडावं लागून
मनाच्या इच्छेविरुद्ध
नको त्या व्यवसायात पडणाऱ्या
माझ्या
समस्त मैत्रिणींना
-
अरुणा

a

चारा नहीं कोई जलते रहने के सिवा
सांचेमें फनाके ढलते रहने के सिवा
ऐ शमा तेरी हयाते फ़ानी क्या है
झोंका खाके संभलते रहने के सिवा

: ऋणनिर्देश :

डॉ. निशिकांत मिरजकर

चंद्रमोहन कुलकर्णी

प्रा. वामन निंबाळकर

Nothing is good or bad in this world.
It all dependson howyou look at it
and react to it

# मनोगत

'मुन्नी' ही माझी दुसरी कादंबरी आज मी वाचकांच्या स्वाधीन करताना माझ्या मनात बरेच विचार आहेत. या कादंबरीचा विषय जेव्हा मला सुचला आणि डोक्यात तो सारखा खळखळू लागला,मनात तो मुरला, आणि एक दिवस झपाटल्यागत मी अक्षरश: अर्ध्या रात्री उठून लिहायला सुरुवात केली. एका बैठकीत पहिली वीस-पंचवीस पानं चक्क पहाटे साडे पाचपर्यंत लिहिली. रात्री दोन ते साडे पाचपर्यंत मी काय लिहिलं मला माहिती नाही, पण खूप रात्रीच्या जागरणानंतरची ती पहाटेची झोप मात्र फारच सुखावह होती. जणू काय माझ्या डोक्यावरचं प्रचंड मोठं दडपण कमी झालं होतं. किंवा माझ्या मनावरचं ओझं मी कुणातरीसोबत 'शेअर' केलं होतं. दुपारी डॉ. प्रकाश खरात आणि ज्येष्ठ कवी प्रा. वामनराव निंबाळकर या माझ्या दोन्ही स्नेह्यांना फोन करून बोलवलं आणि मी जे काय लिहिलं होतं ते वाचून दाखवलं. मी वाचेपर्यंत त्या दोघांनीही त्यांना येणारा एकही फोन घेतला नाही किंवा एक शब्दही बोलले नाहीत. मी माझ्या हातातले कागद वाचून संपवताच निंबाळकर सर म्हणाले, "व्वा बढिया. बहुत बढिया." आणि खिशातला रुमाल काढून त्यांनी डोळ्यात आलेली आसवं पुसली. "मॅडम, खूपच छान झालंय. जमली. भट्टी जमली. ही कादंबरी लवकर पूर्ण करा. खूप वेगळा विषय हाताळला तुम्ही."

'खरंच सर. तुम्हालाही असंच वाटतं?' मी प्रकाशकडे वळून विचारलं,"अहो म्हणजे काय खूपच छान जमली नं. व्वा. बढिया. विषय मात्र भलताच भारी आहे हं. पण मस्तच जमली. लिहा लवकर लिहा."

वाङ्मयक्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटवलेल्या माझ्या या दोन मित्रांच्या 'पावती' नं माझं बळ वाढलं आणि जमेल तशी ती कादंबरी पुढे जाऊ लागली. प्रकाशन व्यवसाय,आकांक्षा मासिकाचा व्याप, माझ्या माहेर सामाजिक संस्थेची

कामं, महिला पाणी मंचचे उपक्रम आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या या सर्वांतून वेळ काढून एकाग्रतेनं लेखन करणं तसं कठीणच. पण 'मुन्नी' मला स्वस्थ बसूच देईना. माझ्या दौऱ्यातही माझं रजिस्टर सोबत असायचं. मूड आला की रेल्वेतलं माझं कम्पार्टमेंट असो की हॉटेलमधली खोली असो मला 'मुन्नी' लिहायला कोणत्याच जागेनं 'बाधा' आणली नाही.

आकांक्षा मासिकाच्या वर्धापनदिनाच्या विशेषांकात 'मुन्नी'चा एक अंश प्रसिद्ध करावा,असं प्रकाश खरातांनी मला सुचवलं. मी ते लगेच अमलात आणलं आणि जसजसं मासिक वाचकांपर्यंत पोहचत गेलं तसतसा माझ्यावर फोन आणि पत्रांचा अक्षरश: पाऊस पडला आणि माझ्या लक्षात आलं की खरंच, मी काहीतरी वेगळाच विषय हाताळते आहे. प्रा. द. ता. भोसले, शांतारामजी, डॉ. विलास खोले, प्राचार्य भगवान ठाकूर, डॉ. सुलभा हेर्लेकर, माधुरी अशिरगडे, डॉ. आनंद पाटील, मीरा, तारा भवाळकर, अनेक... अनेक नावं सांगता येतील. पण अगदी पहिला फोन आला माझा कलावंत मित्र चंद्रमोहन कुलकर्णींचा. त्याने खूप प्रोत्साहीत केलं. तो मग अधूनमधून कादंबरी कुठवर आलीय याची चौकशी करीत राहिला.

अनेकांचा एक कॉमन प्रश्न होता, 'ही मुन्नी तुम्हाला कुठं भेटली?'व्यक्तिगत मला तसा हा प्रश्न काही फार महत्त्वाचा नाही वाटत. अशा अनेक मुन्नी अनेकांना भेटतच असतात. समाजात आपण उघड्या डोळयांनी वावरत असू तर मुन्नीच काय अनेक सायना तर आपल्या आजूबाजूलाच असतात. पण आजकालच्या मुळात स्वत:च्याच कुटुुंबापासून तुटलेल्या लोकांनी समाजापासून तुटून वागलं तर विशेष काय? आणि समाजापासून तुटून-तोडून वावरणाऱ्या सभ्य लोकांना मग अशा 'सायना' दिसतील कशा? आणि दिसल्या तरी उघडपणे त्यांच्याशी संवाद साधणं जमणार कसं? पण सतत लष्करच्या भाकरी भाजायची सवय असणाऱ्या माझ्या मन:चक्षूंना अशा मुन्नी, सायना सतत दिसतात. त्या दिसल्या की त्यांची वास्तपुस्त केल्याशिवाय, त्यांना जमेल तशी मदत केल्याशिवाय, त्यांच्यासाठी खस्ता

खाल्ल्याशिवाय मी राहूच शकत नाही. तेरा वर्षापूर्वी अशीच एक 'मुन्नी' माझ्या आयुष्यात आली. दहा वर्षाच्या त्या सुंदर-निष्पापपोरीला रक्तभरल्या अवस्थेत मी जेव्हा घरी घेऊन आले होते तेव्हा बारा वर्षांच्या माझ्या पोरींनी लगेच तिला स्वत:चे कपडे दिलेत, स्वत:च्या ताटातून तिला जेवायला घातलं हे पाहून मी मुन्नीला घरी आणून किती योग्य निर्णय घेतला याचा त्यावेळी मला आनंद झाला होता.

अगदी पहिल्यांदा मी आणि माझी मैत्रीण प्रा. वंदना महात्मे आम्ही ऐन दुपारी जेव्हा'गंगा-जमुना' मध्ये आमची कायनेटीक टाकली होती, तेव्हा तिथलेच लोक विस्फारल्या नजरेनं आमच्याकडे बघत होते आणि 'बहनजी, तुम इधर क्या कर रयेला? कहाका पता चे आपको?' असं आमची गाडी थांबवून आम्हाला विचारणारे होते. 'आमच्यासारख्या बहेनजी' तिकडे येऊच शकत नाही, हा त्यांना ठाम विश्वास होता. कालांतरानं माझा मुलगा त्याला जमेल तसं त्याच्या पद्धतीनं सामाजिक कार्य करीत होता,तेव्हा एक दिवस मला म्हणाला, "मम्मी, गंगाजमुनातल्या बायांसाठी आपण मेडीकल चेकअप कॅम्प घेऊ या."

"कठीण आहे रे." मी त्याला म्हणाली.

"नाही. तू मनावर घेतलंस तर काही कठीण नाही. होईलच ते."

त्यानं माझ्या मनात परत त्या बस्तीचा विचार अंकुरला. 'गंगाजमुना' हा तसाही नेहमीच माझ्या चिंतनाचा विषय राहिला आहे. अस्वस्थ भूमीला नंतर तिथं बरच काही सापडत गेलं.

नागपूरची 'गंगाजमुना' असो, मुंबईचा फोरास रोड काय नि व्हिटी स्टेशनजवळच्या महानगर पालिकेशेजारचा त्यांचा अड्डा काय किंवा पुण्याचा लक्ष्मी रोड, बुधवारपेठ काय माझ्या नजरेला या बाया ओळखूच यायला लागल्या. मग त्यांच्याशी आधी नजरेतून ओळख...मग प्रत्यक्ष ओळख, मग चर्चा. चर्चेतून त्यांचे प्रश्न समजून घेणं, त्या हे काम सोडूनही काय-काय करू शकतात आणि इतर चांगली कामं करून त्या कसं मस्त मजेत जगू शकतात, असं सारखं त्यांचं ब्रेन-

a

वॉशिंग करण्याचं वाणच मी पत्करलं. 'हिला काय एवढं या बायांबद्दल?' असं वाक्य मनातल्या मनात... या क्षणी लगेच आमच्या हितचिंतकांनी उद्गारलं असेल. मला खात्री आहे माझ्या हितचिंतकांची. पण असं कुणाकडे मी लक्ष देत राहिले नाही. जमेल तसं त्यांच्यासाठी काम करावं. जमलं तर एखादी मुन्नी, नाहीतर सायना तर आहेतच आपल्याकडे ढिगांनी. वेश्यांना पदोपदी नाकारलं जातंय, सर्व पातळ्यावर त्यांचं शोषण होतंय, मुख्य म्हणजे छोट्या छोट्या निष्पाप मुली या मार्गानं बळजबरीनं वळविल्या जातात. त्यांच्यासाठी काही करता आलं तर बघावं.

एक महत्त्वाचं. 'मुन्नी' ही कादंबरी 'कादंबरीच' आहे. याला माझं आत्मचरित्र किंवा आत्मचरित्रात्मक कादंबरी वगैरे मुळीच समजू नये. 'मुन्नी' हा एवढा एकच धागा त्यातला सत्य तोही अल्पांशानं. मुन्नी आता कुठं आहे. ती काय करते वगैरे प्रश्न वाचकांच्या मनात नक्कीच निर्माण होतील. एखाद्या कलाकृतीकडेनिखळ कलाकृती म्हणूनच बघितलं तरच त्यातला रसास्वाद आपल्याला घेता येतो. अन्यथा कादंबरीत आपण लेखकाला शोधत बसलो तर निखळ वाङ्मयीन आनंदाला आपण मुकतो.

या कादंबरीच्या निमित्तानं मला माझ्या वाचकांना एकच सांगावसं वाटतं की, वेश्यांच्याशोषणाला, त्यांच्या दुय्यमत्त्वाला केवळ पुरुषी सत्ता कारणीभूत नसून, ते भांडवली व्यवस्थेशी, जातिव्यवस्थेशी जोडलेलं आहे. 'गंगाजमुना' सारख्या प्रत्येक शहरात असणाऱ्या बस्त्या या त्या स्त्रियांनी निर्माण केलेल्या नाहीत. इथल्या वासनेनी हपापलेल्या पुरुषांमुळे या वस्त्या निर्माण झाल्या आहेत. अनेकदा हे पुरुष बाहेरचेच असतात असं नाही तर कधीकधी घरातलाच काका-मामा-भाऊ-शेजारचा-मानलेला एवढंच काय सख्खा बापही असतो. आपली 'हवस' भागवण्यासाठी छोट्याछोट्या मुलींचेही हे हैवान बळी घेतात. अत्यंत कमी पैशात आपल्याच मुली विकणारे मायबाप इथं जोवर आहेत, माणुसकीचा धर्म विसरून ऐन तारुण्यातल्या मुलींना फसवून रसातळाला नेणारे हैवान जोपर्यंत इथे आहेत; तोवर 'गंगाजमुना' तली गर्दी

कधीच कमी होणार नाही. समाधान एवढंच आहे की एखादा प्रा. महाजनसारखा माणूस, एखादा विवेकसारखा तरुण आणि एखादी वैदेही तिथे पोहचली तर मुन्नी, सायनासारख्यांच्या जीवाचं सोनं व्हायला वेळ लागत नाही. ही कादंबरी वाचून तुमच्यापैकी कुणाला असा विचार सुचलाच तर या लेखनाचं सार्थक झालं असं मी समजेन.

ही कादंबरी लिहायला आणि त्याचं पुनर्लेखन करायला मला साधारणदीड वर्ष लागलं. या दीड वर्षांत या कादंबरीनं मला अक्षरश: ग्रासलं होतं. माझ्यात प्रचंड अस्वस्थता होती. आत्यंतिक प्रसववेदना मी भोगल्या. मला खूप काहीतरी सांगायचं आहे. मुन्नीची कथा सांगायची आहे, सायनाचं दु:ख सांगायचं आहे. सुहास सारखी वृत्ती सांगायची आहे, साबची पण काहीतरी बाजू आहे. कोणत्याच पात्रावर अन्याय होता कामा नये. मनाची सतत घालमेल व्हायची. खूप दिवसांपासूनच आतआत काहीतरी दडून बसलेलं बाहेर येऊ बघतंय. पण मातीचे खूप सारे थरच्या थर बाजूला करतकरत आतमध्ये दडलेल्या कोंबांनी पूर्णपणे आपल्या सामर्थ्यानिशी बाहेर यायला त्याला त्रास तर भोगावा लागणारंच ना. बरं एवढ्या नाजूक कोंबानं धसमुसळेपणानं असं बाहेर येऊन पण नाही चालणार. त्याला अलगदच बाहेर यायला लागेल. आणि त्या अलगदपणे बाहेर येण्याच्या अट्टहासामुळेच होणारा त्रास मी गेल्या दीड वर्ष भोगला. त्या प्रत्येक पात्रासोबत मी जगले. मला जे गवसलं ते आज मी तुमच्या स्वाधीन करत आहे.

माझे ज्येष्ठ स्नेही डॉ. निशिकांत मिरजकर यांनी काळजीपूर्वक ‘मुन्नी’ वाचून मला मार्गदर्शन केलं आणि मलपृष्ठाची शोभा वाढविण्याचं महत्त्वाचं काम केलं. त्याबद्दल मी त्यांची विशेष ऋणी आहे.

चंद्रमोहनच्या व्यग्र कामातही त्याने माझ्या आग्रहाखातर मुन्नीला साजेसं मुखपृष्ठ तयार केलं; केवळ मुखपृष्ठ तयार केलं असं नव्हे तर मुन्नीच्या कच्च्या अवस्थेपासून तर कादंबरी शेवटच्या टप्प्यात जाईपर्यंत तो माझ्या सोबत होता. सूचना

करीत होता. त्याच्या सूचना मला मोलाच्या ठरल्या. त्याचे आभार मी मानायलाच हवेत.

या लेखनाला माझ्या साऱ्याच मित्रमैत्रिणींनी वेळोवेळी मला प्रोत्साहन दिलंय. कादंबरी कुठवर आलीय अशी विचारणा डॉ. द.भि. कुलकर्णी सर, शनवारे सर आणि वहिनी, चंद्रकांत वानखडे, ही सारी माझी माणसं सतत मला विचारत राहिली. माझी ऑपरेटर मनीषाने सतत माझे लेखनातले बदल न कुरकुरता अमलात आणलेत. भाग्यश्री पेठकर आणि प्रा. सिद्धार्थ नितनवरे यांनी मुद्रित शोधकाची जबाबदारी अतिशय जबाबदारीनं पार पाडली.

माझी मुलं स्वप्नील, पियुषा आणि समीक्षा यांना त्यांचे विनाकारण उल्लेख केलेले आवडत नाहीत. पण माझी स्नुषा. ती या घरात आल्यानंतर माझं हे पहिलंच वाङ्मयीन अपत्य. माझ्या साऱ्या गर्भवेदनांची ती साक्षीदार. तिनं सतत मला अबोल पण समंजससाथ दिली. हा दीड वर्षांचा काळ. सर्वात जास्त सध्यामाझ्या ‘वेळेवर’ ज्यांचा अधिकार आहे, ती माझी दोन नातवंड. अर्णव आणि सावरी. त्यांच्या लाडाकोडाच्या वेळेतच मी ‘मुन्नी’चं काम करीत राहिले. त्यामुळे त्यांच्यावर थोडासा अन्याय झालाय,याची मला जाणीव आहे.

ही कादंबरी वाचकांच्या पसंतीस उतरेल, याची मला खात्री आहे. ती अधिकाधीक उत्तम होण्यास माझ्या या साऱ्याच स्नेह्यांचा हातभार लागला पण काही उणिवा राहिल्या असल्यास त्याची जबाबदारी माझीच. ‘विमुक्ता’ या कादंबरीला जसा माझ्या वाचकांनी भरघोस प्रतिसाद दिला, तसाच प्रतिसाद ‘मुन्नी’ ला आपण देणारच.

23.02.10<br>
अरुणा सबाने<br>
नागपूर.

# मुन्नी

a

वैदेही नुकतीच कार्यालयातून घरी आली होती. कुलूप उघडून हॉलचा लाईट लावीत पर्स खुर्चीवर ठेवत नाही तोच फोन घणघणला. आल्याआल्या घरचा फोन वाजला किंवा मोबाईल जरी वाजला, तरी आजकाल तिला चिडल्यागत होतं. दिवसभर काहीतरी धावपळ चाललेलीच असते. डोकं अगदी कुट्ट झालेलं असतं. घरी आल्यावर किमान एक तास तरी काही नको असतं. वॉश घेऊन झाला, की स्वयंपाकघरात दुपारचं काय शिल्लक आहे हे बघायचं, भाजी गरम करायची आणि टि. व्ही. बघत रात्री मन लावून जेवायला तिला आवडतं. कारण सकाळी जेवण नसतंच. जाण्याच्या, फोनच्या गडबडीत पोटात ‘ढकलणं’ असतं. आता वाजणारा फोन घेणं आलंच. कारण घरी असताना कुणाचा फोन आला की नुसता वाजू देण्याइतपत बथ्थड मन अजून व्हायचंय तिचं. त्यामुळे चप्पलही न काढता तशीच ती बेडरूममध्ये धावत आली आणि तिनं फोन घेतला.

“मॅडमजी भैऽया बोल रू.”

भैया? कोण भैया? क्षणभर डोक्यात काही शिरलं नाही. पण त्याच्या हेल काढून कर्कऽश बोलण्याच्या पद्धतीवरून लगेच लक्षात आलं. भैया? आणि आश्चर्यही वाटलं. रात्री सव्वा नऊ वाजता याने कसा काय फोन केला? पण तातडीचं काम असल्याशिवाय भैया फोन करणार नाही, याची खात्री होती तिला. “कैसी हो मॅडम? किंवा आपका फोटू पेपरमे ें देखला, म्हून फोन किया” वाली बात भैयाची

नसते. रांगड्या व्यक्तिमत्त्वाच्या भैयाला कामाशी काम एवढंच माहीत आहे. कदाचित याने आजच मुन्नीसंदर्भात काही ठरवलं तर नाही? मिळाली वाटतं याला संधी.

“बोलो भैया.”

“मॅडमजी, आज अपना काम हो सकता है.”

“सच? कैसे क्या?”, वैदेही आनंदाने चीत्कारलीच.

“पहलवान गया आज उसकी बनारसीके पास”

“तो क्या हुआ? उसका लंगडा तो होगा ना.”

“लंगडे को मै संभाल लुंगा. उसको दो बोतले और भरपेट सावजी मार देंगे. उसकी चिंता मत करो”

“ऐसा नही भैया. बहुत जोखीमका काम है. अपना प्लॅन फिस्कट गया तो लेने के देने पडेंगे. अपना तो वो कुछ नही बिगाड सकता, लेकिन मुन्नी का तो वो दुगना नरक बना देगा. वो ग्यारा-बारा सालकी लडकिका जिना हराम कर देगा. और इसके पहले मैने जिस लडकिको वहासे फरार किया, वो हमलोग ही है, ये भी उसको पता चलेगा, मेरा तो वहा आनाही बंद कर डालेगा वो. आज अॅटलिस्ट हम वो लोगों के तबियतकी, औषधपानी की, कंडोमकी कुछ तो व्यवस्था कर सकते ना। तुमको पता है ना, वो बस्तीमें घुसने के लिये मुझे कितनी तकलीफ हुई।” “तुमने कैसे प्लॅन किया, मुझे ठिकसे बताओ। एक मिनिट, मै अभीअभी घरमे आई हूँ. मै पहले पानी पिती हूं, तूम एसटीडी बूथ से फोन करो. ये एक-एक रुपये के कॉईन बॉक्समे टकटक बजती रहती. बोलनेमे डिस्टर्ब होता है।”

a

वैदेहीनं फोन ठेवला, तेव्हा तिच्या लक्षात आलं होतं, की तिच्या हाताला कंप सुटलाय आणि तळहात पूर्ण घामाने भिजला. शरीरात एकदम उत्साह संचारलाय पण नाभीत खड्डाही पडल्यासारखा वाटतो आणि घसा कोरडा झाला आहे. यापूर्वी आपण पोरींना तिथून सोडवताना जे कष्ट घेतले, त्यापेक्षा कितीतरी जास्त रिस्क यावेळी होती. मुन्नी अतिशय सुंदर होती. निर्मळ मनाची. दोन वर्षांच्या बालकाचा निष्पाप, निर्मळपणा तिच्या डोळ्यात होता. एखाद्या नंदादीपासारखी शांत, सोज्वळ. मात्र एकएक क्षण तिला त्या चिखलात युगायुगाचा होता. आणि पहिलवान तिच्यावर आस लावून बसला होता. मुन्नीच्या रूपात खूप वर्षांनी त्याच्या हाती 'घबाड' सापडलेलं होतं. आंटी आणि तो रोज मुन्नीच्या 'रेट' बद्दल इम्ले रचत होते. रोज तिचा भाव आपल्या तोंडातच वधारवत होते. मुन्नीची बोहनी कधी आणि कशी करायची, यांवर दोघांमध्ये नेहमीच चर्चा आणि वादावादी चालत असे. मुन्नीला तिथून सोडवताना परत तिचं नखही त्यांच्या दृष्टीला पडता कामा नये, याची दक्षता तिला घ्यायची होती. शिवाय भैयावरही त्या लोकांची नजर जाता कामा नये. पहिलवान आपलं काहीच बिघडवू शकत नाही, याची तिला खात्री आहे. पण भैया हा असा एक दुवा आहे, की ज्याच्या मदतीशिवाय ती हे काम करूच शकत नाही. या कामासाठी भैयाचं मन वळवण्यात तिला बरंच रक्त आटवावं लागलं. तेव्हा कुठं तो तयार झाला. तो स्वत: यात होरपळून गेलाय म्हणूनच. आता मात्र आपल्याला फार विचारपूर्वक वागायचं होतं, याची तिला जाणीव होती.

भैयाचा लगेच फोन आलाच. ''मॅडम, मैने पुरा बंदोबस्त कियेला है। तुम इधरकी चिंता मत करो. पहलवान एकदम कल दोपहरमे आयेगा. आंटी को ठर्रेकी दो बोतले जादाकि दिया है। बाकी लडकिया. अपने अपने कामों मे है। जिनका

बिस्तर खाली है वो ठर्रा लगाके सोयेंगी। यहाका मैने तो सब देख लिया! अब आगे की तुम बताओ.”

भैया बोलत होता, तेव्हाच तिचंही डोकं वेगाने चालायला लागलं होतं. असं काही काम करायचं म्हणजे हुरळून न जाता तिचा मेंदू न अडखळता धावायला लागतो. फक्त कन्फ्युजन नको आणि एखादं काम एकदा करायचं ठरविलं की मग तिला कन्फ्युजन नसतंच. मनात प्रत्येक कामाची स्वतंत्र स्वच्छ मांडणी होते. भैयाला तिनं सांगितलं, “तू साडे अकरा वाजता तिला मंगळवारीच्या तोंडावर घेऊन ये. डॉ. ढेमस्यांच्या दवाखान्यासमोरची जी पडकी माडी आहे, त्याच्याखाली माझी लाल रंगाची मोठी गाडी उभी राहील. माझ्यासोबत दोन माणसं असतील. ती आपल्या कामात फक्त मदत करणारी आहेत. मैं अब आगेके काम मेलगती हू । तुम मुन्नीको बराबर लेके आना! उसको बोलना, चौकमे ताई आयी हुई है बाकी कुछ भी नही बताना ।”

“जी मॅडम. मॅडम रखता हूं”

“संभालके काम करना भैया. तुमको आगेमें तकलीफ नही होनी चाहिये.”

“जी मॅडम. आप चिंता मत करना.”

त्याने फोन ठेवला. चिंता मत करना... यात थोडी जरी गडबड झाली, तरी भैयाच्या जिवावर उठणार होतं. त्यामुळे तिला दुहेरी काळजी होतीच. शिवाय मुन्नीची तर त्याहून. त्या निष्पाप जिवाचं अजून आयुष्यही सुरू झालं नव्हतं, तोच तिला अशा चिखलात चक्क तिच्या सख्ख्या बापाने आणि मामाने आणून टाकलं, याला काय म्हणायचं? याच्यापेक्षा वाईट भोग कुणाच्या वाट्याला येणार? आजचं काम खूप क्लिष्ट होतं. साडे अकरा बारा ही खरं तर वर्दळीचीच वेळ. या वेळेचा फक्त एक फायदा त्यांना मिळणार होता. गंगा-जमुना-मंगळवारी हा एरिया केवळ

a

गल्लीबोळांचा. रिक्षेवाल्यांचा, हातठेलेवाल्यांचीच नुसती गजबज. रात्री साडेअकराच्या पुढे गंगाजमुनात येणारे गिऱ्हाईक फारच तुरळक. जे येणार तेही दारूच्या नशेत झोकांड्या खात. यावेळी पोलिसांचं गाड्यांकडे फारसं लक्ष नसतं. ते आरामात एखाद्या पानठेल्यावर उभे राहून एकतर गप्पा मारत बसलेले असतात, नाही तर, सिग्नलपासून थोड्या अंतरावर रॉंग साईडवर उभे असणार. तीन नल चौकाकडे जाणाऱ्या गल्लीच्या तोंडाजवळ पोलीस उभा राहतो आणि शॉर्टकटने जाऊ पाहणाऱ्या दुचाकी वाहनाला ‘रॉंग साईड’ म्हणून अलगद पकडतो. रात्रीचे चार-पाच बकरे पोलिसांना मिळाले, की आपोआप डिसेंबरच्या थंडीतही तो गस्त घालण्याइतपत उबदार झालेला असतो. शिवाय रात्री बारानंतर ‘गाडी कहासे आ रही, कहा जा रही’ असल्या त्यांच्या प्रश्नांची सरबत्ती आपल्यापर्यंत पोचत नाही. खरं तर गाडी उभी असताना चुकून त्यांचं लक्ष आपल्याकडे गेलंच, तर सरळ सांगता येतं, ‘अस्पतालमें आये है’ । समोरचा डॉ. ढेमस्यांचा बोर्ड त्यासाठी तरी आपल्या उपयोगी येणारच.फोन ठेवल्याबरोबर आधी तिनं गिझरचं बटन सुरू केलं. आंघोळ करताकरता तिचं डोकं आणखी बऱ्यापैकी चालतं. पाच मिनिटांत गिझरचं पाणी कडक होतंच. तिनं आणखी एक फोन लावला. तिला सोबत हवीच असंही नव्हतं. पण अशावेळी एकसे दो भले. ‘कुणाला सोबत न्यायचं?’ वगैरे गोंधळ डोक्यात नव्हताच. ते तर भैयाशी बोलतानाच स्पष्ट झालं होतं. म्हणून तर लगेच “लाल कलरकी गाडी” सांगून मोकळी झाली होती. तिनं मोबाईल केला. “सुरेश, कुठे आहात?”

“हिंगणा.”

“अरे यार कधी येणार?”

"का बरं हो. काय काम आहे?"

"काम खूप महत्त्वाचं आहे. पण साडेदहा वाजेपर्यंत तुम्ही नागपुरात पोचणार असाल तरच सांगते."

"हो, येतो नं. बस एका कस्टमरसोबत जमिनीच्या किमतीवर चर्चा चालली आहे. तेवढी आटोपली की येतो. सांगा नं काय म्हणता?"

"नक्की येणं होईल काय सुरेश तुमचं? जमत नसेल आणि नाही आलात तरी चालेल. पण येणार असाल तर नक्की यायला पाहिजे. नाही तर ऐनवेळी पंचाईत व्हायची."

"नाही. नक्की येतो. सांगा कुठे येऊ?"

"साडे दहा वाजता तुम्ही सोसायटीतच या. मी आता जे सांगते आहे, ते तिकडे कुठेच बोलू नका. तिथून आत्ता तुम्ही माझ्याकडे येणार आहात, आणि इथून आपण पुढे कुठे जाणार आहोत, हेही कुणाला कळता कामा नये. अगदी या कानाचं त्या कानाला. तुमचा ड्रायव्हरही सोबत नको."

"पण जायचं कुठं?"

"गंगाजमुनात."

"काय?" सुरेशराव दचकलेच. सुरेश आमचा एकदम सभ्य मित्र. बाकीचे गावभरचे कारभार खूप करतो तो. व्यवहार करण्यात, जमिनी खरेदी-विक्री करण्यात, करोडोच्या उलाढाली करण्यात एकदम तरबेज. त्याच्या डोक्यात सारखी बेरीज आणि गुणाकाराचीच गणितं चाललेली असतात. भागाकार वजाबाकीशी पार वाकडं असावं त्याचं. मात्र बाई म्हटलं, की बोबडी वळते. नुसतं गंगाजमुना ऐकूनच तो जागेवर ओला झाला असेल.

a

"घाबरू नका. आपल्याला काही सौदा करायला नाही जायचंय. आमच्या एका पोरीला तिथून आणायचं आहे."

"मॅडम, तुमच्यासारखा 'माणूस' सोबत असल्यावर मी कशाला घाबरतो. पण काम काही सहजसाधं नाही. एवढी मोठी रिस्क तुम्ही कशाला घेता?"

"ते जाऊ द्या. आतापर्यंत दोनदा यशस्वीपणे केलंय मी हे काम. पण त्या बायका थोराड होत्या. त्यांची तिथे फारशी उपयुक्तता नव्हती. ही पोरगी लहान आहे. हिच्यावर नजर आहे त्या लोकांची. त्यांच्यासाठी ती 'माल' आहे. रोजची रास येऊन पडेल. तिला त्या नरकातून मला काढायचंच आहे. तुम्ही नक्की या. तुम्हाला काहीही करायचं नाहीये. फक्त तुमची गाडी असेल आणि तुम्हाला गाडी चालवायची आहे."

"येतो मॅडम."

"ठीक आहे."

तिनं मोबाईल बंद केला आणि आंघोळीसाठी ती आधी बाथरूममध्ये घुसली. गरम पाणी अंगावर पडताच तिला अगदी स्वर्गसुख मिळालं.

दिवसभराचा सगळा शीण, नको ते विचार, नको त्या गोष्टी सगळ्या धुऊन स्वच्छ झाल्या. व्वा. असं कडक गरम पाणी मिळणं यापेक्षा दुसरं सुख नाही बाबा. नाही तर साले ते हॉटेलचे गिझर. एक मिनिट गरम पाणी तर दोन मिनिट थंड पाणी. असा कॉक करा नि तसा कॉक करा. वैताग. आंघोळीचा सारा मूडच जातो ना माणसाचा. पण मजा आली. मनाजोगी गरम पाण्याने आंघोळ झाली, की पुढच्या कामालाही हुरूप येतो. गाऊन चढवून बाथरूमच्या बाहेर आल्याबरोबर खूप भूक लागल्याची वैदेहीला जाणीव झाली. त्यामुळे तिनं आधी पाय किचनकडेच वळवले.

a

दुपारची भाजी गरम करून आधी मस्तपैकी जेवायला घेतलं, तोच तिचा मोबाईल वाजला. मुलाचा फोन. "बोल, काय म्हणतोस?", ती म्हणाली.

"मम्मी. नागपुरात आलोय. जरा वेळाने घरी येतोय."

"अरे... आत्ता कसा काय आलास तू?" त्याच्या अचानक येण्याने आपलं काम डिस्टर्ब होऊ शकत होतं याची तिला लगेच जाणीव झाली. "आता नाही गं. मघाशीच आलो सात वाजता. पण अक्षय उद्या मुंबईला जायचा आहे, म्हणून आधी त्याला भेटायला इकडे आलोय, रेशीमबागेत. सुनीलपण आलाय इथेच. तू कुठे आहे? घरी पोचलीस का? का जरावेळाने येऊ? कारण मी माझ्याजवळची फ्लॅटची चाबी आणायला विसरलो."

"अरे तू... तू..." आपण अडखळतो आहोत याचा तिचाच तिला राग येत होता. पण आत्ता ईशान घरी येणं चालण्यासारखं नव्हतंच. डोक्यात सेट झालेले सगळे विचार, प्लॅन्स विस्कटणार होते. शिवाय असं धोकादायक काम करताना पोरं तिला आजूबाजूला नकोच असतात. सगळं 'आईपण' विसरून तिला ते धोक्याचं काम करायचं असतं. शिवाय तो घरी येणार म्हणजे आधी त्याच्या खाण्यापिण्याचं पाहायचं. किंवा तो सरळ बाहेरूनही जेवण करून येऊ शकतो. पण 'आता एवढ्या रात्री कशाला जातेस?' असा सहज साधा प्रश्न त्याचा असूच शकतो. आणि त्याला खरं काय ते सांगितलं, तर त्याच्यातला समंजस, काळजीवाहू मुलगा लगेच जागृत होणार. 'मम्मी एवढ्या रात्रीची एवढ्या भयंकर कामासाठी तेही अशा वस्तीत तू जातेच कशाला? हे भलतंच धाडस तू करतेसंच कशाला? वगैरे' ..

"हॅलो... हॅलो... मम्मी, आवाज ऐकायला येत नाहीये काय? कार्यक्रमात आहेस काय कोणत्या?"

“ईशान, अरे मी बाहेर आहे आणि घरी पोचायला मला अजून खूप वेळ आहे. कदाचित दोनही वाजतील.” त्याला असं खोटं सांगताना तिला वाईट नक्कीच वाटत होतं. पण इलाज नव्हता. रात्री अकरा वाजता गंगाजमुनातून एका पोरीला बाहेर काढायला जाताना ती घरी येईपर्यंत त्याचा जीव तिला असा टांगणीला लावायचा नव्हता. शिवाय ते दोघं एकत्र असताना शांत राहूच शकत नाहीत. काहीतरी बोलत असतात आणि त्या दोघांजवळही एकमेकांना सांगण्यासारखं खूप काही असतं.

“ठीक आहे. एक काम करतो. आता आम्ही बाहेरच जेवतो आणि मनीषकडे जाऊन झोपतो. सकाळी येतो.”

“ठीक आहे.”

“ठीक आहे. बाय. उद्या करते मी तुला फोन.”

“ठीक. ठीक.”

ईशानचा फोन ठेवताना तिला थोडंसं वाईटही वाटत होतं. जरी आठ-दहा दिवसांतून त्याचं येणं असतंच तरी गावात येऊन आपल्या कामामुळे आज पोराला घरी येऊ दिलं नाही, हे कुठेतरी खटकलंच. पण मुन्नीचं आयुष्य यापेक्षा निश्चितच खूप महत्त्वाचं होतं. शिवाय आजचा दिवस गेला तर अशी संधी परत कधी उपलब्ध होते, काय सांगावं? पोटात भुकेचा डोंब उसळला होता. तिला भूक अजिबात धरवत नाही. पोट भरलेलं असलं की विचारांची संगतीही नीट लागते. एक पोळी खाऊन संपत नाही तोच परत मोबाईल वाजला. ‘सुरेशराव कॉलिंग.’

“हॅलो. काय म्हणता?”

“मॅडम जरा प्रॉब्लेम झाला हो.”

“काय हो, काय झालं?”

“माझं काम लवकर आटोपेल असं वाटत नाही.”

“ थोडक्यात येणं जमणार नाही. फक्त मघाशीच सांगितलं असतं, तर जास्त बरं झालं असतं” ती कोरडेपणाने म्हणाली.

“नाही. तेव्हा मला वाटलं होतं की माझं काम लवकर आटोपेल.”

खरं तर वैदेहीचं डोकं लगेच सटकलं होतं. हा सभ्य बायको-पोरांचा माणूस नाही का म्हणतो हेही तिच्या लगेच लक्षात आलं होतं. तीन वर्षांपूर्वी याच्या मित्राच्या तरुण बहिणीला तिच्या लेकींसह अशाच एका बदमाशाच्या तावडीतून तिनं तिच्या जिवावर उदार होऊन बाहेर काढलं होतं आणि आता दुसऱ्या कुणाच्यातरी मुलीला बाहेर काढताना या माणसाने अशी सावध भूमिका घ्यावी? अर्थात हे काही नवीन नव्हतं. हे नेहमीचेच अनुभव असतात. शिवाजी दुसऱ्याच्या घरात जन्माला यावा माझ्या घरात नाही. असं वाटणारेच अनेक असतात. लोकांवर संकटं आली, ते काही प्रॉब्लेममध्ये असले तर आमच्यासारख्या कार्यकर्त्यांनी आमचं व्यक्तिगत आयुष्य सोडून धावायला पाहिजे. ते आमचं कर्तव्यच आहे. पण आम्हाला लोकांची गरज असेल, तेव्हा हे लोक काहीतरी कारण सांगून मोकळे होणार. म्हणून तर आमच्या चळवळी मोठ्या होत नाहीत, वाढत नाहीत. तिच्या मनात क्षणभरात हजार प्रश्न हिंदकळले.

“काही हरकत नाही सुरेशराव. बघते मी दुसऱ्या कुणाला तरी. पण धन्यवाद. तुम्ही किमान अर्धा तास आधी मला कळवलं.” माझ्या बोलण्यातला तिरकसपणा त्यांना जाणवला.

“मॅडम, प्लीज रागावू नका नं. राग आला काय?”

“नाही हो. राग कशाला येईल? ठेवते.”

a

तिनं मोबाईल बंद केला आणि आधी पोटभर जेवण केलं. आता पूर्ण जेवण झाल्याशिवाय एकही फोन उचलायचा नाही, असं ठरवलं. जेवताजेवता कुणाला सोबत घ्यावं? मुळात कुणाला सोबत घ्यावं की एकटंच जावं, हाही विचार करून बघितला. सोबतीचा मुख्य फायदा होणार होता, ड्रायव्हिंग दुसरं कुणीतरी सांभाळणारं असलं, की घाबरलेल्या मुन्नीला ती धीर देऊ शकणार होती. मुन्नी जेवढी तिथे आहे म्हणून घाबरलेली आहे, त्यापेक्षा कितीतरी जास्त ती गाडीत बसल्यावर घाबरणार आहे, याची तिला कल्पना होती. विचार करताकरता तिच्या नजरेसमोर परत एक नाव तरळलं. सुहास. सुहासलाच म्हणावं. तो नक्की येईल. एकतर या विश्वाचंच त्याला प्रचंड आकर्षण आहे. आपल्या कामाबद्दलही त्याला आकर्षण आहे आणि मुख्य म्हणजे आपल्यावर त्याचा जीवही आहे. नेहमीची संस्थेसाठी कामं करणारी पोरं यावेळी तिच्या कामाची नव्हती. वैदेहीनं जेवण आटोपून आधी औषधं घेतली आणि मोबाईल हातात घेतला.

“सुहास.”

“बोऽऽला” त्याचा नेहमीचा चेष्टेचा सूर. “मस्करी नको. अतिशय गंभीर गोष्टीसाठी तुला फोन केलाय. तुला माझ्यासोबत कुठेतरी यायचं आहे. चलशील?”

“कुठेतरी काय. कुठेही. अरे यार, तू म्हण तर. जंगलात काय राजस्थानच्या वाळवंटात सुद्धा येतो की नाही ते बघ.”

“सुहास... प्लीज, आय ॲम रिअली सिरियस.”

“ओ. के. ओ. के. सांग. कुठे जायचंय? काय काम आहे?”

"सुहास, गंगाजमुनातून एका मुलीला आणायचं आहे. तुला तुझी गाडी घेऊन यायचं आहे. माझी गाडी तिकडे सारे ओळखतात. त्यामुळे ती नेता येणार नाही आणि गाडी तुला चालवायची आहे."

"गंगाजमुना? बापरे. मी? माझी तिकडे फिरकण्याची सुद्धा हिंमत नाहीये."

"अरे राजा, तुला तिकडे फिरकण्याची सवय आहे म्हणून नाही रे मी तुला तिकडे चल म्हणत. तू माझ्यासोबत मुकाट चलशील आणि नीट गाडी चालवशील, एवढीच आज माझी तुझ्याकडून अपेक्षा आहे."

"चिडू नको ग बाई अशी. येतोय ना. मी आपलं सहज तुला सांगितलं. बरं सांग, कुठे यायचं आणि किती वाजता यायचंय?"

"माझ्या घरापासून गंगाजमुनात जायला पन्नासेक मिनिटं लागतात. आपल्याला तिथे रात्री बरोबर सव्वा अकराला पोचायचं आहे. त्यामुळे माझ्या घरापासून आपण सव्वा दहाला निघू या. तू सोसायटीत आलास की मला मिस कॉल दे. मी खाली येते. चालेल? आणि हो घरी किंवा कोणत्याही मित्राला आपण कुठे जातोय, ते सांगायचं नाही. कळलं?"

"हो गं माझे आई. एवढा काही मी ढं नाही हं."

"ढं नाहीच रे तू. उलट अति हुशार आहेस."

"बरं, बरं. ठेवतो आता फोन. आणि वेळेवर येतो. निश्चिंत राहा."

सुहासचा फोन बंद झाला आणि तिनं नि:श्वास सोडला.

सुहास नक्की येणार याची तिला खात्री पटली होती. ती शांतपणे खुर्चीवर येऊन बसली. डोळे बंद करून ती विचार करत होती. भैया सगळं तिकडलं नीट पार पाडेल ना; याची मात्र काळजी होती. भैयाचा विश्वास ज्यादिवशी संपादन केला,

a

तो दिवस आयुष्यात फार मोठा विजयाचा दिवस होता. त्या वस्तीमध्ये काम करताना जीव मेटाकुटीला येत होता. त्या बायकांना समजावून सांगणं किती कठीण आहे, हे जो तिथे जाऊन येतो, त्यालाच कळू शकतं. आपल्या भल्यासाठी इथे येऊन कुणी काही करेल, यावर त्यांचा विश्वासच नसतो. त्यांनी विश्वास ठेवावा तरी कसा? सारे त्यांना ओरबाडणारेच तर असतात. ज्वारीच्या कणसातून साराच्या सारा जोंधळा तीनतीनदा झाडून झटकून बदडून काढला जातो, अगदी त्याची पिसं गळेपर्यंत. तसेच त्यांना ओरबाडणारे असतात. 'आपल्या शरीराची स्वच्छता' या विषयावर त्या वस्तीत कार्यक्रम ठेवला होता, तेव्हा तिच्याशी दोन शब्दही बोलायला कुणी तयार नव्हतं. अर्थात हीच अपेक्षा होती. पण ती निराश झाली नाही की हिरमुसली नाही. जात राहिली. खरं तर त्या गल्लीत जायलाच तिला नकोनको व्हायचं. घाण. सारीकडे घाण. गरिबी, उघडेनागडे शरीरं. बिभत्स हावभाव, विकृत शारीरिक हालचाली. डोळयांची नेत्रपल्लवी वगैरे नाहीच. 'चल आता क्या? कितने मे?', 'ए बैठता क्या रे?', 'क्यू बे सौ रुपये भी नही क्या?' अशी सरळ-सरळ भाषा. सुरुवातीला हे सारं बघून आणि ऐकून शिसारी यायची. अंगावर काटा उभा राहायचा. अगदी पहिल्या दिवशी तर तिथून बाहेर पडल्यापडल्या वैदेही भडाभडा ओकली होती. तो उग्र दर्प साऱ्या वातावरणात तिथं भरून होता. पण तिनं जायचं सोडलं नाही. आठ दिवस झाले, की पाय तिकडे ओढले जायचे. 'का आहे मला एवढी असोशी?' हा प्रश्न हजारदा ती स्वत:ला विचारायची. हळूहळू प्रत्येक बाईसोबत ती बोलायला लागली. तिथली प्रत्येक स्त्री एक कादंबरी आहे. किती भोग आहेत, त्या प्रत्येक बाईच्या वाट्याला! कुणीच तिच्यापर्यंत पोचून तिचा विचार का करीत नाही? कितीतरी बायकांच्या व्यथा आपण आजपर्यंत ऐकल्या. पण मुन्नीला जेव्हा पहिल्यांदा आपण बघितलं तेव्हा डोळयासमोर एकदम अंधारीच आली. असं कसं? ही पोरगी?... ही

अकरा-बारा वर्षांची लहानशी पोरगी... इथलीच.. याच शहरातली... आणि बाप... चक्क सख्ख्या बापाने. सोबत सख्खा मामाही! नाही. काहीतरी चुकतंय आपलं. नीट ऐकलं नाही काय? बाप. सख्खा बाप. छे. भलतंच काय?... काय...! पण तिच्या दुर्दैवाने हे खरं होतं. मुन्नीचा बाप जो गेल्या पंचवीस वर्षांपासून आंटीचा गिऱ्हाईक होता, त्यानं एक दिवस सरळ पोटची पोरगीच आंटीसमोर आणून उभी केली. दोन हजार! फक्त दोन हजारांत!! किती तास की किती दिवस पुरले असतील ते दोन हजार रुपये त्या हरामखोर बापाला? त्या दोन हजारांसाठी का त्याला हा सौदा करावासा वाटला? का त्याचीही काही मजबुरी होती?

सशाच्या पिल्लासारखे मुन्नीच्या डोळ्यातले भित्रे भाव पहिल्यांदा जेव्हा वैदेहीने बघितले तेव्हा आपल्या सुखावलेल्या ऊन-ऊन आयुष्याचीच लाज वाटली तिला. काय दोष होता त्या एवढ्याशा पोरीचा? का तिच्या प्राक्तनात हे दुर्दैवाचे दशावतार होते. मेडीकल चेकअपच्या निमित्ताने डॉक्टरजवळच उभ्या असलेल्या तिला मुन्नीचं सारं शरीरच आपल्याशी संवाद साधतंय हे लक्षात आलंय. दुःखानं तिचंच मन थरारलं. त्या लहानशा पोरीच्या डोळ्यातलं न मावणारं दुःख तिनं आपल्या डोळ्यानी पिऊन टाकलं. तिला थोपटलं. आईच्या ममतेनं थोपटलं. आणि त्याचवेळी वैदेहीनं निर्धारही केला, “ या पोरीला मी इथून बाहेर काढीलच.” मुन्नीलाही कदाचित ही भाषा कळली. त्यानंतर कधीही बस्तीत वैदेही आली की मुन्नी तिच्याकडे यायचीच. बोलायची...कधी न बोलताच गपचूप तिच्या आसपास वावरायची. तिच्यावर झालेल्या शारीरिक आणि मानसिक आघाताने ती जरा बधिरल्यासारखी झाली आहे, हे वैदेहीच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. त्यामुळे ती मुन्नीकडे विशेष लक्ष द्यायची. तिच्या घट्ट बंद करून ठेवलेल्या ओठांच्या आत भुयारातला अंधार दडलाय, हे वैदेही जाणून होती. तिच्या कलाकलाने घेत

तिला समजून घेऊन तिच्या मनात पूर्ण विश्वास मिळवला होता वैदेहीनं. आणि एक दिवस संधी मिळताच,

"माझ्यासोबत माझ्याघरी चलशील?"

"तुमच्या घरी? कायले? आन आंटी जाऊ देल?"

"आंटीला नाही सांगायचं."

"मंग कशी जाऊ? लंगड्याचं लक्ष रायते. तो हालू नाय देत इथून."

"भैयासोबत बाहेर पडायचं. तो माझ्या विश्वासातला आहे."

"नाही. मले भेव लागते."

"भ्यायचं नाही. मी आहे ना."

"तुम्ही कुठं न्यान? दुसरीकडं विकान?"

"नाही गं." वैदेहीनं तिला पोटाशीच घेतलं. प्रेमानं तिच्या केसांतून हात फिरवला. तिच्या जाड केसांचे पार दोरखंड झाले होते.

"माझ्या घरी नेईल."

"आन विमली. पक्या?"

"हे कोण?"

"माहे बहीनभाऊ"

"त्यांच्याजवळ पण जाऊ. ते नंतर. आधी तुला इथून बाहेर पडायचं ना?"

"हो. इथं मले भेव लागते. गंदेगंदे मानसं येतेत इथं."

"माझ्याकडे येशील?"

“येऊ? तुम्ही नै मले तरास देसाल?”

“नाही. मी नाही देणार तुला त्रास. मी माझ्या घरी ठेवेन तुला, पण हे कुणालाच सांगायचं नाही. भैयाला मी सारं सांगेन. तो खूप चांगला आहे. त्याचा जीव आहे तुझ्यावर. तो जेव्हा चल म्हणेल, तेव्हाच त्याच्यामागे जायचं. पण कुणाला संशय येईल असं वागायचं नाही.”

“तुम्ही नक्की न्याल मले इथून?”

साऱ्या जगातली वेदना त्यावेळी तिच्या डोळ्यात वैदेहीला दिसली होती. पोटातून उमाळा आला होता त्याक्षणी वैदेहीला. तो आजतागायत टिकला.

मोबाईल वाजला म्हणून तिचं लक्ष घड्याळाकडे गेलं. दहा वाजून पाच मिनिटं. बापरे. आपण तर मस्त गाऊनमध्येच बसले आहोत अद्याप, पण तो लेकीचा फोन होता. वैदेही तिला म्हणाली, ‘सकाळी बोलू या बेटा. जरा गडबडीत आहे.’ लगेच कपडे बदलून ती तयार राहिली. आता कुठल्याही क्षणी सुहासचा फोन येईल. आपण आधीच तयार असलेलं बरं. अपेक्षेप्रमाणे सुहासचा फोन आलाच. “बोल आलास खाली?”

“पाच मिनिटांत येतो. बजाजनगरला पोचलो आहे. तू जेवलीस?”

“होय. मस्त. खूप भूक लागली होती. का? तू नाही जेवलास?”

“घरी गेलोच कुठे? घरी जेवायला गेलो असतो, तर बायको म्हणाली असती आता थंडीचे एवढ्या रात्री कुठे जाताय? त्यापेक्षा अजून गेलोच नाही. आता भेळ

a

खातो. आणि लगेच येतो. पण मी मिस कॉल दिल्यावरच तू खाली उतर. नाही तर परत तुझी चीडचीड व्हायची वाट पाहायला लागल्यामुळे.”

“ठीक आहे. ये तू पटकन भेळ खाऊन.”

आणखी पाच मिनिटं काय करायचं हे न कळूनच की काय तिच्या लक्षात आलं, आज तर आपण आल्यापासून टीव्ही लावलाच नाही. बातम्या पण ऐकल्या नाहीत. म्हणूनच ‘आजतक’ चं चॅनेल सुरू केलं. पण केबलवाल्याची लाईन गेलेली. त्यामुळे टीव्हीवर मुंग्यांशिवाय काही दिसत नव्हतं. मग ती फक्त बसून राहिली. काहीही न करता. सुहास बजाजनगरपर्यंत आलाय म्हटल्यावर ती अस्वस्थता आता तिला नव्हतीच. मोबाईल वाजतोय. वंदूचा नंबर. पण कुणाचेच फोन आता घ्यायचे नव्हते. घ्यायची इच्छा होत नव्हती. मुन्नी... फक्त मुन्नी तिच्या डोळ्यासमोर दिसत होती. एकदा मुन्नीला गाडीत बसवून घरापर्यंत आणलं की निश्चितच ती यशस्वी होणार होती. तिला एकदा घरापर्यंत आणल्यावर आपल्याजवळून तिला कुणीच दूर करू शकणार नव्हतं, तिचा सख्खा बाप देखील आपल्याला जाब विचारू शकत नव्हता. आणायचंच, हा निर्धार पक्का होता. आज मुन्नीला घरी आणायचंच. भैयाने आपल्यासाठी एवढीमोठी जोखीम घेतली आहे. आजचा दिवस तिच्या आयुष्यातलं फार मोठं आव्हान आहे. आज एवढीशी चूक मुन्नीचं आणि भैयाचं आयुष्य नरक बनवू शकते. तिथल्या पोलिसांचा ससेमिराही मागे लागू शकतो. त्यांची कटकट तर आणखीच वेगळी. आपल्याकडले बहुतांश पोलीस चिरीमिरी खातखात ड्युटी करण्यातच धन्यता मानतात. त्यांना कुणाच्या आयुष्याशी काही देणंघेणं नसतं. नाहीतर मुन्नीसारखी अल्पवयीन पोरगी तिथे कशी राहिली असती? आणि मुन्नी काय एकटीच थोडी अल्पवयीन आहे, कितीतरी पोरी तिथे अल्पवयीन आहेत. अधूनमधून पोलीस धाड टाकण्याचं कर्तव्य पार पाडतात.

त्याचाही बायकांनाच त्रास. तिथे जाणारे टगे कमी पकडले जातात आणि बाया जास्त. गिऱ्हाईक कमी आणि व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया जास्त हे व्यस्त प्रमाण धरपकडीत कसं काय? हा तिला नेहमीच छळणारा प्रश्न आहे. त्या बाया तिथे व्यवसाय करतात म्हणून पोलीस पकडतात, असं असतं, तर ती वस्ती तिथे व्हायलाच नको होती आणि धरपकड असते, म्हणजे जिच्यासोबत गिऱ्हाईक आहे तिलाच पोलीस पकडत असणार. दहा गिऱ्हाइकांना पकडत तेव्हा दहाच बायकांना पकडावं ना. पण नाही. बाया नेहमी जास्तच. जी काय त्यांच्याजवळ चिरीमिरी असेल, ती घ्यायची, दहा-पंधरा मिनिटं स्वत:ही त्या बाईला भोगायचं आणि सोडून द्यायचं, हा यांचाही 'धंदा.'

फोन वाजला. सुहासचा मिस कॉल. ती पटकनच उठली. पायात चप्पल घातली. पर्स घेतली, दाराला कुलूप लावलं आणि बाहेर पडली. ती गाडीपर्यंत येईस्तोवर सुहासने त्याची गाडी वळवूनही ठेवली होती. म्हणजे सुहासला खऱ्या अर्थी कामाचं आणि वेळेचंही महत्त्व लक्षात आलंय हे तिला कळलं. पण मघापासून तिच्या डोक्याला एकच प्रश्न कुरतडत होता. भैयाला आपण मोठी लाल गाडी सांगितली, ती रद्द होऊन सुहासची पांढरी सॅन्ट्रो आहे, हे आपण त्याला अजूनही सांगू नाही शकलो, त्यामुळे फार गडबड होण्याची शक्यता आहे. पण भैयाचा फोन आल्याशिवाय ती त्याच्याशी आजतरी संपर्क साधूच शकत नाही. एसटीडी बूथवर आपण फोन करून त्याला बोलवायला सांगितलं, तर उद्या जेव्हा मुन्नी नाही ही गोष्ट उघडकीस येईल, तेव्हा सर्वात आधी हीच गोष्ट पुढे येईल आणि पहिलवानची सगळी संशयाची सुई आपल्यावरच स्थिरावेल. गाडी बदलल्यामुळे ती अस्वस्थ झालीच होती. पण तिच्या स्वभावाप्रमाणे 'देखा जायेगा आगे का आगे' म्हणून ती सुहाससोबत बाकी गोष्टींवरच चर्चा करायला लागली. तसंही ते वेळेतच पोहोचणार

होते. त्यामुळे दवाखान्यासमोर आपणच दहा मिनिटं आधी जाऊन उभं राहिलो की भैयाची फार अडचण होणार नाही. "सुहास, ती मुलगी आपल्या गाडीत बसल्यानंतर आपण तिथून लगेच बाहेर पडू. पण माझ्या घराच्या दिशेनं नाही. विरुद्ध बाजूनं. गल्लीबोळातून तुला वाटेल, तिथून तू गाडी काढ. कुठून घेऊ आणि कोणत्या गल्लीत टाकू हे मला तू विचारू नको. इकडला फारसा भाग तुला माहीत नाही; हे मला माहीत आहे, पण आपल्याला निरुद्देश अर्धा-पाऊण तास गाडी चालवायची आहे. दीड वाजल्यानंतरच सोसायटीत ही गाडी शिरली पाहिजे आणि तू कोणत्याही गल्लीत गाडी टाकली तरी ती कुठून तरी कुठे तरी निघणारंच ना. फक्त मेनरोडवर लगेच नको टाकूस गाडी. कळलं?"

"कळलं, कम्माल आहे गं बाई तुझी. पाया पडायला पाहिजेत तुझ्या. जिवावर उदार होण्याची तुला..."

"पुरे सुहास. हा विषय बंद."

"बरं. पण एक लक्षात घे, आता हा विषय मला पूर्ण समजलेला आहे, त्यामुळे माझ्याकडून गाडी चालवून तिथून तुम्हाला सुरक्षित बाहेर काढण्यात काहीही चूक होणार नाही, याची तू खात्री बाळग."

त्यानंतर मात्र ते दोघंही एकमेकांशी काहीच बोलले नाही. गांधीबागेतून टेलिफोन एक्स्चेंजपर्यंत निमूटपणे आल्यावर तिनं त्याला डावं, उजवं-सरळ-उजवं अशा सूचना देतदेत डॉ. ढेमस्यांच्या दवाखान्यासमोर आणलं, आणि दवाखान्याच्या समोरच्या गजभियेच्या माडीखाली गाडी उभी करायला सांगितलं. गल्लीत. त्यातही रस्त्यावरचा दिवा नाही. त्यामुळे गाडी फारशी कुणाच्या लक्षात येण्याचं कारण नव्हतं. दवाखान्यासमोर सायकली, लुना आणि दोन-चार स्कुटर्स होत्या. पण फारशी वर्दळ नव्हतीच. दवाखान्याच्या तीस अंशाच्या कोनात त्यांची गाडी उभी

a

असल्यामुळे गाडी पटकन कुणाच्या नजरेत भरणार नव्हती. घड्याळात बरोबर अकरा वाजून बावीस मिनिटे झालेली होती. म्हणजे फार आधी ते पोहोचले नव्हते. भैयाला साडे अकराची वेळ दिलेली होती. भैया वे◌ेळेवर काम करणार याची तिला खात्री होती. गाडीचे दिवे लावून ठेवून ते गाडीतच बसून राहिले.

ती तर गाडी उभी होताच मागच्या सीटवर येऊन बसली. ड्रायव्हरसीटवर सुहास बसूनच राहिला. तिची नजर समोरच्या गल्लीत होती. भैया समोरून आल्याआल्या तिला दिसायलाच हवा होता. त्याला गाडी शोधायला नको होती. पोलिसांनी चांभारचौकशा करण्याचा प्रयत्न केलाच तर ‘दवाखान्यात पेशंट गेलाय ’ हे सुहास ड्रायव्हरसारखा सांगणार होता. शेजारच्या बोळीत गिऱ्हाईक आणि एका बाईत भाव ठरण्यावरून घासाघीस चालली होती. व्हेस्पावर बसून काळ्या जर्सीतला चाळिशीतला पुरुष ‘त्या ’ बाईसोबत लाडेलाडे बोलत होता. पण ती या धंद्यात मुरलेली दिसत होती. डीप लो कट ब्लाऊज आणि भडक मेकअप लगेच डोळ्यात भरत होता आणि डोळ्यांना त्रासही देत होता. गुलाबी लिपस्टिक, डार्क गुलाबी साडी आणि गुलाबीच प्लॅस्टिकची चप्पल. डोक्यात चाफ्याची चार फुलं. हिला चाफा इथे कुठे सापडला असावा? पण लगेच लक्षात आलं की, या गल्लीतून सरळ पुढे गेलं की गांधीबागचा मेनरोड येतो आणि कॉर्नरवर तर फुलवाला बसतो. उलट रोज संध्याकाळी शे-दीडशे बायका हमखास त्याच्याजवळून कोणती ना कोणती फुलं घेत असणार. व्हेस्पावाल्याच्या मनगटावर गजरा बांधलेला होता. ती त्या गजऱ्यावर हात फिरवतच त्याच्याशी बोलत होती. बहुधा तो तिचा नेहमीचाच गिऱ्हाईक असावा. महिन्याचा शेवट असल्यामुळे असे नेहमीचेही गिऱ्हाईक त्यांना नेहमीचे पैसे देऊ नाही शकत. पण ही त्याच्यासोबत कमी पैशात जायला तयार नव्हती. दवाखान्याच्या समोरच एक माणूस खूप दारू ढोसून तोल गेल्यामुळे पडला

a

होता. आपण जमिनीवर पडलो, याचेही बहुधा त्याला भान नव्हते. पलीकडच्या गल्लीत मात्र अजूनही बऱ्यापैकी वाहतूक दिसत होती. पण त्यातले बहुतांश दारूच्या नशेत होते. तेवढ्यात सायकलवरून येणारा एक पोरगा मोठा दगड चाकात आल्यामुळे अडखळला आणि त्याचा तोल जाताजाता सावरला. मग तो सायकलवरून खाली उतरला आणि चोरट्यासारखी नजर त्याने सारीकडे फिरवली. त्याची नजर फिरत असतानाच तिनं त्याच्याकडे पाहिलं. आणि पाहतच राहिली. हा... हा चेहरा तर आपल्या ओळखीचा आहे. कोण? कोण आहे हा? कुठे पाहिलं आपण याला! त्याला ती दिसण्याचा प्रश्नच नव्हता. पण तिला तो स्पष्ट दिसत होता. त्याने आता हातात सायकल पकडून खिशातून रुमाल काढला. तोंडावर, मुख्य म्हणजे ओठांवरून फिरवला. तो बावचळला आहे, थोडासा घाबरलाही आहे, हे त्याच्या देहबोलीतून स्पष्ट जाणवत होतं. दवाखान्याच्या दारातला पिवळा लाईट त्याच्या चेहऱ्यावर पडल्यामुळे तिला तो स्पष्ट दिसत होता. पॅन्टच्या खिशातून काढलेला रूमाल तो शर्टच्या खिशात ठेवत होता. तिची नजर त्याच्यावरच होती. कोण हा? आणि इथे कसा? आपण याला कुठं पाहिलं? आपल्या स्मरणशक्तीला ती ताण देत होती. त्याने हात खिशाजवळ नेला, त्याच्या खिशावर ओळीत तीन पेन टोचलेले दिसले आणि आठवलं... आठवलं.. हा सहा डिसेंबरच्या कार्यक्रमाला तिला विद्यापीठाच्या वसतिगृहात दिसला होता. भाषणाच्या नोट्स घेत होता. मध्येच अंडरलाईन करायला की काय, पण पेन बदलत होता. अगदी पहिल्या-दुसऱ्या रांगेतच बसला होता. त्याच्या चेहऱ्यावर समजून घेण्याचे आणि अभिप्राय देण्याचे बोलके भाव सारखे बदलत होते. त्यामुळे तो तिच्या चांगला लक्षात राहिला. वसतिगृहातला मुलगा. म्हणजे महाविद्यालयातीलच. त्याचीही पावलं इकडेच वळावी! तो सायकलवर टांग टाकून घाबरत-बिचकत का होईना गल्लीतून आत शिरलाच. तिच्या छातीवर उगाचंच दडपण आलं.

a

तिचं लक्ष परत घड्याळाकडे गेलं. आता कोणत्याही क्षणी मुन्नीला घेऊन भैया येणार होता. आता तिची नजर समोरच्याच गल्लीवर स्थिरावली. भैयाला गाडी शोधण्याची वेळ येऊ द्यायची नाही. तो बिचारा आधीच किती टेंशनमध्ये असणार. मुन्नी तर घाबरूनच गेली असेल. तिथून मुन्नीला घेऊन तो कसा निघणार आहे? हाच प्रश्न खरं तर सारखा छळत होता. तसं पाहिलं तर आज मुन्नी कुणाच्याच मनिध्यानी नसावी. पण साऱ्या तरुण पोरींना माहीत आहे, एकदा ही धंद्यावर बसली की आपला भाव घसरणार. आज ते कच्चं फळ आहे. पैशाच्या आणि धंद्याच्या पलीकडला कोणत्याही पद्धतीचा विचार करू न शकणारी पहिलवानसारखी माणसं जिथे आहेत, आणि कच्चंच खाऊन तृप्तीचा ढेकर देणारी जनावरं ज्या समाजात आहे, तिथे मुन्नीच्या 'मोठी' होण्याची कोण वाट बघणार होतं! म्हणूनच तर पहिल्यांदा मुन्नीला त्या वस्तीत बघितल्याबघितल्या ठरविलं होतं, 'हिला इथून नेल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही' पाऊणे े बारा वाजून गेले. समोरचा दवाखानाही बंद झाला. सारखं समोर बघूनबघून डोळेही दुखरे झाले. सुहास तर जाम कंटाळलाच होता. तिच्यासोबत असल्यामुळे बिचारा सिगारेटही ओढू शकत नव्हता. 'आपली गाडी जिथे उभी राहील, तिथल्या पानठेल्यावर जायचं नाही.' हे तिनं त्याला आधीच सांगून ठेवलं होतं. कुणाच्या नजरेत त्यांना यायचं नव्हतं.

"अरे इधर गाडी कायको खडी है रे?" बाहेर उभ्या असलेल्या सुहासला पोलिसांनी हटकलंच. मघापासून ज्याची भीती होती तेच झालंय. आतल्या आत तिच्या पोटात धस्सच झालं. आता सुहास काय सांगणार?

"कुछ नही. गलतीसे हम इधरके गल्लीमे आये, और गाडीका पेट्रोल खतम हो गया. ड्रायव्हरको भेजा है पेट्रोल लाने के लिए. उसका इंतजार कर रहा हूँ, साली कितनी गंदी बस्ती है ये. सब साले शराबी. कहा आके फंसे हम लोग यहा."

“हां साब. धंदेवालोंका एरिया है. इसलिये तो तुमपे मेरी नजर गयी ना. तुम्हारे जैसा साब इधर कायको... वो तो यहासे गाडीमे लडकी डालता और दुसरे दिन लडकी रिक्षे◌ेसे आती.”

“बापरे मै तो देख रहा हूं, कब मेरा ड्रायव्हर आयेगा और मै यहासे भागुंगा. गाडीको छोडकेभी तो नही जा सकते ना। ये शराबियोंका क्या भरोसा.”

सुहास कशाला त्या पोलिसांशी जास्त बोलतोय असं तिला झालं होतं. मुन्नी कधीही येऊ शकते. मुन्नीला आपण नेलंय हे कुणालाही कळता कामा नये. खरं तर पोलिसांच्या मदतीनं हे काम जास्त सोपं व्हायला हवं होतं. पण प्रत्यक्षात तसं नाहीये, हे तिला माहीत आहे. म्हणून पोलिसांच्या भानगडीत यावेळी पडायचं नाही, हे तिनं ठरवलं होतं. पण ऑफ द रेकॉर्ड एका ज्येष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या कानावर ही गोष्ट तिनं टाकून ठेवली होती. पुढे फारच काही कॉम्प्लिकेशन्स झालेत, तर पोलीस डिपार्टमेंटचीच मदत घ्यायची. आपण स्वत:ला या क्षेत्रातले कार्यकर्ते समजतो, तर शक्य तोवर हे प्रश्न आपण आपल्याच लेव्हलवर सोडवावेत अशी तिची भूमिका आहे. पोलिसांच्या मागे आधीच काय कमी कामं असतात! उलट ज्या प्रामाणिक सामाजिक कार्यकर्त्याला समाजासाठी जे जे काय करायचं आहे, पण सरकारी नोकर नाही, म्हणून अनेकदा त्याचे हात बांधलेले असतात, अशा कार्यकर्त्याला शासनाने खुलेआम ते काम करण्याची परवानगी द्यावी, एखादं कार्ड त्याच्याजवळ असावं, जेणेकरून विध्वंसक माणसं ‘तू कोण आम्हाला शिकवणारा?’ असं म्हणू शकणार नाही, असं स्वत:चं मत तिनं अनेकदा शासकीय बैठकीत मांडलेलं आहे.

बारा वाजले. एका पडक्या घरातून खूप जुन्या घड्याळाचे टोले ऐकायला आले. आता अजून जास्तवेळ इथे थांबणे धोक्याचेच होते. माणसांची ये-जा तुरळक झाली होती. अर्थात ती ये-जा नव्हतीच. त्यांचे लटपटणारे पाय ओढणे होते. बाजूची

a

कुत्री उगाचंच केकाटत होती. आमच्या गाडीच्या अगदी समोर तीन म्हशींनी आपलं ठाण मांडलं होतं. गाडीला टेकून उभा राहूनराहून सुहासही कंटाळला आणि गाडीत येऊन बसला.

"तुला ही भलतीच शिक्षा झाली रे सुहास."

"नाही गं. शिक्षा कसली? उलट तू जे काय करतेस, त्यात माझी थोडीशी मदत."

"अरे पण मुन्नी अजून आली कशी नाही? भैयाला काही प्रॉब्लेम झाला असेल काय?"

"नक्कीच. त्याशिवाय काय तो एवढा उशीर लावणार? आणि तिथून निघणं काय सोप्प आहे? मला नाही वाटत आता भैया तिला आणू शकेल."

"तुला थांबण्याचा कंटाळा आलाय काय? जायचं आहे तुला?"

"समजा मी हो म्हटलं, तर जाऊ देशील काय?"

"हो. जा तू."

"आणि मुन्नीला घेऊन तू कशी जाणार?"

"माझं मी पाहून घेईन. त्याची तुला कशाला काळजी?"

"तुला हा एवढा अहंकार का गं?"

"अहंकार कसला रे? तुला घाई आहे ना. तुझी बायको वाट बघत असेल."

"ते सारं खरं असलं तरी तू असं नाही म्हणू शकत काय की, 'सुहास तुला थांबलंच पाहिजे बरं.' पण तू कशी म्हणशील? अहंकार आड येतो ना."

a

“गप रे” तेवढ्यात तिचा मोबाईल वाजला. भैयाचाच असणार या विश्वासानंच ती स्क्रिनकडे न बघताच म्हणाली, ‘बोलो भैया क्या हुआ?’

“भैया? कोण भैया. ममा मी बोलतेय.”

“अरे एवढ्या रात्री. काय गं?”

“काही नाही. उद्या रविवार आहे, खूप झोपणार आहे. सकाळी दहा वाजेपर्यंत. आता मोबाईल स्विच ऑफ करणार आहे, हे सांगायला फोन केला आणि भैया कोण?”

“काही नाही उद्या बोलू. झोप तू. मी कामात आहे”

आता मात्र तिची काळजी पराकोटीला पोहोचली होती. इथे बसून वाट बघण्याशिवाय आत्ता या क्षणी आपण काहीच करू शकत नाही, याचा रागही येत होता. मधूनच म्हैस जोरजोरात हंबरत होती, याचाही रागराग येत होता. आता तिलाच खाली उतरावंसं वाटत होतं, पण रात्री बारा वाजता गाडीजवळ उभं राहून विषयाला कलाटणी देणंच होतं.

“वैदेही, बघ तर समोरचे आपल्याकडे येताहेत काय?” सुहास तिला म्हणाला. तिनं पटकन समोर पाहिलं!ं अंधूक प्रकाश होता. काळोखच म्हणायला हवा खरं तर. पण गल्लीत बंडी घातलेला भैया आणि त्याच्या बोटाला धरून लगबगीनं चालणारी मुन्नी दिसली. हो मुन्नी. मुन्नीच होती. शंभर टक्के मुन्नीच. ती एकदम एक्साईटच झाली. व्वा. आली. आली मुन्नी. ती पटकन गाडीतून खाली आली. गाडीचं दार उघडंच ठेवलं. धावल्यागत ती पुढे गेली मुन्नीपर्यंत. तिचं बोट तिनं तिच्या हातात पकडलं आणि झपझप चालायला लागली. “भैया अब हम कुछभी बात नही करेंगे. तुम जाओ. डायरेक्ट बस्तीपे मत जाओ. तीन-चार दिनके

बाद फोन करना. जैसा जैसा बताके रखा है वैसाही करना.” बोलताबोलताच मघापासून हातातच ठेवलेल्या चारशे-पाचशे रुपयांच्या चुरगळलेल्या नोटा त्याच्या हातात ठेवल्या. “खाना खाकेच जाना. किसीने पुछा तो खाना खानेको गया बोलो.”

“हा मेडमजी, वो मै सब संभाल लुंगा. आप इधरकी चिंता मत करो.”

ती मुन्नीचा हात पकडून झपझप पावलं टाकीत गाडीजवळ आली. सुहासने वेळेचं आणि कामाचं भान ठेवून गाडी आधीच सुरू करून ठेवली होती. मुन्नीला तिनं मागच्या सीटवर झोपायला सांगितलं. आणि ती स्वत:ही पटकन गाडीत बसली. ती बसताच सुहासने गाडी सुरू केली. वैदेहीनं मुन्नीच्या केसांमधून, अंगावरून प्रेमाने हात फिरवताच गाडीत लवंडलेली मुन्नी पटकन उठून तिला बिलगलीच. “मेडमजी ते लोक आपल्या मांगं येतीन?”

“नाही येणार. तू काळजी करू नकोस. मी आहेना. झोप.” वैदेहीनं तिला परत गाडीत झोपायला लावलं. पाऊण तास सुहास गाडी या त्या रस्त्यावरून नुसती पळवत होता. पोलीस दृष्टीस पडू नये या उद्देशाने कमीतकमी सिग्नलच्या रोडवर गाडी टाकत होता. कोणताच रस्ता त्याने रिपीट केला नाही. सोसायटीच्या गेटमधून जेव्हा त्याने गाडी आत टाकली, तेव्हा रात्रीचे पावणे दोन वाजले होते. अख्खी बिल्डिंग झोपलेली होती. चौकीदार दोन गाड्यांच्या मध्ये पार्किंगमध्ये सतरंजी टाकून मस्त झोपला होता. गेट बंद असणार याची जाणीव तिला होतीच. हॉर्नवाजवून चौकीदाराला आणि सोसायटीलाही जागं करायचंच नव्हतं. सुहासने गेटजवळ गाडी ◌थांबवताच तिनं उतरून गेट उघडलं. मुन्नीला जागं केलं. गाडीत बसल्यावर कितीतरी वेळ मुन्नी नुसती हमसूनहमसून रडत होती. तिला मनसोक्त रडू द्यावं हे वैदेहीनं ठरवलच होतं. कारण रडण्याशिवाय मुन्नी मोकळी झाली नसती. तिच्या मनावरचा ताणही हलका झाला नसता. वैदेही तिला पोटातल्या उमाळ्यानं कुरवाळत

राहिली. रडूनरडून थकली आणि आपल्या हातात तिचा हात घट्ट पकडून झोपीही गेली होती. बिनधास्त. “मुन्नी उठ आपलं घर आलं” म्हणताच पटकन उठली. लहान मुलांना उठवायला एरवी किती वेळ लागतो. गाडी थांबताच आधी वैदेही उतरली. मग मुन्नीला उतरायला सांगितलं. “सुहास चल, चहा पिऊ या.”

“नको खूप रात्र झाली. थकलोही. बायकोचे आठ मिस कॉल आणि चार एसएमएस आहेत. पळतोच पटकन. पण जाताजाता एक मघापासून कुरतडणारा प्रश्न विचारू?”

“आत्ता नको. तुझे सारे प्रश्न विचारायला आणि त्यांची उत्तरं मिळवायला उद्या निवांत ये. चल बाय.”

मुन्नीचा हात पकडून वैदेही तिला लिफ्टकडे घेऊन आली. लिफ्ट खालीच होती. तिचं दार उघडून मुन्नीला आत यायला सांगितलं. लिफ्टचं दार बंद केलं. हे सारंच मुन्नीसाठी नवं होतं. तिच्या डोळयात प्रश्नांचं, उत्सुकतेचं, भयाचं आकाश मावत नव्हतं. लुकलुकणारे तिचे डोळे मनातल्या मनात कितीतरी प्रश्न तिला विचारत होते. आपोआप वर जाणारी लिफ्ट तिला आता वरवर उंच आकाशात नेणार आहे, याचा मात्र वैदेहीला ठाम विश्वास होता. तिनं मायमाखल्या स्पर्शानं मुन्नीला जवळ ओढलं. जन्मभर सगळयाच कळा तिनं एकटीनं सोसल्या होत्या. आईविना राहणं काय असतं हे तिनं भोगलं होतं. त्यामुळे स्वत:च्या दु:खाबद्दलचं तिचं मन फार घट्ट होतं, आणि दुसऱ्याची एवढीशी कळ बघूनही ते कळवळून उठत होतं. मुन्नीच्या पदरात तर दु:खाचा डोंगरच होता. पण तो सारा डोंगर आता वैदेही पार पाडून टाकणार होती. स्वत:वर तिचा पूर्ण विश्वास होता.

a

**बा**हेर प्रचंड पाऊस कोसळत होता. गाडीतून उतरून इमारतीच्या लिफ्टपर्यंत येईस्तोवरच वैदेही बऱ्यापैकी भिजली होती. अचानक येणाऱ्या पावसाच्या रौद्ररूपानं गांगरून चौकीदाराची धावपळ चालली होती. इमारतीतली सगळी मुलं मात्र मधल्या गच्चातल्या टेरेसवर धावाधुवी खेळत होती. पावसात भिजून खेळण्याचा आनंद याच वयात किती छान घेता येतो, याचा विचार करीतच तिनं लिफ्टचं बटन दाबलं. लिफ्ट तिच्या मजल्यावर थांबल्यावर तिच्यातून बाहेर येताच वाऱ्याच्या झोताने तिचं ओलं अंग थंडीने शहारलं. पटकन दारापर्यंत पोचून बेलवर बटन ठेवत नाही, तोच दारही उघडलं गेलं.

“अरे ईशान, दार न वाजवताच कसं काय ओळखलंस?”

“आपल्या पावलांच्या आवाजावरूनच ओळखतो माँ साहेब आम्ही आपण आलात ते.”

“व्वा. आता कोणता इतिहास वाचायला घेतलास? दुसरा बाजीराव का शाहू महाराज? आणि आलास कधी?”

“मघा तू बाहेर पडलीस आणि मी आत आलो. मुन्नी होतीच, त्यामुळे तुला लगेच फोन केला नाही. मुन्नी, टॉवेल घे मम्मीसाठी.”

“हो. लहान आनू का मोठा जी.”

“लहान. वत्सला, कडक चहा कर गं जरा आलं घातलेला.”

“जी मॅडम.” वत्सलानं तत्परतेनं वैदेहीला होकार दिला आणि ती आत चहा करायला वळली. तेवढ्या वेळात मुन्नी पाण्याचा ग्लास हातात घेऊन आली.

“दादा, तुले बी आनू? हा म्या यायच्यासाठी आनला.”

“मला नको. पण मुन्नी, हॉलमध्ये कुणाहीसाठी पाणी आणायचं असेल ना, तर ट्रेमध्ये आणायचं. आणि यायच्यासाठी काय म्हणतेय? आई. आईसाठी म्हणायचं”

“मी यायले आई कशी म्हनू? मी तं बाहेरची हावो ना.” मुन्नी खाली पाहत म्हणाली.

“मुन्नी, ज्यादिवशी तुला मी या घरात आणलं, त्याचदिवशी मी तुला म्हणाले ना, तू आता माझ्या मुलीसारखी म्हणून. सारखीही नाही. तू माझी मुलगीच गं.” प्रेमाने तिला जवळ ओढत आतड्याच्या मायेतून वैदेही म्हणाली. तरीही मुन्नी खाली बघत अंगठ्यानी टाईल्सवर घासत तशीच उभी राहिली. आपलं अंग आणखीनच चोरून. तिचं असं अपराधीभाव असल्यागत उभं राहणं फार वेळ ईशानला बघवलंच नाही. वातावरणात हलकेपणा आणण्यासाठी परत तोच म्हणाला, “मग काय मुन्नी यानंतर ट्रेमध्ये पाणी आणायचं ना?”

“पन दादा, यकच तू गिलास पानी आनाचं होतं. मंग कायले येवढा मोठा टरे.”

“नको तिथे तुझा शहाणपणा खर्च करायलाच हवा का? मुन्नी, मोठे जे सांगतात नं, ते नीट ऐकायचं, बरं का. आणि जरा शुद्ध बोलायला शिक आता. जा आतमध्ये खेळ.”

a

“अरे एकदम कशी ती शुद्ध बोलेल. आपण सारे जेव्हा सारखे तिच्या भाषेतल्या चुका काढू, तेव्हाच ना तिला शहरी भाषा अवगत होईल. ईशान, तिला मी मोठ्या अक्षरातली गोष्टींची पुस्तकं देते आहे सध्या सारखी वाचायला. ती सांगते त्याप्रमाणे ती तिथे शाळेत तिसऱ्या वर्गात होती म्हणे. पण तेच कधीतरी कसंतरी शाळेत जायचं. पण हुशार आहे अरे तशी ती. शिकेल हळूहळू. तिला या चार महिन्यांत अक्षरांची चांगली ओळख झालेली आहे.”

“होय. मलाही मघा काहीतरी वाचून दाखवत होती. पण मम्मी, फारच गावंढळ आहे गं ही पोरगी. खूप शिकवावं लागणार आहे तिला. मी काय म्हणतो मम्मी, खरंच तिला आपल्या सोबतच ठेवायला हवं काय? एखाद्या आश्रमशाळेत बघ ना तिची काही व्यवस्था. म्हणजे...मला असं वाटतं हं. म्हणजे...तिला इथे ठेवणं त्रासदायक नाही का होणार. फार वैताग असतो गं अशा पोरींशी आपल्याला जुळवून घेणं म्हणजे...”

“ईशान, पहिली गोष्ट हा विषय तुझा नाहीच आहे. मी तिला आपल्या सोबतच ठेवायचं ठरवलं आहे, ते ठरवलं आहे. आता त्यावर काहीही चर्चा नकोय. ती रेवाही माझ्या नावाने तिकडनं खडेच फोडते आहे. आश्रमशाळेचा तर विषयच नाही. दुसरं, मुन्नी ही माझी जबाबदारी आहे. तुम्ही तिघांनीही मला सहकार्य केलं तर उत्तम नाही केलं तरी उत्तम. पण ती इथेच आपल्या घरातलीच एक; घरातल्या सारखी नव्हे. घरातलीच एक, माझी तिसरी मुलगी म्हणूनच या घरात ती राहणार आहे. मी शिकवेन तिला. तिची आकलनशक्ती चांगली आहे. ईशू, मी तुला सांगते, एक दिवस मुन्नी आपली बहीण आहे, याचा तुम्हा तिघांनाही अभिमान वाटेल. बस. फक्त तिला थोडा अवधी द्या.” जरा रागातच वैदेही ईशानशी बोलत होती.

“अग अशी रागावतेस काय. मी आपलं माझं मत सांगितलं. आणि आम्हाला काय, तुलाच सगळा त्रास होणार आहे. साधं टॉयलेटमध्ये भरपूर पाणी टाकावं, प्रत्येकदा साबणाने हात धुवावे, इथून तू सारं शिकवलंस ना तिला. म्हणजे नसता मनस्तापच की नाही हा. पण नो प्रॉब्लेम. हा माझा प्रांत नाही, माझा विषय नाही, असं म्हणालीस खरं तू. पण असं नाही होत मम्मी.”

“म्हणजे? काय... म्हणायचं काय आहे तुला?”

“त्यादिवशी नाही का तू म्हणाली, तिला शाळेत घालायचंय, आणि त्यासाठी तिच्या गावी जाऊन टी.सी. आणायची. अगं शक्य आहे का तुला एकटीला त्या गावात जाऊन हे सारं करणं? ते लोक तिच्या मागावर आहेत ना? अजूनही शोधत आहेत ना मुन्नीला? तिला बाहेर हॉलमध्ये यायची परवानगी नाही दिली तू अजून. कॉलबेल वाजली की अजूनही तू घाबरतेस आणि म्हणे एकटी तिथे जाणार.”

“अरे सुहासला नेईन मी सोबत.”

“नको. मुळीच नको. मी येईन तुझ्यासोबत. सांग कधी जायचं? मोठ्या मायबापाच्या पोटी जन्माला आलं की त्या मोठेपणाच्या खालचे जे काटे असतात, ते तर बोचणारच ना.”

“एवढे काटे वगैरे बोचून घेऊन नको हं येऊस.”

“मम्मी..अगं गंमत केली. बोल कधी जायचं? पण कठीण आहे बरं मम्मी हे सारं. ती आपल्याजवळ आहे, हे जर का गुपित ठेवायचं आहे तर फारच कठीण बुवा.”

“ईशू, माझ्या डोक्यात सगळा प्लॅन तयार आहे. बघ, आपण इन्सपेक्टर देवतळ्यांना सोबत घेऊन जाऊ. तिथल्या ग्रामपंचायतच्या सरपंचासोबत इन्सपेक्टर

a

बोलतील. त्यांच्याजवळून आपण जन्मदाखला घ्यायचा आणि त्या शाळेतून ट्रान्सफर सर्टिफिकेट. इन्सपेक्टर काय सांगायचं, आणि काय बोलायचं ते बोलतील. तिथे आपण प्रत्यक्षात कुठेच राहायचं नाही."

"मग जायचंच कशाला आपण? देवतळेकाकांना जाऊ देत ना."

"अरे सोन्या, ते काही त्यांच्या ऑफीसच्या कामाचा भाग म्हणून नाही येणार आहेत आपल्याबरोबर. या कामात ते माझ्यासोबत केवळ माझे स्नेही म्हणून आहेत. आपण ऑफिशिअली त्यांना कुठेही गुंतवलेलं नाहीये. त्यामुळेच आपण त्यांना सोबत नेतोय ते ऑफ दि रेकॉर्ड. आपल्या गाडीने आपण जाऊ या. त्यांच्या ऑफिशिअल युनिफॉर्ममध्ये ते असले आणि त्यांनीच ते दाखले हातात घेऊन हेडमास्टर आणि सरपंचाला 'कुणालाही सांगायचं नाही' अशी सक्त ताकीद दिलीय, की ते काय बोलणार."

"हा. हे बाकी खरं हं. ग्रेटच आहे बॉ मम्मी तू. काय सुचतंय गं एकएक तुला बरं कधी निघायचंय?"

"तू किती दिवस आहेस इथे?"

"गुरुवारपर्यंत."

"ठीक आहे. त्यापूर्वी सांगते मी तुला. मुन्नी, चहा झाला काय बघ गं."

"व्हय जी." आतूनच मुन्नी ओरडली.

"व्हय नाही मुन्नी. होय म्हणायचं, होय. आणि आता चहा कसा आणशील?"

"टरे मधे दादा." मुन्नीने बाहेर येऊन सांगितलं.

“टरे नाही ग माझे माय. ट्र्र. ट्रे म्हणायचं.” कपाळाला हात लावत ईशान म्हणाला. “आणि आईला तू जी जी काय करतेस, आमच्यासारखं मम्मीच म्हण की.”

“नाय. पयले म्या आई म्हनाले शिकतो.” लाजत मुन्नी उद्गारली.

“ईशू, अरे तू तर एकदम तिची शिकवणीच घेतो आहेस.” हसताहसता पुरेवाट झालेली वैदेही त्याला म्हणाली, आणि मुन्नीकडे पाहून म्हणाली, “मुन्नीबाई आन माय लवकरलवकर टरेमंधी चाय.” आणि ईशानकडे पाहून खो..खो हसायलाच लागली. तिच्या हसण्यात ईशानही सामील झाल्याचं बघून लाजून मुन्नी आत पळालीच.

सुहास हॉलमध्ये बसून टी. व्ही. वरचे चॅनल्स सारखे बदलवत होता आणि तिथेच बसून वैदेही आपलं काम करीत होती. आपलं हातातलं काम थोड्या वेळात संपेल आणि मग आपण मोकळेपणाने सुहासशी गप्पा मारू हा विचार करून वैदेही आपल्या हातातल्याच कामात लक्ष ठेवून होती. पण अर्धा तास झाला तरी तिचं काम संपेना आणि ती आपल्याकडे लक्ष देत नाही हे बघून आता सुहासही कंटाळला. शेवटी तो तिला म्हणालाच.

“मॅडम, आपण आपलं काम सुरू ठेवा. मी जातो.”

“दोन मिनिट रे. थांब जरा.”

“अर्धा तास झालाय मी येऊन.”

“बापरे. खरं की काय? अरे मग आधीच नाही का सांगायचं?”

“का? तुला दिसलो नाही मी आलेला.?”

“दिसलास म्हणजे काय? माझ्या समोरच ना बसला आहेस. पण एवढा वेळ झाल्याचं नाही आलं रे माझ्या लक्षात.”

“आता आलंय ना? आता ठेवतेस ते काम बाजूला?”

“हो. हे काय मिटलं सुद्धा रजिस्टर. आणि ही बघ. ही बिलं सुद्धा ठेवलीत बाजूला. बोला राजे, कुठून आलात?”

“घरून.”

“घरून आलास तरी चेहरा का एवढा फुगला आहे?”

“घरून आलो म्हणजेच चेहरा फुगलेला असतो.”

“आता आज काय झालं बाईसाहेबांचं तंत्र बिघडायला?”

“त्याला काय कारण लागतंय का? बाबांना नाश्ता वेळेवर दिला नाही की ते चिडतात. म्हातारं वय. त्यांना भूक लागते. मग ते चिडचिड करतात. म्हटलं, ‘जरा लवकर देत जा त्यांना काय हवंय ते.’ तर म्हणाली, ‘तुम्हाला एवढा पुळका येतो तर तुम्हीच देत जा नं त्यांना काय हवंय ते.’ आता काय मी नाश्ता तयार करायचा?”

“करायचा. त्यात काय एवढं. पुरुषांनी स्वयंपाकघरात जाऊच नये, असा काही नियम नाही.”

“आता तू नको हं आणखी माझं डोकं तापवूस. घरी तिचा ताप आणि इकडे जरा रिलॅक्स व्हायला यावं तर तू आपली उपदेशाचे डोस पाजतेस.”

“बरं राहिलं. आता आपण कामाचं बोलू या. चालेल?”

“बोला. कामाचं बोला. मुन्नी कुठाय? काय म्हणतेय ती?”

“मुन्नी घरात आहे ना. मजेत आहे. मुन्नी, काकांसाठी पाणी आण. तिच्याच कामाचं बोलायचं आहे मला तुझ्याशी.”

“काय गं, काय झालं? काही गोंधळ झालाय? तिकडली माणसं आलीत का?”

“नाही रे. एकावेळी केवढे प्रश्न विचारतोस. मुन्नीला शाळेत टाकायचंय आता.”

“हो मुन्नी, शाळेत जाणार?” आतून पाणी घेऊन आलेल्या मुन्नीला सुहास म्हणाला.

“नमस्ते काका. हो. मी शाळंत जानार हाय आता.”

“वा. वा. फारच छान. तू हिची टी.सी. आणली नं गं?”

“होय. तिचा जन्मदाखला आणि टी.सी. दोनही आणलंय आम्ही तिथे जाऊन. देवतळे सोबत होते त्यामुळे आम्हाला काहीच करावं लागलं नाही. पोलीस वर्दीची कमाल. गुपचूप काढून दिलेत. या कानाची त्या कानाला खबर नाही. आता मी तुला यासाठी बोलवलंय की हिला कोणत्या शाळेत घालू? घरी तीन महिने तिचा अभ्यास करवून घेऊन सरळ चौथ्या वर्गातच तिला प्रवेश द्यावा म्हणते मी. काय, तुझं काय म्हणणं आहे?”

“बरोबर आहे तुझं. आता मध्येच कशाला आणि कोणत्या शाळेत टाकणार? त्यापेक्षा सरळ जून-जुलैत शाळा सुरू झाल्यात की जाईल ती चौथीत.

“होय ना. चला मग हे तर ठरलं. पण आता शाळा?”

“शेजारच्या बुनियादी स्कूलमध्ये टाक. फक्त मुलींची शाळा आहे. ग्रामीण भागातून आल्यामुळे तिच्यात ज्या काय उणिवा आहे, त्या मुलीमुलींमध्ये निभावून जातील. उगाच मुलांची चिडवाचिडवी नको.”

"होय. हेच होतं माझ्या मनात. बुनियादीबद्दल मी गौरीसोबत बोललेही आहे. तिथल्या मुख्याध्यापिका तिची मैत्रीणच आहेत म्हणे."

"तुझं सारं ठरलेलं असतं वैदेही. पण उगाच आपलं तोंडदेखलं मला विचारतेस. चला निघू मी की चहा पाजतेस."

"बसा नं काका, मी आनतो ना च्या."

"का ऽऽ य?" मुन्नीच्या प्रतिसादावर दोघंही मनापासून हसले. वैदेहीने वत्सलाला आवाज दिला आणि कडक चहा करून आणायला सांगितला आणि मुन्नीकडे वळून ती म्हणाली, "मुन्नी, तू काकांसाठी डब्यातला चिवडा आणि बेसनाचे लाडू आणतेस?"

"हो आत्ता आनतो." लगबगीनं उठण्याच्या धडपडीत पाय घसरून मुन्नी पडतापडता सावरली. तिला सावरण्यासाठी सुहासने तिला हात दिला. त्याच्या हाताच्या आधाराने ती नीट उठून उभी राहिली. आणि त्याच्याकडे बघून म्हणाली, "थ्यँक्यू काका."

"बापरे. थँक्यू! थँक्यूपर्यंत मजल गेली मुन्नीबाईची. व्वा गुड. पण थ्यँक्यू नाही. थँक्यू.

"थँन्कू"

"व्वा. बढिया. जा चिवडा आण."

वैदेही कौतुकानं आत जाणाऱ्या मुन्नीकडे बघत राहिली.

a

**“आ**ई, या बाहुलीला हात लावायचा नाही, असं ताई म्हणते.”

मुन्नी वैदेहीचा पदर पकडून सांगत होती. खरं तर ती खूप घाईत होती. तिला ताबडतोब ऑफीसमध्ये पोहचायचं होतं. गारमेंट फॅक्टरीत आज माल पोहचवायचा होता. त्यासाठी दशपुत्रे कार्यालयात येऊन बसले होते. डिस्पॅच करण्यापूर्वी आजच इन्स्पेक्शन होऊन त्यावर ओकेचा शेरा मिळणं आवश्यक होतं. आज इन्स्पेक्शन करायला डिसूझाच यायला हवा होता. खूप गुणी तरुण आहे तो. उत्साही. त्याचे इंग्रजी-हिंदी मिक्स उच्चार समजून घेताना सुरुवातीला तिची खूप धावपळ व्हायची. काळाकुट्ट कुरळ्या केसांचा हा तिशीतला तरुण तरीही त्याच्यातल्या उपजत हुशारीने तिच्यावर इंप्रेशन मारून गेलाच. हळूहळू छान गट्टी जमली; पण मध्येच दुसरीच मुलं इन्स्पेक्शनला यायची. त्यांच्या वेगळ्या अपेक्षा असायच्या. चिरीमिरी खायची सवय झालेली. त्यावेळी ती उपस्थित नसली, की दशपुत्रे आपल्या कर्कऽश बोलण्याने त्यांना डिवचायचे; आणि ते डिवचले गेलेत की माल रिजेक्ट करायचे. उगाचंच काहीतरी चुका काढत राहायचे. ‘ये अलायनमेंट बिगड गया. ये बटन्स यहाँ क्यू लगायी? ये कपडेका डिझाईन सिधेसिधे में नही तिरछेवाला था!’ वगैरे... एक ना अनेक कारणं. मग तिला निस्तरता निस्तरता नाकी नऊ यायचं. त्यामुळे इन्स्पेक्शनच्या दिवशी ती सर्वांच्या आधी कार्यालयात हजर राहायची. पायात सॅन्डल्स घालताघालता मुन्नीने केलेली तक्रार तिनं अजिबात कानाआड केली नाही.

मुन्नी तिच्या पार हृदयात जाऊन बसली होती. रेवाला तर अलीकडे मुन्नीचा राग यायला लागला होता. चार दिवसांच्या सुट्ट्यांत ती इथे आली की तिला तिचं इथलं अस्तित्वच सगळं उलटंपालटं झाल्याचा त्रास होतो. रेवा जेव्हा शिकायला पुण्याला गेली, तेव्हा तिची सगळी खेळणी तिने नीट लावून ठेवली होती; काही कपाटात तर काही शोकेसमध्ये. तिचा मोऽऽठा ससा हॉलमधल्या कोपऱ्यात विराजमान झालेला. तिचं फिशपॉण्ड ती जिथे ठेवून गेली तिथेच गेल्या दोन वर्षांत होतं! तिची इथे आल्यावर घालायची स्लिपर, इथले कपडे, सारं.. सारं जिथल्या तिथे असायचं. आईच्या कारसोबत तिची गाडीही रोज पुसल्या गेली पाहिजे ही तिची मागणीच असायची. लाडक्या लेकीचा हा हट्ट वैदेही पुरवायचीसुद्धा. म्हणजे चार- सहा महिन्यांनी ती आली की कायनेटिक परत एका किकमध्ये सुरू व्हायलाच हवी. अर्थात कार्यालयातल्या पोरांना मात्र याचा फायदा व्हायचा. आयती कायनेटिक त्यांना चालवायला मिळायची. मुन्नी आल्यापासून रेवाचं सगळं सामान इकडलं तिकडे झालंय याची जाणीव तिला होती. खरं तर वैदेहीलाही ते मनापासून आवडत नव्हते; पण ती तिकडे कानाडोळा करायची. मुन्नीची तक्रार फारशी मनावर घेण्यासारखी नव्हती; पण कुठेही ती दुखवू नये, तिच्या मनात उपरेपणाची भावना येऊ नये याची ती काळजी घ्यायची. तिनं सॅन्डल्स पायात घातल्या आणि मुन्नीला आपल्या समोर उभं केलं. तिचे दोन्ही दंड आपल्या दोन हातांनी पकडले.

“बोल मुन्नी. काय झालं?”

“ताई म्हणते, माझ्या बाहुलीला हात लावायचा नाही.”

“मग, चूक म्हणते?”

“पण मला खेळायला पायजे ना!”

“तुला नवीन बाहुल्या आणून दिल्यात ना?”

a

“पण मला तीच पायजे.”

“पायजे नाही पाहिजे! तुझ्या भाषेत कधी सुधारणा होणार गं?”

“होय...तेच ते, पाहिजे. आणि आई, आता मी पुष्कळ छान बोलते.”

“वा फारच. मुन्नी तुला ही नवीन घेऊन दिलेली बाहुली शेजारच्या ध्रुवने खेळायला मागितली तर तू त्याला देशील?”

“नाही.”

“का?”

“ध्रुव माझी बाहुली खराब करतो.”

“नाही करणार!”

“नाही. करतोच. मागचा कुत्रा नाही का त्याने खराब केला?”

“मग मागचा ताईचा टेडीबिअर नाही का तू खराब केला? बघ, ताईला तिच्या वस्तूंना हात लावलेला आवडत नाही नं! जसा तुला नाही आवडत! मग तू तिच्या खेळण्यांना हात नाही लावायचा.”

“पण ताई आता मोठ्ठी झाली ना. ती कुठे खेळते या बाहुल्यांशी? आता ते माझं झालं ना?”

“होय. तुझंच झालं; पण ते ताईचंही आहेच. मोठं झाल्यावर आपल्या वस्तू आपल्या नसतात, असं नाहीय. आणि शाळेची वेळ झालीय ना? जा. तयार हो. डबा भरून घे नीट. मला ऑफीसला जायचं आहे. वेळ होतो आहे मला.” तिनं शाळेसाठी तयार होण्यासाठी मुन्नीला आत पिटाळलं आणि रेवाला आवाज दिला.

“काय मम्मा?”

a

“रेवा मुन्नी लहान आहे. तिला का बाहुल्यांशी खेळू देत नाही?”

“मम्मी, एका विशिष्ट लिमीटच्या बाहेर मुन्नीने आपल्या घरात अधिकार गाजवलेला मला खपणार नाही. मी पाहते आहे एवढ्यात सारखं मुन्नी-मुन्नी चाललेलं असतं. दादाचंसुद्धा. हे मुन्नीसाठी आणलं, ते मुन्नीसाठी. रेवाचं इथे काही स्थानच राह्यलं नाही आता!”

“रेवा, गाढव आहेस की काय तू? अगं, तिच्याशी तू स्वतःची बरोबरी करून काय स्पर्धा करते आहेस?”

“स्पर्धा कशाला करेल? पण मला हे पटत नाहीये. तू तिला मदत केलीस, घरी आणलंस, शिकवलंस, मुलगी मानलंस वगैरे ठीक आहे; पण मी तुझी मुलगी आहे; आणि दादा फक्त माझा दादा आहे. दादाने फक्त माझे लाड करायचे आहेत. आजकाल तर भलतंच चाललेलं असतं. जेव्हाही मी येते तेव्हा सारखं दादाच्या तोंडी, ‘मुन्नी पाणी दे’ , ‘मुन्नी गाडीवर चक्कर मारायला चल’ , ‘मुन्नीसाठी टॉफी.’ काय आहे हे? रेवा इथे कुठेच नाही?”

“वेडी का खुळी गं तू? रेवा, रेवा आहे. कालपर्यंत माझी किती शहाणी मुलगी होतीस गं तू. समंजस. माझी प्रत्येक गोष्ट समजून घेणारी. माझ्या कामात मदत करणारी. आणि आज हे काय भलतंच वेड घुसलंय तुझ्या डोक्यात? आणि मुन्नीला मी जिथून आणि ज्या परिस्थितीत आपल्या घरी आणलंय ते सारं माहीत आहे ना तुला? तुला किती भरून आलं होतं गं मुन्नीबद्दल ऐकून; आणि माझ्या गळ्यात हात टाकून केवढं कौतुकानं म्हणाली होतीस, ‘माय मम्मा इज ग्रेट.’ आणि आता आठच महिन्यांत काय झालं तुला?”

“मम्मी, मला अजूनही तिच्याबद्दल वाईटच वाटतं. माझ्याही मनात तिच्याबद्दल प्रेम आणि दया आहेच; पण या घरातलं माझं स्थान असं कुणामुळे जाणं मला सहन नाही होऊ शकत. तुला माहीत आहे, दादाबद्दलही मी किती पझेसिव्ह आहे ते. त्याची येणारी बायको आता या घरात आपला हक्क दाखवेल, हे जिथे मला कल्पनेतही सहन होत नाही, तेथे मुन्नीने माझी जागा घ्यावी, हे मी कसं सहन करणार?”

“आपलं घरातलं, मनातलं स्थान एवढं पोकळ असतं काय? शार्दूलच्या प्रेमात तू पडलीस हे माहीत झाल्यावर आम्ही नाही असा विचार केला की, आता रेवाचं तर आपल्यावरचं प्रेमच कमी होऊन जाईल. रेवा, प्रत्येकाचं आपलंआपलं एक स्थान असतंच. ते दुसऱ्या कुणाच्या येण्याने ढासळण्याइतपत तकलादू असेल, तर ते स्थानच नव्हे आणि ती नातीही नव्हेत. एवढ्या ठिसूळ पार्श्वभूमीवर रक्ताची, मनाची नाती नसतात गं.”

“मम्मी, एवढं सारं मला कळत नाही आणि कळूनही घ्यायचं नाही. मुन्नी मलाही आवडते. मीपण तिचा या घरातील एक सदस्य म्हणून स्वीकारही केला आहे. पण यापलीकडे मला सहन होणार नाही.”

रेवाने आपल्या कायनेटिकची किल्ली घेतली आणि तिथून बाहेरही पडली. ‘हे तर नवंच त्रांगड झालंय’ असं मनाशीच पुटपुटत वैदेहीनं मुन्नीला आवाज दिला.

“मुन्नी, झाली तयारी?”

“होय आई.”

“मग पटकन शाळेत पळ.”

"आई, पाच मिनिटांच्या अंतरावर माझी शाळा आहे. एवढ्या लवकर जाऊन काय करू? शाळेत कंटाळा येतो मला."

"शाळेचा कंटाळा?"

"नुसतं बसून राहायचं. मॅडम बडबड करतात, ते ऐकायचं, लिहायचं, पाठ करायचं."

"मुन्नी, मॅडम बडबड करीत नाहीत. त्या तुम्हाला शिकवतात. कंटाळा कशाचा येतो तुला? बघ मुन्नी, एक लक्षात घे. तुला खूप शिकायचंच आहे. शिकायचंच खूपखूप. ताईसारखी गाडी चालवायची आहे ना?"

"हो."

"दादासारखे खूप पैसे हातात हवेत ना?"

"होय."

"मग त्यासाठी काय करायला लागेल?"

"शाळा."

"गुड गर्ल."

"म्हणजे काय?"

"छान मुलगी."

तिनं असं म्हणतातच मुन्नी चक्क लाजली आणि आत पळाली.

"तुझी वेळ झाली की तू जा. मी निघाले." हसतच तिला सांगितलं आणि कारची किल्ली घेऊन पर्स उचलली आणि पटकन तिथून ती बाहेर पडली. आता तिला दशपुत्रे दिसायला लागला होता. इन्स्पेक्शनची टीम येण्याच्यापूर्वी ती तिथे

पोचायला हवी होती; पण तिनं जेव्हा फॅक्टरीसमोर गाडी उभी केली, तेव्हा वळणावरून डिसूझा नजरेआड होताना दिसला. एवढ्या लवकर डिसूझा कसा काय गेला? ती मनाशीच नवल करत आत शिरली, तोच दशपुत्रे हसतहसतच बाहेर आलेले. दशपुत्र्यांचा चेहरा एवढा खुललेला तिला क्वचितच दिसतो. “दशपुत्रे, काय झालंय? एकदम खुश दिसताय?”

“होय. काम ओके झालंय. आत्ताच डिसूझा येऊन गेला.”

“अरे व्वा. आनंदाची बातमी.”

“तेच तर. तुम्ही नसताना डिसूझाने काहीही कटकट न करता माल पास केला. मग आनंदी होऊ नको?”

“या मग माझ्या केबीनमध्ये ज्यूस घेऊ या. तुमचं हे यश सेलिब्रेट करायलाच हवं.”

“आलोच मॅडम. पाच मिनिटांत येतो. पार्सल विभागात जाऊन त्यांना जरा सूचना देऊन येतो.”

दशपुत्रे पार्सलकडे गेले आणि ती तिच्या केबीनकडे. ती येण्याच्या पूर्वीच हा इन्स्पेक्शनचा भाग पूर्ण झाला हे एकापरी बरंच झालं होतं. तसंही आज ऑफीसमध्ये येण्यापूर्वी जी वादावादी घरात झाली, त्यामुळे तिचं मन अस्वस्थच होतं. त्याचा परिणाम कदाचित डिसूझासोबतच्या वर्तणुकीवर होऊ शकला असता. खुर्चीवर निवांत टेकून बसत तिच्या समोर पडलेल्या फाईल्स तिनं हातात घेतल्या. त्या उघडूनही बघितल्या; पण त्यात फार लक्ष घालावं असं काही तिला वाटत नव्हतं. किंबहुना फाईल चाळण्याचीही इच्छा होत नव्हती. सारखं रेवाचं बोलणं आणि मुन्नीचा चेहरा तिच्या डोळ्यांसमोर येत होता. मुन्नीला तिनं जिवाच्या आकांतानं

a

त्या चिखलातून बाहेर काढलं होतं. आजपर्यंत तिनं तिच्या बापालाही तिच्या नखाचं दर्शन घेऊ दिलं नव्हतं. हे आठ महिने डोळ्यात तेल घालून जपलं होतं तिला. तिच्यासाठी बाहेरगावची कित्येक कामं सोडलीत. वर्कशॉप्स सोडलेत. कारण ती बाहेरगावी जाणार म्हणजे मुन्नीला कुठे ठेवायचं हा प्रश्न. वत्सलाबाई दिवसभर असतात; पण रात्रीचं काय? या आठ महिन्यांत मुन्नीसाठी खूप कष्ट घेतलेत. त्या पहिलवानाच्या ताकास तूर लागू दिला नाही. आजही त्यादिवशीचा प्रसंग आठवला की अंगावर काटा उभा राहतो. त्या सगळ्या भयानक प्रसंगातून व्यवस्थित निभावलं गेलं, हा एक चमत्कारच म्हणायला हवा. ती तर मुन्नीला इकडे सुरक्षित घेऊन आली; पण दुसऱ्या दिवशी सकाळीसकाळी आंटी जागी झाल्यावर मुन्नीला आवाज दिला आणि मुन्नीकडून काहीच प्रतिसाद नाही बघता सायनाला ती म्हणाली, “देखो तो ये लौंडी अभीतक उठी नही क्या?”

“मुन्नी, ए मुन्नी” सायना मुन्नीला आवाज देतदेत कमऱ्यात घुसली, आणि तिच्याच लक्षात आलं की गिऱ्हाइक आटोपून रात्री दोन वाजता जेव्हा आपण कमऱ्यात घुसलो तेव्हा तर मुन्नी इथे नव्हतीच. पण रात्रीच्या जडावलेल्या मनाने आणि थकलेल्या शरीराने त्याची फारशी दखलही घेतली गेली नाही. ‘असेल कुठेतरी’ असच अस्पष्ट मनाच्या वरच्या थरावर उमटलं आणि गिऱ्हाइकाने दिलेल्या पाचशे रुपयांच्या कडक नोटेच्या गरमीत सायना मुन्नीचा विचार न करता लगेच झोपीही गेली. पण आंटीने आता मुन्नीला विचारताच तिला हे लक्षात आलं. पण ती रात्रीच खोलीत नव्हती म्हटलं तर आपलीच काही खैर नाही, हे तिला पक्क ठाऊक होतं. त्यामुळे ती परत आंटीजवळ येऊन म्हणाली, “आंटी, शायद वो भी उधरही गई होगी. कमरेमे नही है !”

“ठीक है. मेरा डिब्बा लेके आ.”

रात्रीचा ठर्रा आंटीला जरा जादाच झाला होता. भैयाने तिच्याशी गप्पा मारतामारता नारंगीच्या अख्ख्या तीन बाटल्या तिच्या पोटात रिचवल्या होत्या. दीड-दोन बाटल्या तर आंटीचा रोजचाच कोटा होता. एक अख्खी बाटली जादाचीच आणि सोबतीला सावजी. यापलीकडे तर आंटीसाठी स्वर्गसुख दुसरं नाहीच. त्या अधिकच्या एका नारंगीची नशा उतरेपर्यंत सूर्य पार उजाडून जुनाही झाला होता. सारी बस्ती आळसावलेल्या अवस्थेत होती. या बस्तीची पहाटच मुळी साडेदहा-अकराला होते. रोज रात्री दीड-दोनच्या पुढे झोपायचं आणि साडेदहा-अकराच्या पुढे एकाएकाने उठायचं. हाच इथला क्रम. सकाळी उठूनही कोणाला कोणत्या कार्यालयात जायचं नसतं, ना नवऱ्याचा डबा तयार करून द्यायचा असतो. त्यांची चूलही घरात स्वतंत्रपणे विरळाच पेटते. गल्लीतील लंगडाच त्यांच्या पोटाची सोय करायला जणू हॉटेल चालवतो. त्यामुळे आजही दहा वाजले तरी अर्धी बस्ती गाढ झोपेतच होती. सायनाने आंटीला डब्बा आणून दिला. आंटी आपलं थुलथुलीत झालेलं जड शरीर सावरत, गुडघ्याच्या वर गेलेली साडी उगीचच खाली करण्याचा प्रयत्न करत आणि सतत छातीवरून घरंगळणारा पदर खांद्यावर टाकत एका हाताने सायनाचा हात धरून कशीबशी उठली. तिला हात देतादेता आपणच पडतो की काय अशी भीती क्षणभर सायनालाच वाटली. शिवाय हातातला मोबाईल पडतो की काय? कालच्या नव्या गिऱ्हाइकाने तिला चक्क मोबाईलच दिला होता. त्यामुळे सायना एकदम खुश होती. या दीड-दोन महिन्यांतच हा गिऱ्हाईक गावला होता तिला; पण भलताच खुश होता तो पंचविशीतल्या सायनावर. सायनाची कहाणी हृदय हेलावून टाकणारी होती. दहावीत गेली आणि भाऊ अपघातात दोनही पाय गमावून बसला. बाप आधीच गेल्या सहा महिन्यांपासून टीबी वॉर्डात भरती. तीन लहान भावंडं आणि सायना असा आईवर भार येऊन पडलेला. आई धुणंभांडी करायला जायची. हिला पण सोबत न्यायला लागली. सुरुवातीला लोकांकडली

a

उष्टी-खरकटी काढणं तिला आवडत नसे. पण दोघींनी मिळून पटापट कामं केलीत तर चार घरची कामं जास्तीची पकडता येतील आणि घरातली ददात थोडी कमी होईल, असं वाटलं. सुरुवातीला रोज कामावर निघताना नाखूश असलेली सायना आईच्या कटकटीनं हळूहळू गुमान कामावर नाराजीनं का होईना यायला लागली. मग दोघींनी एकाच घरी एकाच वेळी कामावर येण्यापेक्षा आईनं कामं वाटूनच टाकली. सलमाची नवीनच कामाला लागलेली पोरगी म्हणून जुन्या मालकिनी सायनाला सांभाळून घ्यायच्या. ज्या घरातलं वातावरण चांगलं आहे, मालक-मालकीन नीट बोलतात, अशा दोन-तीन घरी ती जरा रुळायला लागली. दोन कामं जास्तीचीही करून द्यायला लागली. अंथरुणावर खिळलेला भाऊ आणि सगळ्याच गोष्टींचा अभाव अशा पडक्या दोन खोल्यांच्या घरात कामं झाल्यावर परत येण्यापेक्षा स्वच्छ, सुंदर, प्रसन्न, उंची सोफे, पडदे, बागबगिचा, सुंदर बाथरूम, तिथल्या उंची शाम्पू आणि सुवासिक साबणांचा दरवळ या साऱ्याचंच तिला वेड लागलं होतं. तिथेच ती रमायची. लहान मुलांना सांभाळायची. चावलाच्या घरी दिवाळीपासून तर जास्तच रमली होती. दिवाळीची सगळी स्वच्छता, डबे घासणं, खिडक्यांच्या ग्रील्स स्वच्छ करणं या साऱ्या कामांचा भार चावलाबाईंनी तिच्यावर टाकला होता. आणि दिवाळीच्या दोन दिवस आधी सिफॉनची नवी साडी आणि कोऱ्या करकरीत दोनशेच्या नोटा. सायना सुंदर गुलाबी रंगाची आणि त्यावर छोटेछोटे उडते फुलपाखरू असलेली साडी बघून हरखूनच गेली. त्या साडीचा मुलायम स्पर्श तिच्या शरीराला झंकारून गेला. एखाद्या कपड्याचा स्पर्श आपल्याला असा पुलकित करू शकतो हे ती प्रथमच अनुभवत होती. चावलाबाईंनी जेव्हा तिच्या हातात ती साडी दिली, त्याचवेळी ऑफीसची तयारी करून बाहेर पडायला मिस्टर चावला बेडरूमच्या बाहेर येऊन किचनमध्ये बायकोचा निरोप घ्यायला आले होते. हरखलेली सायना त्या साडीच्या स्पर्शाने एवढी उत्तेजित झाली होती की ती नकळत

साहेबांकडे पाहून लाजली आणि साडी घेऊन तिथून पटकन बाहेर पडली. 'कितनी प्यारी लडकी है' असं म्हणून चावलाबाई चावलांना म्हणाली, "अपने गुड्डूके लिये दिनभर इसकोही रखनेका इरादा है मेरा. बहुत अच्छी लडकी है। सब नयी बाते जल्दी सिख लेती है। देखो तो अब मिक्सरभी हँडल कर लेती है।"

"हा. हा. रखलो. लेकिन जादाके पैसे देना. नही तो तू उतनेमेही उसको धोपट डालेगी।"

"नही जी. वो मुझे बहोत अच्छी लगती है। अभी तो मैने साडीके साथ दोसो रुपये दिये।"

"व्हेरी गुड. तेरा सायना पुरान हुआ होगा तो मैं चलू?"

"हा हा एक मिनटमे मैं आपका टिफीन भर देती हूँ।" तिने नवऱ्याचा टिफीन भरून त्याच्या हातात दिला, आणि 'शामको जल्दी आना. जरा घुमने चलेंगे' म्हणून त्याला बाय केला. चावलाने गाडी काढली आणि कार्यालयाच्या दिशेने निघाले तर गल्लीच्या तोंडाशी उभी राहून सायना साडीचा स्पर्श आपल्या गालाला लावून हरखून त्या नव्या साडीकडे बघत होती. जुने पुराने फ्रॉक घालत, सलवार सूटपर्यंत आलेली सायना; नवीन साडी बघून तिचा जीव आभाळाएवढा झाला होता. रस्त्यावर उभी राहून गालाला साडी लावणारी सायना बघून चावलासाहेब आश्चर्यचकितच झाले. त्यांनी तिच्याजवळ गाडी उभी केली आणि गाडीची काच खाली करून म्हणाले,

"सायना, रस्तेमे क्यों खडी हो?"

"कुछ नही यूही."

"बैठो गाडी में, मै तुझे घरतक छोड देता हूँ।"

“नही साब. मैं चली जाऊंगी।”

“बैठो बैठो. मैं छोड देता हू। शरमाना मत।”

“नही साब. सही मे मैं चली जाऊंगी।”

“डरती हो मुझसे?”

“नही साब. माँ बोलती है कामपरके साब लोगोंसे जादा बाते नही करने की।”

“बिलकूल सही फर्माती है तुम्हारी माँ। इधर आओ।” थोड्याशाच अंतरावर उभ्या असलेल्या सायनाला त्यांनी गाडीच्या अगदी जवळ बोलवलं. आणि हळू मुलायम आवाजात तिला म्हणाले, “तुम्हारी माँ सही कहती है। देखो, कुछ साब लोग बहोत गंदे होते है। वो तुम्हे अच्छी नजरसे नही देखते। मै तुझे गंदा आदमी लगता हूँ क्या? अगर लगता हूँ , तो मेरे साथ भी नही आने का।”

“नही साब. आपतो बहुत अच्छे हो।”

“फिर चलो. मै छोड देता हूँ।”

आता सायनाला नकार देणं शक्यच नव्हतं. त्याने डाव्या हातावरचं गाडीचं दार उघडलं. ती बसल्यावर खिडकीची काच बंद केली आणि गाडी सुरू केली. आयुष्यात पहिल्यांदा सायना गाडीत बसत होती. तीही इंडिगो. लांबलचक गाडी, आलिशान फोमची सीट, एसीमुळे थंडगार, एअर फ्रेशनरचा रोमांचित करणारा सुवास, ऐंशीच्या स्पीडने झूऽऽ जाणारी गाडी. चावलाने गाडी मुद्दामच लांबच्या मेनरोडवर टाकली. तेवढेच पाच मिनिटं तिला जास्त फिरवता यावं म्हणून. ती तर हरखूनच गेली. हवेत असल्यागतच वाटलं तिला.

“कैसा लग रहा है सायना?”

“बहोत अच्छा साब. बहुत मजा आ रहा है।”

“फिरसे बैठोगी फिर?”

“नही बाबा. माँ डाटेगी ना!”

“माँ को नही बतानेका.”

“अब आप मुझे घरतक छोडनेको आओगे तो माँको दिखोगे नही क्या?”

“नही दिखना चाहिये ना?”

खाली पाहत हळूच पुटपुटली “नही”!

“कोई बात नही. नही दिखेंगे. हम आपके घरसे दूर खडी करेंगे गाडी.”

“दूर भी नही. गल्लीके लडकोंको गाडी दिखेगी ना!”

बोलताबोलताच सिग्नलवरून गाडीचा यू टर्न त्याने इतका वेगात घेतला की तिचं अख्खं शरीर हिंदकळलं आणि तिचा झोक जाऊन ती त्याच्या डाव्या खांद्यावर आदळली, “वुई माँ”.

“सॉरी, सायना सॉरी. जरा जोरसे टर्न मारा. झटका लगा क्या.”

“फिर क्या तो. मैं तो डरही गई बाबा.”

“डरना कायको. मैं हू ना.”

“मैं गाडी से गीर जाती तो.”

“ऐसे कैसे गिरोगी? अपनी गाडी पुरी लॉक है। अच्छा आंटीने दियी वो साडी अच्छी लगी?”

“बहुत अच्छी साब. देखो, हात लगाया कि कितना अच्छा लगता है।”

त्याने साडीवरून हात फिरवला आणि तोच हात हळूच खाली आणून तिच्या सलवारवरून पण फिरवला; अगदी मृदू स्पर्श भावाने; आणि म्हणाला, ‘‘सायना, मुझे तो साडीसे तेरा सलवारका स्पर्श जादा अच्छा लगता है।’’

‘‘ या अल्ला कुछ भी क्या साब. वो कितना पुराना है और गंदाभी.’’

‘‘अच्छा नयी साडी कब पहनोगी?’’

‘‘दिवालीके दिन.’’

‘‘फिर पहनके घरमे आओगी?’’

‘‘हा साब. आंटीकोच दिखाऊंगी ना सबसे पहले.’’

‘‘और हमको?’’

सायना लाजून गप्प बसली. हळूहळू सायनाला त्याच्या बोलण्याची नशा चढायला लागली होती. बसल्याबसल्या तिचं शरीर अलगद-हळुवार झालं होतं. आतल्या आत वादळ सुटलं होतं. मनाच्या आकाशात दिवसाढवळ्या तारे चमकत होते. डोळे जडावत होते. आपण घरापासून खूप लांब आलोय हेही जाणवत होतं; पण ते म्हणवतही नव्हतं. त्याच्या शर्टचा स्पर्श तिच्या हाताला लागताच हृदयात वेगळीच हुरहुर जाणवत होती. त्याने मारलेला सेंट तिला रोमांचित करत होता. शब्द जड झाले होते. ‘‘सायना हमको नही दिखाओगी?’’

तिनं खाली मान घातली. वयात आलेली सायना या सगळ्या गोष्टींचा अर्थ जाणून होती. तरुण तिशीतल्या चावलाची तिला ही नवी ओळख एकदम आवडून गेली. कालपर्यंत मनिध्यानी नसलेलं जग तिच्या पुढ्यात स्वप्नागत आलेलं होतं. दोन-तीनदा चावलाच्या बेडरूममधला दुपारचा रोमांस तिनं बाहेरूनच अनुभवला होता. सुट्टीच्या दिवशी जास्तीची कामं काढलीत की चावालाआंटी तिला दुपारी

कामावर बोलवत आणि मध्येच नवरा तिला आत बोलवून दार बंद करून घेत असे. त्यावेळची कपड्यांची सळसळ, बांगड्यांची किणकिण, पलंगाची किरकिर आणि दोघांच्याही बोलण्याचा घुसमटलेला आवाज तिला अस्वस्थ करत असे. चार वाजताच्या आवरासावरीत बेडवरच पडलेली चावलाआंटीची ब्रा तिच्या मनात कितीतरी प्रश्न उमटवीत असे. आज सारं तिला आठवलं आणि ती चावलाकडे बघून लाजली, “बताओ ना सायना!”

“आंटी को दिखाने आऊंगी तो आप भी देखोगेच ना.” ती घुसमटल्या आवाजात म्हणाली.

“वैसे नही. हमको ठीक से देखना है.”

“क्या देखना है?”

“तुझे. आंटीके साथ नही. सिर्फ हमही देखेंगे.”

“साब, आप क्या बोल रहे हमे नही पता.” ती खाली पाहत पुटपुटली.

“हम पता करवायेंगे ना।”

“साब चलो. पहले हमे घरतो छोडो. कितना दूर आये हम.”

“क्यू. ये घुमना तुझे अच्छा नही लगा?”

“बहुत अच्छा लगा. लेकिन घरतो जाना ही होगा ना. माँ डाटेगी?”

“माँ को नही बताना.”

“और आंटीको?”

त्याने तिच्याकडे बघितलं. क्षणात तिचा हात हातात घेतला. तो दाबला. “आंटीको बताना तुम्हे ठीक लगता तो बताओ. इसके बाद हम आपसे बातही नही

a

करेंगे. और साडी पहनके आओगी तो देखेंगे भी नही. चलो हम अब पहले तुम्हे घर छोड देते है।”

त्याने घराकडे गाडी वळवली, तेव्हा त्याच्या लक्षात आलं होतं केवढी दूर गाडी आणलीय ते. घर येईपर्यंत तो तिच्याशी एक शब्दही बोलला नाही. कोपऱ्यावर त्याने गाडी उभी केली, तिला कारचं दार उघडून दिलं आणि ती उतरताच वेगात गाडी पुढे नेली.

**थो**ड्याच दिवसांत चावलाच्या लक्षात आलं, आपली बरीचशी कामं न सांगताही करण्याची तिला आवड आहे. बुटांना पॉलिश करणं, कपड्यांच्या घड्या नीट करणं, कारची चाबी लगेच उचलून जागेवर ठेवणं, ऑफीसमधून आल्याआल्या आंटी आजूबाजूला असली तरी स्वत:च दार उघडायला येणं. सगळ्याच गोष्टींची नोंद तो कुठेतरी घेत होता. तिची अस्वस्थताही त्याच्या लक्षात येत होती. पण आपल्या चंट बायकोच्या नजरेत काहीही यायला नको, याची तो काळजी घेत होता. मुलाला सांभाळण्यासाठी म्हणून तिनं सायनाला दिवसभरासाठी घरी ठेवलेलं होतं. चार घरी हिंडून कामं करण्यापेक्षा एकाच ठिकाणचं दिवसभराचं काम सायनाच्या आईलाही पटलं होतं. शिवाय चावलाबाई मोठ्या हाताची होती. सायनाला प्रेमानं सांभाळीत होती. सायनाला त्याचा सहवास हवाहवासा झालाच होता. त्यामुळे ती सकाळी लवकर यायची. सकाळच्या कामांच्या धावपळीत आपसूकच त्याची बरीचशी कामं चावला आंटी तिच्यावर सोडून मोकळ्या व्हायच्या. दुपारी गुड्डू झोपला की सायना दोनतीन तास घरी जाऊन यायची. परत चार वाजता आली की आंटीच्या रात्रीच्या स्वयंपाकात मदत करण्यासाठी म्हणून बराच वेळ रेंगाळायची. त्यामुळे चावला ऑफीसमधून आल्यावरही सायनाला त्याचा घरातला वावर मिळायचाच. त्या दोघांमध्ये छुपे स्पर्श केव्हाच सुरू झाले होते. सायनाला तर त्याचा

a

सहवास खूप हवाहवासा वाटायचा. फक्त त्याला मात्र खूप सांभाळून वागायचं होतं. तो आपल्या बायकोला चांगला ओळखून होता. शेवटी एकदिवस त्यांना हवी ती संधी मिळालीच. आंटीची बहीण दोन-तीन दिवसांसाठीच बंगलोरहून तिच्या सासरी आली होती, तिच्याजवळ वेळ खूपच कमी होता, त्यामुळे चार वाजता चावलानेच तिला भेटायला तिच्या सासरी जावं असं ठरलं. रात्रीचा स्वयंपाक सायनाने करून ठेवावा. साहेब आल्यावर त्यांचा नाश्तापाणी झाला की तिने घरी परत जावं, असं ठरलं. सायनाने ते अतिशय आनंदाने मान्य केलं. आंटी गेल्या-गेल्या तिने सायंकाळच्या स्वयंपाकाची तयारी केली. कुकर लावला. कोबी चिरली आणि पटकन भाजी फोडणीला घातली. कणीकही लगेच भिजवून ठेवली, आणि त्याच्या ऑफीसच्या फोनवर फोन केला.

"साब, आपको नाश्ते के लिये क्या बनाऊ?"

" अरे तुने क्यू फोन किया? तेरी आंटी कहा है?"

"वो तो बडी दिदी के घर गयी। आपको नहीं बताया?"

"हा, हा फोन आया था। लेकिन मैं मिटींग मे था. इसलिये बात नही हुई। कब तक आनेवाली है?"

"वैसे नही बताया। लेकिन रातका खाना बनाके रखना और आपका नाश्तापानी करके घर जाना, ऐसे बताके गये है।"

"फिर जल्दी फोन क्यू नही किया?"

"साब, खाने कि तयारी करके रखी पहले"

"ठीक है मैं अभी दस मिनट में आता हूं"

"नाश्ते के लिये क्या करू?"

"कुछ भी नही"

"क्यू? भूक नही?"

"बहोत है"

"फिर?"

"घर में आके बताऊ. फोन रखो. मैं अभी निकला."

तुफान वेगानेच चावला घरी आला. चार महिन्यांपासून ज्या संधीची तो वाट बघत होता, ती आज अशी सहज चालून आली होती. कार गेटच्या आत ठेवण्यासाठीही त्याने वेळ दवडला नाही, गाडीतून उतरून जणू धावतच तो दारात आला. आज सायनाने त्याच्या बेल वाजवण्याचीही वाट बघितली नाही. त्याच्या कारचा आवाज येताच तिनं दार उघडंच ठेवलं. काय करावं काहीच न सुचून ती किचनमध्ये काहीतरी करत राहिली. जणू आपलं लक्षच नाही असं दाखवत. चावला मागून आला आणि तिच्या पोटाला आपल्या दोन्ही हातांनी गच्च आवळलं. ती शहारली. त्याच्या मादक स्पर्शाने ती बेहोशच झाली. तिच्या शरीरातलं सारं त्राणच गेलं. सारं शरीर पिसासारखं हलकं हलकं झालं. आपला पूर्ण भार तिनं त्याच्यावर सोपवला. पापण्या जड झाल्या होत्या. त्यानं आपले ओठ तिच्या कानाला लावले तेव्हा तिचं शरीरातलं सारं अस्तित्वच लोप पावलं. तो तिला जवळजवळ उचलूनच बेडरूममध्ये घेऊन आला. दार बंद केलं. बायकोला फोन लावला. 'किती वाजता घ्यायला येऊ?' तिनं सांगितलं, 'सायनाला सांगा स्वयंपाक करू नकोस, तुम्ही पण इकडेच जेवायला या म्हणते दिदी. आठ वाजेपर्यंत या. आपण जेऊनच घरी जाऊ या.' त्याने 'ओ.के.' म्हणून फोन ठेवला, आता तो निश्चिंत झाला होता. बायकोच्या अचानक येण्याचं टेंशन राहिलं नव्हतं. आता निदान दोन तास तरी सायनाला मनसोक्त वेळ देऊ शकत होता. त्याने सायनाला जवळ ओढलं. आणि आपल्या घट्ट

मिठीत आवळलं. तिच्या तोंडून ‘स्सऽऽ हांऽऽ उई मा’ असे अस्फुट शब्द निघत राहिले. आणि शेवटी ती कधी त्याच्यात पूर्ण विलीन झाली हे तिलाही कळलं नाही. तो तृप्त होऊन बाथरूममध्ये गेला तेव्हा त्याच्या लक्षात आलं, की सायनाचा घडा तिच्या आयुष्यात पहिल्यांदा आपण फोडला. आणि बिछान्यावरची रक्ताळलेली चादर बघून सायना मात्र घाबरून गेली होती. एकीकडे स्वर्गसुख आणि दुसरीकडे वेदना होत असूनही तिला साहेबाला स्वत:च्या शरीरापासून बाजूला करावंसं मात्र वाटलंच नव्हतं. पण बिछान्यावरचा डाग बघून ती घाबरली. तिच्यासाठी हे सारंच नवं होतं. तिला रडायलाच आलं. तिला डोळ्यासमोर आंटी दिसायला लागली. “साब, ये क्या है?” “घाबरू नको. ती चादर बदलवून तिथे दुसरी टाक. ही चादर लगेच धुऊन घे. आणि उद्या बाकीच्या सगळ्या कपड्यांसोबत ती चादरही लाँड्रीत दे. म्हणजे आंटीच्या काहीच लक्षात येणार नाही.” त्याच्या शब्दांनी तिला धीर आला. तो म्हणाला तसंच सारं तिनं पटापट आटोपलं. आपले कपडे नीट केलेत. कोणी येईल की काय याची तिला मघापासून भीती वाटत होती. आतापर्यंत सारं निर्वेध पार पडलं. आता कुणी आलं तरी काळजीचं कारण नव्हतं. कारण तिचा दिवसभराचा तिथला वावर साऱ्यांनाच परिचित होता. त्यानं परत एकदा तिला जवळ घेतलं. तिचे केस सावरीत, त्यावरून प्रेमभरानं त्यानं हात फिरविला. तिचे लांबसडक पिंगट, तांबडे झालेले केस त्याला आवडायचे. तिचं अबोधपण त्याला आवडायचं. फक्त एका मुलीचं शरीर हा भाव तिच्यासंदर्भात त्याच्याजवळ राहिला नव्हता. ती त्याला खरंच मनापासून आवडली होती. खरं तर त्याचं त्याच्या बायकोवर खूप प्रेम होतं. त्या दोघांमध्ये चांगला संवाद होता. पण हिनं घरात प्रवेश केला. पहिले तो तिच्याकडे केवळ सहानुभूतीच्याच नजरेने बघत होता. तिच्याबद्दल केव्हा आकर्षण

निर्माण झालं आणि त्या आकर्षणाचं प्रेमात रूपांतर झालं त्याला कळलच नाही. अलीकडे तर तिचं उष्ट-खरकटं काढणं त्याला खटकायला लागलं होतं.

‘सायना’

“जी साब.”

“मैं तुझे मेरी रानी बनाके मेरे पास रखुंगा तो तू रहेगी?”

“क्या बोलते साब आप. इस गरीबका मजाक बनाते?”

“नही सायना. तेरी कसम. तू मुझे बहुत अच्छी लगती है!”

“और आंटी?”

“आंटी तो अच्छी है ही! वो यहा रहेगी, मै तेरे लिये दुसरा घर लुंगा! तुझे वहा रखुंगा!”

“कुछ भी मत बोलो साब, आंटी गुस्सा करेगी. मारेगी वो और मुझे कामपरसेभी निकाल डालेगी! उधर हजार रु. का काम छुट गया करके मां मारेगी.”

“कोई नहीं मारेगा तुझे. लेकिन ये बाते अभी किसीको मत बताना.”

त्याचा खरच जीव बसला होता तिच्यावर. ती केवळ त्याचं खेळणं नव्हती. जेव्हा शक्य होईल, तेव्हातेव्हा तो तिला फिरवून आणत होता. चांगला साबण. चांगला शाम्पू वापरण्यासाठी पैसे देत होता. गाडीतच बसवून तो तिला चांगलं खाऊपिऊ घालत होता. मात्र घरात बायकोच्या आणि तिच्या मध्ये अजिबात तो नसायचाच. आपलं काम बरं नि आपण बरं. तसंच त्यानं तिलाही सांगून ठेवलं होतं. त्याला आता तिच्या शरीराची हाव नव्हती, तर तिच्या मनाची काळजी होती. बायकोनं कौतुकानं स्वत:साठी घेतलेल्या नव्या साड्या त्याला दाखवल्या की

a

अलबत त्यातल्या दोन साड्या तो ‘अजिबात आवडल्या नाहीत’ असं सांगायचा. साहेबांना न आवडलेल्या साड्या बायको बरोबर सायनालाच देणार हा त्याचा अंदाज दरवेळी खरा ठरायचा. आणि तिच्या नजरेत त्याला ‘न आवडलेल्या’ साड्या सायनाच्या अंगावर आल्यात की तो खुश व्हायचा. आंटीने दिलेल्या साड्यांची संख्या वाढली आणि सायनाचे जुने सलवारसूट आपोआप सुटलेत. साड्यांमध्ये तिचं सौंदर्य आपोआप खुलत होतं. सायनाच्या कोवळ्या मनात साहेबांबद्दल ओतप्रोत प्रेम आणि भक्ती दडलेली होती. चावलाच्या घरातलं प्रत्येक काम ती त्यामुळेच अतिशय मनापासून करत होती. आंटीही तिच्यावर भलतीच खुश होती. आपल्या घरात आपल्या नजरेसमोरच सायना राहते, यामुळे चावलाही निर्धास्त होता. त्याला आता तिनं दुसऱ्या कुणाकडे काम करणं नकोच होतं. दिवसभर ती इथंच अगदी कौटुंबिक सदस्यासारखी राहत असल्यामुळे तिच्याही घरचे प्रश्न आंटी गृहीत धरत होती. सगळ्या घरातल्या कामांचा बोजा सायनाने घेतल्यामुळे तिला तिच्याबद्दल खूपच आदर आणि आधारही वाटत होता. भावाच्या तब्येतीबद्दल, भावंडांच्या शाळेतल्या फीबद्दल काहीही सायना आंटीजवळ बोलली की ती काळजी आंटी नवऱ्याजवळ बोलून दाखवायची आणि सायना आपलं एवढं घर सांभाळते आहे, तर आपण तिचे प्रश्न सोडवलेच पाहिजे, या भूमिकेतून तो तिच्या जवळ जास्तीचे पैसे द्यायचा. भावाची ट्रिटमेंट चांगल्या डॉक्टरकडून कर असं सांगायला लावायचा. तो सायनाची सगळ्या प्रकाराने काळजी घेत होता. पण त्या दोघांना एकत्र यायला हवा तसा वेळ त्यांना सापडत नव्हता. त्यामुळे तो व्याकूळ व्हायचा. त्याच्या डोक्यात खूप वेगवेगळे विचार यायचे. आपण करणार आहोत, ते बरोबर की चूक हेही तो आपणच आपल्या मनाला हजारदा विचारायचा. पण तिचं आकर्षण त्याला स्वस्थ बसू देत नव्हतं. त्याला तिला तिथून बाहेर काढायचंच होतं.

हा संसार सांभाळून तिला स्वतंत्रपणे दुसरीकडे ठेवायचं होतं. त्याची आर्थिक परिस्थितीही उत्तम होती. पण बायकोचा सामना तो करू शकणार नव्हता. त्याला आपला संसार मोडायचा नव्हता. त्याच्या मनात सारखं द्वंद्व चालायचं. पण प्रयत्न करूनही सायनाचा विचार त्याच्या मनातून जात नव्हता. सायनाला कुठेतरी वेगळं ठेवायचं म्हणजे या घरातून, तिच्या घरातून तिला वेगळं करायचं आणि स्वत:ही गायब राहायचं. दोघंही एकाच वेळी घरात नाही, म्हणजे सायना आपल्याच सोबत गायब झाली हे सांगायला कुणा वेगळ्या भविष्यवेत्त्याची गरजच नव्हती. काय करायचं? तो सारखा विचार करायचा. आणि अचानक त्याच्या ऑफीसमधूनच त्याला ही संधी मिळाली. ऑफीसने पाच दिवसांसाठी त्याला कलकत्त्याला जायची आर्डर दिली. तो बायकोला म्हणाला, “तू पण चल. वाटेत तुला धनबादला तुझ्या माहेरी सोडतो आणि माझं काम झालं की आपण मिळूनच परत येऊ या. तुझंही माहेरी राहणं होईल.”

ही तर तिच्यासाठी सुवर्णसंधी होती. गुड्डू झाल्यापासून तसंही तिचं जाणं झालेलंच नव्हतं. ठरल्याप्रमाणे ते दोघंही गुड्डूला घेऊन गेलेत. सायना रोज दुपारी एक तास येऊन घराची आणि बगिच्याची स्वच्छता करणार होती. पण भरदुपारी येऊन झाडांना पाणी देण्यापेक्षा तिने नऊ ते दहाच्या सुमारास यावं हे त्याने सुचवलं. ते त्याच्या बायकोलाही पटलं. सगळं त्याच्या मनासारखं होत होतं. चौथ्या दिवशीच फोन करून त्याने बायकोला सांगितलं, ‘माझं कलकत्त्याचं काम आटोपलं पण आणखी तीन दिवस ऑफीसने मला दिल्लीला जायला सांगितलं आहे. म्हणून इथूनच मी दिल्लीला जातो आणि तिथलं काम आटोपून धनबादला येऊनच तुम्हाला घेऊन जातो. मी पण माझ्या सासरच्या लोकांसोबत एक दिवस राहीन.’ त्याचा हा प्लॅन तिला खूपच आवडला. रोज नऊ ते दहाच्या सुमारास सायनाने घरी यावं ही

त्याची आयडिया फोनसाठी होती. तो फोनवर रोज तिच्या संपर्कात राहतच होता. त्याने सायनाला सांगितलं. उद्या सकाळी घरची कामं करून तू ॲटो करून बर्डीवर यायचं. पंचशील टॉकीजजवळ तो ॲटो सोडून द्यायचा. आणि टॉकीजमध्ये तिकीट काढण्यासाठी म्हणून उभं राहायचं. मी तुला तिथे येऊन भेटतो.” सायनाने एवढं ऐकल्यावर तिच्या मनात प्रचंड प्रश्न होते. पण तो म्हणाला, “आपण सारं नंतर भेटीतच बोलू या.”

ठरल्याप्रमाणे तो सकाळच्या विमानाने कलकत्त्याहून नागपूरला आला. टॅक्सी करून पंचशील चौकापर्यंत येऊन त्याने टॅक्सी सोडली. टॉकीजमध्ये येऊन जरावेळ तिकीटच्या लाईनमध्ये उभा राहिला. अमिताभ-राणी मुखर्जीच्या ‘ब्लॅक’ चित्रपटाचा शुभारंभ असल्यामुळे सकाळपासून गर्दी होती. रांगेत उभं राहण्याचा कंटाळा आला आणि खांद्यावर त्या एअर बॅगचा भार झाला असं दाखवून तो तिथून बाजूला झाला. त्याची नजर सारखी भिरभिरत होती. तो तिला शोधत होता. ती तिकीट काढण्याच्या रांगेत उभी असेल, आणि आपण गेल्यागेल्या आपल्याला दिसेल, हा त्याचा अंदाज खोटा ठरला, ती मुळी बाहेर रांगेत उभीच नव्हती. ती आतमध्ये पॉपकॉर्न घेत होती. पण तिचीच एक नजर बाहेर होती. रांग सोडून तो जसा आत येऊन इकडे-तिकडे बघायला लागला, लगेच सायनाच्या दृष्टीस तो पडला. ती पॉपकॉर्न घ्यायचं सोडून लगेच धावतच त्याच्याकडे गेली.

‘साहब, कितना टाईम लगाया.’

‘हळूऽऽ हळू’ अशी खूण करून आधी त्याने तिला गप्प केलं. तरीही तिच्या मोठ्या आवाजातल्या बोलण्याने त्यांच्या आजूबाजूच्यांचं लक्ष त्यांच्याकडे गेलंच.‘हे जरा वेगळंच प्रकरण दिसतंय.’ असे काहीसे भावही काहींच्या चेहऱ्यावर

a

उमटले. त्यांचे चेहरे पाहून एकीकडे त्याला घामही फुटला होता आणि सायना तिथे लगेच दिसल्यामुळे आनंदही झाला होता. ‘चलो’ म्हणून लगेच तो तिथून बाहेर पडला. एअरबॅगच्या वजनाने आधीच त्याचा खांदा जडावला होता. ‘चलो क्यू? सिनेमा देखेंगे ना?’ तिनं इकडे-तिकडे पाहत त्याला विचारलं.

“हा देखेंगे लेकिन पहले नैवेद्यममें जाके कुछ खाके आते है! भूक लगी है!”

भुकेची मात्रा बरोबर लागू पडली. सिनेमाच्या आकर्षणापेक्षा तिच्यासाठी निश्चितच त्याची भूक महत्त्वाची होती. मुळात सिनेमाला जायचं म्हटल्याम्हटल्याच ती अगदी रोमांचित झाली होती. राणी मुखर्जी तिला फार आवडायची. पण अमिताभपेक्षा त्यात अभिषेक बच्चन असायला हवा होता. मग आणखीच मजा. त्यातही सिनेमा ‘साब’ सोबत पाहायचा म्हणजे मजाच. पण ‘साब’ नी आल्याआल्या तिला बाहेरच काढलं. पंचशीलपासून झाशी चौकातल्या नैवेद्यमपर्यंत यायलाही त्याने पटकन ॲटो केला. ‘नैवेद्यमजवळ उतरल्यावर ती त्याला म्हणालीही, ‘साब, इतना नजदीक था. काय कू ॲटो किया. पैदल एक मिनटमें आ जाते थे. ’

‘हा. लेकिन तेरा हाथ हाथ में ले सकता था क्या?’

त्याच्या बोलण्यावर ती चक्क लाजली. पण मनातून मात्र अगदी हुरळून गेली होती. ‘साब’ चा सहवास, त्याचा स्पर्श, त्याचं बोलणं सारंसारं तिला खूपच हवंहवंसं असायचं. त्याच्या प्रत्येक स्पर्शाने ती पुलकित व्हायची. ‘त्या’ दुपारची धुंदी तिला सारखी वेडावत राहायची. त्या दिवशीचा प्रत्येक अनुभव तिला नवा होता. शरीरावरच्या प्रत्येक मुक्कामावरचा त्याचा स्पर्श तिला रोमांचित करून गेला होता. त्याच्या त्या दिवशीच्या प्रेमाच्या वर्षावाने ती गच्च भिजून गेली होती.

a

कोरड्या ठक्क असलेल्या भूमीवर अचानक भरभरून पावसाची सर यावी आणि तिला नखशिखांत गच्च ओलं करून टाकावं, असं काहीसं तिचं त्या दिवशी झालं होतं. पण हा सारव्याचा पाऊस आता तिला परतपरत हवाहवासा झाला होता. त्या पावसात गच्च भिजून चिंब व्हायला तिला आवडलं होतं. तिचं नवथर मन म्हणूनच ‘साब’ च्या स्पर्शासाठी आसुसून राहायचं. आजचा सिनेमा तर तिच्यासाठी पर्वणीच होता. त्याचा हात हातात घेऊनच ती बसणार हा मनसुबा आधीच तिनं मनाशी रचून ठेवला होता. ॲटोतच त्यानं तिचा हात हातात घेतल्याघेतल्या ती त्याला बिलगलीच.

“सायना भूक लागली?”

“ना. तुम्हाला पाहून पोट भरलं.”

“व्वा. बढिया. फिर मैं खाऊंगा. तू देखती रहना!”

“साऽऽब”

बोलतबोलतच दोघंही नैवेद्यमच्या पायऱ्या चढलेही. कोपऱ्यातलं टेबल बघून त्याने तिला बसवलं. तोही तिच्या शेजारच्याच खुर्चीवर बसला. दुपारचे बारा वाजले होते. अतिशय तुरळक ग्राहक होते. वेटरची दुपारी जेवायला येणाऱ्यांसाठी तयारी करण्याची लगबग चालली होती. शेठ खुर्चीवरून आपल्याला निरखतो आहे. असं उगाचंच त्याला वाटलं. आपल्या सोबत विजोड व्यक्ती आहे, याचं त्याला पूर्ण भान होतं. इथून बाहेर पडल्यापडल्या पाच-सहा ड्रेसेस तो तिच्यासाठी घेणार होता. एक ग्रॅमचा सोन्याचा पूर्ण सेट त्याने कलकत्त्याहूनच तिच्यासाठी आणला होता. त्याने आधी खायची आर्डर दिली. ऑर्डर येईपर्यंत तो उगाचंच तिच्यासोबत इकडल्यातिकडल्या गप्पा मारीत राहिला. आपल्या घराबद्दल, बगिच्याबद्दल, तिच्या

भावाच्या तब्येतीबद्दल. त्यांच्या प्लेट्स आल्याआल्या आधी त्या खाऊन संपवल्यात. बिल दिलं आणि कुणाच्याही नजरांकडे न बघता तो तिथून बाहेर पडला. बाहेर आल्याआल्या त्याने आधीच बुक केलेली टॅक्सी येऊन उभी राहिली. त्याने आधी तिला त्यात बसवलं आणि ‘इतवारी मेन मार्केट’ म्हणून टॅक्सी ड्रायव्हरला सांगितलं. बर्डीवरून व्हाया बैद्यनाथ चौक वेगात गाडी इतवारीच्या मार्गाने धावायला लागली.

“साब, आपन पिक्चर पाहानार होतो ना?”

“रात्री पाहू.”

“रात्री? मग मी घरी केव्हा जाईल?”

“रात्री.”

“रात्री? अम्मा रागावेल.”

“सायना. थोडी देर चूप बैठोगी? मेरे सर में दर्द हो रहा है!”

ओशाळून तिनं त्याच्याकडे बघितलं. आणि गप्प झाली. त्यानं तिचा हात हातात घेतला. तो स्वत:च्या कपाळावर जरासा चेपला. मग आपल्या छातीवर तिचा हात ठेवून गप्प पडून राहिला. नंगा पुतळयाजवळ आल्यावर ड्रायव्हर म्हणाला, “साहेब, इतवारीत कुठे घ्यायचंय.”

“कपडा लाईनला घे.”

“साहेब कॉर्नरला सोडतो. गाडी आत घेता नाही येणार. पार्किंगचा प्रॉब्लेम आहे. मी मेन मार्केटच्या समोरच्या गल्लीत गाडी थांबवेल. चालेल?”

“ठीक आहे.”

कॉर्नरला हे दोघेही उतरले. आता बॅग त्याने गाडीतच ठेवली. उतरताउतरता ड्रायव्हरचा मोबाईल नंबर त्याने घेतला. "माझं आटोपलं की मी फोन करतो. तू इथेच ये."

"होय साहेब."

गाडीतून उतरल्यावर त्याने तिला सरळ 'शीतल' मध्ये नेलं. रेडिमेट सूट मागवले. भरपूर स्टॉक बघून त्यातले चार-पाच ड्रेसेस त्यानं तिच्यासाठी पसंत केले. हे सारं काय चाललंय, हे अद्यापही तिला नीट कळेना. एक निळसर आकाशी कलरचा सिफॉनचा ड्रेस वेगळा काढून त्याने तिथल्या मार्केटिंग लेडीला सांगितलं,

"हमारी मेमसाब को ट्रायल रूम दिखाओ वो पहनके आयेगी." आणि सायनाकडे बघून तो हळू आवाजात म्हणाला, "सायना, वो लडकीके साथ जाओ. ये पुराना ड्रेस उतारो, नया ड्रेस पहनो. फिर हम पिक्चर जायेगे. कुछ भी बात नही करना. जाओ"

तिनं विलक्षण विचित्रासारखं त्याच्याकडे बघितलं, आणि त्या पोरीच्या मागोमाग ती गेली. पोरीच्या अनुभवी नजरेनं जे काय टिपायचं होतं ते टिपलच. 'अच्छा बकरा मिल गया ये पगली लडकी को तो.' मनाशीच तिचा हेवा करत, ती पोरीला ट्रायल रूमकडे घेऊन गेली. खरं म्हणजे सायना जाम घाबरली होती. 'शीतल' सारखं एसी गार्मेंट शो रूम तिनं आयुष्यात पहिल्यांदा पाहिलं. दार उघडणारा दरबान पाहून तिला तर तोच दुकानाचा मालक वाटला. आतमध्ये गेल्यावर दुकानाचा थाटमाट बघून ती थक्कच झाली. तिथल्या मुली फक्त उभं राहून येणाऱ्यांकडे हसतात हे पाहून तिला वैतागच आला. त्यातली एक पोरगी तर सारखीच आपल्या 'साब' कडे बघतेय हे तिच्या लक्षात आल्यावर तिचा वैताग

a

आणखीच वाढला. पण साब आल्याआल्या कपडे पाहण्यातच दंग. ते तिच्याकडे बघतही नव्हते. सारखं 'ऐसा दिखाओ, वैसा दिखाओ, ये रंग नही होना. वो उधरका निकालो, लाल के पासवाला दो, उपरसे पाचवा दो.' असंच चाललं होतं.

आंटी नसताना आंटीसाठी साब काय एवढी खरेदी करीत आहेत, हा प्रश्न तिला सारखा छळत होता. पण काहीच विचारायची सोय नव्हती. एवढ्या मोठ्या दुकानात आधीच ती बुजली होती. त्यात ती काही बोलायला गेली की तो सारखं ओठांवर बोट ठेवून 'शूऽऽ चूप बैठो बादमें बात करेंगे' म्हणायचा आणि तिला चूप बसवायचा. त्यामुळे तिचे सारे प्रश्न मनातल्या मनातच राहिले. आता तर चक्क तो तिला 'हे नवे कपडेच घालून ये' म्हणाला. विचारायचं काही नाहीच. ती बाहुलीसारखी फक्त त्या मुलीच्या मागे गेली. असं दुकानात एका लहानशा खोलीत जाऊन कपडे बदलायचे ही तर कल्पना तिच्यासाठी अशक्यप्राय होती. पण 'साब' शी बोलण्याची, त्यांच्यासोबत वाद घालण्याची तिची याक्षणी हिंमत नव्हती. साब गंभीर असले की ती त्यांच्याशी काहीच बोलू शकत नव्हती. ती त्या पोरीच्या पाठीमागे गपचूप गेली. पण मनातल्या मनात चिडचिडतच. पोरीने ट्रायलरूम दाखवली. जेमतेम उभी राहू शकेल एवढी. 'अंगावरचे कपडे इथे या दुकानातल्या या लहानशा डब्ब्यात काढायचेच कशाला?' परत ती मनातल्या मनात साबवर चरफडली, वरचा सलवार काढल्याकाढल्या टयूबलाईटच्या स्वच्छ प्रकाशात ती सगळीच्यासगळीच समोरच्या मोठ्या आरशात दिसली, तेव्हा ती लाजलीच, 'उई मा' नकळत तिच्या तोंडातून शब्द बाहेर पडला.' तिनं आपला चेहरा आपल्याच हातांनी झाकला. हे काय? आयुष्यात पहिल्यांदाच ती आपलं उघडंनागडं शरीर अशी आरशात बघत होती. पांढरा स्वच्छ दुधाळ प्रकाश तिच्या उमलू पाहणाऱ्या शरीराला

रोमांचित करून गेला. आपला गोरा रंग, आपले भरलेले स्तन, कोवळे बाहू, नाजूकशी मान आणि गोऱ्यागोऱ्या मानेवरचा तो मोठ्ठा काळा तिळ किती पप्प्या घेतल्या होत्या साबनी या तिळाच्या, आत्ताही तिला ते आठवलं, ती सारं विसरून आरशात स्वत:लाच निरखत राहिली, मग तिनं खालचा पैजामाही काढला, खूपवेळ त्याच अवस्थेत ती उभी राहिली, काय करावं तिलाच कळेना. आज आपण असे सारेच कपडे एकदम का काढून टाकलेत हेही तिला कळेना. पण आज असे आपलेच कपडे आपणच उतरवताना कुठेतरी छान वाटत होतं. स्वत:चं अख्ख शरीर आज प्रथमच ती अशी आरशात निरखत होती. कितीवेळ ती तशीच उभी होती. पण दारावरच्या टकटकीने तिची तंद्री कुणीतरी भंग केली. तिला लक्षात आलंय, अरे आपल्याला कपडे बदलून पटकन बाहेर जायचंय. साब वाट पाहत असतील. मग तिने पटकन नवे कपडे अंगावर घातले. ओढणी घेतली. जुने कपडे घडी करून पॉलिथीनमध्ये ठेवून घाईतच बाहेर पडली. या गडबडीत मात्र नवे कपडे घातल्यावर आरशात पाहायलाही विसरली. बाहेर तो तिची वाट बघून कंटाळला होता. ती बाहेर येताच नव्या कपड्यातला तिचा मोहक चेहरा त्याला खूप गोड वाटला. पण त्याला आलेला राग तो आवरू शकला नाही. 'ये क्या सायना? कितनी देर लगायी?'

ती गप्पच बसली. त्याने तिच्या सलवारला चिकटलेलं स्टिकर काढलं. आणि बॅगा घेऊन तो बाहेर पडला. त्याच्या पाठोपाठ तीही. मग तो तिला घेऊन त्याच रांगेतल्या 'बाला शूज' मध्ये घेऊन गेला.

"इनके लिये चप्पल दिखाओ"

"साब, चप्पल या सॅन्डल्स?"

"सॅन्डल भी चलेगी. लेकिन जादा हिलवाली नही" ती त्याच्याकडे टकाटका पाहतच राहिली. आज याचं नेमकं काय चाललंय, हेच तिच्या लक्षात येत नव्हतं. हा

आज आपल्याला असा नवरीसारखा का सजवतोय हेही तिला कळत नव्हतं. पण त्याला काहीही विचारण्याची सोय नव्हती. हे सारं तो हौसेनं करत असला तरी त्याच्यावरचा तणाव नक्कीच जाणवत होता.

"सायना, ही सॅन्डल छान आहे. तुला आवडली?"

"हं."

काहीतरी उत्तर द्यायचं म्हणून तिनं हलक्या आवाजात 'हं' म्हटलं पण ती फार भांबावून गेली होती.

"हे े सगळं...?"

"चूप बैस सायना. नंतर बोलू." हा आपल्याला थोडंही का बोलू देत नाही?

जे काय चाललंय यातलं आपल्याला काहीच समजत नाहीये, हे तिच्या लक्षात आलं होतं. ती खूप घाबरून, बावरून गेली होती. पण बोलायची सोय नव्हती, नेहमी त्याच्या आसपास असलं तरी आपल्याला आश्वस्त वाटतंय, आज अशी भलतीच भीती आपल्या मनात का येतेय, हेच तिला समजत नव्हतं. 'सॅन्डल घालून बघ' म्हटलं म्हणून तिनं ती पायात घातली. 'मस्त.' मनाशीच म्हणाली. तिला ती खूपच आवडली. तिनं हसून त्याच्याकडे बघितलं. पण तो पाकिटातले पैसे काढून दुकानदाराच्या हातात ते ठेवण्याच्या घाईत. आधीची तिची जुनाट झिजूनझिजून फाटलेली चप्पल त्याने नव्या चपलेच्या खोक्यात टाकायला लावली. ते पुडकं तिथल्या नोकराच्या हातात दिलं आणि तिथून तो वेगातच बाहेर पडला. तिला त्याच्यामागे धावावंच लागलं. दोघही गाडीजवळ आलीत. त्याने ड्रायव्हरला मोबाईल करून बोलवल्यामुळे त्यांना फार पायी चालण्याची गरजच पडली नाही. गाडीत बसल्यावर त्याला सुचेचना आता हिला कुठे न्यायचं? त्याने आधी जेवढे

a

विचार करून ठेवले होते, प्रत्यक्ष वेळ आली, त्यावेळी त्याला ते सारं अशक्यप्राय वाटत होतं. कुठल्याही चांगल्या पॉश हॉटेलमध्ये आपल्यासोबत सायनाला नेणं एवढं सोपं नाहीय हे त्याच्या आत्ता वेळ आल्यावर लक्षात आलं. त्यामुळे मध्यम दर्जाच्याच जरा आडमार्गात असलेल्या हॉटेलकडे गाडी घ्यायला लावावी, या विचारातच त्याने 'हॉटेल अमीर' ला ड्रायव्हरला गाडी घ्यायला सांगितली.

गाडीत बसल्यावर त्यानं आधी सायनाला जरा जवळ घेतलं. मघापासून आपण सारखं तिच्याशी फटकूनच वागतो आहोत, हे आता त्याच्या लक्षात आलं होतं. पण त्याला इलाज नव्हता. कोणत्याही दुकानात तिच्या जास्तीच्या बोलण्याने आपण कुणाच्याही नजरेत भरायला नको याची तो काळजी घेत होता. त्यासाठी त्याला तिच्याशी असंच वागणं भाग होतं.

"सायना, गुस्सा आया?"

"नही तो. गुस्सा क्यू आयेगा?"

"हम आपके साथ ठीक से बात ही नही कर पा रहे."

"साब इतनी सारी खरेदी हम क्यू कर रहे है? और पिक्चरका क्या हुआ? आप मुझे आज पिक्चर दिखानेवाले हो ना?"

"पिक्चर रात्री बघू."

"रातको? साब आज आपको क्या हुआ? दो घंटे से हमलोग बहार घुम रहे है। मुझे जल्दी घर जाना है। आंटी जबसे यहां नही है, तबसे मै जल्दी घर जाती हूं। अम्मा चिल्लायेगी।" बोलताबोलता ती रडवेली झाली.

"बरं लवकर जाऊ. आता आपण आधी चांगल्या हॉटेलमध्ये जाऊन हे सगळं सामान ठेवू, नंतर बढिया जेवण करू. नंतर मी तुला घरी सोडतो."

“साब, घर के बजाय हम होटल मे सामान क्यू रख रहे है?”

“सायना, तू फार प्रश्न विचारतेस बाबा.”

सायना त्याच्या बोलण्याने दुखावली. गप्पच झाली. ‘आता याच्याशी काही बोलायचंच नाही’ तिनं ठरवलं. त्याने तिचा हात हातात घेतला. तिच्या पाठीमागून एक हात टाकला आणि तिला जवळ ओढलं. तीही लगेच त्याला बिलगली. त्याचा स्पर्श होताच तिचा सारा राग गेलाच. हॉटेल अमीरसमोर ड्रायव्हरने गाडी थांबवली. त्याने तिला गाडीतच बसायला सांगितलं. स्वत: हॉटेलच्या रिसेप्शनला जाऊन डबलबेडरूमची डिलक्स रूम त्याने आपल्या नावे नोंदवली. सायनाचं नाव बायको म्हणून त्यानं नोंदवलं आणि गाडीतलं सामान आणायला वेटरला पाठवून त्याने हॉटेलच्या चार पायऱ्या खाली उतरून सायनाला आवाज दिला. त्याच्या आवाजाने सायना खाली उतरून त्याच्याकडे गेली. तो तिला घेऊन लगेच लिफ्टमध्ये गेला. तिच्या मनात हजारो प्रश्न होते. पण विचारायचे नव्हते. ती रिसेप्शन समोरून जाताना मॅनेजरच्याही मनात काही प्रश्न निर्माण झालेत. पण त्याने रूम बुक केली होती. त्यामुळे मॅनेजर आता लगेच काही ऑब्जेक्शन घेऊ शकत नव्हता. पण एकंदरीतच तिच्याकडे बघितल्यावर स्मार्ट, स्टायलीश आणि एज्युकेटेड चावलाची ती बायको वाटत नाही हे मात्र मॅनेजरच्या अनुभवी डोळ्यांनी चांगलंच हेरलं होतं, आणि इकडे जरा नीट लक्ष ठेवायला हवं, हेही तो मनाशी पुटपुटलाच.

a

वैदेही आपल्या क्लायंट्ससोबत नवीन मालाबद्दल चर्चा करण्यात व्यग्र होती. वेगवेगळ्या फॅशनचे डिझाईन्स प्रदीपला करून हवे होते. प्रदीप चांगलाच बारीक स्वभावाचा होता. तो सगळा व्यवहार नीट समजून घेऊनच ऑर्डर देणार होता. त्यामुळे वैदेहीने आज त्याच्याचसाठी वेळ ठेवला होता. दुसरी कोणतीही अपॉईंटमेंट आज तिने कुणालाच दिली नव्हती. यावेळी फोनची रिंग घणघणली, तेव्हा ही तिसऱ्यांदा वाजतेय, हे तिच्या लक्षात आलं. यावेळी एक रिंग वाजल्यावाजल्याच तिने पटकन फोन उचलला. 'कोण बोलतंय?' तिनं विचारलं. क्षण दोन क्षण तिकडून काहीही आवाज आला नाही. वैदेहीला आता फारच चीड आली. कोण हा गाढवपणा करतंय. मूर्ख मेले. ती चिडून ओरडली. "कोण आहे? बोलत का नाही? फोन बोलायला करता की फक्त आवाज ऐकायला?" जरा वेळ तरीही फोन सुरू ठेवला. पण आता ती जरा अस्वस्थच झाली. कोण असेल असं सारखं ब्लँक कॉल करणारा. क्लायंटसोबत बोलण्याची तिची सगळी लिंकच तुटली. मघा त्याच्याशी बोलण्यात आपला संवाद कुठवर आला होता, कशावर बोलत होतो, काहीच तिच्या लक्षात येत नव्हतं. तिने प्रश्नार्थक नजरेनच प्रदीपकडे बघितलं. एव्हाना या नव्या क्लायंटच्याही लक्षात आलं होतं की मॅडम आता डिस्टर्ब झालेल्या दिसत आहेत. "मॅडम, समथिंग इज राँग विथ यू?"

“ नो. नो. नॉट अ‍ॅट ऑल. जरा लिंक तुटली एवढंच. लोक फोन करतात पण बोलत नाहीत. मूर्खपणाच एकेकाचा.”

“चालायचंच. दुसऱ्या कुणासाठी तरी तो असावा. त्याला हवा असलेला आवाज नाही असं जाणवल्यामुळे पलीकडच्याने तो ठेवला असावा. आपण आता आपल्या कामाकडे वळू या?”

“होय. निश्चित. प्रदीपजी, तुम्ही निश्िंचत असा. लेटेस्ट फॅशन्स आम्ही तुम्हाला देऊ. यावेळी जरा वेगळं अलायनमेंट घेऊ या. तिरपा कट घेऊ. समोर जरा स्मॉकिंग टाकूया. आता पंचवीस वर्षांपूर्वीचं स्मॉकिंग परत येतंय. तुम्ही अजिबात काळजी करू नका. आमच्याकडे चांगली डिझायनर आहे आणि त्याहीपेक्षा उत्तम मर्चेन्टायझर आहे. ती प्रत्येक गोष्ट स्वत:च्या डोळ्याखालून घातल्याशिवाय ओ.के. करतच नाही. अगदी डिझायनरने तयार केलेल्या डिझाईनवर सुद्धा आम्हाला तिचा शेरा महत्त्वाचा वाटतो. तुम्ही खरंच निश्चिंत असा प्रदीप.”

“मॅडम, मी आतापर्यंत मुरारका आणि मंदानासोबत काम केलंय. पहिल्यांदा मी तुमच्याकडे ऑर्डर देतोय.”

“इथून पुढे परतपरत द्याल.”

“ओ.के. बघूया. निघू मी?”

“निश्चिंत मनाने. पुढल्या सोमवारला आपण पेपर्स साईन करूया. मी नसले तरी दशपुत्रे तुमच्या सगळया फॉरमॅलिटीज पूर्ण करेल. ओ के.?”

“ओ.के. हॅव अ गुड डे.”

प्रदीप केबीनमधून बाहेर पडतच होता, तोच परत फोन वाजला. याहीवेळी तिनं तो पटकन उचलला. ‘हॅलो.’

‘हॅलो, मॅडमजी है?’ कडक आवाजात कुणीतरी बोलत होतं.

“बोल रही हूं.”

जाताजाता प्रदीपने वळून तिच्याकडे बघितलं, हलकसं स्मित केलं आणि पटकन निघून गेला.

“मॅडम मुन्नी कहा है?”

मुन्नी! मुन्नी शब्द पलीकडून ऐकताच वैदेहीचे सगळे गात्र सतर्क झालेत. शरीरातली शीर न् शीर ताणल्या गेली. एवढे दिवस ती ज्या फोनची वाट बघत होती; म्हणजे येऊ नये हे जरी वाटत होतं, तरी येणारंच याची खात्री होती, तो फोन आज आलाच शेवटी. पण मुन्नीसाठी कुणाचा तरी फोन म्हणताच, तिच्या मनात धस्सच झालं. एवढ्या दिवसांत मुन्नीसाठी फोन का आला नाही, याचं आश्चर्य जरी वाटत होतं, ती त्या फोनची वाट जरी बघत होती, तरी तिच्या मनात या फोनची एक धास्ती होतीच. शंभर प्रकारच्या शंभर बायकांना घेऊन त्या घाणेरड्या वस्तीत ‘धंदा’ चालवायचा, अरेरावी करणाऱ्या, गुंडगर्दी करणाऱ्या दारू पिऊन तर्र असणाऱ्या, प्रसंगी खून-खराबाही करू शकणाऱ्या गिऱ्हाइकांनाही सांभाळू शकणाऱ्या पहिलवान आणि आंटीसोबत मुन्नीसंदर्भात आपल्याला एक दिवस बोलायचं आहे याची तिला पूर्ण जाणीव होती. अनेक गोष्टी अति आत्मविश्वासाच्या भरवशावर हाताळणारी वैदेही यावेळी मात्र जपून होती. पूर्ण सावध होती. एका मुलीचं आयुष्य तिच्या समोर होतं. त्याचं गांभीर्य तिला होतं. तिच्या आयुष्याचं मोलही वैदेहीला होतं. फोनवर मुन्नीची विचारणा होताच ती सावध झाली.

“कोण बोलत आहे?”

“मुन्नी कहा है?”

a

“कोण मुन्नी?”

“मॅडम, शहानपंथी करने की नही अपुनके संग. क्या? बताओ मुन्नी कहा है?”

“कोण बोलताय तुम्ही? आणि कोणत्या मुन्नीबद्दल विचारत आहात?”

“मेरी बच्ची. मेरी बच्चीको भगाके ले गये तुम”

“तुमची बच्ची? पण तुम्ही कोण?”

“मैं जो भी हूं. मेरी बच्ची कहा है?”

“तुम्हारी बच्ची मैं क्यू भगवाऊंगी?”

“तुम ज्यादा शायनी हो ना इसलिये.”

“अगर मैने तुम्हारी बच्ची भगवायी, तो पुलीस के पास जाओ ना.”

“एय मॅडम, बोला ना मैं, जादा शायनी मत बन. मुन्नी कहा है बता.”

“देखो, तुम जो भी हो पता नही. और कौनसे मुन्नीके बारे मे बात कर रहे हो, ये भी मैं नहीं जानती. इसके बाद मुझे फोन नही करना. अगर आपको लगता है, कि तुम्हारी मुन्नी मैंने चुराई तो आप पुलीस में रिपोर्ट दर्ज कर सकते हो।”

एवढं एका दमात बोलून वैदेहीने फोन ठेवला. इकडनं फोन बंद होताच तो मात्र जाम चिडलाच. लगेच त्याने फोन रिडायल केलाच. अर्थात याची वैदेहीला अपेक्षा होतीच.

‘हॅलो.’ त्याचाच आवाज आहे की नाही याची खात्री करून घेण्यासाठी ती बोलली.

“मॅडम अगर शामतक तुमने मेरी बच्ची मेरे हवाले नही की तो बहुत बुरा होगा. अल्ला कसम तुम्हारी बच्ची तुमको नही दिखेगी.” तो चिडून बोलला आणि त्याने रिसिव्हर क्रेडीलवर आपटला. त्याने फोन ठेवल्यावर वैदेहीने फोन ठेवला. पण ती अक्षरश: थरथरत होती. त्याच्या धमकीने ती नखशिखांत घाबरली. ही असली घाणेरडं काम करणारी माणसं कोणत्याही थराला जाऊ शकतात, याची तिला जाणीव होती. ती भयंकर घाबरली. जरा वेळ तर तिला काही सुचलंच नाही. घामाने डबडबलेला चेहरा तिने रुमालाने पुसला. विवेककडून पाणी मागवलं. मग खुर्चीतच मागे रेलून डोळे मिटून बसून राहिली. पण डोळे मिटताच रेवाच तिच्या डोळ्यासमोर आली. रेवा.....रेवा आणि देवयानी! जोरात ओरडावंसं वाटलं तिला. मुलींच्या तर केसालाही धक्का लागलेला चालत नाही तिला. मुली तिचं काळीज आहेत, त्याने त्यांचं नाव घेतलंच कसं? माझ्या मुलीपर्यंत तो नालायक माणूस कसा पोहचू शकतो? काय....काय करायला हवं? त्याचा काय भरवसा? मुन्नी...मुन्नीला त्या नरकातून सोडवण्याची एवढी मोठी शिक्षा! आणि मुन्नीसाठी रेवा, देवयानीच्या जीवाला जर का धक्का पोहचणार असेल तर....

वैदेहीच्या मनात विचारांनी नुसती गर्दी केली. जणू तुफान वादळ सुटलंय. तिच्या डोक्यात अक्षरश: विजा चमकायला लागल्या. गांगरलीच ती त्याच्या जीवघेण्या धमकीनं. रेवा. तिनं मोबाईल हातात घेतला आणि लगेच लावला. बी मध्ये गेल्यागेल्या आलाच तिचा ‘बच्चा.’

“रेवा कुठे आहेस बच्चा?”

“मम्मी काय झालं गं? तुझा आवाज असा का येतोय? बरं नाही काय?”

“मला बरं आहे. तू कशी आहेस? कुठे आहेस तू?”

“मी आत्ताच कॉलेजमधून आले. होस्टेलवरच आहे.”

“बच्चा. जरा जपून राहा बेटा. एकटी कुठे बाहेर जाऊ नकोस हं.”

“अगं काय झालं मम्मा? घाबरली की काय?”

“घाबरले नाही गं. उगाचंच तुझी आठवण आली म्हणून. सतत माझ्या संपर्कात राहा बेटा.”

“म्हणजे? जशी काय राहतच नाही. रोजच तर रात्री बोलतो आपण. मम्मी, आपण दोघी जेवढ्या बोलतो ना, माझ्या एकापण मैत्रिणीच्या आया तेवढं बोलत नाहीत.”

“जाऊ दे. त्यांना आपल्या मुलीशिवाय करमत असेल. मला नाही करमत.”

“बरं. बाकी कशी आहेस तू? ऑफीस ठीक चाललंय? आणि तुझी मुन्नी काय म्हणतेय?”

“मुन्नी? मुन्नीचाच तर प्रॉब्लेम आहे.”

वैदेहीच्या तोंडून वाक्य बाहेर पडलं आणि लगेच तिने जीभ चावली. अरे हे काय भलतंच.

“मुन्नीचा प्रॉब्लेम? काय झालंय ग?”

“नाही नाही. झालं काही नाही गं, पण तिची जरा काळजीच वाटते ना. घरात एकटी असते ती.”

“मम्मी, तूच एक-एक काम फालतू वाढवतेस. खरं तर त्या मुलीला घरी आणण्याची काही गरज होती काय? तिथून सोडवलंस ते खूप झालं. एकतर तिच्याच वडिलांकडे नेऊन द्यायचंस नाही तर पोलिसांच्या स्वाधीन करायचं. किंवा एखाद्या अनाथाश्रमात. तुला अंगाला लावून घ्यायची फार सवय आहे मम्मी. बाकीच्या सोशल वर्कर्सकडे बघ जरा. बाहेरबाहेरची, वरवरची कामं करतात,

वर्तमानपत्रवाल्यांना बातम्या देतात, दूरदर्शनचे चॅनल्स हाताशी ठेवतात आणि वारेमाप प्रसिद्धी मिळवून दुसऱ्यादिवशी त्या प्रश्नापासून वेगळ्या होतात."

"इतर तसं करतात, म्हणून आपणही तसंच करावं का बेटा?"

"मम्मी, अंगावर घेऊन करायची तुझी सवय आहे. मोठमोठ्यांच्या भानगडीत तू पडतेस, ते तुला धमकी देतात, मग तू आमची काळजी करतेस. दादाची तेवढी नाही, पण आम्ही मुली म्हणून आमची जास्त."

"बरं बरं बस झालं. संधी मिळाली की तू मला सुनवत जा."

"तुला सुनवण्याची माझी काय बिशाद आहे गं. पण तू जे स्वत:ला त्रास करवून दुसऱ्यांसाठी करतेस ना, खरंच ते नाही पटत यार मला."

"अच्छा यार नंतर बोलू. बाय. काळजी घे. बाहेर एकटी जाऊ नकोस. बुधवारपेठ, लक्ष्मीरोडला तर अजिबात नाही. देवयानीशी पण बोलायचंय मला आता."

"कॉलेजला पण नको जाऊ मम्मा?"

"रेवा.. चावट मेली. ठेवते फोन."

रेवाच्या फोनवरच्या आविर्भावावर सुद्धा वैदेहीला हसू आलं आणि मघापासूनचा तिचा ताण थोडासा कमी झाला. पण डोक्यातले विचार मात्र संपत नव्हते. तिचा फोन बंद झाल्याचं लक्षात येताच विवेक आत आला आणि म्हणाला, "मॅडम, बाहेर लोक वेटिंगमध्ये आहेत. पाठवू?"

"कोण आहे. कोणत्या कामानिमित्त."

"फॅक्टरीच्या संदर्भात."

“पाठव”

विवेक बाहेर जात नाही तोच तीन जण आत आले. खरं तर तिला देवयानीशी पण बोलायचं होतं. पण आत आलेल्यांना तिनं बसायची खूण केली. ते तिघंही तिच्या समोर खुर्चीवर बसले आणि म्हणाले, “मॅडम, गोंदियाला आम्हाला कपड्यांची फॅक्टरी काढायची आहे. त्यासाठी तुमची मदत हवी आहे.”

“नक्कीच. पण आपण कोण? आपला परिचय?”

“आम्ही तिघंही गोंदियाचे. मी सावरकर, हे राठोड आणि हे पांडे”

“नमस्कार”

“नमस्कार”

“तुम्ही सध्या तिघंही काय करता?”

“माझं कपड्याचं दुकान आहे, याची दिनशॉ आईसक्रीमची फ्रेंचाईझी आहे आणि पांडे आमच्या परिसरातले उत्कृष्ट शेतकरी आहेत. एकरी दहा क्विंटल कापूस पिकवतात ते.”

“व्वा. उत्तम. खूपच चांगलं त्रिकूट आहे तुमचं तर. चांगलं होईल तुमचं फॅक्टरीचं प्रोजेक्ट.”

“मॅडम पण आम्हाला तुमची मदत लागेल.”

“करील मी. पण माफ करा. आज मला एक अर्जंट मिटींग आहे. तुम्ही मला फोन करून आला असतात तर मी तुमच्यासाठी वेळ ठेवला असता. आपण परत कधी निवांत येऊ शकता?”

a

“नक्की मॅडम. सॉरी. खरंच आम्ही तुमची वेळ घेऊन यायला हवं होतं; पण आमचंही अचानकच ठरलं. आज आम्ही चान्स घेतला. मात्र परत कधी यायचं ते सांगा.”

“गुरुवारला. दुपारी दोन वाजता. चालेल?”

“चालेल”

“येतो मॅडम आम्ही.”

“ माफ करा, पण आज मी तुम्हाला चहा पण ऑफर करू शकत नाही.”

“ काही हरकत नाही मॅडम आम्ही परत येऊ.”

“या.”

वैदेही इतकी अस्वस्थ होती की तिला त्यांच्याशी काय कुणाशीच बोलायची इच्छा नव्हती. मुन्नीसोबतच आज देवयानी-रेवाचाही विचार येत होता. आज तिला मुन्नीपेक्षा रेवाची आणि देवयानीची काळजी वाटत होती, हे खरं होतं. सुहासशी बोलावं काय की मोहनशी? पण इथून एवढ्या लांब औरंगाबादमध्ये असलेल्या मोहनसोबत फोनवर बोलून काय होणार? फार झालं तर मनावरचा ताण कमी होईल. बाकी प्रत्यक्ष त्याचा काहीही उपयोग होणार नाही. एवढ्या लांबून तो आपल्याला काय मदत करू शकेल? त्यापेक्षा सुहासशी बोलणंच उत्तम. तिचा सुहाससोबत बोलण्याचा विचार पक्का होताच तिने त्याला फोन लावला.

“हॅलो सुहास”

“हाय डिअर काय म्हणतेस.”

“ऑफीसमध्ये ये. भेटायचं आहे.”

“कधी?”

“आत्ता”

“आत्ता? अरे यार आत्ता मी कामात आहे.”

“तर काय झालं. मला तुझ्याशी बोलायचं आहे. लवकर ये.”

“अरे आज माझा असिस्टंट आलेला नाही. खूप कामं आहेत. दोन तासांनंतर येतो.”

“नाही ना सुहास. लवकर ये. प्लीज तुझ्याशी महत्त्वाचं बोलायचं आहे.”

“अरे बाबा....”

“सुहास, तुला यायचं नसेल तर तसं सांग. नालायक मेला. जा फूट.” वैदेहीचे डोळे चक्क पाणावले. याक्षणी तिला अगदी एकटंएकटं वाटायला लागलं. सुहास तिचा हुकमाचा एक्का होता. कधीही काहीही चर्चा करायची असेल, मनातली गरळ ओकायची असेल, कुणासोबत काही वादविवाद झाले असतील तरी सुहासजवळ ते व्यक्त व्हायलाच हवं असायचं. सुहास एरवी कितीही खिल्ली उडवणारा, मस्करी करणारा, सतत चावटपणे बोलणारा असला तरी योग्यवेळी मात्र त्याला परिस्थितीचं भान ठेवता येतं. त्याची समज चांगली आहे. प्रश्नाचं गांभीर्य त्याच्या लवकर लक्षात येतं आणि शक्य असेल तशी तो तिला मदतही करतो. खरं तर वैदेहीला त्याची मदत ती काय लागणार असते? आपण आवाज द्यावा आणि त्यानं यावं बस एवढंच. पण एरवी सर्वांच्या संदर्भात समजूतदार असलेली वैदेही सुहासची कोणतीच अडचण ऐकायला तयार नसतेच. माझ्या अडचणींसमोर सुहासची व्यक्तिगत अडचण येता कामाच

नये अशीच तिची ठाम भूमिका असते. सुहास खूप महत्त्वाच्या कामात अडकल्याशिवाय असं म्हणणार नाही, याची खात्री असूनही तिला त्याचा राग आलाच. कदाचित अपेक्षाभंग झाल्यामुळे किंवा अहंकार दुखावला गेल्यामुळे. मग तिनं मोहनला फोन लावला.

"हॅलो, कुठे आहेस तू?" तिकडून रिसिव्हर उचलल्याउचलल्या ती म्हणाली.

"मॅडम मी राजू बोलतोय. सर बाहेर गेलेयत. मोबाईलवर ट्राय करा."

"सॉरी", वैतागून वैदेहीनं फोन ठेवला.

खुर्चीला रेलून डोळे मिटून दोन मिनिटं गप्प पडून राहिल्यावर तिच्या डोक्यात अचानक काहीतरी प्रकाश पडल्यागत ती दचकून खुर्चीत सावरून बसली आणि मघाशी आलेले तिघे खरंच आपल्यासोबत व्यावसायिक चर्चा करायला आले होते की....तिच्या मनात धस्सच झालं. ती वेगात तिथून उठून बाहेर पडली. काळजीनं काळवंडून. कुणीतरी सतत आपल्या मागावर आहे, याची तिला जाणीव झाली आणि तिच्या पायातलं बळ गेल्यागत वाटलं तिला.

**“मु**न्नी.”

“आली आई,”

हातातलं पुस्तक बाजूला ठेवून मुन्नी आतल्या खोलीतून धावतच हॉलमध्ये आली.”

“काय आई?”

“मुन्नी इकडे ये माझ्याजवळ. मुन्नी, तू आज माझ्या पर्सला हात लावला होतास?”

“नाही आई.”

“खरं सांगतेस?”

“तुझी शपथ आई.”

“शपथ काय घालतेस ग वेड्यासारखी. कुणी लावला मग हात?”

“माहीत नाही बॉ. पण काय झालं गं?”

“पैसे कमी आहेत त्यातले.”

“दादांने घेतले असतील.”

“दादा आलाय का सकाळपासून घरी?”

a

“नाही.”

“मग सकाळी यात पैसे होते. आता नाहीत. खरंच नाही घेतलेस ना तू? मुन्नी पैसे हवे असतील तर मला सांगायचं बरं का? उगाच पर्सला हात लावायचा नाही. न सांगता.”

“आई नाही गं घेतले मी. मला माहीत आहे. चोरी करणं वाईट आहे ते. इथे... या घरात मी कशी चोरी करेल आई. आई तू माझ्यासाठी काय केलं हे थोडंथोडं कळतं गं मला. गजा चोरी करून कुणाच्या घरून काही आणायचा ना, तेव्हा नाना लई ठोकायचा त्याला. पण नानाबी त काही तरी चोरतच राहायचा गं. काय घाणघाण वस्तू पडल्या राहायच्या आमच्या घरात. छी.”

“मुन्नी, तुला तुझ्या घरची आठवण येते काय गं?”

“घराची आठवण अजिबात येत नाही आई. त्या घरची आठवण येण्यासारखं आहेच काय? फार घाण, वंगाळ होतं बाई ते सारं. माझा बाप म्हणजे हरामखोर माणूस. रात्रीचा भयंकर पिऊन यायचा. आल्याआल्या खायला लागायचं त्याला. तेही केवढं? चार-चार भाकऱ्या तो एकटाच खायचा गं.”

“मुन्नी..”

“ऐक आई. ऐकच तू. अगं त्याच्याआधी मी, गजा आणि विमलीनं जेवलेलं त्याला अजिबात चालायचं नाही. तोच एवढा हापसून खायचा नं की आमच्यासाठी जेवायला फार थोडं शिल्लक राहायचं. मग आम्ही तिघंही एका ताटलीत जेवायचो तर हा नाऱ्या गपागप खाण्यावर भिडायचा. नेहमी उपाशी राहायची ती बिचारी विमलीच. फार हळूहळू खायची विमली. मग मी गजाच्या हातावर चापट्या मारूनमारून त्याच्या हातातली कोरभर भाकर विमलीच्या हातात एकाच वेळी

द्यायची. मग बाईसाहेब बसायच्या अर्धा तास तेवढाच कोर खात. आता फार हाल असतील गं आई तिचे."

"नाही गं. आता ती मोठी झाली ना. आता तिची जेवणाची गती वाढली असेल."

"मोठी झाली म्हणूनच तर आई काळजी वाटते."

"म्हणजे?"

"आई, आमचा नाना तिलाही सोडत नसेन. तिच्याही आंगाआंगाशी करत असेल."

"वेडी आहेस का मुन्नी तू? अग बाप आहे तो तुमचा. तो आपल्याच पोरीला असा त्रास देईल काय?" आपण किती खोटी समजूत घालतोय, याची जाणीव वैदेहीला होती.

"आई, मला द्यायचाच ना. किती सहन केलं मी. अगं, तो बाहेरून घरात कधी येऊच नये असं वाटायचं. जेवण झालं की मी मुद्दाम एकाबाजूला विमली आणि एका बाजूला गजाला घेऊन झोपायची. पण हा त्या दोघांच्या मधून पाय दाबण्याच्या निमित्तानं मला रात्रीचा त्याच्याजवळ बोलवायचाच."

"काय सांगतेस काय तू मुन्नी? जाऊ दे विसर ते सारं."

"खरच सांगते आई. आई आज सांगतेच. खूपदा अजूनही रात्रीची मी तुझ्याजवळ येते ना, ती त्याच भीतीनं, की नाना असा रात्रीचा माझ्याजवळ येणार तर नाही? भीती वाटते गं."

"काय. भोगलंय या पोरीनं" असा विचार मनात येताच एकदम घाबरल्यासारखंच झालं वैदेहीला. विचारावं की विचारू नये. खूप ताण

a

आल्यासारखं झालं तिलाच. पोटच्या पोरीला पैशासाठी तो कसायासारखं विकतो, पण त्याहीपलीकडे पोरीच्याच शरीराला तो हात लावतो. छे. भयंकर. भयंकरच. गरगरायलाच लागलं तिला. तिनं मुन्नीला एकदम कुशीतच घेतलं. पण क्षणभरातच मुन्नी तिच्या कुशीतून बाजूला झाली. आणि म्हणाली,

"आई, तुला सांगते, अगदी पहिल्यांदा; ज्यादिवशी माझी आई वारली, त्याच दिवशी रात्री आला नाना माझ्याजवळ. तो माझ्याशेजारी झोपल्याबरोबरच मला थरथरायला लागलं. कारण तो आईला कायकाय करायचा, हे मी पाहिलं होतं ना सारं. एक दिवशी तर अख्खा उघडाच पाहिला होता मी त्याला. तेव्हा तर मला ओकारीच आल्यागत झालं होतं."

"छी. मुन्नी. केवढीशी तू. आणि काय बोलतेस तू हे सारं."

"आई, एवढीशी असूनही ते सारं भोगलंच नं मी. जे माझ्या आईनं भोगलं. माझी आई नेहमी माझ्या बापाला शिव्याच द्यायची. त्रासच तसा दिला ना यानं तिला. माझी आई गेली, त्यादिवशी आम्हाला अन्नही गोड लागेना. पण यानं मात्र गंगाकाकीनं दिलेलं जेवण पोटभर जेवला. आम्ही तिघंही एकमेकांच्या गळ्यात पडून रडत होतो नं हा खात होता मस्त. रातचा माझ्याजवळ झोपला नं म्हणाला 'माहे पाय दुखते त दाब.' भीतीनंच मी उठून त्याचे पाय दाबायला लागली. मग त्यानं मला मांडी दाबायला लावली आणि....."

"मुन्नी जाऊ दे. त्या घाणेरड्या आठवणी काढूच नकोस बेटा आता. मला हे सारं लंगड्याने सांगितलं होतं, त्या बस्तीत आणल्यावर मामाने आणि बापानेही तुझा केलेला शारीरिक छळ, त्यांचा तो रानटीपणा, त्यामुळे तुला झालेला त्रास.... ओ गॉड. असली माणसं जन्मालाच का येतात, हेच कळत नाही. जाऊ दे बाळ. विसर ते सारं. तुला आता इथे छान वाटतं ना?"

a

“खूप छान वाटतं. या स्वच्छ घरात मला घरभर हिंडतच राहावसं वाटतं. या बाल्कनीतून समोरच्या दीक्षाभूमीकडे तर मी टक लावून पाहत असते. आई, खाली पार्कमध्ये ही लहान लहान पोरं खेळताना पाहून मला मात्र सारखी विमलीचीच आठवण येते. आई, आपल्याला विमलीला नाही का इथे आणता येणार?”

“आणू आणू. जरूर आणू. विमलीलाही आणू.”

हे आपण म्हणतो आहोत, पण आपल्या बोलण्यात काही दम नाही, हे वैदेही ओळखून होती. वारंवार अशी रिस्क आपण घेऊ शकत नाही, याची जाणीव तिला होती. आपण भेकड आहोत का? हा प्रश्न ती हजारदा स्वत:ला विचारीत होती. आणि भेकड नसलो तरी आपल्या खूप मर्यादा आहेत, हे ती मान्य करत होती. स्वत:च्या मुलींचं आयुष्य ती आपल्या कामासाठी पणाला लावू शकत नव्हती. तिच्या मुली ही तिची हळवी जागा होती. शिवाय या सगळ्या कामात आपण एकटे पडतो, याचीही तिला जाणीव होती आणि खंतही. झोकून देऊन वैदेहीसोबत काम करायला कुणीही तयार नाही. कार्यकर्त्यांचा फक्त उत्साह असतो. यात केवळ उत्साह उपयोगाचाच नाही. आपण आपलं काम आणखी वाढवायलाच हवं. पण कसं? या घरच्या जबाबदाऱ्यांचं काय करायचं? हे सारं सोडून, इकडे पाठ फिरवून तर आपल्याला चालणार नाही ना.

“आई” मुन्नी वैदेहीला आवाज देत होती. पण तिचं लक्ष नाही हे बघून मुन्नीनं सरळ कॉलबेलच वाजवली. या आवाजानं आई लगेच सावध होते हे तिनं हेरलं होतं. अंदाज खरा ठरला. बेलचा आवाज येताच वैदेही जागची पटकन उठली आणि मुन्नी हसायला लागली.

“चावट मेली. जा. पाणी आण.”

“आई चहा करू?”

“चहा? मला आवडतो तसा चहा तुला करता येतो?”

“हो. देवयानीताईने शिकवला.”

“व्वा. बढिया. कर मग. वेलची टाकून. पण मुन्नी तू खरंच पैसे नाही ना घेतलेस?”

“नाही गं आई. मी नाही घेतले.”

“तुझं दप्तर मला आणून दे आणि मग जा चहा ठेवायला.”

“बर.◌ं”

मुन्नीने तिला दप्तर आणून द्यायचं शिताफीनं टाळलं आणि ती चहा करायला आत पळाली. हिच्या डोक्यात विचारांचं काहूर माजलं. बाप म्हणवणारी ही माणसं अशी जनावरासारखी वागूच कशी शकतात? सोफ्यावर डाव्या हातावरच्या पंजावर आपला डावा गाल ठेवून आणि खाली नजर लावून वैदेही याच एका विचारात गढून गेली. काय कारणं असतील याच्यामागे एवढी. शरीराची भूक खरंच एवढी तीव्र असते काय? आणि समजा ती असलीही तरी त्याला एवढं प्राधान्य द्यावं काय की त्यात नात्यांचा, वयाचाही बळी जावा? दहा-अकरा वर्षांच्या पोटच्या पोरीच्या शरीरासोबत असं खेळणं या माणसांना कसं जमत असेल? का जमत असेल? यांच्यासाठी नातं, वय या गोष्टींना काही थाराच नाही? नसावा? पण का? आपल्याला कितीही भूक लागली तरी आपण विटा, माती, रेती तर नाही ना खाऊ शकत? ना छान सुवासिक आहेत म्हणून फुलं खाऊ शकत! मग मुलगी...मुलगी कशी चालू शकेल? कशी चालते? इथवर या माणसांची नजर जातेच कशी? फक्त शारीरिक गरज की... आई गं. नको... नकोच हा विचार. ती उठली, आणि दारातून बाहेरच पडली

a

सरळ. नुकतीच हातात चहा घेऊन आलेली मुन्नी ‘आई’ , ‘आई’ करून आवाजच देत राहिली.

परवाचा फोन वैदेहीला सारखाच अस्वस्थ करीत होता. “शामतक तुमने मुन्नीको नही लौटाया, तो तुम्हारी बच्ची तुमको नही दिखेगी.” हे वाक्य तिच्या कानात सारखं घुमत होतं. तिला अस्वस्थ करीत होतं. जोडीला ते आलेले तिघे. घाईत आपण त्यांचे मोबाईल क्रमांक घ्यायला विसरलो, याचाही तिला स्वत:चा राग येत होता. फॅक्टरीच्या कामांचा आधीच ताण. घरात मुन्नी म्हणून ताण. आणि दोन्ही मुली घराबाहेर म्हणून ताण. हे सारे ताण तिला असह्य झाले. विचार करून तर डो◌ेकं फुटायची वेळ आली. काय करावं? मुन्नीला परत तिथेच सोडून यावं? सारे प्रश्न ज्या मुन्नीमुळे निर्माण झाले, तिला आन्टीकडे गंगाजमुनावर नेऊन पोहचवलं की चुटकीसरशी सुटतील. पोरंही सारखेच माझ्यामागे भुणभूण लावतात. त्यांनाही समाधान मिळेल. तसं पाहिलं तर आपल्या कामासाठी मुलींना वेठीला धरण्याचा आपल्याला काय अधिकार? त्यांच्याही मनात माझ्या या उठपटांग कामांमुळे कायम एक भीती ठाण मांडून बसलेली असते. डोक्यावरचा हा ताण असह्य झालाय अगदी. आपलं काही कमीजास्त झालं तर आपली पोरं उघडी पडतील. त्यांना कुणाचा आधार? पण मुन्नीचं काय? मुन्नीला तर आपण अगदी आपलं अपत्य मानलंय नं? तिसरी पोरगीच जणू. ‘जणू’ हाच फरक आहे काय आपल्यातुपल्यात? पण काय

करू मी? मलाही वाटतंय ना, मुन्नीला खूप शिकवावं, घडवावं. मातीचा गोळा आहे ती. मी तिला जसा आकार देईल, तशीच ती घडणार. गौरी म्हणतेच ना, “वैदेही, मुन्नीचं तू सोनं करणार बाई.” करायचंच मला मुन्नीचं सोनं. मुन्नी ही माझ्यासाठी आता केवळ एक ‘केस’ नाहीय. ते माझं अपत्य आहे. माझी लढाई आहे. कदाचित माझा एक प्रयोगही असेल. पण या प्रयोगाचा मी बळी देणार नाही. आणि या प्रयोगासाठी मी अन्य कुणावर अन्यायही होऊ देणार नाही.

वैदेहीचं आज कोणत्याच कामात लक्ष लागत नव्हतं. कार्यालयात ती दोन तास बसली खरी पण कंटाळलीच. समोर फाईल्सचा पसारा असूनही त्यातली एकही फाईल मार्गी लावावी, असं काही वाटलं नाही. ती फाईल्सकडे आणि फाईल्स तिच्याकडे बराच वेळ बघण्यातच गेला. नंतर दोन-तीन ठिकाणी तिने फोन लावले पण बोलण्यातही तिचं मन रमलंच नाही. कंटाळवाणंच वाटत होतं आज तिला सारंच. एक भकासपण साऱ्या मनभर पसरलंय. अचानक आपण इतकं व्यथित कां झालो हेही तिला कळत नव्हतं. मग ती खुर्चीतून उठून सरळ गाडीतच बसली. गाडीची किल्ली फिरवून स्टेअरिंगवर ताबा घेतला पण आता नेमकं जायचं कुठे हेही तिचं निश्चित हो◌ेत नव्हतं. तेवढ्यात मोबाईल वाजला.

“हॅलो, अगं कुठे आहेस? घरी असशील तर आम्ही येतो.” गौरीचा आवाज.

“घरीच चालले. पाच मिनिटांत घरी पोचतेय. या तुम्ही.”

“मावशी, तुमच्यासाठी खायला काय आणू?” गौरीची मुलगी लाडिकपणे म्हणाली.

“खायला नेहमी आणायलाच हवं काय?”

a

“सांगा ना. तुम्हाला माहितीय, तुम्ही हो म्हटलं काय नि नाही म्हटलं काय, मी आणणारच.”

“ओ.के. पाटोडी आण. गरमागरम खाऊ या.” गौरीच्या फोनने आपली अस्वस्थता कमी झाल्याचं लगेच वैदेहीच्या लक्षात आलं.

तिने घरी येऊन आधी मस्त गरमागरम पाण्याने आंघोळ करायचं ठरवलं. ती आंघोळ करायला जाते म्हणताच, मुन्नीची बडबड सुरूच झाली.

“आई, ही काय वेळ आहे काय आंघोळ करण्याची?”

“अगं आंघोळीला काय वेळ असावी लागते काय?”

“का? तूच तर म्हणतेस, सकाळी उठून लवकर आंघोळ करावी म्हणून.”

“म्हणजे सकाळी मी आंघोळ केली नाही, असं म्हणायचंय का तुला? वेडे, मी अनेकदा दिवसांतून दोनदा आंघोळ नाही का करत.”

“का करतेस पण? एकदाच आंघोळ करायची असते ना?”

“आंघोळीला नियम नाही. छान वाटतं आंघोळ केली की. जा तू खेळ.”

“नाही. मी पण आंघोळ करणार.”

“बरं माझी झाल्यावर कर.”

मुन्नीला उगाच असा हट्ट करण्याचा अधूनमधून मूड येतो. आई किंवा रेवाताई जे करेल ते तिला करायचंच असतं. तिने काहीही करण्याचा हट्ट केला तरी वैदेही त्याला फारसा विरोध करीत नाही. ‘हो’ म्हटलं की विषय संपतो नाहीतर उगाच मुन्नी तिला सतावत राहते.

a

टॉवेल आणि गाऊन घेऊन वैदेही बाथरूममध्ये शिरली आणि दारावरची बेल वाजली.

“वत्सला बघ गं जरा. कोण आलंय ते. गौरी असेल.”

“आई मी दार उघडते.”

“मुन्नी, तू थांब. तुला कितीदा सांगितलंय, तू एकदम दार उघडायला पुढे जायचं नाहीस ते.”

“का? रेवाताई उघडते ना? मला आता लॅच फिरवता येतो ना?”

“बडबड बंद कर.” एव्हाना वत्सला दार उघडायला पोचलीही होती. तिने आधी सवयीप्रमाणे पिपहोलमधून बघितलं. तो नवीनंच दोन चेहरे दिसले. तिने वैदेहीला आवाज दिला,

“बाई, कोणीतरी नवीनच चेहरे दिसतात. उघडू?”

“अग उघड ना. बघ सारखी बेल वाजतेय. मी पटकन अंगावर पाणी घेऊन येतेच. तोवर बसव त्यांना” बोलताबोलता तिने दार लावलं आणि भक्कन एखादा लाईट लागावा तसं काहीतरी तिच्या डोक्यात चमकलं. तिने बाथरूमचं लावलेलं दार परत उघडलं आणि तिथूनच ओरडली.”

“वत्सला, थांब मीच बघतेय कोण ते. मुन्नीला आत माझ्या बेडरूममध्ये ने.”

आंघोळीसाठी जायचं म्हणून बांधलेले केस तिनं मोकळे केले. तोंडावरून हात फिरवला तोवर चौथ्यांदा बेल वाजलीच. तिनं दार उघडलं. ग्रिलच्या बाहेर तीन माणसं उभी होती.

“कोण हवंय?”

a

“तुम्ही.” त्यातला एक जाड मिशीवाला पन्नाशीचा गृहस्थ म्हणाला.

“मी? बोला काय काम आहे?”

“मॅडम, दारातच बोलायचं काय? तुम्ही माणुसकीच्या म्हून तुमच्या दारात आलो तर तुम्ही साधं घरात बी घेत नाही आहात.” अतिशय मृदू आवाजात त्यातला बारकासा वाटणारा, काळ्या भोर डोळ्याच्या तरुणाने म्हटलं. “तुमच्या मदतीची गरज आहे मॅडम आम्हाला.”

गावाकडले कुणीतरी गरजू असावे असा विचार वैदेहीच्या डोक्यात आला आणि तिने ग्रिलचं दार उघडलं. ते उघडताच तिघेही पाहुणे बाहेर चपलाजोडे काढून आत आले आणि सोफ्यावर बसले. आणि त्यांच्यासमोर कोचावर वैदेही बसली. बसल्याबसल्या त्यातल्या तिघांपैकी एकाच्या डोक्यावर जी टोपी होती ती त्यानं काढून सोफ्यावर आपल्या शेजारी ठेवली. गळ्यात असलेल्या उपरण्याने तोंड पुसलं, दुसरे दोघं मात्र जरा शांतपणे बसले होते. त्या बारक्याशा काळ्याभोर केसांच्या तरुणाने समोर टिपॉयवर असलेला पेपर उचलला आणि तोंडासमोर धरला. वीस-पंचेवीस सेकंद होऊनही कुणीच काही बोलेना.

“वत्सला पाणी आण.” त्यांचा अंदाज घेण्यास पुरेसा अवधी मिळावा, आणि त्यांनाही जे काय बोलायचं असेल, त्यासाठी त्यांनाही वेळ मिळावा, असा विचार करीत वैदेही मनाशीच काहीतरी आराखडे बांधत होती.

वत्सलाने पाण्याचे ग्लास आणून टिपॉयवर न ठेवता ट्रेच त्यांच्यासमोर केला, त्यातला ग्लास देतादेता वत्सलाचं लक्ष टोपीवाल्याकडे गेलं आणि ‘याला आपण कुठेतरी पाहिलाय’ असं तिच्या मनात आलं. पण कुठे? हे काही पटकन तिला आठवेना. तिनं तो विचार झटकूनही टाकला. सहज वाटलं असेल.

माणसांसारखी माणसं असतात. असेल कुणीतरी. मॅडमकडे काय सारखी माणसं येतच असतात. तिघांनीही पाण्याचे रिकामे ग्लास ट्रेमध्ये ठेवल्यावर ते घेऊन ती आत आली अन् आपल्या कामाला लागली. मुन्नीला कोणत्यातरी कामात गुंतवायला हवं, हे तिच्या लक्षात आलं. कारण गंभीर चेहऱ्याची माणसं मुख्य म्हणजे अनोळखी माणसं जेव्हा मॅडमला भेटायला येतात, तेव्हा मुन्नीने बाहेर आलेलं तिला चालत नाही, हे तिला पक्क ठाऊक होतं. मुन्नीच्या लायक काय काम काढावं हे पटकन तिला सुचेना. त्यामुळे मुन्नीला ती म्हणाली,

“मुन्नी, अभ्यास कर. बाहेर जाऊ नकोस.”

“का?”

“मॅडम रागात आहेत.”

“आई रागात आहे? कुणावर ओरडते आहे? आवाज तर अजिबात येत नाहीये.”

“चूप. हळू बोल. ओरडत नाही आहेत. मला कामं आहेत. तुझ्या प्रश्नांची सरबत्ती तू करू नकोस. फक्त बाहेर जायचं नाही. एवढं लक्षात ठेव.”

“बरं बरं” पाय आपटत फुरंगटून मुन्नी म्हणाली. “सारखं आपलं बाहेर निघू नको. बाहेर निघू नको.” ती कुरकुरली.

पाणी प्यायल्यावरही आलेली माणसं बोलण्यात पुढाकार घेत नाही, हे बघितल्यावर तिनेच सुरुवात केली. “सांगा, कुठून आलात तुम्ही लोक? माझ्याशी काय काम आहे.”

“आम्ही इथूनच आलो. भंडारा रोडवरून. आम्हाला वळखता तुम्ही.”

भंडारा रोड म्हणताच वैदेहीच्या मनात चर्र झालं. पण चेहऱ्यावर आपण घाबरल्याचं दाखवता कामा नये. हे तिला लगेच लक्षात आलं.

“नाही. मी नाही ओळखत तुम्हाला. भंडारा रोड म्हणजे नेमकं कुठून? काय काम आहे माझ्याकडे?”

वैदेही मनातून पुरती घाबरली होती.

“मॅडम, आमची वस्तू तुम्ही चोरली.”

“मी? आणि चोरी. शक्यच नाही. काय चोरलंय मी तुमचं? आणि हे बघा. माझ्या घरात तुम्ही बसला आहात. जरा नीट बोला.”

“मॅडम, आम्हाले नीट बोलाले कोणी शिकवलंच नाही. तुम्हा शिकलेल्या बायकायले नीट वागता येत नाही आन् आम्हाले बोलायचं शिकवता.”

हळू आवाजात तो बारका तरुण बोलला.

“आधी तुम्ही इथून उठा आणि बाहेर निघा.”

“घरात आलेल्या पाहुण्यांशी असं वागतात हो बाई?”

“मला शहाणपणा शिकवू नका.”

“आम्ही शिकवायला नाहीच आलो. शिकायलाच आलो तुमच्याकडून.”

“तुमचं माझ्याकडे काय काम आहे, हे तुम्ही सरळ सांगणार आहात काय?”

“हो. आमची पोरगी न्याले आलो आम्ही.”

“तुमची पोरगी? ती माझ्याजवळ कशी राहणार? हरवली असेल तर पोलीस कम्प्लेंट करा.” मुन्नीच्याच संदर्भात आले आहेत, याचा तिला अंदाज यायला वेळ लागला नव्हता. तिनं आपली मानसिक तयारी केलीच होती.

“बाई शहानपत्ती दाखवायची नाय. एका मिनिटात तुमचा शहानपन उतरवन हा मी. घरात जा आन् पोरीले बाहेर घेऊन या. आम्ही मानसासारखं वागत आहोत, तेच बेस हाय. उगा आम्हाले सैतान करू नका.” टोपीवाला माणूस जोरात ओरडलाच.

खरं तर वैदेही मनातून घाबरलीच होती. पण चेहऱ्यावर भीती न दाखवता ती उसनं अवसान आणून म्हणाली,

“तुम्ही काय बोलताय मला तर काहीच कळत नाही. तुमची मुलगी इथे नाही. मी कशाला तुमची मुलगी पळवू? मला दोन मुली आहेत.”

“हो ते जाणून आहोत आम्ही. आमची पोरगी मिळाली नाय, तर तुमची रेवा तुम्हाले मिळणार नाही, सांगतो आजच.”

रेवाचं नाव त्या दणकट माणसाच्या तोंडून ऐकताच वैदेहीला चर्ररच झालं.

“अहो काय वेड्यासारखं बोलताय? तुमच्या मुलीच्या हरविण्याचा आणि माझा काय संबंध? आणि रेवाचं नाव घ्यायचं नाही हा. सांगून ठेवते मी.”

“ये बाई, जरा शहानपणानं दे◌ेणार हाय का दाखवू माहा इंगा आता तुले? तव्हापासून समजदारीनं घेतो आहो त लईच शायनी बनून रायली नं तू त.”

“हे बघा, नीट बोला. कुणाशी बोलताय याचं जरा भान ठेवा.” उसनं अवसान आणत वैदेही म्हणाली.

“काय गरज नाही, चाला पटकन पोरीले बाहेर काढा. मुन्ने, ए मुन्ने; चाल ये बाहेर. पाय, म्या गज्या मामा आलो हाय. तुहा बाप लई बेमार हाय तिकडं. चाल ये लवकर बाहेर. टोम्या पाय रे घरात जाऊन. हे पोट्टी कुठं दबूनशान बसली हाय त.”

"माझ्या घरात आतमध्ये घुसलात तर याद राख. वॉचमन ए वॉचमन." बोलतबोलत ती खिडकीशी आली. खाली डाव्या हातावरच्या गेटजवळ उभ्या असलेल्या वॉचमनला तिने जोरात आवाज दिला. चतुराई करून तिने आधी पटकन दार उघडलं आणि शेजारच्या मनीषलाही तिनं लगेच आवाज दिला. आपल्या दादागिरीनं ही बाई घाबरेल, हिची लगेच बोबडी वळेल, या विश्वासात असलेले ते तिघंही तसे बेसावधच राहिले होते. त्यामुळेच वैदेहीला दारापर्यंत जाऊन दार उघडण्याची संधी मिळाली. दरम्यान ठरल्याप्रमाणे तिने एक कोरा एसएमएस पीएस.आय. देवतळयांना पाठविलाच. पंधरा मिनिटांच्या आत इथे स्वत: देवतळे किंवा त्यांची मदत येईल, याचा तिला विश्वास होताच. तिला या लोकांसोबत आणखी थोडा वेळ काढायचा होता. जर का हे लोक जबरदस्ती आतल्या खोल्यांमध्ये गेलेच तर आपण काहीच करू शकत नाही, याची तिला पूर्ण जाणीच होती. उगाच त्यांच्याशी भांडण आणि त्यांना चॅलेंज करण्यातही अर्थच नव्हता. शारीरिकदृष्ट्या आपण कमकुवत आहोत आणि आता पूर्ण बाजी त्यांच्याच हातात आहे, हे ती जाणून होती. तिच्या धारदार आवाजाचाही त्यांच्यावर फार काही परिणाम होणार नव्हता. वॉचमन आणि मनीष तरी कुठे यांच्या पासंगाला पुरणार होते! पण तिचा आवाज ऐकताच मनीष मात्र धावतच आला.

"काकू काय झालं हो?"

"मनीष. चोर लोेक माझ्या घरात घुसलेत."

चोर... चोर.. दिवसाढवळ्या चोर म्हणताच आणि तेही तीन-तीन चोर पाहून मनीषच गांगरला. "काकू चोर.. चोर, चोर" तो पार हडबडूनच गेला. "वॉचमन... चोर..चोर.."

मनीषचा चोरचोर आवाज ऐकून बाकीचेही फ्लॅटवाले बाहेर आले. आता जरा जास्तच कलकलाट होतो आहे, हे या तिघांच्याही लक्षात यायला वेळ लागला नाही. त्या तिघांनीही एकमेकांमध्ये नेत्रपल्लवी केली. तिघंही तिथेच आपल्या चपला, जोडे टाकून हळूच बाहेर पडले आणि सुसाट जिना उतरून खाली पळायला लागले. त्यांच्यामागे गोंधळलेला मनीष, संजय आणि बारकीसारकी पोरंही धावायला लागली.

बिल्डिंगमधल्या कुणालाच नेमकं काय ते कळत नव्हतं. पण चोरचोरचा गलका केवळ वाढला. आणि साऱ्यांच्या डोळयादेखत ते तिघंही चौकापर्यंत धावत गेले◌ेले अनेकांनी पाहिलं.

ते धावत बाहेर पडले आणि पीएसआय देवतळे आपल्या मोटरसायकलनी आत शिरले. सिव्हिल ड्रेसमधल्या पीएसआयला कुणी ओळखण्याचा प्रश्नच नव्हता. ते सरळ आधी वैदेहीकडेच आले. वैदेही दारातच उभी राहून चोरांच्या मागे गेलेल्या मनीषची वाट बघत होती. आजपर्यंत सर्वांपासून लपवून ठेवलेली मुन्नीची खरी हकिकत समोर येते की काय याचीच आता तिला भीती वाटत होती. देवतळयांना बघताच तिला एकदम हायसं वाटलं.

“या या इन्स्पेक्टर. मी तुमचीच वाट बघत होते.”

“काय झालं? मुन्नीला काही...?”

“होय ती मंडळी आत्ता घरापर्यंत येऊन गेली.”

“इथवर आली होती? अरे मग काय तुम्ही त्यांना हाकलून लावलं? माझ्या येण्यापर्यंत तुम्ही त्यांना अडवून का नाही ठेवलंत?”

“इलाजच नव्हता. त्यांना बोलण्यात गुंतवून तुमच्या येण्याची वाट बघण्यापर्यंत वेळ काढणं शक्य नव्हतं. ते तिघं आले होते. शिवाय मुन्नीला इथून नेण्याच्या पूर्ण तयारीने आले होते. मुन्नी इथेच आहे, याची त्यांना बालंबाल खात्री आहे.”

वैदेही आणि देवतळे बोलत होते तोच आतून वत्सला कावरीबावरी होत आली.

“ताई, ताई आठवलं, आत्ता आठवलं. तो माणूस कोण ते. मला तेव्हाचं वाटत होतं, याला कुठंतरी पाह्यला ते. .. अजी, हा नेहमी खालच्या पार्कात येतो. फिरत राहतो. खाली बी दिसतो ना कधीकधी सिक्स टेन मधे.”

“बापरे. म्हणजे इकडे तो नेहमी येतो?”

“होय. मी पाह्यलाच त्याला.”

“वत्सला, त्याला तू इकडे कुणासोबत बोलताना पाहिलं आहे?”

“नाही. बोलताना नाही दिसला. मी जेव्हाजेव्हा पाह्यला तो असाच. बिडी ओढताना, नायतर चालताना. नायतं दुकानात उभा.”

“बरं. जा तू आतमध्ये.”

“ही कोण?”

“ही माझ्याकडे दिवसभराच्या कामाला असते. मुन्नी घरात एकटी असू नये म्हणून ठेवलंय तिला.”

“विश्वासाची आहे?”

“होय. पूर्णपणे. मुन्नीला छान जपते. तिची चांगली काळजी घेते.”

“ते कितीजण होते?” इन्स्पेक्टर देवतळयांनी वैदेहीला विचारलं.

“तिघं”

“कशाने आले होते?”

“कुणास ठाऊक मनीष आल्यावर समजेल, ते कशाने गेले ते.”

“त्यांचं वर्णन करू शकाल?”

“होय.” वैदेहीने त्या तिघांचंही व्यवस्थित वर्णन करून देवतळयांना सांगितलं. देवतळयांनी मोबाईलवरून या वर्णनाच्या तीन इसमांना रोडवरच वॉच करायला सांगितलं. खामला चौकातून जाणाऱ्या पाचही रस्त्यांवर अडथळयांच्या रॅकेट्स लावून या तिघांना हेरून पकडणं तसं पोलिसांच्या दृष्टीनं सोपं होतं. पण ते जर का आधीच त्या रस्त्याच्या पुढे निघून गेले तर हा प्रयत्न असफल होणार होता. शिवाय ते कोणत्या गाडीने गेले की गल्लीबोळीतून पळत गेले हेही कुणालाच माहीत नव्हतं. मनीषने त्यांचा पाठलाग चौकापर्यंत केला होता. तिथून पुढे ते पळत गेलेत असंच तो आता सांगत आला.

“मॅडम, मला मेसेज पाठवायला तुम्ही वेळ केला काय?”

“अजिबात नाही. ते मुन्नीला न्यायला आलेत हे लक्षात येताच, जसा मी खिडकीजवळ जाऊन वॉचमनला आवाज दिला, त्याचवेळी चपळाईनं टेबलवर ठेवलेला मोबाईल हातात घेऊन आपलं ठरलं होतं त्याप्रमाणे ब्लॅन्क मेसेज पाठवला. सर्चमध्ये जाऊन तुमचं नाव शोधायला जो काय वेळ लागला असेल तेवढाच. फक्त आल्याआल्या ते मुन्नीसाठीच आले असतील, हा अंदाज नाही आला मला.”

“बरं. काही हरकत नाही. ते इथून पळतील ते अमरावती रोड किंवा वर्धा रोडवरच. ते लगेच काही त्यांच्या वस्तीचा रस्ता पकडणार नाही. मी मोबाईल मेसेज

दिलाच आहे. बघतो आम्हाला आता काय करता येईल ते. ते आत्ता आले म्हणजे परत येणारच. टेक केअर. यावेळी तुमचा एस.एम.एस.आला तेव्हा मी याच पोलीस स्टेशनला होतो, त्यामुळे लगेच येता आलं. एखादवेळी प्रत्यक्ष केस हॅन्डल करत असलो तर पटकन येता येणार नाही. तुम्हाला खूप दक्ष राहायला हवं. किंवा असं करू या का, मुन्नीच्या सुरक्षिततेसाठी म्हणून एका कॉन्स्टेबलची नियुक्ती करू या का? तुम्ही एक अर्ज करून द्या.''

''नको नको देवतळे, मी तुम्हाला आधीच सांगितलं होतं की मला याचा असा काहीच गवगवा करायचा नाही. मुन्नी कोण आहे, कुठून आली हे कुणालाच कळता कामा नये. कुसुमच्या संदर्भात मी जी चूक केली, ती आता नाही. देवतळे, मला मुन्नीचा भूतकाळ पाण्याने धुऊन पुसून स्वच्छ करायचा आहे. मुन्नीला नको ते कोणतेच प्रश्न कुणीच विचारायला नको आहेत मला. अहो, त्या लहानशा निष्पाप पोरीनं नको ते खूप भोगलंय आयुष्यात. चुकीच्या माणसाच्या पोटी जन्माला येणं हा काय तिचा दोष आहे? जे भोगलं त्याची परतपरत वाच्यताच नको आता. मुन्नीने माझ्या कामाला नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. त्यामुळे कोणतेच रुटीन निकष आपण तिच्यासाठी लावता कामा नये. तिच्या बालमनावर परिणाम होऊन तिच्यात गंड निर्माण होईल, असं काहीच करायचं नाहीये आपल्याला.''

''ओ.के. फार पझेसिव्ह झाला आहात मॅडम तुम्ही तिच्याबद्दल. निघतो मी. काळजी घ्या. मुन्नीची आणि तुमची स्वत:ची सुद्धा.''

''थँक्स देवतळे. थँक्यू व्हेरी मच.''

दारातून बाहेर पडताच, वैदेहीने दार बंद केले, आणि मुन्नीला आवाज दिला. वैदेहीच्या आवाजातला ओलावा मुन्नीला जाणवला. आतापर्यंत घाबरून आईच्या बेडरूममध्ये पार आतमध्ये घुसून बसलेली ती, आईच्या प्रेमळ आवाजाने धावतच

a

बाहेर आली. छोटसं डबकं जरी दिसलं तरी कोरड्या ठणठणीत मातीच्या ढिगाऱ्यावरून पोटतिडीकीनं बेडूक त्या लहानशा डबक्याकडे धाव घेईल तसं. इथे तर मुन्नीसाठी आई म्हणजे प्रेमाचा सागरच होती.

“आई, आई गेलेत का ते लोक? तो गजामामा? आई, मला त्या गजामामासोबत अजिबात जायचं नाहीय. खराब आहे तो. तू मला त्याच्यासोबत पाठवणार नाही नं गं?” मुन्नीनं आईचा हात हातात घेऊन व्याकूळतेनं विचारलं. घाबरल्यामुळे तिचा चेहरा काळवंडला होता.

“नाही गं मुन्नी. कोण पाठवतंय तुला? पण ती तुझी रक्ताची माणसं आहेत. त्यांचा अधिकार आहे तुझ्यावर.”

“आई माझी माणसं नाहीत ती आता. ज्यादिवशी माझ्या बापाने आणि त्या नालायक मामाने मला विकायला त्या आंटीकडे आणलं, तिथला सारा रंगढंग मी बघितला. मला कळलंच होतं गं, की माझ्या बापाने मला चुकीच्या जागी आणलं म्हणून. काय चूक हे नव्हतं कळत मला पण ती जागा बरोबर नाही, हे आपोआपच कळलं मला. मी तर तिथून पळून जाण्याच्या प्रयत्नात होती, पण हा मेला मसन्या माझा मामा, त्यानेच मला पक्क पकडून ठेवलं. मी त्याचे हात झिडकारत होते, तर तो मला घाण-घाण काहीतरी बोलत होता. आणि...आणि...”

खूप काही सांगण्याचं अवसान आणलेली मुन्नी आता भीतीनं, संतापानं थरथरायला लागली होती. मुन्नीला तिने लगेच जवळ घेतलं, तिच्या पाठीवरून हात फिरविला. “मुन्नी, तू शांत हो बेटा, जाऊ दे तुला त्या गोष्टी सांगताना त्रास होतो ना, मग कशाला तू सांगतेस? विसर ते सारं.”

“आई...आई...” मुन्नी वैदेहीला आणखीच बिलगली. वैदेहीने मुन्नीला प्रेमाने जवळ घेतले. तिचे डोके मांडीवर ठेवून ती तिच्या केसातून हात फिरवायला लागली, “मुन्नी मी आहे नं. विसर ते सारं.”

“आई, तू मला तिथे पाठवणार नाही नं?” व्याकूळ आवाजात मुन्नीने विचारले.

“नाही गं माझे राणी. कुठे नाही पाठवणार. माझ्याच जवळ राहणार आहेस तू आता. पाठवायसाठी मी तुला तिथून आणलं होय? माझी मुन्नी माझ्याच जवळ राहणार. ऊठ. आता आपण मस्तपैकी चहा पिऊ या.”

“आणि तुझी आंघोळ?”

“ती गेली उडत. आता कुठला आंघोळीचा मूड? बघ तिकडे माझा मोबाईल वाजतोय. आणतेस?”

“होय” म्हणून मुन्नी टुण्णकन उठली पण लगेच पुढे पाऊल टाकायचं थांबली.

“आई, मी समोर हॉलमध्ये जाऊ? ते लोक येतील परत?”

“नाही येणार मुन्नी ते आता. तू घरात घाबरत राहायचं नाहीस. बी बोल्ड.”

“म्हणजे काय?”

“आधी मोबाईल आण.” एव्हाना तो बंद पडला होता. वैदेहीने मिस कॉल बघितला. अन्नोन नंबर होता. शिवाय लॅन्डलाईन. पण सातपासून सुरू होणारा आणि नेहमीच्या परिचयातल्या सारखा. थोडा इकडेतिकडे असलेला नंबर. वैदेहीला शंका आली. हा नक्कीच भैयाचा फोन असणार. तो आपण लवकर उचलला नाही, याची

तिला खंतही वाटली. भैया महत्त्वाचं तसंच काही असल्याशिवाय फोन करत नाही. इकडून मला फोन करायला बंदी. काय करावं...

वैदेही विचारच करीत होती, तेवढ्यात परत फोन वाजला. तोच नंबर. वैदेहीनं धाड टाकल्यागतच मोबाईल पटकन उचलून बटन दाबून कानाला लावला.

“हॅलो, कोण?”

“मेडमजी मै...मै बोल रू भैया ऽ ऽ ऽ”

“हा. हा. बोल भैया. कैसा है तू?”

“मेडमजी मै अच्छा हू. लेकीन मुझे कल बहुत मारा इन लोगो ने. वो रंडी साली आंटी. उसको मेरेपे संशय आया. लंगड्याके आदमियोने बहोत मारा मुझे. अब वो लोग आपके भी घर आनेवाले है. मुन्नीको उठायेंगे बोल रहा था. और वो गजा है ना गजा. बहुत गंदा आदमी है. मुन्नीपे आँख है उसकी. बोल रहे थे. बोहनी तो मैनेच कियी है करके. मेडमजी, मुझे मारा तो कुछ नही, लेकिन आप आपका और आपके बच्चोंका ध्यान रखना. मुन्नीको संभलना मेडमजी, अच्छी लडकी है वो. आज वो आपके घर आने वाले है. रखता फोन. किसीका ध्यान चला जायेगा. रखता फोन....मेडमजी....रखता. संभलके रहना.”

भैयाचा फोन ऐकून वैदेही सर्दच झाली. पण भैयाबद्दल तिला अभिमान वाटला. एवढा मार खाऊनही तो आपल्याला सावध करतोच. त्या चिखलातही माणुसकीचा गहिवर हुंकारावा, याचं तिला नवलही वाटलं. भैयाने आपल्या जिवावर उदार होऊन तिथून मुन्नीला बाहेर काढून आपल्या स्वाधीन केलं. मुन्नीला सुरक्षित ठेवण्याची आपली जबाबदारी आणखीच वाढल्याची भावना तिच्या मनात उगाचंच वेगात वर आली.

a

भैयाने पहिल्या दिवसापासूनच मुन्नीची किती काळजी घेण्याचा प्रयत्न केला हे माहीत होतं तिला. मुन्नीच्या मामाच्या त्या घाणेरड्या भाषेचा केवढा राग आला होता त्याला. कसली ही माणसं. ती तिथून पळून जाण्याचा प्रयत्न करत होती आणि हा मामा नावाचा राक्षस तिच्या फ्रॉकमधून हात घालून तिच्या छातीशी खेळण्याचा प्रयत्न करत होता. छी. नालायक मेला.

मुन्नीनेच कधीतरी तिला सांगितलं होतं की तिची आई वारल्यावर तिला आपल्या घरी मामा घेऊन गेला होता. दुपारची मामी बाहेरच्या कामांना गेली आणि मुन्नी त्याच्या मुलीशी खेळत होती. हा भामटा घरात घुसला. खेळणाऱ्या मुन्नीला खसकन आपल्याकडे ओढलं. ती विरोध करायला लागली तर जबरीनं आपल्या दोन्ही पायात तिला दाबून ठेवलं. ती रडायला लागली. मुन्नीचं रडणं ऐकून ती लहान पोरगी पण रडायला लागली. पठ्ठयाने तिला एक गालफडात भडकावली, मुन्नीची चड्डी खाली केली आणि.... छी. माणसं आहेत का जनावरं ही! का जगतात असली माणसं? असं वागणाऱ्या या साऱ्या पुरुषांना बंदुकीच्या गोळया घालून शूट करायला हवं. लहानलहान पोरींना नासवायचं म्हणजे काय?.... नाही. एवढा सोपा.. वेदनाहीन.. लज्जाहीन मृत्यू नको यांना. अशा लोकांना भरचौकात नग्न उभं करायला हवं. आणि पोलिसांनी यांचं लिंगच कापून टाकायला हवं. लिंग आहे, म्हणूनच ना हे हैवानासारखे वागतात. त्या लिंगालाच नष्ट करायला पाहिजे. नालायक मेले.

ती अस्वस्थ झाली. तिला काही सुचेचना. काय करावं?... ऑफीसला जाण्याचा तर अजिबात मूड नाहीये. तिनं तडक सुहासला फोन लावून त्याला ताबडतोब घरी यायला सांगितलं.

“आत्ता? अगं मी कामात आहे.”

“प्लीज तू ये. ताबडतोब ये म्हणजे ये. मला फार अनइझी वाटत आहे.”

“अगं जरा ऐकून तर घे.”

“नाही. मला काहीही ऐकायचं नाहीय. मला तुला खूप महत्त्वाचं काहीतरी सांगायचं आहे. खरं तर आत्ता गौरी यायची होती. पण तिच्याकडे ऐनवेळी पाहुणे आल्यामुळे तिचं येणं रद्द झालंय. तू ये मी ठेवते.”

“अगं...”

त्याचं पुढचं बोलणही न ऐकता वैदेहीनं मोबाईल बंद केला याचा त्याला क्षणभर वैताग आला. पण दुसऱ्याच क्षणी त्यानं तो झटकून टाकला. वैदेही असंच करणार. “चल बेटा सुहास निकाल गाडी. और मॅडम के सामने हाजीर हो जा. तेरा काम बादमें. पहले मॅडम.” मनाशीच पुटपुटत हातात चाबी घेऊन सुहास बाहेर पडलाही. तिच्या आवाजातली अस्वस्थता त्याला जाणवली होती.

“**मु**न्नी मी तुला आता जे काय सांगणार आहे, ते तू नीट ऐक. तू उद्या वर्धेला जाणार आहेस.”

“वर्धेला? ते कशापायी?”

“आता तू तिथेच शिकणार आहेस.”

“काय? वर्धेला? कां बर? आणि तू?”

“माझं इथे ऑफीस नाही काय? मी तिथे कशी येणार?

“हे बघ वर्धेजवळ नवेगाव या गावी एक छान नवोदय विद्यालय आहे. तिथे सगळ्या विदर्भातल्या वेगवेगळ्या गावांतल्या-शहरांतल्या हुशार मुली शिकायला येत असतात. मुन्ना बेटा, दोन महिन्यांपूर्वी तुला मी एक परीक्षा द्यायला लावली होती. चार पेपर्स होते. तू खूप अभ्यास केला होता. तुला काकडे मॅडम शिकवायला घरी यायच्या. तू म्हणायचीस ना, शाळेच्या व्यतिरिक्त हा कोणता अभ्यास नि ही कोणती परीक्षा? या नवोदय शाळेची परीक्षा होती ती. त्यात तू चांगल्या मार्कांनी पास झाली. आता तू तिथे शिकायचं. आठवीपर्यंत.”

“पण तेव्हा तर तू म्हणाली होतीस ती स्कॉलरशीपची परीक्षा आहे म्हणून. जी मी चौथीत पण दिली होती.”

“होय. तसं मी तुला मुद्दाम सांगितलं होतं. ‘नवोदय स्कूल’ हा वेगळा शब्द ऐकल्यावर तू मला तेव्हापासूनच हजार प्रश्न विचारले असते ना. आणि जोवर जायचंच निश्चित होत नाही, तोवर वाच्यता कशाला?”

“नाही आई. मी इथून कुठेच जाणार नाही. मला भीती वाटते.”

“आई नाही. मम्मी. तू माझी लेक आहेस ना. मग काय म्हणायचं? आपलं ठरलंय ना आता तू मला देवू-रेवासारखं मम्मी म्हणायचंस ते.”

“मम्मी” लाजत मुन्नी उद्गारली.

“गुड गर्ल.”

“मुन्नी. तू शहाणी आहेस नं? दीदी पुण्याला शिकते. तिला तर नाही वाटत भीती.”

“दीदीची गोष्ट वेगळी आहे.”

“कां तिची का वेगळी आहे? तूच म्हणतेस न मला दीदीसारखं व्हायचं आहे म्हणून.”

“हो. पण इथे राहूनच. मला तुझ्याजवळच राहायचं आहे. आई....प्लीज गं.. मला नको नं तुझ्यापासून लांब पाठवू. मला...मला....भीती वाटते बॉ. आई. नाही मम्मी परत ते लोक माझ्याकडे आलेत तर....”

“मुन्नी तसं काहीही होणार नाही तिथे. अगं ती पब्लिक स्कूल आहे. तिथे शाळा आणि तुमचं राहायचं वसतिगृह जवळजवळ आहे. अगदी बाहेरच्या कुणालाही तिथे प्रवेश नाही. अगदी दादाला जरी तुला भेटायला यायचं असेल तर आधी मला त्या फॉर्ममध्ये त्याचं नाव नोंदवावं लागेल. मुन्नी बाळा, तू माझा प्रॉब्लेम जरा समजून घे. अगं वत्सलाच्या भरोशावर तुला एकटीला मी नाही सोडू शकत.

a

दादाही यावर्षी बाहेर चाललाय. मला माझ्या कामांसाठी रात्री बेरात्री बाहेर जावं लागतं. परवा पाहिलंस ना तू. तुला घरी ठेवून मी रात्री साडे अकरा वाजता संध्या मावशीला तिच्या घरून हलवायला गेले. घरी मला यायला दीड वाजला. तिचाही प्रॉब्लेम मोठा होता. संध्याला तर दिवसाचीसुद्धा भीती वाटत होती. तो माणूस कुठूनही कसाही येऊन आपल्यावर झडप घालू शकतो हे संध्यालाच काय तिच्या तीनही लेकींना वाटत होतं. ते सारं तर तुला माहीत आहे. मुग्धाचं रडणं तू ऐकलं आहेस ना? संध्याचा आक्रोश तू पाहिला आहेस ना? तुला भीती वाटते, तू घरात राहू शकत नाही, म्हणून जर मी तिथे रात्री गेले नसते, संध्याला तिच्या लेकींसह घरातून बाहेर काढलं नसतं, तर दुसऱ्याच दिवशी त्या माणसाने काही धिंगाणा केला असता आणि त्याला या निष्पाप पोरी बळी पडल्या असत्या तर मी स्वत:ला माफ नसते गं करू शकले! बाळा, तू घरात एकटी असताना मलाही तुझीच काळजी असते. माझ्या कामावर मी नाही मग कॉन्सन्ट्रेट करू शकत. रेवा आणि देवयानीपेक्षाही जास्त काळजी मला तुझी वाटते. रेवा काय नं देवयानी काय, या पोरींनी हे सारं लहानपणापासून पाहिलं आहे. मम्मीच्या कामाचे परिणाम आपल्यावर होऊ शकतात, याची रंगीत तालीमच जणू त्यांची अनेकदा होऊन गेलीय. मुन्नी, तू आजपर्यंत जिथे वाढलीस, ते वातावरण, तुझा मधल्या काळात झालेला प्रवास, तिथून तुझं माझ्यापर्यंत येणं, मुन्नी तू माझ्यापर्यंत पोचणं, ही फार मोठी आणि वेगळी गोष्ट आहे बेटा. त्यासाठी त्या नरकात आयुष्य गेलेल्या भैयाने आपला जीव धोक्यात घातला आहे. त्याची चामडी सोलून काढली त्या राक्षसांनी. पण तो फुटला नाही. सायना आजपर्यंत तुझ्याबद्दल काहीही बोललेली नाही. सायनाला आंटीनी किती मारलं, पण नाही बोलली ती पोरगी. सुहासला किती मानसिक त्रास झाला या कामात त्याने आपल्याला मदत केली म्हणून. त्याची बायको अजूनही त्याला बोलते, टोचून बोलते. मुन्नी तू आम्हा सगळ्यांसाठी फार महत्त्वाची आहेस गं. या सर्वांच्या कष्टाचं

फळ आहेस तू. मुन्नी तुला संपूर्ण संरक्षणात काही दिवस मला ठेवलंच पाहिजे. फक्त तुझ्या एकटीपायी मी दिवसभर घरात राहिले, तर माझ्या बाकीच्या केसेसचं काय? माझ्या कार्यालयाचं काय? आपल्याला ऑफीसमध्ये कामही करायचं आहे ना? पैसा नको कमवायला? तुमच्या शिक्षणासाठी, खाण्यापिण्यासाठी, लग्नासाठी पैसा नको कमवायला?"

"मम्मी, तू काय सांगते आहेस ते सारंच काही मला कळत नाही. पण माझ्यामुळे तुला लई त्रास आहे काय गं?"

"लई नाही खूपखूप म्हणायचं. आणि ए वेडाबाई, त्रासाचा काय विषय? अगं तुला मला खूप मो ऽ ऽ ठ्ठ झालेलं बघायचं आहे. कलेक्टर. आयएएस ऑफीसर व्हायचं आहे तुला. त्यासाठी तुला नवोदय शाळेत जाऊनच शिकावं लागेल."

"नवोदय शाळेत गेल्याशिवाय मी कलटर नाही होणार? आणि कलटर म्हणजे तेच ना खोब्रागडे काकांसारखं? आपण लातूरला त्यांच्या ऑफीसमध्ये गेलो होतो. मग त्यांच्या पांढऱ्या मोटरमधून लाल दिव्याच्या गाडीतून त्यांनी तुला आणि मला भाषणाच्या ठिकाणी नेलं होतं? आई काय थाट होता गं त्यांचा."

"तेच. तेच कलेक्टर. कलटर नाही कलेक्टर. तस्साच थाट तुझा बघायचा आहे मुन्नी मला. पण आधी भाषा सुधरव बाई तू."

"मम्मी, हे सगळं होण्यासाठी मुन्नीला खरंच नवोदयलाच पाठविणं आवश्यक आहे काय? कशाला पाठवतेस गं तू तिला तिथे? आत्ता कुठे ती इथे रुळायला लागली अन् पुन्हा आपलं तिचं बस्तान तू बदलवणार. तुझेही काहीकाही निर्णय म्हणजे नं डोक्याला तापच असतो आमच्या." आतल्या खोलीतून बाहेर येत चिडक्या आवाजात ईशान म्हणाला.

“ईशान, झालीय तुझी झोप?”

“होय. झालीय. पण झोपेत माझा एक कान तुमच्या बोलण्याकडेच होता. केव्हाचा ऐकतोय मी तुम्हा मायलेकींचा संवाद. मम्मी, आमच्या या लाडक्या बहिणाबाईला तू कुठेही पाठवायचं नाहीस. काय मुन्नी तुला नाही ना जायचं कुठेच?”

दादानं आपली बाजू घेतलेली बघताच मुन्नी लगेच ईशानकडे झेपावली. आणि त्याच्या शेजारी सोफ्यावर बसत लगेच रुसव्या लाडिक सुरात म्हणाली,

“दादा. खरंच मला तुम्हा कुणाला सोडून कुठेच जायचं नाहीय. मम्मी ऐकतच नाही रे दादा. प्लीज तू सांग ना, दादा.” त्याच्या हाताला लाडाने पकडून मुन्नी ईशानला विनंती करत होती.

“ईशान, तिला इथून बाहेर पाठवायची मला हौस आहे काय? पण मी सतत बाहेर राहणार. पोरी आधीच इथे नाहीत. तू इथे येता जाता असतोस. तू इथे होतास, तरीही त्यादिवशी ती माणसं इथे आलीत तेव्हा तू घरी होतास काय? आपण कुणीच आपली सारी कामं सोडून घरी नाही बसू शकत. एकटी वत्सला काय करणार? बरं ती शाळेत येता-जाता किंवा खाली खेळायला गेल्यावर कुठेही काहीही दगाफटका झाला तर... ईशान मुन्नीच्या संदर्भात मी खूप गंभीर आहे. माझ्या रक्तामासाची नसली तरी माझ्या स्पर्शावर, माझ्या वात्सल्यावर वाढली आहे ती. माझ्या गर्भाशयात नसेल रुजली रे ती; पण माझ्या काळजात रुजली आहे. तिचा आनंद काय नि तिच्या वेदना काय.. इथं.. या काळजात रुततात मला. टोचतात. कोणत्याही परिस्थितीत मुन्नीला मला हातचं गमवायचं नाहीय. मुन्नीचं अख्खं आयुष्य आपल्या छोट्याशाही चुकीने बर्बाद होऊ शकतं. तिच्या संदर्भात आता मला कोणताच धोका पत्करायचा नाहीय.”

“मम्मी, तू सरळ पोलिसांकडे तक्रार का नाही करत?”

a

“ईशान, पोलिसांकडे तक्रार कुणाविरुद्ध करणार? त्या पहिलवान आणि आंटीविरुद्ध जिथून आपण हिला आणलं? की तिच्या बापाविरुद्ध ज्यांनी स्वत:च तिला तिथे काही रुपयांसाठी विकलं? मुळात तोच स्वत: हिच्यावर अत्याचार करत होता रे. ईशान ती लहान आहे. अज्ञानी आहे. कायद्याच्या भाषेला आपलं काम, आपला उद्देश समजणारच नाही. अरे, आपण हिला ठेवून घेतलंय किंवा पळवून आणलंय असाही ते लोकच आपल्यावर आरोप करू शकतात. यातला एक शब्द जरी पत्रकारांपर्यंत पोचला ना, तरी ते काय वाट्टेल तशा ‘स्टोरी’ करतील. अधूनमधून तो सचीन येतोच ना, आपल्याकडून काही बातम्या मिळतात काय, हे चाचपडायला. इन्सपेक्टर देवतळयांना आपण यात अप्रत्यक्षपणे म्हणूनच सहभागी करून घेतलंय. ईशान हा विषय तू नीट समजून घे. कारण मुन्नी ही आता आपल्यासाठी फक्त एक केस राहिलेली नाही. ती आपली कुटुंबातली मुलगी आहे. बघ, गंगा-जमुनात काम करताना ही पोरगी माझ्या डोळयात भरली. मेडीकल चेकअपच्या निमित्तानं ती मला पहिल्यांदा भेटली. तिच्या शारीरिकहालचालीवरून, डोळयातल्या भावावरूनच मला लक्षात आलं, हा इथला बळीचा बकरा आहे. भैयाच्या मदतीनं आपण हिला तिथून बाहेर काढलं. आंटीविरुद्ध सरळ त्याचवेळी पोलीस कम्पलेंट केली असती, तर तिची रवानगी तिच्या घरीच झाली असती. जे घर नसून तिच्यासाठी नरक आहे. बरं वडिलांनीच तिचं लैंगिक शोषण केलंय, म्हटल्यावर काका-मामाकडे रवानगी झाली असती. पण तेही त्यातलेच. आपल्या घरातल्या फुलाकडे आपणच तुच्छतेनं, निर्दयतेनं पाहिलं तर लोक तर पाहणारच. या लोकांना नात्याचा पोत का कळत नाही रे ईशान. सांग, कुणाविरुद्ध तक्रार करू आणि तिला कुठे पाठवू? आपल्याला तिला याच पद्धतीनं त्या नराधमांपासून दूर ठेवायचं

a

आहे. उलट तिचा तर आग्रह आहे की तिच्या बहीण-भावांनाही इकडेच आणायला हवं."

"मग काय त्यांनाही आणणार का तू?"

"नाही. त्यांना इथेच आणणार नाही मी. पण लवकरच त्यांना मी कदाचित सिंधूताईंच्या आश्रमात ठेवण्याची व्यवस्था करणार आहे. ईशान, मुन्नी आता आपल्या आयुष्याचा, या घराचाच एक भाग झाली आहे. आपण तिला वाऱ्यावर जसं नाही सोडू शकत, तसंच आपल्याही घरात जर तिला धोका पोहचू शकत असेल तर आपण तिला योग्य ठिकाणी ठेवायला हवं की नाही?"

"मागे तू तिला मावशीकडे दहेगावला ठेवलं होतंस, ते तरी ठीक होतं. पण हे नाहीच पटत आहे मम्मी."

"दहेगावला पाचव्याच दिवशी पोचलाच ना तो गज्यामामा. मला आठ दिवसांसाठी कलकत्त्याला माझ्या सेमिनारसाठी जायचं होतं. म्हणून तिला ताईकडे सुरक्षिततेच्या दृष्टीनं पाठवलं. तर वॉचमनसोबत मैत्री करून लाडीगोडी लावून त्या नालायक गजामामाने तिचा शोध घेतला. खरं तर मी तिला कुठे ठेवणार हे वत्सलालाही सांगितलं नव्हतं. पण आपण त्यावेळी एक चूक केली होती."

"कोणती?"

"ड्रायव्हरला सोबत नेलं होतं. परत आल्यावर खूप रात्र झाली म्हणून ड्रायव्हर घरी न जाता चौकीदारासोबत खाली झोपला आणि बोलताबोलता सहजच बोलला, आम्ही दहेगावला सोडायला गेलो होतो म्हणून. मुन्नीबद्दल त्याला काहीच माहीत नाही. कारण तो नवा आहे. त्याने तिला आपल्या कुटुंबातलीच समजलं आहे. हा विषय काही वेगळा आहे, हे त्याच्या ध्यानीमनीही नव्हतं. पण आपल्या घराच्या

a

मागावर असलेल्या त्या गज्यानं मी गावात नाही कळताच चौकीदाराशी सूत जमवलं आणि बरोबर मुन्नीचा शोध घेतलाच. ड्रायव्हरला किती किमी. आहे, कोणत्या रस्त्यावर असं सहजसहज विचारून घेतलं आणि पोचला तिथे. ते तर बरं की शरदने त्याला इतका पिटला की पार काळानिळा होईस्तोवर झोडपून काढला. मी कलकत्त्याहून आल्याआल्या शरदने मला फोनवर सांगितलं म्हणून मी तडक तिला इकडे घेऊन आले. शिवाय अशा अडचणी आल्यावर आपण तिला इकडेतिकडे ठेवायचं म्हणजे तिच्या अभ्यासाचा किती खोळंबा होतो बरं.”

“पण मम्मी नवोदयमध्ये ते लोक पोचणार नाहीत हे कशावरून? दोनशे किमी. अंतरावरचं आडमार्गावरचं दहेगाव जर ते शोधू शकतात, तर नवोदय शोधणं काय कठीण आहे त्यांना?”

“ईशान, तू नं अडाण्यासारखे प्रश्न नको उपस्थित करूस. अरे, नवोदय स्कूल इज जस्ट लाईक ए पब्लिक स्कूल. शाळा आणि विद्यार्थ्यांचं वास्तव्य एकाच आवारात आहे. बाहेरच्या कुणालाही तिला तिथे भेटता येणार नाही. आवाराच्या बाहेर मुलांना स्वेच्छेनं जाताही येत नाही. आपण तिचा जो फॉर्म भरू त्यात तिची पालक म्हणून जसं माझं नाव राहील, तसं माझ्याशिवाय तिला भेटायला येणाऱ्या तीन नावांमध्ये जर का तुझं नाव नसेल आणि तू त्या रेक्टरला कितीही बोललास की ‘मी तिचा भाऊ आहे’ तरी तो तुला मुन्नीला भेटू देणार नाही. तिच्या संपूर्ण सुरक्षिततेची हमी त्या शाळेची असेल. ईशान, आश्रमशाळा आणि नवोदय शाळा यांत फरक आहे. विदर्भातल्या एकाही नवोदय शाळेतून विद्यार्थी पळवला गेला किंवा त्यांचं काही वेगळ्या पद्धतीनं शोषण झालं, असं आजपर्यंत ऐकिवात नाही. अरे मी या सगळ्याचा आधी नीट अभ्यास केला असेल, असं नाही का वाटत तुला?”

a

“मम्मी, तुझ्या निर्णयक्षमतेबद्दल मला शंका नाही. तिच्या संपूर्ण सुरक्षिततेचा विचार करूनच तू जे काय ठरवायचं, ते ठरवशील, याचीही खात्री आहे मला. पण तरीही मुन्नीला इथून बाहेर कुठेही पाठवू नये असं वाटतं.”

“ईशान, दरवेळी भावनेला महत्त्व देऊन चालत नाही. तिच्या उज्ज्वल आणि सुरक्षित आयुष्यासाठीच मी हा निर्णय घेते आहे. मुन्नी माझं मिशन आहे. माझ्या कामाला, माझ्या जगण्याला मुन्नीने नव्याने अर्थ प्राप्त करून दिलाय. मला वाटतं, आपण यावर खूपच चर्चा केली. तुला पटणं न पटणं तेवढंसं महत्त्वाचं नाहीच. मुन्नीला घेऊन उद्या नवोदयला मी जाणार.”

नवोदयला जायचं टळण्यासाठी ईशानदादाचाही काही उपयोग होताना दिसत नाही हे पाहताच मुन्नीच्या डोळयांना अश्रूंच्या धारा लागल्या. तिनं केविलवाण्या नजरेनं एकदा दादाकडे आणि एकदा मम्मीकडे बघितलं. आपण किती हेल्पलेस आहोत, याचा त्याला स्वत:चाच राग आला. त्याने मानेला झटका देऊन आपली नापसंती व्यक्त केली आणि तिथून तो निघूनच गेला. त्याच्या जाण्याकडे दुर्लक्ष करून वैदेहीनं मुन्नीला जवळ घेतलं, तिचे डोळे पुसले आणि तिच्या केसांतून हात फिरवत गहिवरल्या आवाजात म्हणाली, “मुन्नी, तुला माझ्यापासून दूर पाठवताना मलाही खूप त्रास होतो आहे गं, पण काय करू. इलाज नाही बेटा.”

“मम्मी... मला नाही जायचं.” मुन्नी स्फुंदत म्हणाली.

“बाळा. तू शहाणी राणी आहेस ना माझी. जा तयारीला लाग. हे तुझ्या भल्यासाठीच आहे बाळा.” दाटून आलेल्या कंठातून आता शब्दही फुटणार नाही हे जाणवल्यानं वैदेही आत निघून गेली.

a

**“क्यू** आंटी, क्या चल रहा है?” वैदेही अचानक समोर आलेली बघून आंटीला क्षणभर तर काही सुचलंच नाही. जवळजवळ तीन साडेतीन वर्षांनी तिनं गंगाजमुनात पाय ठेवला होता. जोवर मुन्नीची नीट व्यवस्था लागत नाही, तोवर इकडे फिरकायचंच नाही, हे तिनं पक्क लक्षात ठेवलं होतं. जसजसं मुन्नी बेपत्ता होऊन दिवस लोटत होते, तसतसे पहिलवान आणि आंटी अस्वस्थ होत होते. पण त्यांच्या हातात काहीच नव्हतं. भैया तोंड उघडत नव्हता. त्याला कितीही मारझोड केली तरी त्यानं तोंडातून ब्र काढला नव्हता. मॅडमजीवर त्याची श्रद्धा होती. मुन्नीबद्दल त्याच्या मनात कणव होती. ही पोरगी वाया जाऊ नये, तिच्या आयुष्याचा उकिरडा होऊ नये, याबद्दल तो मनापासून दक्ष होता. म्हणूनच मरेस्तोवर मार खाऊनही त्याने मॅडमचं नाव सांगितलं नव्हतं. पण वसतिगृहातला ‘तीन पेॅनवाला’ पोरगाच एक दिवस अचानक फुटला. ‘मेडीकल कॅम्प घेणाऱ्या ज्या मॅडम इकडे येतात, त्या एवढ्या रात्रीच्या त्यादिवशी कशा काय आल्या होत्या? इकडे काही प्रॉब्लेम झाला होता काय?’ या एकाच प्रश्नाने मंदाच्या डोक्यात ट्यूब पेटली आणि तिने लगेच आंटीला ही वार्ता कळवली. ‘त्या रात्री’ म्हणजे किती दिवसांपूर्वी वगैरे शोध घेणं सुरू झालं. आणि गणित जुळलं. मॅडमचं रात्री इकडे दिसणं आणि मुन्नीचं बेपत्ता होणं याचं गणित जुळल्यापासूनच पहिलवानची माणसं आणि गज्यामामा वैदेहीच्या मागावर होते. त्याकाळात वैदेहीनंही इकडे येणं टाकलंच. पण मुन्नीला नवोदयला

पाठवताच तिच्या गंगा-जमुनातल्या अनेक मैत्रिणींच्या हाका तिच्या कानात घुमू लागल्या. सायनाची तर तिला प्रकर्षानं आठवणं यायला लागली. सायना, रुबी, शीला, लक्ष्मी, बेबी, काकी, नकोशी, किरण कितीतरी पोरी होत्या, ज्या तिच्यात रमायच्या. तिच्याशी गप्पा मारायच्या. आपल्या आयुष्यातले कडू-गोड प्रसंगही सांगायच्या. दोन वर्षांनी परत ती पांढरीपांडे समाजकार्य महाविद्यालयात पोचली.

"सर, खूप दिवस झालेत, आपण गंगाजमुनात कॅम्प नाही घेतला."

"मॅडम, तुम्हीच तर गायब झाला होतात."

"होय. मधल्या काळात अपघात झाला. पाय फ्रॅक्चर झाला होता. रॉड टाकलाय. त्यामुळे सहा महिने पूर्ण बेडरेस्ट. थोडंथोडं हिंडणं-फिरणं सुरू झालंय. ठप्प झालेल्या कामांना आता मार्गी लावतेय. कारखान्यावर तर अगदी अवकळा आली होती. त्याची घडी नीट बसवताबसवता पार वाट लागली माझ्या या बाकी कामांची."

"बापरे. बरेच प्रॉब्लेम्स आलेत हो. कुणीच कसं काही बोललं नाही. इंगोले मॅडमनेही काही सांगितलं नाही हो."

"राहिलं असेल. पण ते जाऊ द्या. ते काही फार महत्त्वाचं नाही. पण आपण आता एक कॅम्प घेऊ या ना."

"नक्की, सांगा कसं करायचं?"

"नवीन काही नाही. आपल्या नेहमीच्याच पद्धतीनं जाऊ या. एमएसडब्ल्यूची मुलं, आपल्या दोन मॅडम आणि मी. तिकडे सिव्हिल सर्जन बोबड्यांना बोलते. ते त्यांची टीम पाठवतीलच. नाही काय?"

"हो बोला तुम्ही डॉक्टरसाहेबांशी. कोणता दिवस घ्यायचा?"

“मंगळवार घेऊ या. रविवारला तिकडे बाजार असतो, त्यामुळे सोमवारला त्या बाया खूपच थकलेल्या असतात. बाजाराच्या दिवशी यांच्याकडे गिऱ्हाईक खूप असतात ना. मंगळवार-बुधवार ठीक राहील.”

“तुम्ही इंगोले मॅडमशी बोलून घ्या. मी चपराशाला पाठवून बोलवून घेतो मॅडमला.”

“नको सर. त्यांना कशाला इकडे येण्याचा त्रास देता. कदाचित त्या आत्ता पिरेडवरही असू शकतील. मीच त्यांना स्टाफरूममध्ये भेटून घेते. त्यांची पहिल्या वर्षाच्या एमएसडब्ल्यूच्या निवडक विद्यार्थ्यांची यादी पण आम्ही तयार करतो. लागू या मग कामाला?”

“होय. नेहमीसारखा एक अर्ज तेवढा....?”

“तो देतेच आहे. सोबत आणलाच आहे. हा घ्या.”

“थँक्यू. चहा चालेल ना?”

“नको सर. वेळ होईल. मॅडमशी अजून बोलायचं आहे. शिवाय मेडीकलला सिव्हिल सर्जनकडे जायचंय. खूपच कामं आहेत.”

“होय. पण सांभाळून. पायाला जपा.”

“पाय? होय होय होय.” मघाची लोणकठी थाप एव्हाना वैदेही विसरलीही होती. ती हसतच तिथून उठून बाहेर पडली. सगळ्या हालचाली भराभर करून, पाचपावली पोलीस स्टेशनच्या इन्सपेक्टरच्या कानावर कॅम्पची बातमी टाकूनच ती आज चक्क आंटीसमोर उभी होती.

अचानक समोर आलेल्या वैदेहीला बघून आंटी क्षणभर गडबडलीच. पण क्षणात तिचा राग उफाळून आला. ती रागानं वैदेहीकडे बघायला लागली.

“तुम, तुम यहां क्या कर रही हो?”

“क्या कर रही हो? मतलब? आपके सामने खडी हू! आपके साथ बात करना चाहती हूँ!”

“तुमने यहा आने की हिंमत कैसे की?”

“अरे आंटी, छोडो ना ये बाते अब. क्यू आप मुझसे नाराज हो?”

“मेरी बच्ची तू उठाके ले गई. और उपरसे मुझे ही पुछ रही हो?”

“आंटी, मैने आपकी कोई लडकी-वडकी उठाई नही. कोणत्या पोरीची गोष्ट करता तुम्ही?” आवाजात मुद्दाम कठोरपणा आणत वैदेही बोलली.

“मुन्नी”

“कोणती मुन्नी?”

“देखो मेडमजी म्या तुमची इज्जत करते. तुम जरासा अच्छा काम करते म्हून. हमारे लडकियोंके बारे में, त्यांच्या तब्बेतीचं तुम सोचती है. लेकिन आपने हमारे साथ धोखा किया. आप मुन्नीकोही लेके भागे. अब आप यहा नही आना मँगता. आपने यहा पाँव रखनेकी हिंमत कैसे की?”

“आंटी, मी नाही तुमच्या कोणत्याच पोरीला पळवलं. मी कशाला पळवेल बरं.”

“मेडम, तुम इथून जाव.”

“मी नाही जाणार. मला तुमच्यासोबत काम करायचं आहे.” हट्टी आवाजात ती म्हणाली.

“नही. तू इथं येवाचं नाही.”

a

“आंटी, आपली दोस्ती एवढ्या लवकर खतम होईल काय? मला तर सायनाला भेटायचं आहे. नंदा, रुबी, नकोशी सगळ्यांना भेटायचं आहे. तुझ्या दम्यासाठी डॉक्टर आणायचा आहे. बरं का आंटी, चंद्रपूर जिल्ह्यात दम्यावरचं हमखास औषध देणारा एक डॉक्टर सापडलाय मला. त्याच्याकडे आपल्याला जायचं आहे. आप लोगोंके साथ काम करना है!”

“नाही. आम्हाले तुह्या कामाची, तुह्या डाक्टरची जरुरत नही है।”

“अरे यार. ऐसा भी क्या आंटी.”

“आंटी, आंटी मत करो तुम. पहले यहांसे जाओ.” कुठूनसा अचानक पहिलवान उगवला आणि वैदेहीच्या अंगावर खेकसला. आपआपल्या खोल्यांमधून पांच-पंचेवीस पोरीपण एव्हाना बाहेर आल्याच होत्या. मॅडमचा आवाज ऐकून सायना, नकोशी, लक्ष्मीला आनंद झाला तर मंदासारख्या काही आता काय तमाशा होतो, हे बघायला उत्सुक होत्या. कोणत्याही कारणाने असे ना का पण तिथे गर्दी मात्र जमली होती. आंटी आता मेडमला कशी हुसकावून लावते, याचा अंदाज त्या साऱ्याच घेत होत्या. मंगळवारीच्या गल्लीच्या कोपऱ्यात पानटपरीवर भैय्या मात्र एकटाच कानात प्राण आणून काय ऐकायला येतंय, याकडे लक्ष ठेवून होता. काही दंगाधोपा झालाच तर पटकन पोलीसस्टेशनला पळायचं हे त्याने आज ठरवूनच टाकलं होतं. त्यासाठी आज आपल्याला इथून कायमचाच निरोप घ्यावा लागला तरी चालेल. तसंही जेव्हापासून मुन्नीला इथून पळून जाण्यात आपण मदत केली आहे, हे त्यांच्या लक्षात आलं, तेव्हापासून इथे सतत आपली उपेक्षाच होत आहे. आंटी काय, पहिलवान काय एवढच कशाला साल्या त्या लक्ष्याने पण दोन मारायला कमी नाही केलं, पण त्याची भैय्याला चिंता नव्हती. मुन्नी या नरकातून बाहेर पडली, याचंच त्याला अतीव समाधान लाभलं होतं. मुन्नीसाठी आज मेडमच्या जिवाला

धोका होणार असेल, तर मेडमसाठी आज तो स्वत:चा जीव धोक्यात घालायला तयार होता. अलीकडे लक्ष्या आणि लंगड्याच्यामार्फत पहेलवान असे दंगेधोपे करतो, हे तो जाणून होता. मेडमला मात्र इथे धोका होऊ द्यायचा नाही हे त्याने ठरवलं होतं.

"मेडम, आप यहासे चली जाओ. आजके बाद आपने यहा दिखना नही."

"अरे भई लेकिन हमने किया क्या है? क्या गुन्हा किया हमने? कालपर्यंत मी इथे येत होते. तुम्हा सर्वांशी माझी छान दोस्ती होती. आता काय बिघडलं हे सारं?" उंचपुऱ्या तगड्या पहिलवानकडे बघत वैदेही म्हणाली.

"मेडम, फालतू गोष्टी कराले टैम नाही माह्याजवळ. तुम यहाँ से जाओ. अब तुम जाती हो का लक्षाले बोलावू?" गळयातल्या चेनशी खेळत पहिलवान गरजला. पहिलवानच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करून आंटीकडे बघत वैदेही म्हणाली,

"हे बघ आंटी. माझं जरा ऐकून तरी घे. अगं जर का मी इथली तुझी पोरगी पळवून नेली असेल तर तू माझी पोलीसकडे तक्रार कर. त्यासाठी पोलिसांनी मला अटक केली तरी चालेल. पण जर मी तुझी पोरगी पळवून नेली नाही, हे सिद्ध झालं तर तू मला माझं इथलं काम पूर्ववत करू दे.

"मेडम, तुम्हालेबी माहीत आहे, का मी तुमची कम्पलेंंट नाय करू शकत. म्हूनच तुमी अशा शेफारल्या हाय. पन माही नक्षत्रावानी पोरगी नेऊन तुम्ही माह्य लई नुकसान केलं. सायनाच्याच जोडीला उद्या मुन्नी हाताशी येणार व्हती. माही दुभती म्हसच पळवली तुम्ही."

a

“आंटी, पोरगी त खरंच चांगली होती. पण बरं झालं नं ती जिथे कुठे असेल तिथे मजेत तर असेल. तूच सांग बरं, इथे काय सुख मिळतं पोरींना. मुन्नीच्या आयुष्याची पण बर्बादीच होती इथे.”

“म्हून तुम्ही घेऊन गेल्या? माह्या सोन्याचा तुकडा म्हून नेला तुम्ही? मले तुमची बकवास नाही आयकाची. बस, तुम्ही इथून जा. ए लक्ष्या. मेडमले जरा रस्त्यापर्यंत नेऊन दे.”

आंटी काही ऐकण्याच्या मूडमध्ये नाही, हे आता ती समजून चुकली होती. आंटीला समजून सांगण्यालाही आता काही अर्थ नव्हता. तिनं आपली पर्स उचलली आणि तिथून काढता पाय घेतला. गल्लीच्या तोंडाशी ठेवलेल्या आपल्या गाडीत ती येऊन बसली. तोंडावरून रुमाल फिरवला आणि गाडी सुरू केली. परत इथे यायचंच असं मनाशी ठरवूनच. पण वैदेही मनातून नाराज झाली. या बस्तीशी तिला असं नातं तोडायचं नव्हतं. एका मुन्नीला आपण बाहेर काढलं, पण बाकी काय? आपल्याला तर योग्य वेळ येताच सायनालाही तिथून बाहेर काढायचं आहे. सायनाला एव्हाना आपण हे समजवून देण्यात यशस्वी झालोच आहोत, की ‘अजूनही वेळ गेलेली नाही. तू अजूनही बाहेर येऊन चांगलं आयुष्य जगू शकते.’ सायनाला तर इथून काढायचंच. हुशार आहे ती. शिवाय हळवी. आजही ‘साब’ ची आठवण आली की तिला रडायला येतं. किती दर्दभरी कहाणी आहे तिची...

त्यादिवशी हॉटेल आमीरच्या डिलक्स एसी रूममध्ये शिरताच चावलाने आधी तिला आपल्या मिठीत घेतलं. भरपूर लाड केले तिचे. त्या लाडाने ती पार

गुदमरूनच गेली. त्याचं मन जेव्हा तृप्ततृप्त झालं, तेव्हाच त्याने तिच्या प्रश्नांना उत्तर द्यायला सुरुवात केली.

"सायना, दिवसभराच्या साऱ्या प्रश्नांची उत्तरं मी तुला आता देतो. सायना, तू मला आवडतेस. खूपखूप प्यारी आहेस तू मला. पण मी तुझ्याशी लग्न नाही करू शकत. त्याच घरातही नाही ठेवू शकत. तू दिवसभर माझ्याच घरात असतेस. माझ्या डोळ्यांसमोर, माझ्या देखरेखीखाली असतेस, पण ती कामवाली म्हणून. मला ते आवडत नाही. माझं प्रेम आहे तुझ्यावर. माझी बायको ज्या थाटात राहते, त्याच थाटात तू राहावंस, हीच माझी इच्छा आहे. तसंच तुला मी ठेवणार."

"साब, काय बोलताय तुम्ही. तुम्हाला तरी कळतंय काय? अहो, कुठं आंटी, कुठं मी? आणि माझी माय? जित्त गाडेल ती मला."

"तिच्या दृष्टीस पडायचंच नाही तू आता."

"म्हणजे?" काहीही न कळून आश्चर्यचकित मुद्रेनं ती त्याच्याकडे बघतच राहिली. त्याच्या छातीवर डोकं टेकलेल्या सायनाची हनुवटी उंचावत तिरक्या नजरेनं त्यानं तिला विचारलं,

"सायना, तू आता तुझं घर, तुझे मायबाप, भाऊ विसरून जायचं. तू माझी आहेस, माझ्याजवळ राहायचं."

"नही. नही, ये नही हो सकता. परवरदिगार मुझे माफ नही करेगा."

"परवरदिगार प्रेम करायचं नाही म्हणतो काय? तुला मी आवडत नाही?"

"खूपखूप आवडता." त्याच्या कपाळाचं दीर्घ चुंबन घेत ती म्हणाली.

"मग माझ्याजवळ तुला राहावसं नाही वाटत?"

"वाटतं. तुमच्याजवळ राहावसं वाटतं." त्याला घट्ट आवळत ती म्हणाली.

“माझ्याजवळ राहायचं आहे, तर मग तू तिकडे कशी राहशील?”

“नाही साहेब असं नको व्हायला. मला आता खूप भीती वाटत आहे.” समोरच्या टी.व्ही. कडे बघत ती म्हणाली, “बापरे ‘घर घर की कहानी’ सुरू झालं. रात्रीचे साडे दहा वाजले. मेरी अम्मा बहुत चिल्लायेगी अब. और मुझे आज पापभी बहुत लगनेवाला है! मैने तो आज नमाझ भी नही पढा. पताही नही चला समयका. साब मला घरी जायचं आहे. माझी अम्मा वाट पाहत असल माझी.”

“काय सांगशील घरी? दिवसभर कुठे होती सांगशील?”

सायनाने त्याच्या छातीवरून आपलं डोकं वर केलं, त्याच्या डोळयात क्षणभर बघितलं आणि ती रडायलाच लागली. आता ती खऱ्या अर्थी घाबरली होती. बरेच प्रश्न तिच्या मनात गर्दी करायला लागले. आईकडे एवढ्या रात्री आपण परत गेल्यावर काय सांगणार, हा प्रश्नच होता. आई आपल्याला किती मारेल, झोडेल याची कल्पना होती तिला. आपण साबसोबत येऊन किती मोठी चूक केली हे आत्ता तिच्या लक्षात यायला लागलं. साबनी आपल्याला इथे कां आणलं, याचाही बोध अद्याप तिला नीट लागलेला नव्हता, चावलाने तिला जवळ घेतलं. तिच्या डोक्यावरून प्रेमाने थोपटलं.

“सायना, मी तुला काही सांगितलं तर तू माझं ऐकशील?”

“तुमचंच तर ऐकतेय साब मी सकाळपासून.”

“सायना, आता तू घरी जायचंच नाहीस.”

“मतलब?” ती दचकून उठूनच बसली.

“मी तुला माझ्याजवळ ठेवणार आहे आता. अगं माझं प्रेम आहे तुझ्यावर. मात्र मी माझं घर नाही मोडू शकत. मी नागपुरातच तुला वेगळं ठेवणार. आपलं

दोघांचं एक स्वतंत्र घर असेल. हम वहा प्यारसे रहेंगे. सायना, तुझ्याशिवाय आता मला नाही राहता यायचं."

"नाही. मी माझ्या अम्माला सोडून नाही राहू शकत. मला तर आताच अम्मा शोधायला लागली असेल. मी अद्याप घरी नाही म्हणून, ती किती घाबरली असेल. नाही साब मला आता पटकन घरी जायचं आहे."

"सायना, तू दिवसभर कुठे होतीस हे अम्माने विचारलं, तर काय सांगशील?"

सायना निरुत्तर झाली. काय करावं तिला काही सुचेचना. ती धाय मोकलून रडायलाच लागली. तिला घरी जायचंच होतं. आईची, बहीणभावंडांची तिला खूप आठवण यायला लागली. शिवाय आता साबची भीती पण वाटली. क्षणभर तिच्या मनात विचार चमकून गेला. हे काय करून बसलो आपण. आपल्याला साबनी फसवून इथवर आणलं. आपल्याशी गोडगोड बोलून सिनेमा दाखवायला म्हणून आणलं आणि इथे हॉटेलमध्ये घेऊन आले. दिवसभर त्यांनी आपल्याला काहीच सांगितलं नाही. का केलं त्यांनी असं? तिला आईच्या, घराच्या आठवणींनी खूप रडायला यायला लागलं. चावलाने तिला बराच वेळ समजावलं. जवळ घेतलं. रडण्याचा आकांत करून शेवटी थकून तशीच ती झोपी गेली. दिवसभराच्या दगदगीनं तशीही ती थकली होती. चावलाला अनेक प्रश्न आता कुरतडायला लागले. मनाशी ठरवताना जी गणितं त्याला फार सोपी वाटत होती, तीच आता अतिशय अवघड वाटू लागली. आपण चुकलो तर नाही ना? अशीही शंका त्याच्या मनात यायला लागली. त्याने सायनाकडे एक नजर टाकली. आणि तिच्या कपाळाचं अलगद एक चुंबन घेतलं. अठरा-एकोणीस वर्षांच्या या अबोध कळीबद्दल त्याला केवळ आकर्षण नव्हे तर तिच्याबद्दल एक आत्मीय प्रेम त्याच्या मनात निर्माण झालं

होतं. तिला सुखात ठेवायची त्याची मनापासून इच्छा होती. सायना त्याचं प्रेमच होतं. केवळ शरीराचे चोचले पुरवण्यासाठी त्याने नक्कीच एवढा मोठा धोका पत्करला नव्हता. सायना त्याला हवी होती. पूर्णांशाने हवी होती. सायनाला तो आनंदात ठेवणारच होता. फक्त बायकोच्या चोरून. त्याने मनाशी काही विचार केलेलाच होता. भाड्याने तो एक वन रूम किचनचा फ्लॅट घेऊन तिथे तो सायनाचा संसार थाटणार होता. त्यानं ब्रोकरला हे सांगितलंही होतं. मोजकंच पण नेटकं फर्निचर, आवश्यक ते किचनचं सामान सारंसारं त्याला या चार दिवसांत करायचं होतं. सायनाला नव्या फ्लॅटमध्ये शिफ्ट केल्यावरच तो कलकत्त्याला बायकोकडे जाणार होता. तोपर्यंत बायकोही 'मैकेका सुख' घेण्यात दंग असल्यामुळे तिला काही संशय येण्याचं कारणच नव्हतं. त्याने ब्रोकरचा नंबर सर्चमधून काढला. अर्धवट रिंग देऊन बंद केला. जेणेकरून सकाळी उठल्याउठल्या त्याला फोन करण्याची आठवण यावी. बराचवेळपर्यंत मनाशीच तो खूप बेत आखत राहिला. निरागस सायनाच्या चेहऱ्याकडे बघून त्याला आपल्या जबाबदारीची आणखीच काळजी वाटली. मध्येच सायना झोपेतच थोडी उसासली, त्याने लगेच तिला आपल्या मिठीत घेऊन थोपटलं. तिही 'साब' म्हणून त्याला बिलगली. बराच वेळ तो भविष्याबद्दल विचार करत बसला. सायनासह एक नवं आयुष्य त्याच्या पुढ्यात होतं. ते त्याला सुंदर करायचं होतं. सायनाला एक नवं वळण लावायचं, तिची भाषा सुधरवायची, तिच्यावर चांगले संस्कार करायचे, शक्य झालं तर तिला पुढे शिकवायचं सुद्धा. एवढ्या लवकर तिने मराठी भाषेत किती प्रगती केली. आपण तिला कथा-कादंबऱ्या वाचायला दिल्यात याचा थोडा तरी फायदा झालाच. विचार करताकरताच त्याला झोप लागली.

a

झोपेतच मोबाईल वाजतोय हे त्याच्या लक्षात आलं. गाढ झोपेतल्या चावलाला सेल घ्यायला थोडा वेळच लागला. नाईट लॅम्पच्या अंधूक प्रकाशात मोबाईलच्या स्क्रीनवर ‘अनिता’ नाव येताच आधी त्याने मनगटावरच्या घड्याळात पाहिलं. रात्रीचे पावणे दोन. एवढ्या रात्री बायकोचा फोन. त्याला धक्कच झालं आणि बायकोसोबत फोनवर बोलल्यावर तर त्याला कळेचना, काही सुचेचना. त्याच्या फोनवरच्या आवाजाने सायना पण जागी झाली होती. ती पटकन उठून बसली. तिलाही क्षणभर आपण कुठे आहोत, हे समजून घ्यायला वेळच लागला होता. गाढ झोपेतून उठलेल्या सायनाला वर्तमानात येताना जरा त्रासच झाला. पण साबला बघितल्यावर तिच्या लगेच लक्षात आलं. ‘काय झालंय साब?’ असं सायनाने विचारताच त्याच्या डोळ्यात पाणीच आलं. त्याचा अडीच वर्षांचा गुड्डू सिरियस होता. त्याला रक्ताची ओकारी झाली होती. त्याला दवाखान्यात नुकतंच ॲडमिट केलं होतं. याने ताबडतोब यावं असं त्याची बायको म्हणत होती.

गुड्डूला रक्ताची ओकारी म्हटल्यावर तो खूपच सिरियस आहे, हे उघडच होतं. त्याला ताबडतोब जायलाच हवं होतं. पण सायना? सायनाचं काय करू? त्याला सुचेचना. रात्रीचे तीन वाजलेले. कलकत्त्याचं सकाळीच विमान. तो पार भांबावूनच गेला. सायनालासुद्धा काही सुचेना. ‘अब क्या?’ हाच प्रश्न तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. आता साब सकाळी मला घरी जायला सांगणार आणि रात्रभर कुठे होतीस म्हणून आई मला खूप मारणार हे स्पष्ट होतं. काय सांगू मी? “साब मी अम्माला आता काय सांगू?” सकाळी तुम्ही विमानाने कलकत्त्याला जाणार आणि मी घरी. माझी अम्मा मला किती मारेल याची कल्पना आहे का तुम्हाला? काय सांगू मी तिला?” सायनाने आक्रोश केला. चावला तिला बरंच समजवून सांगण्याचा प्रयत्न करीत होता. पण ती आता काहीच ऐकण्याच्या मन:स्थितीत

नव्हती. चावला तिला प्रेमाने सांगूनही ती काहीच ऐकेना, तेव्हा त्याने ताडदिशी एक लगावली. त्यावर ती पलंगाच्या दुसऱ्या टोकावर बसून भोकांड पसरत राहिली. आता तर चावला जाम वैतागलाच. त्याला काही सुचेचना. सकाळी सातच्या विमानाने कलकत्त्याला जायचं हे तर त्याचं निश्चित होतं, पण सायनाचं काय करायचं? तिच्या राहण्याची काय व्यवस्था करावी? एकटीला हॉटेलात कसं ठेवावं? तिच्या घरी तर त्याला पाठवायचं नव्हतं. विचार करूनकरून त्याचं डो◌ेकं थकलं. मेंदू बधिर झाला. एव्हाना सायनाही रडूनरडून थकली होती. आपण उगाच तिच्यावर चिडलो, याची जाणीवही त्याला झाली. त्याने हात लांब करून टोकाला जाऊन बसलेल्या सायनाला जवळ ओढलं. ती लगेच ‘साब, साब’ म्हणून त्याच्या कुशीत येऊन विसावली. त्याला बिलगलीच. तो खूप वेळ तिच्या डोक्यावर थोपटत राहिला. तिला आश्वस्त करीत राहिला. पहाटेपहाटे त्याचा थोडा डोळाही लागला बहुधा. पण साडेपाचचा मोबाईलमध्ये लावलेला अलार्म वाजला आणि तो उठला. सायना त्याच्या कुशीत गाढ झोपलीच होती. त्याने हळूच तिला बाजूला केलं. आणि तो आपल्या तयारीला लागला. तो जाण्याची तयारी तर करत होता; पण अतिशय अस्वस्थ होता. तो अद्यापही काहीच निर्णय घेऊ शकला नव्हता. या एक तासात त्याला काहीतरी ठरवायचंच होतं. बाथरूममध्ये जाऊन त्याने कपडे काढले. शॉवर सुरू केला. शॉवरच्या पहिल्या पाण्याच्या फवाऱ्याने त्याचं शरीर किंचित थंडाव्यामुळे शहारलं आणि झर्रकन त्याच्या मनात एक विचार आला. जणू पाण्याच्या या पहिल्या धारेने त्याचा मेंदू इतका तल्लख केला की मागच्या चार तासांपासून त्याला जे सुचलं नव्हतं ते सहज सुचलं. एकदम पंडितच त्याच्या बंद डोळ्यासमोर आला. पंडित. होय पंडित. एकदम चांगला मुलगा. पंडित त्याच्याच कार्यालयात काम करणारा त्याचा असिस्टंट. याच्या माघारी अनेकदा तो याची कामं

बिनबोभाट करायचा. एकदा सांगितलं, की ते त्याला नीट कळायचं. कोणत्या पार्टीला कसं टॅकल करायचं, कसं कटवायचं, त्याला नीट कळायचं. आपल्या साहेबांना कधी, काय, कसं हवं हे समजून घेणारा तो एक अतिशय प्रामाणिक कर्मचारी होता. चावलासोबत त्याचं सूत चांगलं जमलं होतं. विश्वासू होता. पंडितचं नाव नव्हे चेहराच डोळ्यासमोर येताच, सगळ्या बाजूंनी विचार करूनही त्याला तोच योग्य माणूस वाटला आणि त्याला एकदम हायसं वाटायला लागलं. बस. ठरलं. पंडितवरच आता सायनाची जबाबदारी टाकायची. जास्त काहीही न सांगता. त्याने पटकन आंघोळ आटोपली आणि बाथरूमबाहेर येऊन केसही पुसण्यापूर्वी त्याने पंडितला मोबाईल लावला. पहाटेच्या साखरझोपेतही पंडितने फोन मात्र पटकनच उचलला.

“पंडित, मी चावला बोलतोय. मी हॉटेल अमीरमध्ये आहे. तू ताबडतोब इथे ये. रूम नंबर तीनशे अठरा.”

“सर हॉटेल अमीर. कायं झालं सर? काही प्राब्लेम?”

“होय. तू ताबडतोब ये. किती वेळ लागेल?”

“सर पंचवीस मिनिटं.”

“पंचवीस? नाही. तेवढा वेळ नाही. लवकर ये.

“सर पाच मिनिटं फ्रेश व्हायला आणि रामनगरमधून गांधीबागेत यायला किमान वीस मिनिटं. पण शक्य तेवढ्या लवकर पोचण्याचा प्रयत्न करतो.”

“प्लीज कम फास्ट”

“यस सर”

a

पंडित येणार म्हणताच त्याच्या डोक्यावरचा मनामनाचा भार उतरल्यासारखं वाटलं त्याला. मग त्यानं सायनाला उठविलं. तिला फ्रेश व्हायला सांगितलं. ती मुकाट उठून दहा-पंधरा मिनिटांत फ्रेश झाली. तोवर त्याने कॅन्टीनला फोन करून दोन चहा बोलवले. चहा येईपर्यंत स्वत:चे घालायचे कपडे, बूट, सॉक्स काढले. मोबाईलवरून किंगफिशर एअरलाईन कंपनीला फोन करून एक तिकीट बुक केलं. सायना हे सारं काहीही न बोलता ऐकत होती. तिला स्वत:चीच खूप चीड आलेली होती. आता काय करावं? कसं करावं? अम्माला काय सांगावं? हा एकच प्रश्न तिला छळत होता. ती आपल्याच विचारात मग्न होती. तेवढ्यात चावला तयार होऊन तिच्याजवळ बसला आणि तिला म्हणाला,

"सायना, फार विचित्र वेळ आली आहे आपल्यावर. गुड्डू सिरियस आहे. त्याला दवाखान्यात ॲडमिट केलंय. त्यामुळे मला कलकत्त्याला जाऊन धनबादला जाणं आवश्यक झालंय. मी आज जातोय आणि लगेच उद्या रात्रीपर्यंत परत येतो. मला जाणं किती आवश्यक आहे, हे तू पण समजू शकतेस. पण म्हणून मी तुला तुझ्या घरी परत पाठवणार नाही. आता तू एक रात्र एक दिवस माझ्याजवळ राहिल्यावर तुला परत पाठविण्याचा मी विचारही नाही करू शकत. सायना आपण स्वतंत्र संसार करायचा आहे. मी तुला म्हणालो होतो, तसं तुला मी फ्लॅटमध्ये ठेवणार आहे. मी तिकडून आल्याबरोबर आपण फ्लॅट बघू, खूप सारं सामान खरेदी करू, आपला संसार सुरू करू. फक्त हे दोन दिवस मात्र तू इथेच राहावंस असं मला वाटतं. मी माझ्या असिस्टंटला फोन केला आहे. पंडित येतोच आहे थोड्या वेळात. तो चांगला आहे. तो तुझी मी येईपर्यंत काळजी घेईल. तू घाबरू नकोस. मी उद्या रात्रीच येतो. तुला काही काम पडलंच तर हे पैसे ठेव."

a

त्याने खिशातून काही नोटा तिला देण्यासाठी समोर केल्या. तिने रागाने त्याचा हात झिडकारला. अचानक समोर आलेल्या या प्रसंगाने ती गांगरून गेली होती. आपल्याला साबचं आकर्षण का वाटलं याचाच आता तिला खूप राग यायला लागला होता. आपण कोणतं पाप केलं म्हणून अल्लाने आपल्याला ही शिक्षा दिली, असं वागण्याची बुद्धी दिली. इथे राहण्याची तिच्यात हिंमत नव्हती, घरी आईजवळ ती जाऊ शकत नव्हती, तिसरं कोणतंच असं घर नव्हतं जिथे ती जाऊ शकली असती. ती खूप घाबरून गेली. साबला ती विरोधही करू शकत नव्हती. ती आपल्याच विचारात दंग असताना दारावरची बेल वाजली. पंडित आला. चावलाने दार उघडलं. त्याला थोडंफार समजेल, अशा भाषेत सायनाची जबाबदारी दिली आणि उद्याच रात्री परत येतोय हे सांगून तो सायनाला 'टेक केअर' असं सवयीनं म्हणाला आणि बाय करून हातात बॅग घेऊन बाहेर पडलाही. सहा वाजून गेले होते. त्याला जायलाच हवं होतं. गांधीबागेतून विमानतळावर जायला त्याला अर्धा तास सहज लागणार होता. एकीकडे सायना आणि दुसरीकडे गुड्डू. बापाचं काळीज जिंकलं. प्रेम, कामवासना, आकर्षण सारं बाजूला पडलं. सायनाचीही त्याला काळजी होती. पण तो काहीच करू शकत नव्हता. गुड्डूजवळ पोहचेपर्यंत त्याला दुसरं काही सुचणं शक्यच नव्हतं.

साहेबांनी आपल्याला काय सांगितलं आणि एवढ्या घाईत ते का निघून गेले पंडितला कशाचंच काहीच आकलन झालं नाही. सायनाची काळजी घ्यायची म्हणजे नेमकं काय करायचं हेही त्याला कळलं नव्हतं. तिच्याशी काय बोलावं, हेही उमगेना. खाली थांबावं का रूमच्या समोर थांबावं, का इथून निघूनच जावं तडक? त्याला काहीच सुचत नव्हतं. साहेबांनी आपल्याला धड काहीच सूचना दिल्या नाहीत, याचीच आता त्याला चीड यायला लागली होती. साहेबांचा फोन येताच

त्यातल्या त्यात हॉटेलमध्ये बोलवलं म्हणताच तो केवढा घाबरला होता. त्याच्या मनात काही वेगळेच विचार आले होते आणि हे तर भलतंच प्रकरण निघालं. एवढीशी ही पोरगी, हिच्याशी काय संबंध साहेबांचे? साहेब तर असे नाहीतच. मग हे काय यावेळी भलतच पाहतो आहेत आपण. शंभर प्रश्न त्याच्या मनात होते. काय करावं? त्याने पलंगावर एका कडेला अंग चोरून बसलेल्या त्या मुलीकडे बघितलं. अतिशय केविलवाणी दिसत होती ती. घाबरलेली सुद्धा.

"काय नाव तुझं?" त्याच्या नकळत त्याच्या तोंडून प्रश्न बाहेर पडला. तिनं आवाजाच्या दिशेनं पाहिलं. प्र्रथमच ती सरळपणे त्याच्याकडे बघत होती. साब खोलीच्या बाहेर पडल्यापासून अधांतरीच वाटत होतं तिला. साबने ज्याकुणाला आपल्यासाठी इथे बोलवलं, तो आपल्या ओळखीचा ना पाळखीचा. तिलाही तो आपल्याकडे लक्ष ठेवणार, काळजी घेणार म्हणजे काय करणार हे कळलंच नव्हतं. पण त्याच्या शब्दातली आपुलकी तिला जाणवली आणि त्याच्याबद्दलची तिच्या मनातली भीती कमी झाली.

"सायना". ती उत्तरली.

"तू साहेबांना कुठे सापडलीस? कलकत्त्याला? सर ट्रेनिंगला होते तिकडे. तिथून तू त्यांच्यासोबत आलीस?"

पंडितचे प्रश्न ऐकून तिला आपल्या घरची, अम्माची, भावाची इतकी आठवण आली, की त्या साऱ्यांच्या आठवणीने तिला खूप रडू कोसळलं. ती इतकी रडायला लागली की पंडितला तिच्या रडण्याचीच भीती वाटायला लागली. आपण उगाच तिला नसते प्रश्न विचारले असंही त्याला वाटलं. "सॉरी, सॉरी. सहज उत्सुकता म्हणून विचारलं मी. सॉरी. नको सांगूस. तुला दुखवण्याचा हेतू नव्हता माझा. खूप लहान वाटलीस, आणि आमचे साहेब एकदम भला माणूस आहेत. कुणाला

विशेषत: स्त्रियांना तर फसवणारे नाहीतच ते. किती वर्षांपासून ओळखतो मी त्यांना. सॉरी. पण तू रडू नकोस. तुला काही हवं असेल तर मला सांग. तुझ्यासाठीच सरांनी मला इथे बोलवलं. पण मला नेमकं कळतच नाही. मी इथे थांबू की खाली जाऊन थांबू? जाऊ का मी खाली?"

"नाही. नाही. तुम्ही इथून जाऊ नका. मला भीती वाटते. मला अल्लाची भीती वाटते. मला आता इथे राहायची पण भीती वाटते. मला नाही राहायचं इथे. मी जाते. मी घरी जाते."

"नाही नाही. सर येईपर्यंत तू आता इथून कुठेच जायचं नाही. तुझी जबाबदारी माझ्यावर आहे आता. तू कुठेच जायचं नाही."

"नाही. मला नाही राहायचं इथे. मी जाते."

"अगंबाई असं काही करू नकोस. मला सर सांगून गेलेत, तुझ्याकडे लक्ष ठेवायला. आणि जाणार कुठे तू? ज्या गावावरून आलीस तिथे जायला तिकीट काढावं लागेल ना. तिकीट काढण्यासाठी पैसे नको? ते आहेत का तुझ्याजवळ? तू तर सर देत होते तर घेतले पण नाहीस."

"मी गावाला नाही. इथेच राहते. साबच्या घराजवळच्या झोपडपट्टीत."

"काय?" पंडित आश्चर्यचकित होऊन उडालाच. हे काहीतरी भलतंच प्रकरण दिसतंय असं त्याच्या मनात आलं, सरांनी भलतीच जबाबदारी आपल्यावर टाकली याचा त्याला रागही आला आणि तडक इथून निघून जावं हाच विचार प्रबळपणाने त्याच्या मनात ठाण मांडून बसला.

टिपॉयवरचा भरलेला ग्लास तोंडाला लावून तो गटागटा पाणी प्यायला. डिसेंबरच्या कडक थंडीतही त्याला दरदरून घाम फुटला आणि घशाला कोरड

पडली. सकाळीसकाळी कुठे आपण अडकलो. आता पुढे काय? इथून निघून जायची कितीही इच्छा असली तरी तिथली रोजीरोटी त्याला दिसत होती. सरांनी टाकलेली जबाबदारी झिडकारून आपण इथून निघून जाण्याचे जसे आपल्या नोकरीवर परिणाम होतील, तसेच या पोरीच्या आयुष्यावरही होऊ शकतात, हे त्याच्या ध्यानात यायला आता वेळ लागला नाही. सरळसरळ सरांनी या मुलीला पळवून आणली, हे त्याला पक्क कळलं. तो समोरच्या खुर्चीत बसला.

“चहा पितेस?”

“हो.” तिने डोळे पुसत सांगितलं.

दोन दिवस पंडितने त्याच्या पद्धतीने काळजी घेतली. या दोन दिवसांत त्याच्याबद्दल तिच्या मनात आस्था निर्माण झाली. त्याच्याबद्दलची भीतीही निघून गेली. रात्री तो घरी जायला निघाल्यावर तिला परत प्रचंड भीतीनं ग्रासलं होतं, पण तो इथे रात्रभर थांबू शकत नाही, हेही तिला कळत होतं, मात्र तो गेल्यावर रात्रभर ती जागी राहिली, हे तिनेच दुसऱ्या दिवशी त्याला सांगितलं. दुसऱ्या दिवशी रात्रीच्या विमानानं साब येणार म्हणून ती आनंदात होती. काल त्यांचा तसा फोनही येऊन गेला होता. दिवसभर येताजाता पंडितही होताच. थोडं ऑफीस, थोडं सायना असं त्याचं चाललं होतं. सायंकाळी सहा वाजता “मी आज येऊ शकत नाही. मुलगा खूपच सिरियस आहे.” असा त्यांचा मे◌ेसेज आल्यावर पंडित खूपच हैराण झाला. त्याचा नियमित टाईमटेबल बिघडल्याचं घरच्यांच्या लक्षात आलं होतं. त्यामुळे त्यांच्या

प्रश्नांना वेगवेगळी उत्तरं देऊन तो आधीच वैतागला होता. आता सायनाला हे सांगितल्यावर त्या पोरीची काय अवस्था होईल, हे तो समजू शकत होता. "तुम्हीच हॉटेलला फोन करून मॅडमला हे सांगा." असा मेसेज त्याने सरांना टाकला पण "आय ॲम बिझी इन हॉस्पिटल." एवढचं ते म्हणाले.

सर आज येणार नाहीत, हे सायनाला कसं सांगावं हा मोठाच प्रश्न आता त्याच्यासमोर होता. तिला हे सांगितल्यावर ती किती व्यथित होईल, किती घाबरेल, याची त्याला कल्पना होती. त्या गरीब बिचाऱ्या जगाचं ज्ञान नसलेल्या अननुभवी, कोवळ्या पोरीला असं हॉटेलमध्ये सोडून सरांनी निघून जाणं; जरी त्यांचा मुलगा गंभीर आजारी होता, तरीही त्याला हे आवडलंच नाही. आपला या प्रकरणाशी अर्थाअर्थी काहीही संबंध नसताना आपण उगाचंच यात गुंततो आहोत, याचाही त्याला वैताग आला होता. काय करावं? कसं सांगावं? तिचा केविलवाणा चेहरा त्याला अस्वस्थ करत होता. कार्यालयातून सायंकाळी सहा वाजता निघून तो हॉटेलवर पोचला. तिच्या रूमच्या दारावरची बटन दाबली, तिनं त्वरितच दार उघडलं.

"पंडित, साबचं विमान किती पर्यंत येईल?"

त्याने तिच्याकडे पाहिलं. सर येणार म्हणून उजळलेल्या तिच्या चेहऱ्याकडे बघून ते येणार नाहीत हे सांगूच नये, असंही त्याला वाटलं. पण ते आपण किती वेळ टाळू शकू? त्यापेक्षा आताच सांगावं, असा विचार करून त्याने तिला लगेच सांगितलं,

"सायना, गुड्डू खूप सिरियस आहे. सर आज येणार नाहीत. उद्या येतील की काय हेही त्यांनी आज काहीच सांगितलं नाही. मला वाटतं, गुड्डूचं जरा जास्तच असावं. त्यामुळेच सर काहीच सांगू शकत नाही."

a

“अब मेरा क्या होगा? मै क्या करू?”

“अगं, येतील ना सर एक-दोन दिवसांत. सर येईपर्यंत तू इथेच राहायचं. तुला जे हवं ते खायचं प्यायचं, फोनवरूनच आर्डर द्यायची. पाहिजे तेवढा वेळ टीव्ही बघायचा, आणि झोपायचं. मी तुला उद्या येताना वाचायला काही पुस्तकं आणून देईल.”

“मला नकोत ती पुस्तकं नि फुस्तकं. मी इथे राहत नाही. मी आता इथून जाते. मला भीती वाटते.”

“कुठे जाणार तू? तुझ्या घरी सोडू?”

“माझ्या घरी? माझी अम्मा मला किती रागावेल.”

“मग कुठे?”

“कुठेही. पण इथे मला भीती वाटते.”

“सायना, इथून बाहेर पडण्याचा वेडेपणा करू नकोस. सर एक-दोन दिवसांत येतीलच. त्यांना समजून घे. ते काही तुला फसवून गेलेले नाहीत. ते खूप चांगले आहेत. मजबुरी म्हणून ते तुला इथे ठेवून गेले. मला यातलं काहीच माहीत नाही. पण मोठ्या विश्वासानं सर तुझी जबाबदारी माझ्यावर टाकून गेले. तुला या बंद खोलीत जर भीती वाटते, तर बाहेर नाही वाटणार? आणि जाणार कुठे? राहणार कुठे? खाणार काय? मुख्य म्हणजे रात्रीची झोपशील कुठे?”

पंडितने तिला वास्तविकतेचं भान आणून दिल्यावर ती गप्पच बसली. पण जरा वेळानं खूप रडायला लागली. तिच्या मन:स्थितीची कल्पना येऊन त्याला तिच्याबद्दल खूप कणव येत होती. पण तो काहीच करू शकत नव्हता. जरा वेळ तिच्या जवळ थांबून तो निघून गेला.

a

चार दिवस झालेत, तरी साब आले नाहीत, हे पाहून आता पंडितही खूप घाबरला. त्याला नाना शंकाकुशंकांनी घेरलं. हॉटेलचा मालकही चावलाची चौकशी त्याच्याकडेच करायला लागला. त्याने त्याला जशी माहिती होती, तशी खरी माहिती मॅनेजरला दिली. चार दिवस मुक्कामाच्या मानाने चावलाने अॅडव्हॉन्स कमी जमा केलेला होता, त्यामुळे आता मॅनेजरने त्या मुलीला तिथे थांबवायला साफ नकार दिला होता. उद्या बारा वाजताच्या चेक आऊट टाईममध्ये रूम खाली करून हवी म्हणून स्पष्टपणे त्याने पंडितला सांगितले. ही भानगडीची केस आहे, हे तर त्याने सुरुवातीलाच हेरले होते. पंडितवर तर आभाळच कोसळले. सरांनी मोबाईल उचलणंही बंद केलंय, याचा अर्थ ते पोराच्या तब्येतीत फारच व्यस्त दिसत आहेत, असा अर्थ याने काढला. पण आता पुढे काय? या विचाराने तो रात्रभर हैराण झाला. हॉटेलचे बिल पे करण्याचा त्याच्यासमोर प्रश्न नव्हता. सरांनी तीन दिवसांपूर्वी त्याचा अकाऊंट नंबर विचारला होता. याचा अर्थ सर आपल्या खात्यात पैसे टाकतील यावर त्याचा विश्वास होता. म्हणूनच त्याने मॅनेजरला तिला तिथेच राहू देण्याबद्दल आग्रह करण्याचा प्रयत्नही केला. पण मॅनेजर बधला नाही. रात्रभर विचार करून तो शिणला. पण त्याला मार्ग सापडत नव्हता. त्याने परत एकदा सकाळीसकाळी सरांना मोबाईल केला. तो त्यांनी कट केला. आता मात्र त्याला सरांची चीड यायला लागली. समजतात काय ते स्वत:ला? स्वत: काहीतरी लफडं करायचं आणि ते अर्थाअर्थी माझा काही संबंध नसताना माझ्या गळयात टाकायचं. माझे बॉस म्हणून त्यांनी बोलवल्या बोलवल्या मी गेलो तर त्यांनी माझ्याच गळयात ही धोंड अडकवली. व्हॉट नॉनसेंस? खड्ड्यात गेली ती नोकरी. काय होईल ते पुढलं पुढे. आता आपण अजिबात त्या हॉटेलकडे फिरकायचं नाही. गेली उडत ती सायना. मूर्ख पोरगी. बिन बुडाच्या आश्वासनांवर बसली विश्वास ठेवून. भर आता आपल्या

a

पापांची फळं. मीच कशाला तिची काळजी करत बसू. संबंधच काय माझा तिच्याशी?

पंडितने आपल्या मनाला बजावलं. पेपर वाचून होताच, मस्तपैकी आंघोळ करून तो ऑफीसला जाण्याच्या तयारीला लागला. जेवण करून गाडीची चाबी आणि मोबाईल हातात घेतला, मोबाईलवर मेसेज आल्याची खूण होती. बघतो तर सरांचा मेसेज ‘‘पंडित, तुला मी फार त्रास देतोय, मला कळतंय. पण माझा मुलगा इथे मृत्यूशी संघर्ष करत असताना मला इथून तिकडे येणं शक्य नाही. माझी जबाबदारी मी तुझ्यावर टाकली आहे. पण प्लीज तू मी येईपर्यंत सायनाची काळजी घे. सायना माझ्या आयुष्यातला एक महत्त्वाचा भाग आहे. तिला मला वाऱ्यावर सोडायचं नाहीये. मी कालच तुझ्या खात्यामध्ये पैसे जमा केलेत. माझ्या केबीनच्या ड्रॉवरमध्ये माझं एक्सीस बँकेचं क्रेडीट कार्ड आहे, त्याचा पिन नंबर पाकिटाच्या मागे आहे. परत लागले तर त्यातले पैसे तू काढू शकशील. ते कार्ड मी येईपर्यंत तुझ्याजवळ ठेव. तुझ्यासाठी केबीन उघडून द्यायला मी चपराशाला सांगतो. मी तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणावरही याबाबत विश्वास ठेवू शकत नाही. प्लीज, टेक केअर ऑफ माय सायना.’’

एवढा लांबलचक मेसेज वाचल्यावर तर तो मटकन सोफ्यातच बसला. अरे देवा काय करू? सर माझा पिच्छा का सोडत नाही. मी कसला त्यांचा विश्वासू माणूस? ‘सायना’ , ‘सायना’ , ‘सायना’ . या सायनाने माझं जिणं हराम केलंय. शट. तो वैतागूनच तिथून उठला. गाडी काढली. परत एकदा मॅनेजरला कनव्हिन्स करण्यासाठी हॉटेलात पोचला. यावेळी मात्र ड्युटीवर दुसराच मॅनेजर होता. त्याने त्याच्याशी बोलणं सुरू केलं. या रूमला बारा वाजता खाली करायला सांगितलंय हे नव्या मॅनेजरलाही माहीत होतं. पण पंडितने त्यालाही जो काही प्रॉब्लेम होता तो सरळसरळ सांगितला. ‘मी तिला इथून बाहेर कुठेच नेऊ शकत नाही’

हेही सांगितलं. पंडितचा साधासरळ, निष्पाप स्वभाव चलाख मॅनेजरने ओळखला. आधी मॅनेजरने शिस्त, नीतीवर भरपूर व्याख्यान सोडलं. नंतर तुझ्या साहेबांचा त्रास तुला कशाला? तुझ्यासारख्या पापभिरू माणसाला अशा गोष्टीत गोवण्यात तुझ्या सरांनी किती चूक केलीय, याचे तुझ्या आयुष्यावरच काय पडसाद पडू शकतात, वगैरे बोलताबोलता "तुझ्यासाठी म्हणून मी आमच्या मॅनेजरशी बोलेन. पण एक करूया, आपण तिला डिलक्समधून हलवून दुसऱ्या सिंगल बेडरूममध्ये शिफ्ट करू या, सर येईपर्यंत उगाच एवढं मोठं भाडं कशाला भरायचं?" पंडितला ते एकदम पटलं. त्याने आधीचं सगळं बिल पे केलं. दुसऱ्या रूमसाठी रजिस्टरमध्ये एन्ट्री केली. त्याच्या सरांच्याच नावाने ती रूम बुक झाली. सायनाला नीट समजावून त्याने स्वत: तिला शिफ्ट केलं. इथेही फोन आणि मुख्य म्हणजे टीव्ही बघून सायना खुशच होती. कारण सध्या दिवसभराचा टाईमपास केवळ टीव्ही वरच्या मालिका. दुसरा कोणताच उद्योग सायनाला तिथे नव्हता. साबनी एवढे छानछान कपडे तिला घेऊन दिले होते. पण साबच नाही तर ते घालून जायचं कुठे? आणि बाहेर कुठेही जायचं नाही, हा साबचा तिला हुकूम होता. शिवाय घरी कुणालाही न सांगता ती आल्यामुळे तिलाच आता खोलीबाहेर पडण्याची हिंमत नव्हती. अम्माच्या प्रश्नांना उत्तरं देणं सोपं नव्हतं. एकीकडे अम्मा आपली किती काळजी करत असेल, आपण तिच्याजवळ नाही म्हणून तिची काय परिस्थिती झाली असेल, यानेही ती अस्वस्थ होत होती. तरीही आता आपण अम्माला कसं तोंड दाखवावं याचाच ती विचार करायची, आणि उत्तर सापडत नाही म्हणून टीव्ही बघत बसायची. या खोलीत टीव्ही बघितल्यावर खोली बदलल्याचं कोणतच वैषम्य तिला राहिलं नाही. पंडितने तिला काही सूचना दिल्या. सरांचं येणं आणखी पुढे गेल्याचं सांगितलं आणि तो ऑफीसला निघून गेला.

a

रात्री साधारण दहा-सव्वा दहाच्या सुमारास दारावरची बेल वाजली. आज एवढ्या उशिरा पंडित का आला? कदाचित मित्राचं लग्न आटोपून जाताजाता आला असावा कारण काल तसं तो बोलला होता, असा मनाशीच विचार करत ती उठली आणि तिनं पटकन दार उघडलं. दारात नवा मॅनेजर.

“काय मॅडम, रूम कशी आहे?”

“छान आहे.” नवख्या माणसाला अचानक दारात बघून ती बावरलीच. आणि लगेच दार लोटायला लागली. पण त्याने दार लोटू दिलं नाही. तो पटकन आत येत म्हणाला. “अगं मला काय घाबरतेस. तू मला माझ्या मुलीसारखी. तुझा प्रॉब्लेम मला पंडितने सांगितला. पण तू काळजी करू नकोस. साहेब येईपर्यंत तुझी मी जातीनं काळजी घेईल. तू नवखी आहेस माहीत आहे मला. नो प्रॉब्लेम. मी आहे तोवर तुला काळजीचं कारण नाही. चल झोप आता. काही लागलं तर मला फोन कर. सध्या मीच ड्यूटीवर आहे. झोप सुखाने. दार फक्त लोटलं तरी चालतं. लॉक होऊनच जातं. वरची कडी लावशील आणि एखादवेळी खोलीतच चोरबीर आला तर तुला कडी काढून बाहेर ओरडत येईपर्यंत वेळ लागायचा, तेवढ्या वेळात तो काय करेल न् काय नाही, त्यापेक्षा दार लोटलं की ते लॉकच होतं. ॲटोमॅटीक आहे ना.”

“इथे चोर येतात?”

“येतातच असं नाही गं, पण एखादवेळी येऊही शकतात. मागच्या महिन्यात आला होता. पण घाबरू नको. आम्ही सारे असतोच आजूबाजूला. तसा तुला धोका नाही. तुला मी लॉबीतली शेवटची आणि चांगली साईडची रूम दिली. बाजूलाच आमची क्लॉक रूम आहे. मी असतोच इथे. काही लागलं तर पटकन बाहेर येऊन माझी मदत मागायची. चल झोप येतो मी.”

a

तो गेला पण सायनाची झोप घेऊनच गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी पंडितचा फोन आला की तो ऑफीसच्च्या कामासाठी चार दिवस बाहेर जात आहे. आल्यावर भेटतो म्हणून. साहेब पोराच्या आजारपणात व्यग्र आणि पंडितही नाही. ती मनातून पार ढासळून गेली. घर सोडण्याचा तिला वारंवार पश्चात्ताप होत होता. कधीकधी तर इथून पटकन अम्माच्या घरी निघून जावं, असंही मनात येत होतं. पण परत आईचा मार आठवत होता. या चार दिवसांचा हिशेब कसा द्यायचा हा प्रश्न तिला घरी जाऊ देत नव्हता. एक एक मिनिट तिला युगासारखा वाटत होता. टी.व्ही. चा पण तिला आता कंटाळा यायला लागला. नवा मॅनेजर अधूनमधून तिला फोन करायचा. विचारपूस करायचा, पंडित जाताना त्याला सांगून गेला होता. एखादवेळी खोलीत येऊन तो भेटूनही जायचा. तिला बरं वाटायचं. सध्याच्या घटकेत तोच तिचा आधार झाला होता. हे आता त्यानंही हेरलं. एकदिवस रात्री गाढ झोपेत असलेल्या सायनाच्या खोलीत मॅनेजरने हॉटेलकडे असलेल्या दुसऱ्या चाबीने दरवाजा उघडून प्रवेश केला. सुरू असलेला लाईट बंद केला, आणि सायनाच्या अंथरुणात घुसला. सायनाच्या केसांतून त्याने हात फिरवला. त्याने तिला जवळ घेतलं. त्याच्या स्पर्शांनी तिला जाग आली आणि "साब आप आये?" असं अभावितपणे तिच्या तोंडून निघालं. त्यानेही 'हं' म्हणून हुंकार भरला. ती त्याला बिलगली, अंधारात क्षणदोन क्षण ती त्याच्या स्पर्शात भान विसरली पण लगेच काहीतरी गडबड आहे, हे तिच्या लक्षात आलं. पण मांजरानं जसं उंदराला क्षणात गिळंकृत करावं, आपल्या पंजात गच्च पकडून आधी त्याला आपलं भक्ष्य बनवावं, तसं मॅनेजरने सायनाला आपलं भक्ष्य बनवलं होतं. त्याच्या बळकट आणि हवसी पंजातून नवख्या सायनाला सुटणं शक्य झालं नाही. खरं तर सायनाने जेव्हा ही कहाणी वैदेहीला सांगितली तेव्हा वैदेहीने तिला बरेच सूक्ष्म प्रश्न विचारले, तेव्हा दहा दिवसांपासून ती ज्या मानसिक

a

अवस्थेतून गेली होती, त्या अवस्थेत मॅनेजरचा तो स्पर्शही तिला खूप सुखावून गेला होता. आणि तिने नंतर त्याला फारसा विरोधही केला नव्हता. पण त्याच्याजवळ चारच दिवस होते. चार दिवसांनी पंडित आला की कदाचित त्याचं बिंग फुटू शकलं असतं. त्याच रात्री तो तिथला फोन डिस्कनेक्ट करायला विसरला नव्हता. ‘साब’ ची फक्त वाट बघूनबघून ती कंटाळली होती. मॅनेजरच्या रूपात तिला एक नवाच आधार मिळाला. हा फसवा आहे, हे मात्र तिच्या लक्षात आलं नव्हतं. त्याची तर सायनामुळे चंगळ चालली होती. गोड-गोड बोलून तो तिला भुलवत होता. मात्र सायनाची रिस्क फार दिवस तो घेऊ शकत नव्हता. आणि सायनासारखी फुकटात गवसलेली तरुणी तो गमवायलाही तयार नव्हता. त्याने लगेच गंगाजमुनातल्या दादासोबत संधान साधलं, आंटीसोबत चर्चा केली आणि “मला हवं तेव्हा सायनाशी मी संबंध ठेवणार, पहिला अधिकार माझा” या व्यवहारात तिला विकलं. अठरा वर्षांची चिकनी पोरगी, जिचा नारळच मुळी नुकताच फुटलाय म्हणताच आंटीच्याच तोंडाला पाणी सुटलं. असा माल आपल्याला किती मालामाल करतो, याचे अनुभव तिच्याजवळ भरपूर होते. ‘दोन दिवसांत सायनाला इकडे सोडतो’ असं आंटीला सांगून तो लगोलग सायनाजवळ आला. आज त्याची दिवसपाळी असल्यामुळे तसा तो गडबडीत होता. ड्यूटी संपल्यावर रात्री सायनाजवळ थांबून तिला पटवावं या विचारात तो होता. पण सायनाजवळ जाताच त्याला मोह आवरला नाही. त्याने सायनाला सांगितलं, “तुझ्या साबचा फोन आला होता. त्यांचा पोरगा खूप जास्त सिरियस आहे त्यामुळे आता ते लवकर इकडे येऊ शकणार नाही. पंडितही तुझी जबाबदारी जास्त दिवस घ्यायला तयार नाही त्यामुळे तुझी जबाबदारी आता माझीच झाली आहे. पण रोजचं बाराशे रु. भाडं या खोलीचं मी नाही भरू शकत. त्यापेक्षा मी तुझी व्यवस्था दुसरीकडे केली आहे.”

a

“दुसरीकडे म्हणजे कुठे?”

“जिथे तुझ्यासारख्याच घरून पळून आलेल्या खूप मुली राहतात.”

“कुठे आहे ते”?

“इथून जवळच आहे.”

“कोणकोण असेल तिथे?”

“खूप मुली, बाया असतील. तुम्हा सगळ्यांवर लक्ष ठेवायला एक आंटी आणि तिचा नवरा असेल. चोर लोक येऊ नये म्हणून दोन-तीन दादा लोक, तुम्हाला खायला-प्यायला आणून देण्यासाठी दोन लहान पोरं आणि तुम्हा सगळ्या बायांना भेटायला येणारे माझ्यासारखे अनेक माणसं. मी जसा तुला भेटायला येईल, तसं दुसऱ्या बायकांना भेटायला येणारेही असतील. दुसऱ्या बायकांना भेटायला येणारे लोक कधीकधी तुलाही भेटत जातील.”

“मला? मला कशाला? मी नाही भेटणार कुणालाच, मला फक्त तुम्ही भेटायला यायचं. आणि साबनं. साबची मला आठवण येते.”

“त्या साबला विसर आता. त्याने तुला फसवलं. तो नाही येणार आता.

मी येईनंच. पण इतरांनाही भेटायचं, चांगलं वाटेल तुला. तुझा वेळ चांगला जाईल. एखाद्यावेळी माझं येणं नाही जमलं तर तुला बोअर नाही का होणार? शिवाय ते भेटायला आलेत की तुला जाताना पैसेही देत जातील.”

“पैसे? पैसे कशाला?”

“पद्धत आहे तिथे तशी. आपण कुणाकडे पाहुणे म्हणून गेलो की वापस जाताना त्या घरातल्या लहान मुलांना पैसे नाही का देत?”

“पण मी काय लहान आहे? मला तर तुम्ही राणी म्हणता.”

“आहेसच तू माझी राणी. पण अशा खूप राण्या असतात तिथे आणि माझ्यासारखे खूप राजे येतात तिथे. त्या राजांना राणीने खुश केलं की ते राजे राण्यांना पैसे देतात. त्या पैशातूनच मग त्यांनी तिथे राहायचं, खायचं, प्यायचं, फिरायचं. आणि आंटीला तिथे राहण्याचं भाडंही द्यायचं.”

“एवढे पैसे देतात ते?”

“होय. जे राजे आपल्याकडे येतील, त्यांना मात्र छान खुश करायचं.”

“पण खुश कसं करायचं?”

“ओहो! पक्की वेडाबाई आहेस तू. रात्री सांगतो. आता मी तुझ्या नाही हॉटेलच्या ड्युटीवर आहे.”

जाताजाता त्यानं बोटांच्या चिमटीत तिचं बुटकं नाक ओढलं आणि ओठाचं एक दीर्घ चुंबन घेऊन तो दाराजवळ आला. दाराच्या पिपहोलमधून कॅरिडॉरमधला अंदाज घेतला. कुणी वेटर तर बाहेर नाही ना, याची खात्री करून घेतली. नंतर लगेच दार उघडून तो तिथून बाहेर पडला.

त्याचं असं नाक ओढणं, आपल्याशी त्याचं लाडेलाडे वागणं हळूहळू तिला चांगलंही वाटायला लागलं होतं.

मॅनेजरनं सांगितल्याप्रमाणे सायना सगळी तयारी करून त्याची वाट बघत होती. तिला साबची खूप आठवण येत होती. आईची पण आठवण येत होती. इथून-तिथे-तिथून-तिथे-तिला अधांतरी वाटायला लागलं, खरं तर ती वैतागली होती. स्वत:वरच. आपण घर सोडलंच नसतं तर.... हा विचार हजारदा तिच्या मनात येत होता. पिक्चर बघायच्या निमित्ताने आपल्याला साबने बोलावून घेतलं आणि एका

a

दिवसात स्वत:च निघून गेले. आपल्याला साबने फसवलंच, एवढे दिवस गुड्डू कसा आजारी राहील. तो तर किती चांगला होता. मस्त तब्येत होती त्याची. कदाचित चावला आंटीला हे माहीत झाल्यामुळे त्यांनीच साबला इकडे येऊ दिलं नसेल. नाही. पण आंटीला माहितीच कसं होणार? साबलाच यायचं नसेल. साबच झुटे निघाले. साबने मला पिक्चरच्या निमित्ताने माझ्या घरापासून दूर आणलं, मला कपडे घेतले आणि एका रात्रीत मला सोडून निघून गेले. तो पंडितही तसलाच. त्याच्या भरवशावर जर मला साबने सोडलं होतं, तर तो का निघून गेला? साबनेच सांगितलं असेल त्याला, आता तू सायनाकडे जायचं नाही म्हणून. गंदे आहेत साब, झुटे कही के. आता मी त्यांच्यासोबत कधीच बोलणार नाही. कधीच नाही. माझ्या आईपासून तोडलं त्यांनी मला. 'अम्मा...अम्मा' मनातल्यामनात सायना आईला सादवत होती. गाईपासून बिछडलेल्या वासरासारखी अवस्था झाली होती. पण तिला तर आपली आई कुठे आहे, हे माहीत असूनही ती आता तिथे जाऊ शकत नव्हती. आता तिला वाटत होतं की पहिल्याच दिवशी साब गेल्यागेल्याच आपण आपल्या घरी गेलो असतो तर .... एकच दिवस आपण घरी नव्हतो. सांगितलं असतं असंच काहीतरी, घर भुललो म्हटलं असतं.....मारलं असतं तर मारलं असतं. काय मोठं बिघडलं असतं. लहानपणी तर कितीदा मारलं आहे आपल्याला अम्माने. तेव्हा त्या मारण्याची अशी भीती वाटत नव्हती, जशी आता वाटते. आता का आपल्याला इतकी भीती वाटते? नवा मॅनेजर म्हणतो तसं पुन्हा आपण त्याच्यासोबत कुठेतरी जातो आहे. नवं ठिकाण, नवे लोक. ते कसे असतील, कोण असतील काय माहीत, आपल्याशी चांगले वागले नाही तर....हजारो प्रश्न तिच्या मनाला मधमाशांसारखे डंख मारत होते. नव्या मॅनेजरने पण आपल्याला भेटायला येणं बंद केलं तर.. मग

आपण कसं राहायचं? ते लोक भेटून जाताना पैसे देतात म्हणजे कोण लोक असतील ते?

सायनाच्या मनात असंख्य विचार येत होते. पण कोणत्याच विचारावर ती स्थिर होत नव्हती. आपण नेमकं काय करायला हवं, याचं उत्तर तिला सापडत नव्हतं. आईकडे जावं असंही तिला वाटत होतं, आणि तिची भीतीपण वाढत होती. विचारांच्या जंजाळात फसली असताना मॅनेजर आला. तिची झालेली पूर्ण तयारी बघून तो खुश झाला.

“चला, सायनाबाई. आता आपण निघूया.”

“हो. माझी तयारी झाली. पण कुठे जाणार आहोत आपण?”

रात्री उशिरा मॅनेजर आला. सगळीकडे सामसूम झालं होतं. गिऱ्हाइकांची वर्दळ पण कमी झाली होती. बाराच्या नंतर वेटरपण रिलॅक्स झाले होते. हॉटेलचं किचनही आटोपतं घेतल्या गेलं होतं. किचन बंद झालं की आपोआपच हॉ ॅटेलला सवड मिळते. गिऱ्हाइकांच्या किरकोळ मागण्या सुरू असतात. कुणाला पाणी हवं असतं, कुणी शौकीन पान नाहीतर संपलेली सिगारेट मागवतो, कुणाची तरी व्हिजिटर चोरून येणार असते, तिला काळजीपूर्वक त्याच्या रूमपर्यंत पोचवायला तो काऊंटरवरच्या रिसेप्शनिस्टला कनव्हिन्स करण्याचा प्रयत्न करीत असतो. एकंदरीत हॉटेल सामसूम असतं. कोणतीही चोरी फारशी कुणाच्या नजरेला पडण्यासारखी नसते. म्हणूनच सायनाला बाहेर काढण्यासाठी ही वेळ नव्या मॅनेजरने निश्चित केली. त्याच्या विश्वासातल्या वेटरला ॲटो आणायला सांगितला. तो स्वत: हॉटेलच्या समोरच्या चौकात थांबणार होता. तिथवर वेटरच तिला सोबत करणार होता. याच्या बदल्यात वेटरचं लवकरच तो प्रमोशन करून देणार होता. मॅनेजर सायनाच्या खोलीत गेला. अलीकडे त्याच्याजवळ त्याने डुप्लीकेट चाबी ठेवल्यामुळे बेल वाजवून

a

सायनाची दार उघडण्याची भानगडच ठेवली नव्हती. तो सायनाकडे गेला तेव्हा याने आधीच सांगून ठेवलेलं असल्याप्रमाणे सायना पूर्ण तयारीत होती. तिच्या दोन बॅगा भरून तयार होत्या. साबने त्यादिवशी जी काय खरेदी केली होती, आणि नंतर तिच्या आवश्यकतेप्रमाणे पंडितने तिला जे काय आणून दिलं होतं, ते सारं तिनं आपल्या बॅगेत भरलं होतं. नवीन घरात जाण्याबद्दल तिच्या मनात उत्सुकता जशी होती, तशीच भीतीपण होती. खूप प्रश्न तिच्या मनात होते, पण मॅनेजर म्हणाला होता, तुला वाटेत मी सारं सांगतो. आताही त्यानं तिला आवश्यक त्या सूचना दिल्या आणि तो खोलीतून गपचूप बाहेर पडला. तो बाहेर पडल्यावर लगोलगच एक वेटर तिच्या खोलीत आला. त्याने बॅगा उचलल्या. त्याच्या मागोमाग तीपण निघाली. एवढी सुंदर, सगळया सोयींनी सुसज्ज अशी खोली सोडताना तिला थोडसं वाईट वाटलंच, पण तिथे फार न घुटमळता ती लगेच तिथून बाहेर पडली. लिफ्ट वर येताच लिफ्टमध्ये वेटरच्या मागोमाग ती पण गेली, खाली उतरल्यावर कुठेही न बघता तडक दाराच्या बाहेर पडली. दारासमोर आधीच एक ॲटोरिक्षा येऊन उभी होती. ती त्यात बसली. समोरच्या वळणावरून स्वत: मॅनेजरही त्याच ॲटोरिक्षात बसला.

गंगाजमुनाजवळ ॲटोरिक्षा येऊन थांबली. मॅनेजरने त्याचे पैसे चुकते केले आणि तिला उतरवून तो थेट पहिलवानच्या घरी पोचला. त्या गल्लीबोळातून जाणारा रस्ता, घाणेरडे हावभाव करणाऱ्या त्या पोरी, चिकार दारू पिऊन झोकांड्या देत जाणारी माणसं, मधूनच ओरडणारी कुत्री, कुजला-घाणेरडा वास, रस्त्यावर पडलेल्या दारूच्या रिकाम्या बाटल्या, भज्यांचे, मिरच्यांचे तुकडे, ते सारं विचित्र किळसवाणं वातावरण पाहून सायनाला तर आपल्याला ओकारीच येते की काय असं वाटत होतं. तिचा जीव मळमळायला लागला. मॅनेजरने आपल्याला इथे कुठे आणलं? हे कसलं घर? या मोहल्ल्यात आपण राहायचं? आपली झोपडपट्टीतर

यापेक्षा लाखपट स्वच्छ होती. तिला या वातावरणात भीतीच वाटायला लागली. आपण चुकून कुठेतरी येऊन फसलोय याची जाणीव तिला व्हायला लागली. चुकीच्या जागी आपण जातो आहोत, हे कळायला आता तिला वेळ लागला नाही. आपण जोरात काहीतरी ओरडावं किंवा इथून पळून तरी जावं असा विचार तिच्या मनात आला आणि त्याचक्षणी मॅनेजरने पहिलवानला आवाज दिल्याचं तिनं ऐकलं.

"पहिलवान, आम्ही आलो. लंगड्याला सांगून आमच्यासाठी एक खोली दे रे."

"आओ साब पहले बैठो. एखाद पव्वा मारो."

"नाही. मला आज जास्त वेळ थांबता येणार नाही. ही सायना. हिची खोली पाहतो आणि जातो. उद्या येईन."

"सायना, बडा प्यारा नाम है. लंगड्या, इकडे ये. या नव्या पोरीचं सामान ठेव तिकडं खुशबूच्या खोलीशेजारी."

"आंटी स्वतंत्र खोली पाहिजे. कुणी पार्टनर नको तिच्यासोबत. मी केव्हाही येणार."

"मॅनेजर, मी इथे राहणार नाही. साब रागावतील मला. नाही. मै नही रहूंगी यहा. मुझे नही रहना." ती ओरडली. तिचा भयग्रस्त चेहरा काळवंडला होता.

"सायना, असं वेड्यासारखं करू नकोस. तुझा साब आता येणारच नाही. आता मी जिथे ठेवतो, तिथेच तू राहायचं, आणि मी जे म्हणतो, तेच ऐकायचं."

"नाही - नाही. मला नाही राहायचं. साब येतील. येतीलच साब. पंडित येईल." ती बिथरल्यासारखी इकडेतिकडे बघायला लागली.

a

“कुणीच येणार नाही. भेकड आहे साला तो पंडित. तो कसला येतो. तू गप राहा. आंटी जल्दी करो. लवकर खोली द्या.”

“लंगड्या, जा हिचं सामान ने तिकडे वडाजवळ. हिमटीच्या खोलीत टाक. ते बरी एका बाजूची खोली आहे.”

“हिमटी-बिमटी नको. स्वतंत्र खोली दे म्हणतोय ना?”

“तिचं नाव फक्त हिमटीची खोली हाय. मेली ते पोट्टी गळफास लावून.” आंटीने जे सांगितलं ते ऐकून सायना दचकलीच. तिला खूप भीती वाटली.

“नाही मॅनेजर. मला नाही राहायचं.” बोलताबोलताच सायनाने तिथून पळ काढला. ती पळायलाच लागली. पण तिचा एकंदरीत बर्ताव लक्षात येऊन लंगड्या तिच्यावर लक्षच ठेवून होता. ती पळायला लागताच लंगड्या पटकन तिच्या मागे धावला आणि एका झटक्यात आपल्या पंजात त्याने तिला अक्षरश: पकडलंच. सायना रडायला लागली. तिचं रडणं पाहून मॅनेजर फार घाबरला. हा काय तमाशा? कुणी ओळखीचं दिसलं तर नाहक आपलीच बदनामी. एवढ्या अर्ध्या रात्री आपण इथे काय करतोय म्हणून काय सांगणार कुणाला. त्याने सरळ ती पूर्ण जबाबदारी आंटी आणि पहेलवानवर टाकली आणि तो लगेच तिथून पसार झाला. रात्रीचं गपचूप येऊन एखाद्या खटियात घुसणं वेगळं, पण हा तमाशा त्याला नको होता.

सायना खूप वेळ रडत राहिली. पण आता एवढ्या रात्रीचं आपण इथून कुठे जाणार हा यक्षप्रश्न तिच्यासमोर होताच. सर्वांना खूप शिव्या देत, रडतभेकत ती लंगड्यासोबत हिमटीच्या खोलीत गेली. लहानशी खोली, जेमतेम एक खाट मावेल एवढी, बाजूला स्टो आणि दोन-तीन जर्मनची भांडी पडलेली. भिंतीवर गणपती, शंकरापासून तर लक्ष्मीपर्यंत अनेक देवांचे फोटो लागलेले. खोलीभर कुबट वास पसरला होता. मिचमिच्या पिवळ्या लाईटमध्ये त्या खोलीतलं दारिद्र्य तर तिच्या

a

नजरेत जास्तच खुपलं. पलंगावरची जीर्ण झालेली घाणेरडी गादी आणि त्यावरची कुजलेली, शंभर लाल-पांढरे डाग असलेली, मेणचटलेली घाणेरडी चादर पाहून तिला परत एकदा ओकारी आली. खोलीवरच्या भिंतीवर नेमका कोणता रंग कधीकाळी दिला असेल हे शोधायला रंगतज्ज्ञ आला असता तरी त्याला कळलं नसतं. ठिकठिकाणची मातीची सारवणाची गादीही पडलेली होती. खोलीतच बाजूला पडदा लावून न्हाणी होती. सुंदरसुंदर टॉयलेट-बाथरूमचा वापर करायची सवय झालेली सायना या अठरा विश्व दारिद्र्य असलेल्या खोलीला पाहून परत एकदा खूप रडायला लागली. आणि "मै नही रहूंगी यहां, मै नही रहूंगी यहां" आक्रोशत मागे सरकली. पण लंगड्या तिला म्हणाला,

"देख बाई, तू कुठून आली, कशी आली, तुले आननाऱ्या त्या मानसाले तू कशी सापडली? मले काहीच माहीत नाय. पर एक बार तू इथं आलीस; तू आता इथून तुले बाहेर त काही जाता येत नाही. इथला सारा ताल पाहून तुले अजबगजब वाटून राहिलं, याचा अर्थ तू बऱ्यापैकी घरातली आसशीन. मघा तू म्हने तसा उद्या तुहा 'साब' आलाच आनं त्यानं आंटीले बऱ्यापैकी पैसा देल्लाच तं तू कदाचित इथून जाशीनच. पन मले त ते कठीनच वाटते. पाय तुहं नशीब."

"पैसा? पैसा कशासाठी?"

"अरे, इथं बाई विकल्या जाते. तुले इथं विकत घेतलं आंटीनं."

"मूर्ख आहात का तुम्ही. विकायला मी का भाजीपाला वाटला काय?"

"बह्याड हाय वो बाई तू, बह्याड. चाल जाऊ दे मले. झोप तू आता."

"झोपू? इथं? या घाणेरड्या चादरीवर?"

“मंग बसून राह. चाल मी जातो. पानी लागन तं बाहेरच्या नळावरून आनजो.”

लंगड्या गेला आणि तिला ब्रह्मांड आठवलं. “काय झालं हे? कुठून कुठे आलो आपण. साब... साब... तुम्ही तर मला फ्लॅटमध्ये ठेवणार होतात. मी इथं कुठं येऊन पडली. आई गं. मा...मा.... ये मैने क्या किया...” खूप वेळ ती दारात बसून रडत होती. सगळीकडे सामसूम झालं होतं. मध्येच एखाद्या खोलीतून खूप जोरात खिदळण्याचा किंवा जोरात बोलण्याचा आवाज येत होता. अगदी शेजारच्या खोलीतला. पलंगाचा धबधब आवाजही येत होता. रडू येण्याऐवजी तिला भीतीच वाटायला लागली. आंटी म्हणाली होती, हिमटीनं याच खोलीत गळफास लावला. न पाहिलेल्या हिमटीचं भूत सायनाला दिसायला लागलं, ती घाबरली. तिनं रस्त्यावर येऊन पाहिलं. इथून बाहेर पडण्याचा अंदाज घेतला. पण ट्यूबलाईटचा पांढरा प्रकाश त्या गल्लीबोळात एखाद्या अशुभासारखाच जाणवला तिला. खोलीतल्याखोलीत ती इकडेतिकडे नजर फिरवत राहिली, तोच तिच्या समोर काळी जाडजूड पाल धापदिशी पडली. आणि वळवळत बाजूच्या भिंतीकडे निघूनही गेली. तिच्या आजूबाजूला मोठमोठी झुरळं फिरत होती. खूप वेळ ती बसून राहिली. मध्येच तिला साबच्या आणि घराच्या आठवणींचा उमाळा यायचा. मग जरा वेळ ती रडून घ्यायची. बसल्याबसल्या कधी तिचा डोळा लागला तिला कळलंही नाही. मात्र तिला जाग आली तेव्हा कुणीतरी एक पुरुष आपल्या खांद्याला हलवतोय असं लक्षात आलं तिच्या. केवढ्यांदा दचकली ती.

“ए, क्या कर रहे हो? कौन हो तुम? लंगड्या-लंगड्या.” हे एकच नाव तिथलं सध्या तिला माहीत झालं होतं.

“ए, लंगड्या वंगड्या कोणी येणार नाही. कुणीच येणार नाही. गप्प राहा.”

a

“नाही नाही. माझ्यासोबत असं काही करू नका हो तुम्ही. मी तशी नाही आहे.”

“मला माहीत आहे. तुझा पहिलाच दिवस आहे म्हणे आजचा. मी नेहमी नाही येत इकडे. पण साली माझी बायको हात लावू देत नाही पंधरा-पंधरा दिवस. साला भांडण अलग चीज आहे गं. भांडावं ना माणसानं, पण भांडण झालं म्हणून हात लावू द्यायचा नाही? मला फार असह्य झालं, त्रास झाला तरच मी इकडे येतो. फार क्वचित, त्यावेळी आंटी मला चांगली मदत करते. मला घाणेरड्या मुली नको असतात, खरं तर या घाणीत झोपणंही मला आवडत नाही, पण इथली मुलगी मी बाहेर नाही नेऊ शकत. चांगल्या हॉटेलात कुणी आपल्याला पाहिलं तर... ही भीती कायम असते साली मला. पोरगी मोठी झाली ना माझी.” हे सारं तो तिला सांगत होता असं नाही. स्वत:शीच त्याचा हा संवाद चालू होता. कदाचित गंगाजमुनात यावं लागलं, यामुळे त्याच्यात आलेल्या कॉम्पलेक्समुळेही असू शकेल. “तू काळजी करू नकोस. मी काही तुला जास्त त्रास देणार नाही. तुझ्या कलाकलाने घेईन. नको असेल तर तसंही सांग. आपण गप्पाच माारूया.”

“भाऊ, मी अशी नाही हो. मला ही जागा कोणती आहे, हे पण माहीत नाही. मी काय करू? मला इथून बाहेर जायचं आहे.” ती बोलताबोलता रडायलाच लागली.

“बाहेर? घरी?”

“घरी? घरी नाही आता. माझी आई खूप मारेल मला. आता नऊ दिवसांनी मी घरी गेली तर.. साब पण रागावतील मला मी इथे कशी गेली म्हणून. भाऊ मी काय करू मलाच कळत नाही.”

“नाव काय तुझं?”

“सायना.”

“सायना, तुझी समस्या जरा वेगळीच वाटते. पण मी माझ्या घरच्या कटकटीला कंटाळून इथे आलो आहे. इथे मला कोणतीच कटकट नको आहे. मला तुझ्याकडून सुख हवंय. मात्र एक सांगतो, तू आता इथून बाहेर जाऊ शकणार नाहीस. हे लोक फार वाईट असतात. तुला जमेल तसं तू स्वत:ला इथेच सामावून घे. मी तुला त्रास देणार नाही. मला जेव्हा संभोगाची खूप आठवण येते ना, तेव्हा माझे पाय खूप दुखतात. तेवढे दाबून देतेस? आणि माझ्या केसांची मालीश कर. मला या दोन गोष्टी जरी आज मिळाल्या तरी खूप आहे. जमलं तर माझ्या अंगावरून प्रेमाने हात फिरव. मी पण तुझं डोकं चेपून देईन. रडून खूप दुखत असेल ना!

“भाऊ तुम्ही किती छान आहात हो.”

“हो काय. थँक्स. आधी या उदबत्त्या लाव. मी इथे येताना सोबतच आणल्यात. काय घाण वास हा. किमान उदबत्त्यांच्या सुवासाने थोडावेळ तरी हा घाणेरडा उग्र दर्प येणार नाही. आणि या पॉलिथीनमध्ये ही चादर पण आणलीय. ती टाकू इथे खालीच. त्या घाणेरड्या गादीवर तर मी बसूच शकत नाही.”

त्याने तिच्याशी बोलताबोलताच खाली चादर अंथरली आणि त्यावर अंग टेकलं.

सायनाने त्याचे पाय चेपले. त्याच्या डोक्याची मालीश केली. त्याने तिला जवळ घेतलं, तिच्या अंगावरून प्रेमाने हात फिरवला. आणि ती त्याच्या कुशीत त्याला बिलगून कधी शिरली तिला कळलंही नाही. गल्लीच्या तोंडावरच्या पिंपळाची सळसळ मात्र खूप वाढली होती...

वैदेहीने आज गौरीसोबत बोलायचं पक्क ठरवलंच होतं. पण दिवसभर कोणत्या ना कोणत्या कामाच्या गडबडीत राहिल्यामुळे ते राहूनच गेलं. आता मोबाईलवर 'गौरी कॉलिंग' बघताच तिला खूपच आनंद झाला.

"हाय गौरी, काय म्हणतेस, काय चाललंय? अगं, आज मीच तुला फोन करण्याच्या विचारात होते. बरं झालं, तुझाच फोन आलाय ते. बोल."

"अगं, आमचे प्राचार्य तुझी आठवण काढत होते. म्हणाले, 'मॅडम कॅम्प घेऊ म्हणाल्या पण परत आल्याच नाहीत.' "

"होय. ते राहिलंच. त्यासाठीच मी तुला फोन करणार होते. मागच्या महिन्यात एक दिवस जाऊन आले मी तिकडे. पण ती आंटी आणि तो पहिलवान आता मला तिथे एन्ट्री द्यायला तयारच नाहीत. साफ म्हणाले, 'इथे यायचं नाही.' एरवी त्यांच्या बोलण्याला कोण भीक घालतंय. पण तिथे कॅम्प तर त्यांच्या सहकार्याशिवाय नाही होऊ शकणार नं."

"वैदेही, आपण आणखी काही दिवस जाऊ देऊ या. आंटी आणि पहिलवान मुन्नीमुळे तुझ्यावर चिडले आहेत. पण हळूहळू त्यांचाही राग जाईल. मी प्राचार्यांना सांगते, काहीतरी कारण."

a

“होय. तसं तर करावंच लागेल आपल्याला. पण मला त्या पोरींची फार आठवण येते गं. ती सायना, नकोशी तर मला सारख्या साद घालीत राहतात.”

“वैदेही, कोण कुठे पळून जातंय तिथून. सायनाला आणायचंय ना तुला तिथून परत? आण नं, पण जरा वेळ तर जाऊ दे. बरं काय म्हणतायत मुन्नीबाई?”

“मस्त. तू बघशील आता तिला तर हीच का ती चार वर्षांपूर्वीची मुन्नी? असं वाटेल. आमूलाग्र बदललीय मुन्नी.”

“वैदेही, खरंच तुला अक्षरशः सॅल्यूट मारते गं मी. आयुष्यभरात तू आता कोणतंही दुसरं मोठं काम केलं नाहीस तरी तुझ्या या कामाचं मोल फार मोठं आहे. तू मुन्नीला त्या गटारातून बाहेर काढून फार मोठं काम केलं आहेस.”

“बरं बरं. झाली का तुझी आरती सुरू. चल मोबाईलवर दुसरा फोन येतोय. सुहासचा. त्याचा फोन लवकर अटेंड केला नाही तर ओरडतो आजकाल तो मला.”

“चला. म्हणजे आता त्यांनाही व्हॉईस प्राप्त झाला म्हणायचा.”

“होय. वाजवीपेक्षा थोडा जास्तच. ज्याचं त्याचं स्थान ज्याला त्याला वेळीच दिलेलं बरं असतं ना.”

“करेक्ट. देर आये दुरस्त आये. चल बाय. बोल आधी त्याच्याशी.”

“बाय.”

गौरीचा फोन बंद करून वैदेहीने सुहासच्या मिस कॉलला लगेच अटेंड केलं.

“काय हे, केव्हाचा फोन ट्राय करतोय. किती बोलत राहतेस गं तू कुणाकुणाशी.”

“ए, अर्धा मिनिटही तू वेटींगवर नाहीय. कळलं? लगेचच गौरीचा फोन ठेवलाय मी. बोल काय म्हणतोय?”

“बाहेर चल.”

“बाहेर? कुठे?”

“फिरायला.”

“आता हे काय नवंच?”

“नवं वगैरे काही नाही. काय गं, तुझं काही काम असलं की तू मला फोन करून पटकन बोलवणार. बोलवत नाहीसच तू. चक्क ऑर्डर करते, ऑर्डर. आणि मी तुझ्या वेळेत हजर नाही झालो तर केवढी आगपाखड असते तुझी. आणि मी तुला केव्हाही कुठेही बाहेर चल म्हणालो, की तुझी हजार कारणं समोर असतात.”

“मी कुठे हजार कारणं आता समोर केलीत? मी तर काही बोललेच नाही अद्याप.”

“पण मला माहिताहे ना, तू पुढे नाहीच म्हणणार आहेस ते.”

“नाही. असं मी म्हणालेच नाही.”

“म्हणजे आपण फिरायला बाहेर जाणार आहोत.”

“असंही मी म्हणाले नाही.”

“ओहो. काय हे वैदेही. वैदेही, तू नीट सांग. तू माझ्याबरोबर फिरायला येणार आहेस काय?” सुहास ओरडून म्हणाला. तो जाम वैतागला होता. आणि केव्हाची मनातल्या मनात हसणारी वैदेही आता सुहासचा चढलेला पारा ऐकून खो-खो हसायलाच लागली.

“अरे केवढा चिडतोस तू. पंचविशीतल्या तरुणासारखा. जरा वयाचं भान ठेवावं माणसानं.”

“कशाला? काम करताना ठेवतेस तू? तरुणांना लाजवेल असा उत्साह असतो तिथे तर.”

“बरं सांग कुठे जायचं?”

“लांब.....दूर.....दूर.”

“कितीवेळ?”

“रात्रभर.”

“गाढव आहेस काय?”

“होय.”

“सुहास. रात्रभर फिरायला हा काही सिनेमा नाही.”

“का? रात्रभर काम करू शकते? कामं असली की त्या तुझ्या कार्यकर्त्यांसोबत कशी रात्ररात्रभर फिरत असते. मग माझ्यासोबत का नाही?”

“वेडा आहेस काय रे? रात्रभर फिरायचे का दिवस राहिलेत माझे?”

“होय. आहेत दिवस. तू का माझ्याशी अशी वागतेस कळतच नाही यार मला. तुझ्या आयुष्यातलं नेमकं स्थान कोणतं? तेही कळत नाही मला. मी कोणतीही इच्छा व्यक्त केली की तुझा आपला नकार ठरलेला आणि तुझ्या एखाद्या जरी आज्ञेला मी अव्हेरलं तरी लगेच तू कट्टीवर येते. मग काय अगदी तोंड न बघण्यापर्यंत. खूप झालं सारखंसारखं तुझंच ऐकणं. आज तू माझं ऐकलंच पाहिजे.”

“ऐकते ना. पण एकदम फिरायलाच जायचं म्हणजे जरा अतिच झालंय ना. काहीच काम नाही आणि फक्त फिरायलाच जायचं.”

“वैदेही, मी आत्ता ऑफिसातून निघतो आहे. पंचवीस मिनिटांत तुझ्याकडे येईन. तू मला तुझ्या गाडीजवळ उभी दिसायला हवीस. ओ.के. मी निघालोय.”

त्याने मोबाईल बंदही केला. आज याचा नूर काही वेगळाच दिसतोय. वैदेहीनं हातातलं काम आटोपतं घेतलं, मनाशीच खुदकन हसत.”

a

“उद्या मुन्नीचा दहावीचा पहिला पेपर म्हणून वैदेही आज नवोदयला जाण्याच्या गडबडीत होती. तिच्यासाठी दोन चांगलेसे नवे पेन, डोक्याला बांधायला रुमाल, गॉगल, ताजं घरी विरजण लावलेलं दही, तिला आवडणारे बिस्किट काय...काय बराच सरंजाम घेऊन आज ती मुन्नीला भेटायला निघणार होती. या पाच वर्षांत मुन्नी खऱ्या अर्थी कुठल्या कुठे पोचली होती. नवोदयला सहाव्या वर्गात तिला पाठवताना खरं तर वैदेहीच्याही खूप जिवावर आलं होतं. पण मुन्नीच्या आयुष्याचा, तिच्या भविष्याचा विचार करता त्यावेळी कठोरपणे घेतलेला निर्णयच किती बरोबर होता हे कालांतराने सिद्धच झालं. मुन्नी नवोदयला आहे हे मुळी तिच्या मुलांच्या आणि तिच्या स्वत:शिवाय कुणालाच तिनं सांगितलं नव्हतं. अन्य कुणाजवळ त्याबद्दल चर्चाही नव्हती. कुणी विचारलंच तर ‘मावशीकडे शिकायला पाठविलं’ बस एवढंच ती सांगायची. सुट्टयांमध्ये आली की तिला जास्तीत जास्त सोबतच ठेवण्याचा प्रयत्न करायची. मुन्नीलाही तिनं सक्त ताकीद देऊन ठेवली होती की, तुझ्या नवोदयच्या गमतीजमती, शाळा याबद्दल कुणाजवळ काहीच बोलायचं नाही. एवढी विश्वासातली वत्सला. पण यावेळी तिनं वत्सलालाही काही सांगितलं नाही. कुणावर तिचा विश्वास नव्हता म्हणून नव्हे तर चुकून कुणाच्या तोंडून काही निघालं आणि त्याचा सुगावा जर तिच्या मामाला किंवा बापाला लागला, तर त्यांच्यामुळे पुन्हा नव्या समस्या निर्माण होऊन मुन्नीच्या शिक्षणात खोळंबा निर्माण व्हायला

a

नको, एवढाच तिचा उद्देश होता. सगळयाच दृष्टीनं ती मुन्नीच्या आयुष्याची काळजी घेत होती. रेवा, देवयानी, ईशान हे जसे तिच्या आयुष्याचे महत्त्वाचे भागीदार होते, तशीच मुन्नीही आता तिच्या आयुष्याचा केवळ महत्त्वाचा घटक नव्हे तर ते तिचं नवं चॅलेंज होतं, एक मिशन होतं, मुन्नी हा तिचा स्वत:चा स्वतंत्र कप्पा होता. तिच्या आयुष्याचा एक भाग केवळ मुन्नीनं व्यापलेला होता. मुन्नी आज तिचा काळजाचा तुकडा होती. रेवा आणि देवयानीची तिला जेवढी काळजी वाटत नव्हती, तेवढी काळजी आता तिला मुन्नीची वाटत होती. जसं या पोरांचं आयुष्य मार्गी लावण्याचा ध्यास वैदेहीला होता, तसंच मुन्नीला घडविणं, तिला तिच्या पायावर उभं करणं, तिला 'माणूस' म्हणून घडविणं हा तिचा ध्यास होता. मुन्नीवर तिने भाषेपासून तर तिच्या सवयीपर्यंत सगळयाच गोष्टींवर संस्कार केले होते. तेही कुठलाही गाजावाजा न करता. कोणतीही आवडलेली वस्तू गपचूप चोरून आपल्या ताब्यात ठेवणं ही सवय मुन्नीची वैदेहीनं सहजपणे मुन्नीच्याही लक्षात न येऊ देता घालविली होती. हे घर तुझं आहे, हे सारं या तिघांसारखंच तुझंही आहे, हा संस्कार तिच्या मनावर रुजवला होता. मुन्नीलाही जेव्हा अनुभवांनी हे घर माझंच आहे हे पटलं, तेव्हा आवडलेल्या वस्तू, पैसे दप्तरात किंवा खिशात लपवून ठेवणं आपोआप बंद झालं.

मुन्नीला बाहेरची स्वतंत्र ट्यूशन न लावता तिचा अभ्यास स्वत:च घेणं हेही वैदेहीनं मुद्दाम स्वत:कडे घेतलेलं काम होतं. बाहेर ट्यूशनला पाठवा आणि बोलभांड मुन्नीने मास्तरला स्वत:बद्दल काही सांगा हा धोका नकोच म्हणून तिनं तिच्या व्यस्त कामातूनही तिचा अभ्यास स्वत:च घेतला. ती बाहेरगावी असेल अशावेळी ही जबाबदारी तिनं देवयानीवर टाकली होती. देवयानीही तिला जिव्हाळयानं शिकवायची. नवोदयच्या महाराष्ट्र लेव्हलच्या स्पर्धा परीक्षेत म्हणूनच ती टिकली आणि तिला नवोदयला प्रवेशही मिळाला. नवोदयला मुन्नीला पाठवून तिनं आपली

a

जबाबदारी झटकली नव्हती. ती सतत तिच्या संपर्कात होती. तिथल्या शिक्षकांच्या संपर्कात होती. मुन्नीच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, यासाठी ती सारखी प्रयत्नशील राहायची. तिनं खेळण्यात भाग घ्यावा, चित्रकलेच्या परीक्षांना बसावं, चांगलं संगीत ऐकावं, गावं, सगळीकडे ती लक्ष ठेवायची. उन्हाळा आणि दिवाळीच्या सुट्टीत 'प्रहार' च्या शिबिराला ती पाठवायची. कोणत्याही परिस्थितीत, मुन्नी 'सर्वगुणसंपन्न विद्यार्थी' व्हावी असं तिचं स्वप्न होतं. मुळात चंट असलेली मुन्नी हे सारं लवकरच आत्मसात करायची. शिकविलेली किंवा सांगितलेली एखादी गोष्ट मुन्नीला लवकर आकलन झाली की बाळाने आईचं बोट पकडून पहिलं पाऊल टाकल्यावर जसा आनंद होतो तसा आनंद तिला व्हायचा आणि दुसरं काहीतरी नवं तिच्या गळी उतरविण्याच्या मागे वैदेही कंबर कसून उभी राहायची. गेल्या सात वर्षांपासून वैदेहीनं मुन्नीवर खूप मेहनत घेतली होती. मुन्नी हा तिचा आता भावनिक विषय झाला होता. मुन्नीचा मॅट्रिकचा निकाल जेवढा मुन्नीच्या आयुष्यासाठी महत्त्वाचा होता, तेवढाच तो वैदेहीच्या आत्मिक समाधानासाठी महत्त्वाचा होता.

वैदेहीनं मोहनच्या हातांनी सारं सामान गाडीत ठेवलं आणि दाराला कुलूप लावून ती गाडीत बसली. दुसऱ्याच क्षणी तिने गाडी वर्धा रोडवर नवोदयला जाण्यासाठी त्या दिशेनं जोरात वळवली. ऐंशीच्या स्पीडने गाडी ड्राईव्ह करणं वैदेहीच्या मनाचा उत्साह वाढवणारा भाग होता.

नवोदयच्या आवारात एका झाडाखाली गाडी उभी करून ती दोन बॅगा घेऊन खाली उतरली, गाडी नीट लॉक केली आणि गेटच्या बाहेर उभ्या असलेल्या वॉचमनचा नमस्कार स्वीकारत आत गेली. तोवर चपराशाने मुन्नीला आई आल्याची

बातमी कदाचित दिली असावी म्हणूनच समोरून मुन्नी धावतच येताना तिला दिसली.

"मम्मी... मम्मी..."

"अगं अगं हळू. केवढी धावतेस. पडशील ना."

"पडते कशाने. रनर आहे जरा मी. हे काय एवढंसं धावणं झालं होय. अगं मी तर दोनशे मिटरची रनर आहे. विसरली काय?"

"नाही तर. विसरेन कशी? चला तुझ्या रूममध्येच जाऊ या."

"मम्मी, खायला काय आणलं? तिच्या हातातली एक बॅग घेत आणि चालता-चालताच मम्मीचा हात पकडत मुन्नीने विचारलं."

"अय्या. खायला? अगं बाई, मी तर विसरलेच गं खायला काही आणायला."

"शक्यच नाही. तुला खोटं पण बोलता येत नाही मम्मी. तू माझ्यासाठी खायला काही आणायला विसरूच शकत नाही. सांग नं मम्मी."

"अगं खरंच विसरले. म्हणजे मी केलंय खरं सारं खायचं. पण ती बॅग घरीच राहिली."

"अरेच्या. शट. तू आता कायकाय खायला आणणार हे तुझा फोन आल्यापासून मी माझ्या मैत्रिणींना सांगत होते. त्या मला आता काय म्हणतील?"

"त्यात काय. सांगायचं त्यांना. माझी मम्मी फार विसराळू आहे, ती विसरली." बोलताबोलता तिच्या रूमपर्यंत त्या पोहचल्या. या खोलीत येताच तिच्या दोनही पार्टनर्स अभ्यासाचं पुस्तक बाजूला ठेवून उभ्या राहिल्या आणि 'नमस्ते काकू' म्हणाल्या,

“काय गं कशा आहात पोरींनो.”

“छान.”

“अभ्यास काय म्हणतो? खूप जागरणं करता वाटतं?”

“अभ्यास चालला आहे काकू. उद्याचीच परीक्षा म्हणजे जागरण तर करावंच लागेल ना. पण मैत्रेयी खूप जागते. रात्री बारापर्यंत आणि पहाटे साडेतीनलाच उठते.”

“होय मुन्नी? एवढी जागरणं करतेस? अग आजारी पडशील.”

“नाही पडणार आजारी. आता काय तेराच दिवस जागायचं आहे. मग मस्त झोपा काढीन घरी आल्यावर. घरी खाणे, झोपणे आणि गाणी ऐकणे बस एवढंच. पण तू माझ्यामागे ते शिबिराचं लचांड नको लावूस बॉ, यावर्षी.”

“नाही गं. आता तुझ्यामागे मी कसलंच लचांड लावणार नाही. आता तू मोठी झालीस. तुझे निर्णय आता तूच घ्यायचेस. तुला वाटलं तिथे तू जायचंस, नाही वाटलं ते नाहीच करायचं.”

बोलताबोलता वैदेहीनं पिशव्यांमधून एक-एक वस्तू काढायला सुरुवात केली. “हा तुझा रुमाल, हा गॉगल, हे पेन्स आणि पोरींनो हा तुमच्यासाठी डबा.”

“डबा, मम्मीऽ ऽ ऽ फसवलंस नं मला, व्वा म्हणजे तुला छान खोटं बोलता येतं. बघ मधुरा, मला काय म्हणाली होती माहीत आहे, ‘खायचं आणायला विसरलेच बाई मी.’ “ आपल्या रूमपार्टनरला मैत्रेयी म्हणाली.

“बरं आधी खाऊन घ्या, तुझ्या बाकी मैत्रिणींनाही बोलव. आणि मुन्नी, हा डबा असाच असू दे. त्यात ताजं विरजण लावलंय. उद्यापर्यंत छान दही होणार त्याचं. पेपर सोडवायला जाल तेव्हा सगळ्या मिळून खा. डोकं शांत राहील. मुन्नी आज मात्र अजिबात जागायचं नाही. पेपरच्या आदल्या दिवशी शांत झोप हवी. जास्त

जागरणं झालं तर डोकं उगाच भणभणतं. अभ्यास झालाय ना तुझा? उद्या मराठीचा पेपर ना?"

"अय्या. तुला कसं माहीत?"

"कसं माहीत काय कसं माहीत? वेडाबाई पहिला पेपर मराठीचाच असतो. मराठी, मग हिंदी, मग इंग्रजी, मग कदाचित सोशल सायन्स असणार. मध्ये गणित आणि शेवटी सायन्स. बरोबर?"

"बरोबर. असाच आहे आमचा टाईमटेबल. मम्मी तू पण घे." पराठे खाताखाता ती म्हणाली.

"नाही. मी जेवण करूनच निघाले. खा तुम्ही. मी जरा तुझ्या शिक्षकांना भेटून येते. खाऊन झालं की तू बाहेरच ये. आपण गेस्टरूममध्ये बसून बोलूया. या पोरींना करू दे अभ्यास. त्यांच्या अभ्यासात मघापासून आपल्यामुळे व्यत्यय येतोय."

"काकू, तुम्ही आल्यामुळे आम्हाला व्यत्यय नाही, उलट खूप छान वाटतंय. आमचे आईबाबा काही मुद्दाम येत नाहीत, परीक्षा आहे म्हणून. तुम्ही भेटल्या अन् घरचेच भेटल्यासारखं वाटलं."

"बरं. पोटभर खा आधी आणि मग अभ्यास करा. चला. सर्वांना शुभेच्छा."

"थँक्यू काकूू."

"बाय."

**वै**देहीनी आज वंदूसोबत बोलायचं पक्क ठरवलचं होतं. पण दिवसभर कोणत्या ना कोणत्या कामाच्या गडबडीत राहिल्यामुळे ते राहूनच गेलं. आता मोबाईलवर वंदू कॉलिंग बघताच तिला खूपच आनंद झाला.

वैदेही आज खूपच खुश होती. खरं तर कालपासून तिच्या मनाला सारखी हुरहुर लागलेली होती. मुन्नीच्या निकालाचा प्रचंड ताण तिच्यावरच होता. मुन्नी खूप चांगले मार्क्स मिळवणार, क्लास तर तिला निश्चित मिळणार याबद्दल तिला शंका नव्हती. पण नेमके किती पर्सेंट? यासाठीच ती कालपासून अस्वस्थ होती. शेवटी काल मुन्नीच्या शाळेतून फोन आलाच.

“मॅडम, अभिनंदन. मैत्रेयीला एक्क्याण्णव टक्के मार्क्स पडलेत.”

“काय? खरं?”

“होय मॅडम. अभिनंदन. आमच्या मोठ्या सरांशी बोला.”

“द्या.” पलीकडून लगेच आवाज.

“हॅलो. मॅडम मी हेडमास्टर वझलवार बोलतोय. अभिनंदन. मैत्रेयी बोर्डाच्या परीक्षेत अठरावी आली. तुमच्या कष्टाचं चीज झालंय.”

अठरावी मेरिट! चक्क मेरिट!! मुन्नी मेरिटमध्ये. आनंदातिशयाने क्षणभर वैदेहीला काही सुचलच नाही. पण स्वत:च्या भावनांना सावरत ती म्हणाली,

“धन्यवाद सर! धन्यवाद. माझे कसले कष्ट. कष्ट मैत्रेयीचे. तुमचे. तिच्या धडपडीला यश आलंय.” बोलताबोलता वैदेहीचा गळा दाटून आला. तिला शब्द सापडत नव्हते.

“मॅडम, पत्रकारांना सांगितलंय आम्ही. ते लोक येतीलच आपल्याकडे. मैत्रेयीला सांगा. आमच्या शाळेतर्फे अभिनंदन तिचं. तिनं आमच्या शाळेच्या कर्तृत्वात आणखी एक मानाचा मोरपीस खोचला. आय ॲम प्राऊड ऑफ हर. खरंच मॅडम, तुम्ही तुमच्या मैत्रेयीवर जे कष्ट घेतलेत त्याचे पांग फेडलेत पोरीनं. नाव काढलं अगदी.”

“सर, तुम्ही सगळ्यांनीच तिच्यावर मेहनत घेतलीय. ती आत्ता जरा बाहेर गेलीय. ती येईलंच शाळेत. खरं तर तुमच्याबद्दलच्या माझ्या भावना कोणत्या शब्दांत व्यक्त कराव्यात तेच कळत नाहीय मला.”

“त्याची काही गरज नाही. आमची आवडती विद्यार्थिनी आहे ती. भेटू आपण. ठेवतो फोन.”

“धन्यवाद.”

वैदेहीनं हेडमास्तरचा फोन बंद केला त्यावेळी तिच्या पूर्ण शरीरात कंपन असल्याचा भास तिला झाला. केवढा आनंद झाला होता तिला. सरांसोबत बोलताना तिने खूप नॉर्मल असल्याचा आव आणला होता. पण खरी वस्तुस्थिती हीच होती, की तिच्या मनात आनंदाचे फवारे उठत होते. मुन्नी! माझी मुन्नी!! “जिंकलीस मुन्नी तू. जिंकलीस. झालं. आता इथून मागे वळून बघायलाच नको.

मुन्नी तू फार मोठं यश संपादन केलंस.'' मनाशीच वैदेही बोलत होती. घरात आत्ता याक्षणी कुणीच नाही, याचा तिला रागच आला. मुन्नी नेमकी आत्ताच कशाला मैथिलीकडे गेली. वत्सलापण आज कामाला नाही. छे मूर्ख लोक. नको तेव्हा सारे गायब होणार. देवयानी तरी येईल की नाही? एवढ्या आनंदाच्या क्षणीही कुणी शेअर करायला नाही, म्हणून तिला चिडचिडच झाली. पण पटकनच रेवाच्या नावाचं बटन तिनं दाबलंच.

''हाय मम्मी.''

''रेवा...रेवा ग्रॅन्ड न्यूज. मुन्नी अठरावी मेरिट आली. एक्क्याण्णव टक्के मार्क्स.''

''व्वा व्वा. गुड.'' रेवा कोरडेपणाने म्हणाली.

''अग मुन्नी गेली नेमकी आत्ताच मैथिलीकडे. तिला तर हे अजून माहीतच नाही. रेवा, नाव काढलन् गं बाई पोरीनं.'' रेवाच्या रूक्षपणाकडे दुर्लक्ष करत वैदेही म्हणाली.

''खरंच मम्मी रिअली यू आर ग्रेट. काय ड्रस्टिक चेंज आहे हा मुन्नीतला. कुठून कशी आलेली मुन्नी. पण तू तिला चक्क मैत्रेयी केलंस. कोण म्हणेल मुन्नी एकवेळ त्या गटारगंगेत होती. मम्मी, मला तुझा खूप राग यायचा सुरुवातीला. अजूनही येतोच. मी तिला अद्यापही आपली कौटुंबिक सदस्य म्हणून स्वीकारू शकत नाही. कसली घाण आणि मूर्ख होती ही मुन्नी. कशाला तू हे लचांड लावलंस असं वाटायचं. पण खरंच तू या मातीच्या गोळ्याचं सुंदर शिल्प केलंस. मात्र आमच्या प्रेमात एक वाटा वाढला हे मला आजही त्रासदायकच आहे.''

"रेवा, अगं मी खरंच काहीच नाही केलंय. तिनं कष्ट घेतलेत. ती जात्याच हुशार आहे. तिची आकलनशक्ती चांगली आहे. तिनं सगळं आत्मसात केल. पठ्ठीनं मारलीन् बाजी. बस आता तिला कलेक्टर होण्यापासून कोणीही थांबवू शकत नाही. आणि तिच्यावरचा राग आतातरी सोड. तुझी लहान बहीण आहे ती. तू काय लहान आहेस आता असा दुसऱ्यांचा राग करायला. बरं तुझं कसं काय? ऑफीस काय म्हणतंय? कधी येतेस इकडे?"

"आता कसल्या सुट्टया मिळतायत? आता एकदम राखी नाहीतर दिवाळी."

"अगं पंधरा ऑगस्टला तीन दिवस ओळीनं सुट्टया येतायत."

"ओ. खरंच. अगं मग येते की. हे पाहिलंच नव्हतं मी. तसं असेल तर आजच रिझर्व्हेशन करायला सांगते."

"बघ. ठरलं की कळव तसं. चल ईशानला पण सांगते ही गुड न्यूज. बाय."

"बाय."

मुन्नीच्या कॉलेजच्या अॅडमिशनची गडबड संपेपर्यंत वैदेहीने अजिबात शहर सोडलं नाही. पण एकदाची अॅडमिशन तिच्या मनासारख्या कॉलेजला झाली, तिला हवा असलेला पीसीएम ग्रुप मिळाला, त्यावर बरेच वादविवाद, चर्चा, भांडणं पण शेवटी स्वत:च्याच मनाचं करवून घेऊन वैदेही रिलॅक्स झाली आणि तिनं बंगलोरकडली आपली कामं काढली. पण यावेळी सुहासनेही सोबत यावं, हा तिचा आग्रह होता.

"आता कसं जमेल मला? सुट्टया नाहीत."

“सुट्टया टाक ना. मेडीकल घे. सुहास, आपण कधीतरी बाहेर फिरायला गेलो आहोत का आजपर्यंत?”

“जाऊ या ना. मी काय नाही म्हणतो आहे का? पण यावेळी नाही जमणार.”

“मी जेव्हा जे काय म्हणते ते तुला कधीच का रे शक्य होत नाही? सतत कुणाकुणाचे काम करतो, ते होतं तुला शक्य?”

“आता इतरांची कामं करणं आणि आपण सोबत बंगलोरला जाणं हे सारखंच आहे काय?”

“इतरांसाठी तुला कसा वेळ मिळतो असं म्हणायचं आहे मला.”

“ती कामं वेगळी असतात. आपण बंगलोरला चार दिवस जायचं म्हणजे....”

“चार नाही. सात दिवसांचा टूर आहे. बंगलोर, म्हैसूर, उटी, मस्त फिरूया. सुहास आयुष्यात कधीच असं मनासारखं मनसोक्त भटकता नाही आलं.” अधीर, आतुर, चूरचूर करणारी, अंगाचा थरकाप उडविणारी कंपायमान अवस्था झाली होती तिची. ती आपल्याच नादात बोलत होती. “आता मला माझ्या साऱ्या जबाबदाऱ्या पार पडल्यासारख्या वाटतात. पोरांची शिक्षणं, त्यांच्या नोकऱ्या, त्यांना स्वत:च्या पायावर उभं करणं आणि त्यांनी स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याची निर्णयक्षमता त्यांच्यात निर्माण करण्याइतपत त्यांची वैचारिक पातळी तयार करणं, इथवर माझं काम होतं. इथून पुढे त्यांचे मार्ग त्यांना मोकळे. आता मला जरा माझ्या मनासारखं जगावंसं वाटत रे. तुला माहितीय माझ्या आयुष्याच्या पूर्वार्धात जगणं म्हणजे काय हेच मला माहीत नव्हतं. नवरा नावाच्या प्राण्याने मला आज्ञा करायच्या आणि मी

a

त्या पार पाडायच्या. मला माझं मत नव्हतं, माझे निर्णय नव्हते. हौसमौज कशाला म्हणतात, त्याचा तर दुरान्वयाने संबंध नव्हता.''

''अहो मॅडम, गेलात का आपण भूतकाळात. मी सारंसारं विसरले म्हणताम्हणता, मध्येच तुला लटक येते अशी भूतकाळात जाण्याची. वैदेही, सात दिवसांसाठी आपण बाहेर जायचं म्हणजे गंमत का आहे? तू हे सारं मनापासून म्हणते आहे, का उगाच माझी फिरकी घेते आहेस? आपण दोघं एकत्र सात दिवस बाहेर राहायचं.... अबबब.. काय झालंय काय तुला? रिअली आर यू सिरियस?''

''यस. रिअली आय ॲम सिरियस.'' आणि बहुधा पहिल्यांदाच एवढी सिरियस झाले माझ्या स्वत:बद्दल. सुहास कंटाळा आलाय आता मला या सगळ्या बंधनांचा. खूप झालं रे सतत मन मारून जगणं. आई लहानपणीच वारली. बाबांनी दुसरं लग्न केलं. सावत्र आईच्या जाचात आणि वडिलांच्या करड्या नजरेच्या धाकात पूर्ण बालपण करपून गेलं, लहान सावत्र तीन भावंडांना वयाला न झेपताना सतत सांभाळत राहिले. कौतुकाचा शब्द माझ्या आयुष्यात मी कधी ऐकलाच नाही. शाळेत मात्र गणिताचे सर खूप कौतुक करायचे. गणित माझा आवडता विषय होता सुहास. पटकन कळायचं. अवघड गणित सोडवण्यात मला खूपच आनंद मिळायचा. आमचे सर आम्हाला गृहपाठ द्यायचे. एकतरी गणित त्यात असं असायचं की जे अनेकांना जमतच नसे. काहींना जमताजमता शेवटच्या पायरीलाच चुकायचं. काहींची उत्तरं बरोबर असायची, पण सोडवण्याची पद्धत चुकायची. मग सर मला ते गणित फळ्यावर सोडवायला द्यायचे. वर्गात सर्व विद्यार्थ्यांमधून उठून पुढे जाऊन फळ्यावर गणित सोडवणं यात काय आनंद मिळायचा म्हणून सांगू रे तुला. पण मॅट्रिकला प्रथम श्रेणीत पास होऊनही अण्णांनी पुढे मी शिकायचं नाही, असा फतवा काढला.''

“काय?”

“होय. कारण आईला घरकामासाठी फुकटची मोलकरीण हवी होती ना.”

“मग?”

“मग काय? मी सांगितलं त्यांना, तुमची घरातली सगळी कामं करेन पण मला शिकू द्या. नशीब माझं. त्याचवेळी माझा मामा आला, त्याने माझ्यासाठी मध्यस्ती केली. मी सोबत घेऊन जातो म्हणाला. पण त्या लोकांना मला गमवायचं नव्हतं. त्यामुळे मामासोबत जाण्याचा प्रस्ताव तर त्यांनी पार धुडकावूनच लावला. मात्र मामांनी स्वत:च अण्णांना सोबत नेऊन माझी कॉलेजात जाऊन ॲडमिशन करून आला. त्यांचे पैसे वाचले त्यामुळे फार विरोध करण्याचं कारण नव्हतं. मला त्रास देण्याची एकही संधी माझी आई सोडत नसे. माझा पहिला पिरेड कसा बुडेल, याच तजविजीत ती असायची. वेळेत सगळी कामं करून ठेवा, तरी काहीतरी खुसपट ती काढायचीच. नेमकी तिची तब्येतही त्याचवेळी बिघडायची. कधी काय तर पाठच दुखते, पाय दुखणं तर नित्याचंच. एकही काम न करता, त्या पायांना जराही न हलवता-डुलवता बसल्या जागी तिचे पाय कसे दुखतात तेच कळत नव्हतं. पण तिचं सारं अंगच सतत दुखत राहतं, असं ती सांगत राहायची आणि ते दाबतादाबता माझा क्लास मात्र जायचा.”

“खूपच तारेवरची कसरत केलीस गं. पण मग हे लग्नाचं कसं मध्येच? तू एकदा म्हणाली होतीस, शिकताशिकता मध्येच लग्नाचं झेंगड मागे लागलं ते.”

“होय. ती एक वेगळीच रामकहाणी, माझे घरातले असले हाल मामांना बघवत नव्हते. ते साधारण रविवारला यायचे. त्यादिवशी तर बाई माझ्यासाठी कामाचा डोंगरच उभा करून ठेवायची. दुपारचे दीड-दोन वाजले तरी माझ्या पोटात अन्नाचा कण नसायचा आणि या सगळ्यांचं मटनवर मस्त ताव मारून झोपा काढणं

a

सुरू असायचं. घरातली सगळी कामं, आठवड्याचं धुणं, अधिकची भांडी सारंसारं आटोपून मी जेवायला बसायची तेव्हा माझ्यासाठी मटनचा वाटीभर रस्सा उरलेला असायचा. सोबत रोजच्यासारख्या शिळया पोळया. अश्रूंचे कढ पीत मी ते जेवण पोटात ढकलायची. आईची खूप आठवण यायची रे. त्यावेळी वाटायचं माझ्याच आयुष्यात असं का?"

"पण वैदू, तुझ्या अण्णांचं मला आश्चर्य वाटतं. सावत्र आया बहुतांश अशाच वागतात गं. पण वडील..."

"त्यांचं बहुधा तिच्या समोर काही चालत नसावं. किंवा त्यांनीही स्वत:च्या सुखासाठी तिच्याचसोबत स्वत:ला ॲडजस्ट करून घेतलं असावं. त्यांनी दोन-तीनदा माझी चूक नसतानाही ती सांगते तेच खरं मानून मला खूपच मारलं होतं. त्यानंतर मीही त्यांच्याकडून अपेक्षाच सोडल्या. प्रेम हा शब्द माझ्यासाठी नाहीच, हेच माझ्या बालमनावर ठसल्या गेलं. मी कधीच कोणाचकडून काहीच अपेक्षा ठेवल्या नाहीत रे. कॉलेजात मला चिठ्ठ्या यायच्या. पण मी त्या न वाचताच फाडून टाकायची. मामा हा एकमेव मला माझा वाटायचा. तोही तिथे येऊनच माझ्यावर थोडंफार प्रेम व्यक्त करू शकत होता. त्याच्याही काही मर्यादा होत्याच. माझा तिथे होणारा छळ बघूनंच त्याला वाटायचं, एकदाचं लग्न करून दिलं की जरा तरी सुखात राहील. त्यानेच शिक्षकाचं स्थळ आणलं. गणिताचा शिक्षक. लग्न याचा अर्थ त्यावेळी माझ्यासाठी एवढाच होता, की या घरातल्या छळवादापासून सुटका. अण्णा आईवर प्रेम करतात, मामा मामीवर प्रेम करतात, शेजारचे काका काकूवर प्रेम करतात, याचा अर्थ पत्नीवर प्रेम करायचंच असतं. ते करतातच, एवढंच मला माहीत होतं. म्हणजे लग्नानंतर माझा नवराही माझ्यावर प्रेम करेल, माझं स्वत:चं घर असेल, त्या घराला मी माझ्या पद्धतीनं सजवेन. मी आणि माझा नवरा आम्ही दोघं मिळून

जेवण करू, सिनेमा बघायला जाऊ, फिरायला जाऊ, नदीकिनारी जाऊन बसू, त्यांच्या पुस्तकातली सगळी गणितं आपण सोडवू, त्यांना कळेल आपण गणितात किती हुशार आहोत ते आणि तेही मला त्यांच्याचसारखं शिक्षक करतील. सुहास शिक्षक होणे हे माझं स्वप्न होतं. माझ्या या शिक्षक नवऱ्याला घेऊन मी खूप स्वप्न बघितली. अगदी स्थळ सांगून आल्यापासून. त्यांच्याकडून होकार आल्यापासून तर मला एक दिवसही माहेरी थांबावंसं वाटत नव्हतं. त्या घरातला हा लहान मुलगा. मोठे दोनही भाऊ मिल्ट्रीत शिपाई. आई त्यालाही नव्हतीच. वडील गावी शेतीवर असायचे. एका भावाला सुट्टीच मिळणार नव्हती. वडील थकलेले. घरात बाईमाणूस करायला कुणी नाही. त्यामुळे त्यांच्याचकडून लग्न रजिस्टर पद्धतीनंच करावं असा निरोप येताच आमच्या मातोश्रींच्या तर आनंदाला पारावारच उरला नाही. थोडक्यात आमचं लग्न आटोपलं आणि माझी बिदाई झाली. माझ्या बिदाईत माझ्या मामाशिवाय माझ्यासाठी डोळ्यात पाणी आणणारं कुणीच नव्हतं. पण ते घर सोडताना मला मात्र खूप रडू आलं. का? आमच्या शेजाऱ्यांना याचं खूपच आश्चर्य वाटलं. काकूंनी मला जवळ घेऊन समजावलंही. 'कशाला रडतेस वैदेही? कुणासाठी रडतेस. सुखाचा संसार कर आता.' "

"हो ना. त्या नरकातून बाहेर पडताना तुला का रडायला आलं?"

"ज्या घरावर माझा पहिला अधिकार होता, ज्या बापावर माझा पहिला अधिकार होता, ज्या घरातल्या अंगणात खेळताखेळता लहानाची मोठी मी व्हायला हवं होतं. ज्या घरातल्या गुलमोहरासोबत माझी दोस्ती असायला हवी होती, ज्या घराच्या खिडकीतून मी पहिल्यांदा आभाळाकडे नजर टाकायला हवी होती, ज्या घराने माझ्या उसाशांना आपलंसं करायला हवं होतं ते घर 'माझं' कधीच नव्हतं. या घरात आपली वयाची एकोणीस वर्षे जाऊनही हे 'घर' माझं का होऊ शकलं

नाही? का नाही या घराने मला प्रेम दिलं? का नाही मला कुशीत घेऊन माझ्यासोबत रडलं? या घरातला एकही कोपरा मला माझा कधीच का नाही वाटला? आपण गेल्यावरही या घराला आपल्या जाण्याने काहीही फरक पडणार नाहीये, या विचारानेच सुहास मला खूप रडू येत होतं रे. या घरातल्या माणसांची तर मी कधीच नव्हते. पण या घरानेही मला एखादा कोपरा दिला नाही, याचं खूप वाईट वाटलं, विषाद वाटत होता, की हे घर सोडताना मला वाईट का नाही वाटत आहे? का नाही माझ्या काळजात कालवाकालव होत? का नाही मला इथून जाऊच नये असं वाटत? का नाही मला गुलमोहराकडे बघून गुदमरल्यासारखं होत? का नाही मला त्या अंगणाकडे बघून मैत्रिणींसोबत खेळलेल्या टिक्कर-बिल्ल्याची आठवण होतं? का नाही मला इथे खेळलेल्या भातुकलीतल्या मैत्रिणींच्या लुटीपुटीच्या भांडणाची आठवण होत? कारण सुहास हे असं काही कधीच त्या घरात माझ्यासोबत घडलं नव्हतं ना रे. मग असल्या कासावीस करणाऱ्या आठवणी कशा असणार माझ्याजवळ? त्या का नाहीत हेच तर माझं दु:ख होतं." दाट धुक्यातून माणूस पहावा तशी ती आपल्या पूर्वायुष्याकडे पाहत होती. आणि आता पुन्हा एकदा या धुक्यापलीकडचा स्वच्छ प्रकाश पाहण्यासाठी तिचं मन तयार झालं होतं.

"वेडी आहेस तू. घर सोडताना या आठवणी आपल्याजवळ नाहीत, म्हणून का कोणी रडतं? पण मिळाला ना चांगला गणिताचा मास्तर?"

"सुहास, चांगला? चांगला असता तर पुढे आयुष्यात अशी वाताहत झाली असती?" एखाद्या झाडानं वाढण्यासाठी किती कुंड्या बदलायच्च्यात रे. तसे चांगले होते ते. चांगलेच म्हणायचे. घरात काहीच कमी पडत नसे. पण संवाद काहीच नव्हता आमच्यात. पहिल्याच दिवशी त्यांनी मला सांगितलं, 'माझं माझ्या विद्यार्थिनीवर प्रेम आहे. दहावीपर्यंत मी तिला शिकविलं. स्मिता हुशार आहे. सुंदर आहे. पण

माझ्यापेक्षा दहा वर्षांनी लहान आहे. तिच्या लग्नाला अजून पाच-सहा वर्षे अवकाश आहे. तेवढा वेळ मी थांबू शकत नव्हतो. एकदोनदा आम्ही जवळ आलो. नेहमी आम्हाला एकत्र येणं शक्य नाही. एकदा मला त्या आनंदाची चव कळल्यामुळे मला पाच-सहा वर्षे थांबणं कठीण वाटायला लागलं. इथे तुला काहीच कमी पडणार नाही. तुझ्या बापाच्या घरच्यासारखा सासुरवासही होणार नाही. पण मी काय करतो, कुठे जातो, कसं वागतो, याच्याशी तुझा काहीही संबंध असता कामा नये. स्मिता इथे कधीही येऊ शकेल. तिला अजूनही माझीच ट्यूशन आहे. ट्यूशनमध्ये मी तिला काय शिकवितो, इकडे तू लक्ष द्यायचं नाहीस. कळलं? दिवसा तू तिला डिस्टर्ब करायचं नाही, रात्री ती तुला डिस्टर्ब करणार नाही.' "

"बापरे. काय सांगतेस काय तू वैदू. हे त्याने तुला पहिल्या दिवशी सांगितलं आणि तू हे सारं ऐकून घेतलंस?"

"मग काय करायला हवं होतं?"

"अगं त्याने तुला चक्क फसवलं. एका पोरीवर त्याचं प्रेम असताना केवळ पाच-सहा वर्षे ते लग्न करू शकत नाहीत, म्हणून त्याने घरात हक्काची बायको आणली. स्वत:च्या स्वार्थासाठी त्याने तुझा बळी घेतला, आणि तो तू निमूट सहन केला?"

"सांग नं काय करायला हवं होतं?"

"त्याला हातही लावू न देता तडक तिथून निघून जायचं"

"कुठे?"

"कुठे? ऽऽऽ कुठे?....."

"कुठे सुहास? कुठे? अरे कोण होतं मला? ज्याच्या भरवशावर मी नवऱ्याशी भांडू शकत होते? माझं लग्न करून माझी ब्यॅद माझ्या वडिलांनी त्याच्या स्वाधीन केली होती. नवऱ्याला राजरोसपणे प्रेयसी घरात यायला हवी म्हणून त्याने माझा बळी घेतला होता. कुठे जाणार मी? आत्महत्या करावीशी वाटायचं, पण हिंमत होत नव्हती. काहीच करू शकत नव्हते रे मी. नियतीच्या हातातली कठपुतळी झाले होते. कोणत्याही प्रकारचा सासुरवास नाही, टोमणे नाही, कशाची ददात नाही, हेच तिथलं सुख होतं. दुपारी ट्यूशनच्या वेळी ती यायची. पाच-सहा पोरांच्या ट्यूशनची बॅच संपली की ती सोडून सगळे निघून जायचे. त्यानंतर अर्धा-एक तास दार बंद असायचं. आतून हसण्याचे, गप्पांचे आवाज येत राहायचे. त्यांची वेळ संपली की दार उघडलं जायचं, माझ्या बेडरूममध्ये येऊन ती केस नीट करून, पावडर लावून निघून जायची. माझी कुठलीही दखल न घेता."

"आश्चर्यच आहे, आज आम्ही तुला जे बघतोय, त्या वैदेहीने हे सारं त्यावेळी मुकाट सहन केलं असेल, खरंसुद्धा नाही वाटत."

"काय करायचं? विरोध करण्याची हिंमतच नव्हती माझ्यात. आपल्यात काही शक्ती आहे असं वाटतच नव्हत ना रे. आपल्याला जे पटत नाही, जे आवडत नाही, ते आपण बोलून दाखवू शकतो, बोलून दाखवायला हवं, हेच मला माहीत नव्हतं."

"बापरे, कसं सहन केलंस गं?"

"केलं आपलं. माझ्यापेक्षा दोन-तीन वर्षांनी लहान असलेली पोरगी पण अनेकदा माझा ती अपमान करायची न बोलता. माझ्यासमोर त्याच्याशी अंगलट करायची. मला डिवचायची. माझ्यासमोर माझ्या घरात माझ्या नवऱ्यासोबत वावरताना बघून माझं हृदय गोठून जायचं रे. मेंदू बधिर व्हायचा. अख्ख्या शरीरात

a

अग्नीचे लोळ असे गरगरा फिरायचे. पायापासून कानांच्या पाळयांपर्यंत गरम व्हायचं. आगीच्या भट्टीत बसलोय आपण असं व्हायचं. हळूहळू त्याचीही सवय झाली. मग मी अभ्यासात लक्ष घालायला लागले, पार्ट वनला बसू का विचारलं तर नवरा बस म्हणाला. सगळी पुस्तकं, गाईड्स आणून दिल्यात. त्यानेच परीक्षेचा फॉर्मही भरला. मात्र मला कॉमर्स घ्यायचं होतं, त्यांनी आर्ट्सची पुस्तकं आणून दिली. सगळे मला न आवडणारे विषय. पण बंद दाराआडली कुजबूज ऐकण्यापेक्षा न आवडणाऱ्या विषयांची पुस्तकं वाचणं काय वाईट, असा विचार करून मी ती पुस्तकं हातात घेतली. वाचत राहिले. डोक्यात काही शिरायचं नाही. पण आपण काहीतरी कृती करतोय. फक्त खायला भार न भुईला भार नाही. वाचतो आहोत काहीतरी एवढंच समाधान. दुसरं काहीच काम नाही, म्हणून वाचत बसा. तीच ती पुस्तकं, त्याच त्या गाईड्स. पेपर दिले. काहीही समजून न घेताच पुस्तकं वाचलेल्या सगळया प्रश्नांची उत्तरं मात्र आपोआप लिहिल्या गेली. पहासष्ट टक्के मार्क्स मिळाले. नवऱ्यालाही आश्चर्यच वाटलं. मलाही. मग 'अभ्यास' म्हणून वाचन केलं, शिकत गेले...शिकत गेले...एम ए झालं. एक दिवस सकाळी उठले तर तो घरात नाही. आधी वाटलं, गेला असेल, कुठे फिरायला वगैरे. माझी सकाळची सगळी कामं आटोपली, पोरं शाळेत गेलीत तरी याचा पत्ताच नाही. मला कळेचना. सकाळी गेलेला ईशान शाळेतून घरी आला. जेवला, खेळला, झोपला. तरी याचा पत्ता नाही.

"ईशान, बाबा सकाळी फिरायला गेलेत ते आलेच नाहीत रे."

"फिरायला कुठे, ते तर रात्री मला म्हणाले होते, आठ-दहा दिवसांसाठी गावाला जातोय."

"तुला सांगितलं त्यांनी असं?"

"होय."

a

“मग मला काहीच कसं नाही बोलले? बॅग घेऊन गेले?”

“मम्मी...? आता गावाला जातील तर बॅग तर नेणारच नं?”

“अरे पण सांगून नाही का जायचं?”

“ते कुठे कधी सांगून जातात.”

“हो. पण एरवी आपल्या समोर तर जातात. हे काय नवच? आणि नेमके गेलेत तरी कधी? पहाटे का रात्रीच? चोरासारखं जायचं, याला काय म्हणावं?”

ईशान बिचारा यावर काय बोलणार? देवू तर खूप लहान होती आणि रेवा पोटात. गेले..गेले.. येतील एक-दोन दिवसांत असं वाटलं. पण चार-सहा दिवस झालेत म्हटल्यावर आम्हाला काळजी वाटायला लागली. ते गेल्यापासून स्मिताही आली नव्हती. इतर मुलंही नव्हती आली. याचा अर्थ इतर मुलांनाही सर गावाला गेले हे माहीत होतं. फक्त मलाच त्यांनी सांगितलं नव्हतं. तेवढंही सांगण्याच्या लायकीचं ते मला समजले नाहीत. एक दिवस सगळी कामं आटोपून दुपारची पेपर वाचत पडले होते, तोच दारावर दाण-दाण आवाज. धडपडूनच उठले मी. खात्रीनं हेच घाईघाईत आले आहेत. उत्साहानेच दार उघडलं, तर दारात नवखेच दोन चेहरे. मी दार उघडताच, क्षणाचाही विलंब न लावता, ‘कुठे आहे तो हरामखोर?’ म्हणून एकजण एकदम गरजलाच. त्याच्या आवाजाने मी घाबरले.

“अहो कोण तुम्ही? कोण हवंय तुम्हाला?” मी घाबरतच विचारलं.

“तो नालायक मास्तरडा. तुमचा नवरा कुठाय?”

“गावाला गेलेत ते. आणि तुम्ही जरा नीट बोला ह्यांच्याबद्दल.”

“नीट बोला! सापडू तर दे. हाडं खिळखिळी करणार आहे मी त्याची. कोणत्या गावाला गेला.”

a

“माहीत नाही.”

“माहीत नाही? बायको आहात ना तुम्ही त्याच्या? का तुम्हालाही त्याने...”

“साहेब. जरा नीट बोला. तुमचं काय भांडण असेल, ते त्यांच्यासोबत भांडा. हे घरात नाहीत, हे आल्यावर तुम्ही या.” शांत स्वरात वैदेही म्हणाली.

“बाई, आम्ही तुमच्याशी भांडायला आलेलोच नाही. आम्हाला फक्त तो कुठे गेला तेवढं सांगा. अहो, त्यानी आमच्या स्मिताला पळवून नेलंय.”

“काय?...काय बोलताय काय तुम्ही?”

“होय. स्मिता परीक्षा झाली म्हणून मावशीकडे अमरावतीला जाते म्हणाली. मी तिला गाडीत बसवून दिलं. म्हटलं, राहील चार-आठ दिवस नि येईल. चार-पाच दिवसांनी हा मास्तरडा गेला मावशीकडे. तर ती म्हणाली, ‘सर नाहीतरी गावीच चाललेत तर मी पण जाते सरांसोबत. सोबतही होईल.’ साध्या सुध्या मावशीलाही वाटलं, एकटं जाण्यापेक्षा बरी सापडली सोबत. दिली मावशीनं तिची तयारी करून. आम्हाला वाटलं, मावशीकडे आहे, त्यांना वाटलं, घरी पोचली. पोरगी मधल्यामधे गायब. आज तिचा मावसभाऊ आला, स्मिता इकडे नाही म्हणताच, सारा उलगडा झाला. सांगा कोणत्या गावाला गेला तो हरामखोर.”

“अहो, काय सांगताय तुम्ही मलाच काही कळेनासं झालंय. ते गेलेत ते मलाही सांगून गेले नाहीत. मागच्या गुरुवारला सकाळी मी उठले तर हे नव्हतेच घरात. मला तर वाटलं होतं, सकाळी फिरायलाच गेले असतील. पण माझ्या मुलाला त्यांनी रात्री आठ-दहा दिवसांसाठी गावाला जातो म्हणून सांगितलं होतं म्हणे. बापरे. काय हे भलतंच झालं. म्हणजे तुम्ही म्हणता त्यावरून ते चक्क स्मिताला घेऊन पळाले? आम्हा साऱ्यांना वाऱ्यावर सोडून?”

a

"त्याने तुम्हाला वाऱ्यावर सोडलं असेल, पण आम्ही नाही सोडणार त्याला. आता इथून आम्ही सरळ पोलिसांकडे जाणार तक्रार करायला."

"पोलीस?...पोलीस कशाला? अहो येतीलच ते. जरा आणखी एक-दोन दिवस वाट बघा."

"आता आम्हाला धीर नाही. त्या हरामखोर माणसाने माझ्या नासमझ पोरीला पळवली. तुम्ही एक लग्नाची बायको असताना माझ्या पोरीचा तो माणूस बायकोसारखा वापर करतोय. नाही. मी त्याला सोडणार नाही. चला हो दादा."

"बापरे. भलताच डेंजर निघाला गं तुझा नवरा. म्हणजे आता त्याच्यासोबत जी बाई त्याची पत्नी म्हणून वावरते ती तीच का?"

"होय. स्मिताच्या वडिलांनी जबरदस्ती आपली पोरगी वापस आणण्याचा प्रयत्न केला. त्यांना तर यांना पोलीस केसमध्ये अडकवायचं होतं. पण स्मिताने सांगितलं, 'मी त्यांच्यासोबत स्वेच्छेनी राहते.' ते दोघं आजही पतिपत्नी म्हणूनच सोबत राहतात."

"पण तू काय केलंस मग? दोन पोरं पदरात आणि एक पोर पोटात. बापरे. काय अवस्था झाली असेल तुझी."

"होय ना. कुणाचाच आधार नाही. डोक्यावर मात्र छप्पर तेवढं होतं. बँकेत पैसे जमा होते. चार चेकवर त्यांनी सह्याही करून ठेवल्या होत्या. नाही म्हणायला अगदीच काही वाऱ्यावर सोडलं नव्हतं त्यांनी. थोडी फार माणुसकी दाखवलीच होती. तसे ते चांगलेच होते. मी हळूहळू सावरले. कंबर कसली. मामाच्या सल्ल्याने पोलीस स्टेशनमध्ये जाऊन हे हरवल्याची तक्रार केली. बँकेतले पैसे तर लवकरच संपणार आहेत, याची मलाही कल्पना होती. काय करावं हा विचार करत असतानाच

a

सुचलं, ‘ट्यूशन घ्यावी. गणिताची.’ ईशानला गणित आणि इंग्रजी मीच शिकवत होते. त्यामुळे आपोआप अभ्यास व्हायचाच. पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांची ट्यूशन घेतली. तशी पाटीच लावली घरावर. हळूहळू विद्यार्थी मिळत गेले. आत्मविश्वास वाढला. मग क्लासच घ्यायला लागले. चक्क चार वर्षे कोचिंग क्लास घेतलेत. रेवा बालवाडीत जायला लागल्यावर मी बरीच मोकळी झाले. सोबतीला आणखीही कायकाय करत राहिले. ईशू बारावी झाला आणि खऱ्या अर्थी माझा ताण कमी झाला. मग मी धोका पत्करून व्यवसाय करायचं ठरवलं.”

“बापरे. एवढी मजल?”

“मग मध्ये एवढे उन्हाळे-पावसाळे पाहिले. बँकेशी सारखा संबंध आला. मॅनेजरशी ओळख झाली. लोनसंबंधी माहिती झाली, वेगवेगळे लघुउद्योग, त्यातल्या त्यात स्त्रियांसाठी असलेल्या स्किम्स...बरंच काही. घर गहाण ठेवून लोन मिळतं हे कळलं. त्या मॅनेजरनीच मला ही कपड्यांची फॅक्टरी मोठ्या प्रमाणात टाकायला सांगितली.”

“पण घर तर तुझ्या नवऱ्याच्या नावावर असेल ना. मग तुला कसं काय लोन मिळालं.?”

“घर त्याच्याच नावावर होतं, पण सात वर्षे ते या घरात नव्हते. त्यांचा इकडे काहीच संबंध नव्हता. त्याच बँकेत त्यांच्या नावे असलेल्या खात्यातही त्यांची उलाढाल नव्हती. त्यांनी आमच्याशी काहीच संबंध ठेवलेला नव्हता, त्यांचा पत्ताही नव्हता, पोलिसांनीही त्यांना तोवर शोधून दिलेलं नव्हतं. मॅनेजरनी सांगितलं, पेपरमध्ये जाहीर करा, ‘××× या नावाचा इसम हरविला आहे, जिवंत असल्यास सात दिवसांचे आत भेटावे, अन्यथा ते मृत आहे, असे मी समजून माझे सगळे व्यवहार माझ्या पद्धतीने करायला मी मोकळी असेन,’ अशी जाहिरात आम्ही

पेपरमधून दिली, तरी तो माणूस घरी आला नाही. त्यामुळे त्या घरावर मॅनेजरने मला लोन दिलं. त्या घराचा टॅक्स सात वर्षांपासून मी भरत होते. त्याचाही मला लोनकेसवर सह्या करताना फायदाच झाला. अर्थात मॅनेजरने हिंमत करूनच थोडं वाकड्या मार्गाने जाऊनच मला ही सारी मदत केली हेही तेवढंच खरं. फार माणुसकीनं वागले ते साहेब माझ्यासोबत."

"व्वा. फारच मेहरबान होते वाटतं साहेब तुझ्यावर."

"होय. फार भला माणूस होता तो."

"होता?"

"हं. हार्ट अटॅकने लगेच गेलेत. ऐन चाळिशीत."

"अरे. म्हणजे तुझा मोठा आधारच गेला म्हणायचा."

सुहासच्या आवाजाला जळका वास येतोय, हे आत्ता वैदेहीच्या लक्षात आलं. तिनं चमकून त्याच्याकडे बघितलं. पण तेवढंच दुर्लक्षही केलं. हा विषय तिला वाढवायचा नव्हता. म्हणून ती मुद्दामच म्हणाली,

"आमचे नवरोजी मात्र विचित्रच बाबा."

"ग्रेट. तुझा नवरा खरंच ग्रेट गं बाई. इथे एक बाई पटवायची मारामार. तिथे दोन-दोन बायका."

"ए गधड्या. काय बोलतोस, कुणाशी तुलना करतो. सुहास, तू खूप वेगळा आहेस रे. तुझी पत्नी तुला कुठेच मॅच न होताही तू तिला बरोबर सांभाळतोच आहेस ना. वरून माझ्यासारख्या ध्यानालाही."

"बायकोला मी सतत सांभाळून घेतो हे बरोबर आहे. पण तुला काय सांभाळायचं?"

वैदेही आपल्या खुर्चीवरून उठून तो बसला होता, तिथे त्याच्या खुर्चीजवळ आली. आणि त्याच्या नजरेला नजर देत म्हणाली, “सुहास, तू आहेस म्हणून बरं चाललंय माझं. नाहीतर...”

“बरी आहेस ना वैदू. काय झालं काय तुला आज? भलताच पुळका येतो आहे तुला आज माझा. कायम माझ्यावर बिथरलेली असतेस. मी काहीच कधीच तुझ्या मनासारखा वागत नाही, अशी कायम तक्रार आहे तुझी. मग हे काय भलतंच? बरी आहेस ना?”

“सुहास, तुझ्यावर सारखी का ओरडते माहीत आहे. तू सुरुवातीपासून मला एवढं समजून घेतलं, माझ्यावर एवढं प्रेम केलंस, मला एवढं जपलं की आता तू एवढासाही माझ्या मनाविरुद्ध वागलास की मला सहनच होत नाही. मी काहीतरी इच्छा व्यक्त करावी आणि ती तू पूर्ण करावीस. सवय झाली रे.”

“आज काही खरं नाही बाबा तुझं. कायम मी बायको..बायको करत राहतो, म्हणून ओरडते, आता असंही म्हणतेस.”

“ते तर मी आत्ताही म्हणतेय. बायकोला सांभाळूनच मला कंपनी देणार तू. ते जाऊ दे. आता मला सांग, कधीचं रिझर्व्हेशन करायचं? मला तारखा सांग. त्याप्रमाणे मी माझी कामं अॅडजस्ट करणार.”

“वैदेही, जरा थांब नं. कसं शक्य आहे. सात दिवस. नमिताला काय सांगू?”

“सांग नं, वैदेहीसोबत फिरायला चाललो. मैत्रिणीला घेऊन फिरू नये काय?”

“मॅडम, शुद्धीवर या नं जरा.”

“नाही. खूप जगले शुद्धीवर राहून. आता नको. भान हरपून जगण्याची जरा मजा घेऊ दे. प्लीज चल ना रे.”

“वैदेही, तुला सांगतोसांगतो म्हणताम्हणता राहिलंच पण..”

“काय?”

“वैदेही... रागावू नकोस पण...”

“अरे सांग ना काय सांगायचं ते. काय झालं?”

“वैदेही, अगं ओरडू नकोस, पण याच महिन्यात नमिताने ओरिसाचा टूर आखलाय. मुलं सुट्टीत घरी आली आहेत, आणि त्यांच्या सुट्ट्या आता दहा-बारा दिवसच शिल्लक आहेत. कालच मी रिझर्व्हेशन करून आलोय. सॉरी.”

“सुहास...सुहास.” वैदेहीचं सगळं शरीर अपमानाने थरथरत होतं. तिचा चेहरा रडवेला झाला. “तुम्ही एवढं प्लॅनिंग करत होतात, आणि मला साधं सांगितलंही नाही. चार दिवसांनी तू जाणार, काल रिझर्व्हेशन केलं, हे तू मला आज सांगतोयस. तेही मी तुझ्यामागे लकडा लावला म्हणून. अन्यथा गेल्यावर सांगणार होता?”

“सांगायचं होतं, पण हिंमतच होत नव्हती. तू ओरडणार हे मला माहीत होतं.” अपराधी आवाजात सुहास बोलला.

“म्हणे ओरडणार. तुम्हा नवरा-बायकोच्या प्लॅनिंगमध्ये मी कधी आड आले? कधी जाताय?”

“सातला सकाळच्या फ्लाईटने जाणार आणि पंधराला ओरिसा एक्सप्रेसने येणार.” आणखीच पडलेल्या आवाजात सुहास खाली बघत म्हणाला. आता आभाळ गडगडणार याची त्याला पूर्ण खात्री होती.

“म्हणजे तू अकराला इथे नाही? वैदेहीने हताश नजरेनं त्याच्याकडे बघितलं. क्षणभरात डोळे बंद करून आपल्या हाताच्या तर्जनी आणि अंगठ्यानी ते घट्ट दाबले. तिथेच पडलेली गाडीची किल्ली घेतली आणि पर्सही न घेता दारातून बाहेर पडली. तिच्या शरीरातली अपमानाची धगधगती आग मात्र आता कमी होणार नाही, हे तिलाही माहीत होतं. बिनसलेल्या डोक्याने आता ही शंभरच्या स्पीडने गाडी चालवणार, याची सुहासला काळजी वाटली, पण दारापलीकडे गेलेल्या वैदेहीला थांबवण्याची हिंमत आपल्यात नाही, हे तो जाणून होता. अकरा तारखेला तिचा वाढदिवस करून आपण जायला हवं होतं का? क्षणभर त्याने विचार केला आणि दुसऱ्याच क्षणी केसांमधून हात फिरवत तिथून उठून तो बाहेर पडला.”

“**म**म्मी, यु.पी.एस.सी. आणि एम.पी.एस.सी. म्हणजे काय गं?” मुन्नीने कामात असलेल्या वैदेहीला प्रश्न केला.

“अगं बाई. माझी राणी यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. च्या गप्पा मारायला लागली होय. काय गं बाळे, आज एकदम इथवर मजल? आधी बारावीची परीक्षा तर दे.”

“ ते पेपरला येतंय ना गं सारखं त्या परीक्षा... ते फॉर्म्स... शिवाय माझी मैत्रीण आहे ना, श्वेता तिचा भाऊ म्हणे यु.पी.एस.सी. पास झाल्याझाल्या डायरेक्ट मोठ्ठा साहेब झाला.

वैदेहीनं हातातली फाईल आणि डायरी बाजूला ठेवली. सोफ्यावर रेलून बसली. जवळच असलेल्या मुन्नीला तिरप्या नजरेनं बघितलं आणि दुसऱ्याच क्षणी तिला जवळ ओढून आपल्या मांडीवर बसवलं. आधी तिच्या गालाची पापी घेतली. मग तिच्या बॉयकटमधून हात फिरवत तिला म्हणाली, “मुन्नी, तुला काय व्हायचंय? कलेक्टर ना?”

“होय, मला कलेक्टर व्हायचंय.”

“मग, त्यासाठी आधी बारावी छान मार्कांनी पास हो. मग कोणतीही डिग्री घे. अगदी मेडीकलला जा, नाहीतर बी. ए. हो. नंतर यु.पी.एस.सी.ची परीक्षा चांगल्या मार्कांनी पास झाल्यावर आय.एफ.एस. मिळते. कमी मार्क्स मिळाले की

a

आय.पी.एस. मिळते. किंवा आय. ए. एस. मिळते. त्यानंतर तू कलेक्टर होऊ शकतेस. तू कलेक्टर झालीस की मग प्रत्येकजण तुला कडक सॅल्यूट मारणार.''

''खोब्रागडे काकांना लोक मारतात, तस्सा?''

''होय, तस्साच.''

''काय मज्जा नं मम्मी.'' टाळया पिटत मुन्नी म्हणाली.

''पण त्यासाठी केवळ अभ्यास करून चालत नाही. अवांतर वाचनही खूप हवंय बरं का. भरपूर वाच. रोजचे पेपर्स, त्यातले संपादकीय वाच. सामान्य ज्ञान वाढव. मुन्नी तू मुळी हुशारच आहेस. तू सहज आय.ए.एस. होशील गं.''

''मम्मी, खरंच मला खूप मोठ्ठं काहीतरी व्हायचं आहे गं. मी काहीतरी झाले की मग मला माझ्याजवळ विमली आणि गज्याला आणायचं आहे. मम्मी, मला त्यांची खूप आठवण येते गं. इथे डायनिंग टेबलवर बसून मी मस्तमस्त खातपीत असते, छानछान कपडे तू मला घेऊन देतेस. पण माझे बहीणभाऊ तिकडे कोणत्या परिस्थितीत असतील, ते काय खात असतील, बाप विमलीला किती त्रास देत असेल, असं सारखं मनात येत असतं. मम्मी, विमली मला नक्की खूप स्वार्थी समजत असेल. तिला तर माझा रागच येत असेल. आम्हा लहान भावंडांना इथे या खातेऱ्यात सोडून स्वतः तिकडे मजा मारते असं वाटत असेल विमलीला.'' बोलताबोलता मुन्नी रडायलाच लागली. वैदहीनं तिला जवळ घेऊन समजावलं.

''उगी. उगी राहा मुन्नी. अगं आपण नक्की आणू विमलीला आणि गज्याला पण. मुन्नी, त्यांनाही इकडे आणण्याचे आपण मध्येमध्ये प्रयत्न नाही का केलेत? पण तुझ्या त्या जहांबाज बापासमोर आपलं काहीच चाललं नाही. मुन्नी, तुझ्याबद्दल विमल असा वेड्यासारखा विचार अजिबात करणार नाही. तिला माहिती नाही काय,

a

तू कोणत्या परिस्थितीत इकडे आलीस ते. उलट तिला चांगलं वाटलं असेल की, किमान आपली बहीण तर शिकतेय. ती तर कुठेतरी सुखात आहे? मुन्नी, मला मात्र खूप चांगलं वाटलंय की अजूनही तू तुझ्या बहीण-भावंडांना विसरली नाहीस. त्यांना स्वतःजवळ आणण्याची आस तुझ्यात आहे. एरवी लोक इतके स्वार्थी असतात गं, की त्यांना स्वतःच्या पलीकडे जाऊन विचारच करता येत नाही."

"व्वा. असं कसं. तू तर सारखा इतरांचाच विचार करतेस. तू माझा विचार केलास म्हणूनच ना मी इथवर आले. त्या घर सोडलेल्या बायांचा विचार करतेस. त्यांच्यातल्या कोणत्याकोणत्या बायकांना कायकाय कामी लावते. परवा आमच्या कॉलेजमध्ये माहितीय कोण आलं होतं? शेवंताबाई. साड्या आणि चादरी विकायला. मी जॉन सरांना भेटायला स्टाफरूममध्ये गेले तर तिथे लेडीजस्टाफला चक्क शेवंताबाई साड्या दाखवत होत्या आणि आमच्या मॅडम त्या मस्त बघत होत्या. मला तर शेवंताबाईच्या धाडसाची गंमतच वाटली."

"बोललीस की नाही तू तिच्याशी?"

"अगं तीच आधी मला म्हणाली, 'काय मुन्नी कशी आहे? ताई कशा आहेत? ताईमुळे हे दिवस मला दिसलेत' आणि तिनं आमच्या पटवर्धन मॅडमला सांगितलं. सगळा स्टाफ परवा माझ्याकडे एका वेगळ्याच कुतूहलाने पाहत होता. आई, कधीकधी मी विचार करते, त्यादिवशी भैयाने फोन केल्यावर तू तिथे आली नसतीस, तिथून तू मला सोडवलं नसतंस, तर मी ... माझं काय झालं असतं गं? मम्मी, आज मी कुठे असते?"

"मुन्नी, मुन्नी तू असले वेड्यासारखे विचार मनात का आणत असतेस? अशी कशी मी नसते आले? आलेच असते मी. आलेच असते. मुन्नी, तुझं आयुष्य

a

असं नासायसाठी नाही आहे बेटा. यू आर माय ब्रेव्ह डॉटर मुन्नी. आय लव्ह यू. जा, आईस्क्रीम घेऊन ये. आपण खाऊया. देवयानीला फोन कर. बघ. ती येतेय का.''

''आत्ता? मम्मी रात्रीचे दहा वाजताहेत.''

''दहा? बघ तुझ्याशी गप्पा मारत बसले नि किती वेळ झाला, कळलंही नाही. चौकातल्या दिनशॉमध्ये फोन कर तुला हवं असेल तर, तो देईल पार्सल आणून.''

''नको, मलाही आता मूड नाही. उद्या खाऊया.''

''जा मग अभ्यास कर. मी जरा एवढी बिलं बघते.''

वैदेही ऑफीसला जाण्याच्या गडबडीत असताना फोन वाजला.

''मॅडमजी है?''

वैदेहीला आवाज ऐकूनच कळलं, हा फोन भैयाचा. एवढ्या दिवसांनी अचानक असा भैयाचा फोन म्हणताच, वैदेहीला आश्चर्यच वाटलं.

'' हां. बोल रही हूँ.''

''मॅडमजी, वो सायना फिरसे यहा आई.''

''क्या?'' वैदेही आश्चर्याने करवादलीच. तिच्या जिवाचा अक्षरशः तिळपापड झाला. किती चतुराईने आपण तिला तिथून काढलं होतं. केवढी स्मार्ट पोरगी. दवाखान्यात रिसेप्शनिस्ट म्हणून लावली, होस्टेलमध्ये ठेवलं, तिला बाहेर काढताना तर पहिलवानाचा भयंकर राग ओढवणार होता. तिथलं स्मार्ट पाखरू होतं ते. सहज

a

लोकांच्या लक्षात भरेल असं. पहिलवान आणि आंटीच्या मर्जीतली होती ती. खास लाडकी. सायनाने परिस्थितीशी एवढी चांगली हातमिळवणी करून घेतली होती की तिला या व्यवसायात भरपूर मिळकत झाली होती. गिऱ्हाईक गळाला कसा लावायचा, यात ती प्रवीण होती. ऐन पंधरा सोळाव्या वर्षांतच या व्यवसायाला बळी पडली. पण मुसमुसणारं तारुण्य, बड्याबड्या घरी कामाला असल्यामुळे सगळ्या आधुनिक गोष्टींशी पहचान, कोणाशी कसं वागावं याचं तारतम्य या सगळ्या गोष्टींची सांगड झाल्यामुळे 'चांगले गिऱ्हाईक' तिला सहज मिळायचे. गांधीबाग, बर्डी, रमण सायन्स सेंटर, स्टेशन हा तिचा नेहमीचा इलाका. साधारण तिथल्या मुली जशी केशभूषा, वेशभूषा करतात त्याला तर तिने फाटाच दिला होता. ते भडक लिपस्टिक नको नि गचाळ रंगाचे ड्रेसेस नको. आधुनिक रंगसंगती, सभ्य माणसांना आवडतील असा लिपस्टिकचा शेड, त्यातही लॅक्मे एक हजार छप्पन तिचा आवडता आणि खास डेनिमचा स्वस्तातला गॉगल. ड्रेस कोणताही असो, लो कट ठेवायला मात्र विसरत नसे ती. स्लिव्हलेस ब्लाऊझ आणि लो कट गळा हे तिचं भांडवल होतं. नजरेतलं आव्हान चालत्या माणसाला तिच्या मागे यायला भाग पाडायचं. बोलण्यातली लाडिक शब्दावळ माणसाला भुरळ पाडायची. हे सगळं ती स्वत: प्रयत्न करून शिकली होती. सायना वैदेहीला आवडायची. तिच्याबद्दल करुणा वाटायची. ती ज्या परिस्थितीत इथे पोचली, त्यामुळेच वैदेहीची तिच्याकडे, नकोशीकडे किंवा किरण देशमुखकडे बघण्याची दृष्टी वेगळी होती. सायना तिथून बाहेर पडायला केव्हाही तयार होती. पण जायचं कुठे हा प्रश्न तिच्या समोर होता.

"ते माझ्यावर सोड. फक्त तू स्वेच्छेने येते आहेस यावर ठाम राहा. सायना तू सज्ञान आहेस. मुन्नीच्या वेळची गोष्ट वेगळी होती. त्या दहा-अकरा वर्षांच्या मुलीला पळवून नेण्याच्या आरोपाखाली एखादवेळी मीच कायद्याच्या कचाट्यात सापडले

असते. त्यावेळी मी खरंच जिवावर उदार होऊन काम केलं. त्यावेळी आपल्यासोबत अप्रत्यक्षपणे पी. एस. आय. देवतळे होते. आपण खुलेपणाने पोलीसला मुद्दाम त्यात सहभागी करून घेतलं नव्हतं कारण चक्क बापाच्याच घरी ती सुरक्षित नाही म्हणताच, कदाचित तिची रवानगी बाल सुधारगृहात झाली असती किंवा एखाद्या अनाथाश्रमात. जे मला नको होतं. मुन्नी माझ्यासाठी आव्हान होती. मुन्नीची मैत्रेयी करून तिला तिचं व्यक्तिमत्त्वं मिळवून देणं ही माझी जिद्द होती. तुझ्यासंदर्भात असे कोणतेच प्रश्न आज नाहीत. तू अठरा वर्षांपेक्षा जास्त आहेस. तुझी आई तुला जबरदस्तीने घरी नेऊ शकत नाही. तुझा 'साब' तुला सोबत ठेवायला तयार असेल तर त्याची बायकोही त्यावर आक्षेप घेऊ शकत नाही. येऊन-जाऊन तो तुझ्याकडे सहा-आठ महिने राहिला तरी नंतर तुम्ही एकत्र राहूच शकता. लिव्हिंग रिलेशनशीपचा कायदा तुमच्या बाजूने आहे. उलट तुझ्या संदर्भातलं सगळं उत्तरदायित्व तुझ्या साबचं असेल."

"मग मी नक्कीच इथून बाहेर पडणार. माझा प्राध्यापक गिऱ्हाईकही मला नेहमी हेच सांगतो, 'तू इथून बाहेर पड. चांगलं वाच, चांगली राहा, नोकरी कर.' तो माझ्या इथल्या पहिल्या रात्रीचा पहिला गिऱ्हाईक. अजूनही येतो, मायेनं वागतो, माझी काळजी घेतो, माझे पाय चेपतो, मुख्य म्हणजे कमरेला तेल लावून देतो. म्हणतो, 'या साल्या बत्तमीज पुरुषांना झेलताझेलता तुझ्या कमरेची हाडं खिळखिळी झाली असतील. अनेकदा काहीही न करता माझे फक्त लाड करूनच तो वापस जातो. गप्पा मारतो, बायकोसोबत झालेली भांडणं सांगतो. एखादवेळी माझ्या मांडीवर डोकं ठेवून रडूनही घेतो."

"प्रेमात पडलीस की काय प्राध्यापकाच्या? त्याच्या सोबत जायचं आहे?"

a

“नाही. नाही. त्याच्यात एवढी हिंमतच नाही. बायकोसमोर त्याची हिंमत नाही माझ्याकडे पाहण्याची. मला माझे साबच हवे आहेत. मॅडम, माझे साब मिळतील मला?”

“नक्की मिळतील. आधी तू इथून बाहेर ये. मी तुला कुठेतरी छोटीमोठी नोकरी लावून देते. तुझ्या राहण्याच्या व्यवस्थेचंही बघते. त्याची तू काळजी करू नकोस. सायना, आपल्याला असं आयुष्य एकदाच मिळतं गं. त्याचा चांगला उपयोग करून घ्यावा. स्वच्छ, शुद्ध मनाने जगावं.”

“आपलं शरीर ही एक सुंदर फुलांची बाग आहे. त्यात डोळे, कान, नाक, हृदय असे विविध सुंदरसुंदर फुलं आहेत. आपली बाग, आपल्या हक्काची बाग आपण आपल्या मनाच्याविरुद्ध कुणाला तरी ओरबाडू द्यावी काय? डेरेदार झाड; ज्याला भरपूर गुलाबाची फुलं लागली आहेत, त्या झाडाची फुलं, पानं कुणी एखाद्या राक्षसी माणसाने तोडली, ओरबाडली तर ते झाड कसं दिसेल? ऐन तारुण्यात वैधव्य आलेल्या स्त्रीसारखं ना? सायना, तुझं आयुष्यही तसंच आहे. ऐन तारुण्यात कुणीही यावं आणि तुझ्या इच्छेविरुद्ध तुझं शरीर ओरबाडावं. का? नाही सायना. तू या प्रवाहात जास्त वाहता कामा नये. आधी जे झालं ते चुकीनं झालं. तुझ्या साबला ऐनवेळी परिस्थितीवर मात करून तुझ्यापर्यंत नाही पोचता आलं. हॉटेलच्या मॅनेजरने स्वतःच्या उपभोगासाठी तुझा बळी घेतला. पण आता नाही. आता तू बोलू शकतेस. स्वतःचा विचार करू शकतेस. मी तुझ्यासोबत आहे. माझा आग्रह आहे तुला की तू इथून बाहेर पड. तुझ्या मनाविरुद्ध पहिलवान तुला इथे डांबून ठेवू शकणार नाही.”

“मॅडम, तो मला इथून जाऊ देणार नाही.”

“का?”

"मॅडम, माझ्यापासून त्याला खूप इन्कम आहे. धंदा चालतोय त्याचा. चांगले गिऱ्हाईक येतात. शिवाय पोलीस त्याच्या बाजूनं आहेत. तो पोलिसांना हप्ता देतो."

"कोणत्या पोलिसांना? या एरियातल्याच नं? तू त्याची काळजी करू नकोस. हप्ते देऊनदेऊन तिथल्या दादालोकांना असे त्या एरियातल्या छोट्यामोठ्या पोलिसांचे हात बांधून ठेवता येतील. तसं ते करतात, याची जाणीव आहे मला. हे असं फार काळ नाही चालू शकत गं." वैदेही सायनाला समजवत होती.

"मॅडम, तुम्हाला तिथली परिस्थिती माहिती नाही. अहो, कारण नसताना पोलीस आमच्या एरियात येतात. त्यांना हव्या त्या बाईला कारण नसताना अटक करतात. पोलीसचौकीवर घेऊन जातात. पाहिजे तेवढा वेळ तिला वापरून घेतात, तिच्याच जवळचे पैसेही हडपतात आणि दुसऱ्या दिवशी सोडून देतात. आता पोलीसच आम्हाला त्रास देतात म्हटल्यावर आम्ही तक्रार कुठे करायची?"

"सायना, मी म्हटलंय ना तू काहीही काळजी करू नकोस. ते सारं माझ्यावर सोड. पोलीस कमिश्नर आपले चांगले मित्र आहेत. अतिशय सभ्य गृहस्थ आहेत. त्यांना स्त्रियांच्या चळवळीबद्दल आदर आहे. ते या कामात गरज पडली तर आपल्याला नक्की मदत करतील. एरवी ज्या धाडी पडतात, इथल्या वारांगणांना अटक होते आणि लगेच त्या सुटतातही हा सारा एक फार्स असतो सायना. त्यावरून तू काही अंदाज बांधू नकोस. बघ मला ही पूर्ण व्यवस्था तर नाही बदलवता येत, पण तुझ्यासारख्या, मुन्नीसारख्या एकदोन मुलींना जरी मी इथून-या नरकातून बाहेर काढू शकले तरी माझ्या या आयुष्याचा उपयोग झाला असं मी समजेन."

"मॅडम, मला नक्कीच इथून बाहेर पडायचं आहे. फक्त एक भीती होती मनात. ती पण तुम्ही घालवली. मात्र माझ्या नोकरीचं तेवढं बघा. आणि माझे साब

a

मला भेटवून द्या. एकदा माझे साब मला भेटले की मला जगात कुणाचीच गरज नाही. ते मला फ्लॅटमध्ये ठेवतील. माझी काळजी घेतील.”

“सायना, तुझ्याजवळचा साबच्या नंबरचा कागद जरी त्या गडबडीत हरवला, किंवा तुला त्यांचा ऑफीसचा पत्ता माहीत नसला तरी तुला घरतर माहीत आहे ना? कारण तिथे तू कामच केलेलं आहेस.”

“होय मॅडम. साबचं घर मला माहीत आहे.”

“मग तो पत्ता तू मला दे. मी तुझ्या साबलाच भेटते.”

“मॅडम तुम्ही तिथे जाणार? आंटी.... आंटी असेल ना तिथे. आंटीसमोर बोलणार?”

“वेडाबाई, एवढी मूर्ख आहे का मी? तू त्याची काळजी करू नकोस. ते सगळं नीट होईल.”

वैदेही फक्त सायनासोबत बोलून थांबली नव्हती तर तिनं खरंच चावलाची भेट घेतली. त्याला ‘आमच्या आश्रमाला मदत करा’ म्हणून विनंती केली. शिताफीनं त्याचं व्हिजिटींग कार्ड घेतलं आणि एकदिवस त्याच्या ऑफिसातही जाऊन थडकली.

सायनाचा पत्ता वैदेहीजवळ आहे म्हणताच आधी तो खूषच झाला, आनंदित झाला, त्याचे डोळे चमकले.

“कुठे आहे ती? मला तिला ताबडतोब भेटायचंय. अहो अचानक त्या हॉटेलमधून ती बेपत्ता झाल्याचं मला फोनवरून पंडितने सांगितलं होतं. पण मी त्यावेळी माझ्या मुलाच्या आजारपणात व्यस्त होतो. माझा सोन्यासारखा लहानसा दोन वर्षांचा मुलगा गंभीर आजारी होता. त्याला मला ताबडतोब कलकत्त्याहून

बंगलोरला न्यायचं होतं. त्याचदिवशी मी एअरपोर्टवर असताना मला पंडितचा मेसेज आला. "सायना हॉटेलमधून पळून गेलीय." माझ्या हृदयात तीव्र कळ उठली. पण मी विचित्र प्रसंगात अडकलो होतो. माझं दुःख माझ्या एकट्याचं होतं. मी कुणाजवळ काही बोलूही शकत नव्हतो. माझ्या हातावर दोन-अडीच वर्षांचा गंभीर आजारी गुड्डू आणि हृदयात सायना. तिच्यासाठी जीव तळमळत होता. हॉटेलमध्ये मॅनेजरला ताबडतोब फोन करून काही विचारण्याचीही सवड माझ्याजवळ नव्हती. दोन दिवसांनी जेव्हा बंगलोरहून थोडी सवड मिळताच फोन केला, तेव्हा चेकआऊट करून ती निघून गेली, एवढीच माहिती मला मिळाली. पंडित तर काहीच बोलायला तयार नव्हता. तिच्याकडून घरी गेल्यावर हॉटेलमध्ये काय घडलंय, याबद्दल त्याला काही माहीत असण्याचं कारणच नव्हतं. मी तिथून काहीही करू शकत नव्हतो. साधी पोलीस कंप्लेंटसुद्धा नाही."

"मि. चावला. मला सायनानं सगळं सांगितलं. सायनासुद्धा मजबूरच होती. परिस्थितीला बळी पडली. मॅनेजरनेच तिला फसवलं. तो तिला घेऊन चक्क 'गंगाजमुना' त गेला. हे सांगताना सुद्धा मला फार वाईट वाटतंय, पण सत्य हेच आहे की सायना आजही तिथेच आहे आणि अजूनही ती तुमची वाट बघत आहे. 'साब आके मुझे यहासे ले जायेंगे' असं सारखं ती म्हणत असते."

"गंगाजमुनात? सायना गंगाजमुनात? ओ शीट. डर्टी फेलो. तिथे त्या नरकात कशाला? ... कशाला? मी तिला घेऊन किती स्वप्न पाहिली होती. मॅडम, मै उसको सिर्फ मेरी राते रंगीन करनेके लिये नही लाया था. उसमे ऐसा कुछ था, जो मेरी जिंदगी खुबसूरत कर सकता था. मला तिला शिकवायचं होतं. शहाणं करायचं होतं. लोकांकडली धुणीभांडी करण्यासाठी तिचं आयुष्य नव्हतं हो. ती माझ्याकडे कामाला होती, तेव्हाही तिनं शिकावं, असा माझा आग्रह होता. मी तिला पुस्तकं

वाचायला आणून द्यायचो. ‘ययाती’ कादंबरी केवढी आवडली होती तिला. पारायण करायची ती त्या ययातीचं. आणि ती आता हे काय करून बसली. ओ.नो. बकवास. गंदा. एकदम गंदा काम.”

“मि. चावला. प्रश्न जरा नीट समजून घ्या. ती स्वेच्छेने तिथे गेलेली नाहीय. तिला फसवून तिथे नेण्यात आलेलं आहे. लोकांनी तिचं शरीर जरी वापरलं असलं तरी आजही तिचं मन पवित्र आहे आणि ते केवळ तुमचंच आहे. ती तुमची पूजा करते. आजही ती तुमच्या तेवढीच प्रेमात आहे, जेवढी तेव्हा होती.”

“पण आतापर्यंत हजारो लोकांनी वापरलेल्या त्या शरीराचं मी काय करू?”

“चावला? शरीर? शरीराचं काय करायचं असतं? तुम्हीच म्हणालात ना, तिचा जन्म धुणीभांडी करण्यासाठी नाही. ती तुमचं आयुष्य रंगीन करणार होती? लोकांनी शरीर वापरलं, चावला. तिला नाही. आजपर्यंत तिला कुणीही जिंकू शकलेलं नाही. ती आजही तुमचीच आहे. पवित्र आहे. शेवटी मनच महत्त्वाचं असतं चावला. तुम्हाला माहिती आहे, पुरुष जसा रोजच आंघोळ केली की स्वच्छ होतो ना, रात्रीचं पाप त्याच्या सकाळच्या आंघोळीनी धुतल्या जातं, ही या पुरुषव्यवस्थेनं केलेली सोय आहे. पण स्त्रीच्या पावित्र्याची सोय निसर्गानंच केली आहे. स्त्री रजस्वला झाली, की दर महिन्यात ती पवित्र होते. नव मीलनासाठी, नवनिर्मितीसाठी ती स्वच्छ, शुद्ध, पवित्र झालेली असते. मृगाच्या पहिल्या पावसाने वसुंधरा जशी वर्षभराच्या घाणीने लडबडलेली असली तरी स्वच्छ होते ना, तसंच स्त्रीचं आहे. चावला, सायनाच्या पावित्र्याबद्दल तुम्ही निःशंक असा हो. एकदा ती तुमच्या सोबत राहायला लागली, तुम्ही तिचा स्वीकार केला की सगळं जुनं संपून जाईल. फार गुणी पोर आहे ती. तुमच्यामुळेच तिचं सोनं होऊ शकतं.”

a

"पण माझं वाटोळं होईल. तेव्हाची गोष्ट वेगळी होती. तेव्हा ती केवळ माझी होती. फार प्रेम केलं मी तिच्यावर."

"आताही करा. ती तुमचीच आहे. माझ्यावर विश्वास ठेवा."

"सॉरी मॅडम, आता मी तिला स्वीकारू शकत नाही. कुणीकुणी वापरलं असेल तिला माहीत नाही. माझ्या ओळखीचेही काही लोक कदाचित तिच्यापर्यंत गेले असतील. जर त्यातल्या कुणी तिला ती माझ्याजवळ असताना ओळखलं तर लोक मला चुकीचं समजतील. म्हणतील, वेश्या चावला की रखेल है!"

"चावला, एक गोष्ट अगदी खरंखरं सांगा बरं. 'सायना वेश्या आहे,' असं तुम्ही माझ्या डोळ्यात पाहून म्हणू शकाल?'

.....

"म्हणू शकता?"

"नाही नं. मग का तुम्ही तिच्यावर कोणत्या फालतू लोकांसाठी असा आरोप करता आहात. तिथे जाणारी तुमच्या ओळखीची जी माणसं आहेत, त्यांना नाही तुम्ही झिडकारणार? त्यांच्याशी नाही तुम्ही संबंध संपवणार. आणि जिचा काहीच दोष नाही, त्या बिचाऱ्या निष्पाप पोरीला ही उगाचंच एवढीमोठी शिक्षा? तुम्ही आता एकमेकांचे कुणीच राहिला नाहीत? हेच तुमचं प्रेम? प्रेम असं स्वार्थी नसतं चावला. तुम्हाला प्रेम म्हणजे काय हेच कळलेलं नाहीय. प्रेम तो प्राध्यापक करतो सायनावर, जो केवळ तिची वास्तपुस्त करायला अनेकदा येतो. तिचे पाय चेपून देतो. तिची काळजी घेतो. त्या बदल्यात तो तिच्याकडून कोणतीच अपेक्षा ठेवत नाही. प्रेम त्याला म्हणतात. स्वत:च्या भावनांबद्दल हळवे असलेले तुम्ही, तिच्याबाबत असे उद्दाम आणि बोथट कसे होऊ शकता?"

a

“चावला, खरं सांगू, तुम्ही फार स्वार्थी आहात. सायनासारख्या पोरीने तुमच्यावर प्रेम करावं, या लायकीचेच नाही तुम्ही.”

“मॅ ऽऽ डम” जरा कठोर आवाजातच तो म्हणाला.

“ओरडू नका. ऐका. फक्त पैशाने माणूस मोठा होत नसतो माणसाचं मन मोठं पाहिजे. ते तुमच्यापेक्षा सायनाचं मोठं आहे. एकाहून एक सरस माणसं सायनाच्या आयुष्यात येऊनही ती अजूनही तुमचीच आहे. अजूनही तिचं तुमच्यावरच प्रेम आहे. पण तुम्ही... तुम्हाला तुमची प्रतिष्ठा महत्त्वाची आहे. पत्नी महत्त्वाची आहे. त्यावेळीच या सगळ्या गोष्टींचा विचार करायला हवा होता ना. तेव्हा घरातल्या घरात एक आयतीच मुलगी वापरायला मिळाली, ती वापरली, वापरून चोळामोळा करून फेकून दिलीत.”

“मॅडम, मी तुम्हाला सांगितलंय, त्यावेळी माझी मजबुरी होती.”

“होय. ऐकलंय मी ते. समजूनही घेतलं. पण आज तुमची मजबुरी नाही ना. तुमच्यामुळे त्या मुलीवर हे दिवस आले आहेत, तुम्ही तिच्या आयुष्याचा असा बट्ट्याबोळ केला. तुम्ही जर का तिला तिच्या घरट्यातून बाहेर काढलंच नसतं तर आज ती आपल्या घरात सुरक्षित असती ना. रोज असल्या घाणेरड्या लोकांच्या स्वाधीन तिला आपलं शरीर नसतं करावं लागलं. स्वार्थी. स्वार्थी आहात चावला तुम्ही.”

“मॅडम, तुम्ही काहीही म्हणू शकता. पण माझा नाइलाज आहे. आता मी तिला स्वीकारू शकत नाही. तुम्ही म्हणताय तसं माझ्यामुळे जर का तिचं असं नुकसानच झालं असेल, तर मी ते भरून द्यायला तयार आहे.” बोलताबोलता त्याने ड्रॉवरमधून चेकबुक काढलं, आणि तिच्याकडे बघत म्हणाला, “सांगा कितीचा आकडा टाकू? पंचेवीस हजार? पन्नास हजार?”

a

“बस. एवढीच किंमत आहे तुमच्याजवळ तिची?”

“एक लाख?”

“चावला, तुमची काय दानत आहे, हे मला कळलं. ज्या एका निष्पाप मुलीला तुम्ही आयुष्यातून उठवलंय, त्या मुलीची तुम्ही पैशात किंमत करू शकता. पैशांच्या व्यवहारात रमणाऱ्या तुम्हा व्यापाऱ्यांना स्त्रीच्या आयुष्याचं मोल काय कळणार? तुम्हाला माहितीय, तुम्ही तिला हॉटेलमध्ये सोडून गेलात आणि त्या मॅनेजरने तिला गंगाजमुनात नेऊन विकलं, त्यावेळी ती प्रेगनंट होती. प्रेगनंट. आणि त्याला कारणीभूत आपण होतात, साहेब आपण. चांगूलपणाचे काळजीवाहू सरकार आपणच आहोत, हा तोरा आहे नं आपला. हा तुमचा पराक्रम निस्तरावा लागला मात्र त्या कोवळ्या अठरा-एकोणीस वर्षांच्या पोरीला. तीन महिने झाल्यावर तिला ‘आपल्याला दिवस गेलेत’ हे लक्षात आलं. दवाखान्यात जाऊन गर्भपात करेपर्यंत चार महिने झाले होते. डॉक्टर गर्भपात करून द्यायला तयार नव्हते. केवढा राडा झाला. त्यापेक्षा जास्त हाल तिचे नंतर झालेत. गर्भपात करून आल्याआल्या दुसऱ्याच दिवशी आंटीनी तिला धंद्यावर बसवलंच. तिची शारीरिक आणि मानसिक परिस्थिती लक्षात न घेता. तुमच्यामुळे त्या पोरीचे किती हाल झालेत याची कल्पना आहे तुम्हाला? हे सारे भोग तुम्ही भरून देऊ शकता?”

वैदेही जे काय सांगत होती, ते सारं चावलासाठी नवं होतं. तो खरं तर आश्चर्यचकित झाला. या कोणत्याच गोष्टींची त्याला कल्पना नव्हती. तिच्यासाठी त्यावेळी तोही खूप झुरला होता. त्यांच्याच घरच्या कामावरून ती बेपत्ता झाली, अशी तिच्या आईने पोलीस तक्रार केल्यामुळे मुलाच्या आजारात व्यग्र असलेल्या चावला पतिपत्नीला पोलिसांनी फोनवर चौकशी करकरून खूपच त्रास दिला. पण ऑफीसच्या कामासाठी कलकत्त्याला गेलेला चावला तिथूनच सरळ धनबादला

आला याच कल्पनेत असलेल्या मिसेस चावलाला नवऱ्यावर थोडाही संशय आला नाही. तिच्या बोलण्यात एवढा सुस्पष्टपणा होता की पोलिसांना सुद्धा या घरात काही गडबड असेल अशी शंका आली नाही. त्यामुळे त्यांची चौकशीची सूत्र थोडीही इकडे-तिकडे हलली नाहीत. शेवटी त्याच्या लेखी बोलूनचालून काम करणारी पोरगी. ते काय त्या तक्रारीला फार महत्त्व देणार!

"मॅडम, माझ्यामुळे सायनाला फार भोगावं लागलं, याची जाणीव आहे मला. पण तुम्ही मलाही थोडं समजून घ्या ना. मी फारच मजबूर होतो त्यावेळी."

"मी त्यावेळची गोष्टच करत नाहीये. मला आज तुमच्याकडून न्यायाची अपेक्षा आहे. सायना आजही तुमची आहे. तुमची वाट बघत आहे."

"सॉरी मॅडम. अब मैं कुछ नही कर सकता. माझी पत्नी हार्टपेशंट आहे. मला तिला जपलंच पाहिजे."

"तेच....तेच म्हणतेय मी, की सायनासारख्या गुणी मुलीने तुमच्यावर प्रेम करावं, या लायकीचेच नाही आहात तुम्ही. आपल्यामुळे ज्या मुलीची एवढी अधोगती झाली, तिला एकदा भेटून तिचं सांत्वन करण्याची सुद्धा दानत नाहीये तुमची."

वैदेही हरलेल्या मनाने तिथून उठली. तिला फार अपराध्यासारखं वाटत होतं. चावला सहज तयार होणार नाहीच, याची तिला शंभर टक्के खात्री होती. पण अशा पद्धतीने नाकारेल, असं नव्हतं वाटलं. किमान आधी तो तिला भेटण्याची तरी उत्सुकता दाखवेल, असं तिला वाटलं होतं. पण हाही 'पुरुष' च निघाला, याचं तिला खूप वैषम्य वाटलं.

**मै**त्रेयीचा आजचा शेवटचा पेपर होता. आधीचे तीनही पेपर्स तिचे अतिशय चांगले गेले होते. प्रो. सोहम महाजनसोबत तिने भरपूर अभ्यास केला होता. त्यांनी तिच्यावर खूप मेहनत घेतली होती. बारावीला एक्क्याण्णव टक्के मिळूनही पीसीएम ग्रुप घेणारी मुलगी त्यांच्या कुतूहलाचा विषय होती. सहज मेडीकल, इंजिनियरिंगला प्रवेश मिळत असतानाही ती बी. एससी. करतेय, याचं काय कारण असावं, अशी उत्सुकता त्यांना होतीच. एकदा गणिताची डिफिकल्टी विचारायला ती त्यांच्या केबीनमध्ये आली, तेव्हा त्यांनी तिला विचारलंच.

"मैत्रेयी, तुझा गणिताचा प्रॉब्लेम सॉल्व्ह झाला असेल, तर माझा एक प्रॉब्लेम सॉल्व्ह करशील?"

"सर सहज. आनंदाने. पण तुमचा कोणता प्रॉब्लेम मी सोडवू शकेल?"

"मैत्रेयी, मला एक उत्सुकता आहे. ती मी तुलाच विचारून मिटवू शकतो."

"काय ते?"

"तुला बारावीला एक्क्याण्णव टक्के मार्क्स आहेत. तुला मेडीकल, इंजिनियरिंगला हव्या त्या कॉलेजमध्ये अगदी मेरिट लिस्टप्रमाणे प्रवेश मिळाला असता. असं असताना तू अशी साधं पीसीएम ग्रुप घेऊन बी. एससी. काय करतेस? पुढे काय करणार? आमच्यासारखं प्राध्यापक?"

a

“नाही सर. प्राध्यापक होणं हे माझं आणि माझ्या आईचं स्वप्न नाहीय सर, मला सांगायला अजिबात संकोच वाटत नाही की मला बी. एससी. झाल्यानंतर युपीएससी, एमपीएससीच्या परीक्षा देऊन कलेक्टर व्हायचंय. माझ्या आईचं स्वप्न आहे, मी कलेक्टर व्हावं असं.”

“आणि तुझं?”

“आता तेच स्वप्न माझं आहे. माझ्या आईने सर्वप्रथम माझ्या मनात कलेक्टर होण्याच्या स्वप्नाचं बी पेरलं. त्याला खतपाणी दिलं. माझ्या स्वप्नाला हळूहळू आकार येतोय. सर, मला खूप मेहनत करायचीय. काय वाट्टेल ते झालं तरी मला कलेक्टर व्हायचं आहे. माझ्या आईचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी काय वाट्टेल ते करायला तयार आहे.”

“आईला फार मानतेस वाटतं.”

“तिची पूजा करते सर मी. माझ्या आईमुळेच तर आज मी आहे. नाहीतर मी कुठल्यातरी उकिरड्यावर असते.”

“म्हणजे? असं काय बोलतेस. तुझ्या आईला भेटलं पाहिजे एकदा. काहीतरी विशेष दिसतेय तुझी आई.”

“विशेष आहेच. सर तुम्ही भेटला आहात तिला.”

“कधी? कुठे? मला तर नाही आठवत.”

“सर, मागच्यावर्षी गॅदरिंगला प्रमुख अतिथी म्हणून ज्या उद्योगपती वैदेही वडस्कर होत्या, तीच माझी आई.”

“काय वैदेही वडस्कर मॅडमची मुलगी आहेस तू? पण मग हे एम.पी. पुनसे काय आहे?”

a

“सर, बेल झाली. माझा केमेस्ट्रीचा पिरेड आहे. परत कधीतरी बोलू या.”

“ठीक आहे. जा तू पिरेडवर. पण सायन्सच्या कोणत्याही विषयाची काहीही अडचण आली तरी केव्हाही मला तू भेटू शकतेस. माझा नंबर लिहून घे. तू नक्कीच कलेक्टर होशील. खात्री आहे मला तुझ्याबद्दल. जा. पण परत नक्की भेट हं.”

“ओ.के. सर बाय.”

मैत्रेयी पिरेडवर गेली पण प्रा. सोहम महाजनला अस्वस्थ करूनच. एक साधा प्रश्न सोडवायला निघालेले प्रा. सोहम महाजन, आता तर त्यांच्यासमोर भलंमोठं प्रश्नचिन्ह उभं ठाकलं. आपण काय ऐकलं, हे क्षणभर त्यांना कळलंच नाही. उत्सुकतेचा किडा त्यांच्या डोक्यात सारखा वळवळत होता. पिरेडवर ते गेले आणि वर्गात मैत्रेयी दिसली की ते अस्वस्थ व्हायचे. शिकवताना सारखं लक्ष तिच्याचकडे जातं. हेही त्यांच्या लक्षात आलं होतं. हे टाळण्याचा ते कटाक्षानं प्रयत्नही करायचे. पण त्यांच्याही नकळत त्यांची नजर उजवीकडे पहिल्याच बेंचवर जायची. अवघड गणितांची उत्तरं मैत्रेयीकडूनच मिळतात, याची त्यांना खात्रीही होती. पण त्यांच्या मनातल्या प्रश्नाचं उत्तर त्यांना लवकर हवं होतं. मैत्रेयीसोबत बोलण्याची संधी फक्त ते शोधत होते. लवकरच ती संधी प्रा. महाजनांना मिळाली. ट्युटोरियलच्या क्लासला. क्लासमध्ये केमेस्ट्रीची काहीतरी अडचण तिनेच त्यांना विचारली. ते दोघंही वर्गात बसून चर्चा करीत असतानाच सरांनी तिला तोच मागच्या भेटीत अर्धवट राहिलेला प्रश्न विचारला.

“सर, माझं आयुष्य एक कथा आहे. ती दोन-चार वाक्यांत नाही सांगता येणार. मी तुम्हाला आज एवढंच सांगू शकते की माझ्यासारख्या उकिरड्यावर वाढणाऱ्या तरोट्याच्या रोपाला माझ्या वैदेही मम्मीने तिच्या सुंदर बगिच्यात आणून गुलाबासारखं मानाचं, प्रेमाचं स्थान दिलं. तिला प्रेमाची खूप ऊब दिली म्हणून मी

आज इथवर आले. नालायक बापाची मुन्नी नावाची मुलगी आज मम्मीमुळे मैत्रेयी झाली. माझ्या गतायुष्याबद्दल किंवा मम्मीनं माझ्यासाठी जे केलं त्याबद्दल मी बोललेलं मम्मीला आवडत नाही. मलाही नाही. त्यामुळे तुम्ही मला परत काही विचारू नका. तिनं मला फार वेगळं वाढवलं आहे. आयुष्याची एक वेगळी जाण दिलीय. अपार कष्टानं तिनं मला घडवलं. माझं मन घडवलं.

"सॉरी. यापुढे कधीच विचारणार नाही. तू काय बोललीस हे मला अजिबात समजलेलं नाही तरी यानंतर युपीएससीचा अभ्यास आपण मिळून करायचा. माझीही तयारी चालली आहे. पण माझी आपली गंमत म्हणून."

"काय? तुम्ही पण युपीएससीची तयारी करताय?"

"होय. का? नाही जमणार?"

"नाही. काहीतरीच काय. तसं नव्हतं म्हणायचं सर मला. पण तुम्ही आता युपीएससी ची तयारी करताय आणि मी आपली वेड्यासारखी बी. एससी. पार्ट वन पासूनच त्या तयारीला लागले. सर, माझा जरा आगाऊपणाच आहे हा नाही का?"

"नाही गं. तू अगदी योग्यवेळी तयारीला लागलीस. मैत्रेयी, क्षितिजाच्या पल्याड जाणाऱ्या समुद्रातल्या जहाजाच्या शिडावर आपलं लक्ष असलं ना तर किमान समुद्रापर्यंत तर आपण जातोच. तू अगदी योग्यवेळी आपलं लक्ष्य काय आहे हे ठरविलंस. बारावीला असताना आयुष्याबद्दलच्या, करिअरबद्दलच्या तुझ्या कल्पना स्पष्ट आहेत, हे किती छान नं. लोक जातात, म्हणून नेहमीचा मेडीकल, इंजिनियरिंगचा मार्ग न स्वीकारता हा कष्टाचा मार्ग तू स्वीकारलास. काही ध्येय मनाशी बाळगून. मला तुझा अभिमान वाटतो."

“माझा कसला अभिमान त्यात. मम्मीचं क्रेडीट आहे हे. सर, माझ्या मम्मीने मला घडवलं. मी जेव्हा मम्मीजवळ आले ना, तेव्हा एकदम बावळट होते. काही कळत नव्हतं मला. झोपडपट्टीछाप होते एकदम मी. घाणीने, घाणेरड्या विचाराने बरबटले होते मी. चांगलंचांगलं काही असतं हे माझ्या गावीही नव्हतं. मम्मीने मला इकडे आणलं नसतं, तर त्या उकिरड्यातच पडून राहिले असते मी. ते तर मम्मीच्या मी नजरेत आले, भैयाने मम्मीला मदत केली, म्हणून आज मी इथे तुमच्या कॉलेजमध्ये आहे.”

“भैया कोण गं? आणि कोणता उकिरडा?”

“सर, तुम्हाला नाही कळणार. परत कधी. सर, आमची रेवादीदी मला म्हणाली, ‘आजकाल तू फक्त सायन्सचाच अभ्यास करते. जरा आर्ट्स आणि जनरल नॉलेजचीही पुस्तकं वाचत जा.’ तुम्ही करताय हा आर्ट्सचा अभ्यास? ईशानदादाने सांगितलं, ‘रोज कोणतेही दोन मराठी आणि ‘टाईम्स ऑफ इंडिया’ ही वर्तमानपत्रे वाचलीच पाहिजे. त्यातले अग्रलेख सुद्धा.’ वाचताय ना तुम्ही?”

“मैत्रेयी, आता ही रेवादीदी, ईशानदादा हे कोण? आणि तुझं अख्ख घरच युपीएससीची तयारी करतंय का?”

“अहो असे वैतागता काय सर? माझे बहीणभाऊ आहेत ते. आणि ते युपीएससीला नाही बसले. पण मी युपीएससी पास व्हायलाच हवी, अशी त्यांची मनापासून इच्छा आहे. ते मला गाईड करीत असतात.”

“काय करतात ही भावंडं तुझी?”

“रेवादीदी पुण्याला एमबीए करतेय आणि दादाचा बिझनेस आहे. आणि आमच्या देवयानीताईचं लग्नपण झालं.”

“बापरे मस्त आहे बुवा तुझं कुटुंब.”

“मैथिली असंच म्हणते. तिला तर माझा हेवा वाटतो. त्या सख्ख्या तीन बहीणभावंडात सारखी भांडणं असतात. आई नोकरी करते, म्हणून आईबाबांचं तर घरात फारसं लक्षच नसतं, असं ती म्हणते. ती स्वत:ला कायम लोनली फील करतेेे. तिचे वडील पण फार कडक आहेत म्हणे. पण मी आमच्या घरात मजेत आहे हे सगळं मला आईनं दिलंय. आईनं मला सन्मान दिला. तो कसा घ्यायचा तेही शिकवलं. तिनं माझ्यावर विश्वास ठेवला. माझ्या अंगभूत स्वभावावर, विश्वास ठेवला. अगदी आतड्यातून. म्हणून आज मी ‘अशी’ आहे. तसं तर माझा सख्खा भाऊ आणि बहीण तिकडे दूर एका झोपडपट्टीत राहतात. ते शाळेच्या वाऱ्यालाही उभे राहू शकले नसतील. माझ्या ‘बा’ नी त्यांना शिकवलंच नसेल. मला माहिती आहे. विमलीतर माझी वाट बघूनबघून थकून गेली असेल. मला आणायचंय तिला माझ्याजवळ. तिला सुखात ठेवायचं आहे मला. जरी ती शिकली नसली, तरी या शहरी वातावरणासोबत मी तिची चांगली ओळख घालून देईल. बस फक्त बाने तिला नासवलं नसलं म्हणजे झालं.”

“छी. भलतंच काय बोलतेस गं.”

“तुम्हाला नाही कळायचं सर. आमच्या जगात काय चालतं, याची जराही कल्पना नसणारे सुखी लोक आहात तुम्ही. आम्हीच आपले किड्यामुंग्यांसारखे गटारात जन्माला येतो आणि गटारातच मरतो. सर मला नोकरी करताना माझ्या भावंडांसाठी, माझ्यासारख्या लोकांसाठी खूप काही करायचं आहे मलाही आईसारखं काम करायचंय.”

‘म्हणजे नेमकं कसं?’

"सर, मला तेव्हा तर काही कळत नव्हतं. काही अंदाजही येत नव्हता. पण त्या पहिलवानाकडे जेव्हा मी होते ना, तेव्हा माझ्यासारख्या आणखी दोन-तीन मुली होत्या हो. राधा नावाची एक मुलगी होती. माझ्याच वयाची, खूप कमी काळात आमची दोघींची चांगली गट्टी जमली होती. तिलाही तिथून पळून यायचं होतं. मी तसं भैयाला म्हणालेही. पण का कोण जाणे लंगड्या तिचा रागच करायचा. पण सर, भैया मला खूप जपायचा हो. त्याचा मोठेपणा मला आता कळतोय. भैयाने माझी व्यथा जाणली नसती, मम्मीला माझं दु:ख लक्षात आलं नसतं तर...मम्मी.. मम्मीमुळे मी तिथून सुटले सर. नाहीतर माझं काय झालं असतं! बापरे कल्पनाही करवत नाही."

"मैत्रेयी, तुझी जर काही हरकत नसेल तर मला एकदा हे सगळं नीट ऐकायचंय. तू तुझ्या मूडप्रमाणे तुकड्या-तुकड्यांनी बोलतेस. मला नीट उलगडाच होत नाही. पण तुला त्रास होणार नसेल तरच"

"सर, मलाही एकदा तुम्हाला हे सारं सांगायचंच आहे. मी माझ्या बालपणी प्रत्यक्ष माझ्या जन्मदात्या बापाकडूनच काय वनवास भोगलाय, हे तर मी माझ्या मम्मीला सांगितलं. पण मम्मीने माझ्यासाठी काय केलं, हे मला ती कुणालाच सांगू देत नाही. मी तुम्हाला सांगेन. जरूर सांगेन. सर, माझी मम्मी तिथे त्या घाणीत आली नसती तर आज मला हे आयुष्य, हे कॉलेज, तुम्ही, हे काहीच दिसलं नसतं. ही सगळी सुखं मला माझ्या मम्मीमुळे मिळाली. मला राधाला पण इथे आणता आलं तर किती छान होईल नं?"

"ती कुठे आहे आता?"

"तिथेच. गंगाजमुनात."

"गंगाजमुनात तू... तू.. गंगाजमुनातून आलीस?"

“होय़ तिथूनंच मला आईने आणलं?

“क.. क.. काय?

“होय़ काय झालं सर? त्या घाणीतूनच मी आले आहे.”

“मैत्रेयी.. अगं.. काय सांगतेस तू हे?”

“सर खरं तेच सांगत़े “

“अगं कसं शक्य आहे?”

“तेच तर. खुद्द माझ्या मामाने आणि वडिलांनी मला तिथे नेऊन विकलं. पण आईने मला तिथून सोडवलं़ सर, मला त्या राधाला पण तिथून आणायचं आहे ह़े”

“मैत्रेयी, खरं तर तू काय बोलते आहेस, हेच मला कळत नाह़ी एखादी दरिद्री घरातली मुलगी, तिचे खुद्द सख्खे वडील तिला गंगाजमुनासारख्या गटारात नेऊन पोचवतील हे माझ्या आकलनाच्या बाहेरचं आहे. अगं माझ्यासारख्या पुरुषाला तर तिथेच काय त्याच्या आजूबाजूच्या परिसरात जाण्याची सुद्धा हिंमत नाह़ी आणि तू म्हणतेस तू तिथून आलीस़ “

“सर, मी खरंच सांगते. मीच काय माझ्यासारख्या अनेक आहेत तिथे. सायना, राधा, नकोशी, खुशबू, किरण आम्ही साऱ्या लहान पोरीच तर होत़ो आणि आमच्यासारख्या दरिद्री घरातल्याच तर मुली येतात तिथे.”

“तुझ्यासोबत किती पुरुषांचे संबंध आलेत?”

कुठलाही आडपडदा न ठेवता प्ऱा महाजनांनी तिला सरळ प्रश्न केल़ा खरं म्हणजे प्ऱा महाजन आता खूपच अस्वस्थ झाले होत़े ज्या मुलीबद्दल आपल्या मनात नुकताच प्रेमाचा गुलाबी कोंब उगवू पाहतोय, सतत मनाच्या भूमीवर वर येतोय,

a

ती...ती पोरगी त्या चिखलातून आली..ओ गॉड. नो. नो. त्यांनी स्वत:चं डोकं जोरात हलवलं. त्याच्या मनात आलेले विचार झटकून टाकण्यासाठी. पण त्यांच्या प्रश्नांनी अंगावर विजेचा लोळ पडावा तशी मैत्रेयी हादरली, तिचं शरीर महाजनांच्या एका शब्दानं पार होरपळून निघालं़ जे विसरायचा ती सारखा प्रयत्न करीत होती, आई तिला या साऱ्या गोष्टींपासून सतत दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत होती, तो प्रश्न सरांनी मात्र अगदी सहज विचारला़ ती कासावीस झाली़ काय बोलावं तिला सुचेना़ क्षणात तिचं शरीर घामानी थबथबलं़ तिच्या शरीराला कंप सुटला. साऱ्या संवेदनाच गोठल्या तिच्या. अगदी मनक्यातून कळ गेली तिच्या मस्तकात.

"मैत्रेयी, मैत्रेयी अगं काय ़हे शांत हो तू तुला त्रास होत असेल तर नाही बोलूया आपण या विषयावऱ मी सहज विचारलं तुला. प्लीज फरगेट ईट यार. बी रिलॅक्स."

"स... र ... स ... र" मैत्रेयी काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करीत होती़, पण ती आतून इतकी कासावीस आणि भयग्रस्त झाली होती, की तिला शब्दच फुटत नव्हते. महाजनांना आता गिल्टी वाटायला लागलं. भलताच नको तो प्रश्न आपल्या तोंडून निघालाच कसा, याचं त्यांनाच आश्चर्य वाटलं होतं. पण प्रत्यक्ष गंगाजमुनात वावरलेली मुलगी आपल्या सोबत आहे, केवळ सोबतच नाही ती आपली चांगली मैत्रीण आहे, तिच्याबद्दल आपण जरा जास्तच पझेसिव्ह आहोत अशी आपली मैत्रीण चक्क गंगाजमुनातून आली म्हटल्यावर खरं तर महाजनच खूप अस्वस्थ झाले होते. आणि गंगाजमुनाची सारी नाळ ज्या केवळ एका शरीराभोवती, लैंगिक वासनेभोवतीच जोडली गेली आहे, तोच नेमका प्रश्न नकळत त्यांच्या तोंडून बाहेर पडला. पण मैत्रेयीचा घाबरलेला, अस्वस्थ चेहरा बघून तेच फार अस्वस्थ झाले. आपण मैत्रेयीला नको तो प्रश्न विचारायलाच नको होता, याची त्यांना जाणीव

झाल्यामुळे त्यांना स्वत:चाच खूप राग आला. त्यांनी मैत्रेयीला सावरण्याचा प्रयत्न केला. पटकन लॅबमधल्या कोपऱ्यात असलेल्या वॉटर फिल्टरमधून तिथल्याच चपराशाला आवाज देऊन पाणी आणायला सांगितलं.

“मैत्रेयी...मैत्रेयी प्लीज, मैत्रेयी शांत हो तू. सॉरी. मी तुला नको तो प्रश्न विचारला. घे हे पाणी पी. प्लीज पाणी पी.”

बावरल्या नजरेनं मैत्रेयी सरांकडे बघत होती, “मैत्रेयी आधी पाणी पी. श्यामराव दे मलाच तो ग्लास.” सरांनी श्यामरावच्या हातातून पाण्याचा ग्लास घेतला. तिच्या खुर्चीजवळ स्वत: उभे राहून डाव्या हाताने त्यांनी मैत्रेयीचं डोकं किंचित आपल्या पोटावर घेतलं. तिचा चेहरा थोडासा उंचावला आणि उजव्या हाताने पाण्याचा ग्लास तिच्या ओठांना लावला. ‘घे आधी पाणी पी.’ मैत्रेयी असहाय हरिणीसारखी डोळ्यातल्या वेदनेला आत दडपून ठेवण्याचा असफल प्रयत्न करीत सरांकडे बघत होती. सरांनी तिला मूक नजरेनंच ‘आता काहीच बोलायचं नाही.’ असा इशारा केला आणि डाव्या हाताने तिच्या खांद्यावर थोपटत तिला जबरदस्ती चार-पाच घोट पाणी प्यायला लावलं. पाणी पिऊन झाल्यावर स्वत:चा रुमाल त्याच पाण्याने ओला करून तिच्या डोळ्यांवर ठेवला.

“सर, मैत्रेयीची तब्येत बिघडली काय?”

“होय. तिला घाबरल्यासारखं वाटतंय. एक काम कर श्यामराव तू. आम्ही आता कॉफी प्यायला कॅन्टीनमध्येच जाणार होतो. तूच दोन कप छान गरमगरम कॉफी घेऊन ये. कमी साखरेची, विलायची टाकलेली छान कॉफी घेऊन ये. जा पळ पटकन.”

श्यामराव कॉफी आणायला कॅन्टीनकडे गेला, लॅबमध्ये असलेले तुरळक दोन-तीन विद्यार्थी मैत्रेयीजवळ आले होते, त्यांनाही ‘उगाच गर्दी नको. निघा तुम्ही

’ म्हणून प्रा. महाजनांनी विद्यार्थ्यांनाही तिथून पिटाळलंच. तरीही जरा वेळ मुलं तिथे रेंगाळलीत आणि मैत्रेयी आता ओके आहे, असं बघून एकएक करीत तिथून निघून गेलीत. अधूनमधून काही मुलांचं येणं-जाणं चाललं होतं. पण ते त्यांच्यात्यांच्या कामासाठी. मैत्रेयीला दरदरून घाम गेल्यामुळे आणि तिच्या मनावर प्रचंड ताण आल्यामुळे तिला लगेच अशक्तपणा जाणवायला लागला होता. तिथे बसणंही नकोसं झालंय आता तिला. “सर मला घरी जायचंय.”

“का गं. अजूनही बरं नाही वाटत?”

“बर वाटतंय. पण बसवत नाही. मी घरी निघते.”

“मैत्रेयी, आता दोन मिनिटांत श्यामराव कॉफी आणेल, ती आपण घेऊया आणि लगेच निघू. मी तुला घरी पोहचवून देतो.”

“नको सर. मी जाईन माझ्या मैत्रिणीसोबत. रिंकी आणि मैथिली बायोचं प्रॅक्टिकल करून येतीलच एवढ्यात.”

“होय. येऊ देत त्यांनाही. पण आता तू गाडी चालवायची नाहीस.”

“नाहीच चालवू शकत मी आता गाडी. मला खूप नर्व्हसनेस आलाय. मैथिलीच्या गाडीवर डबलसीट जाईन मी.”

“का? माझ्या गाडीवर का नाही?”

वैदेहीनं फक्त प्रा. महाजनांकडे दुखऱ्या नजरेनं बघितलं. ‘गंगाजमुनातून आलेल्या मुलीची तर तुम्हाला ॲलर्जी आहे ना, मग आता कशाला?’ असा काहीसा भाव होता तिच्या नजरेत. प्रा. महाजनांना ते लक्षात आलं. त्यांना आता खूप गिल्टी वाटायला लागलं होतं. रिंकी, मैथिली कुणाच्याच नजरेचा सामना करायचा नव्हता त्यांना.

a

“चल, मैत्रेयी, ऊठ. मी पोहचवतोय तुला.”

“नाही, मी मैथिली आल्यावरच जाणार. अगदी विवेकसुद्धा येईल आत्ता. तो तर काय माझ्या घराशेजारीच राहतो. त्याच्या बाईकवर जाईन मी. म्हणजे मैथिलीलाही उलटं यायला नको.”

“मैत्रेयी. प्लीज, सॉरी. सॉरी म्हणतोय ना, चुकलं माझं.”

“छे सर. यू आर नॉट राँग. माझं नशीबच असं आहे.”

“मैत्रेयी, आपण यावर नंतर बोलूया. ऊठ.”

सरांनी तिला हाताला पकडून चक्क उठवलंच आणि समोरून येणाऱ्या तिच्या मैत्रिणींच्या घोळक्याला घाईत ते म्हणाले, ‘हिला बरं नाहीय. मी हिला हिच्या घरी पोहचवून येतो.’ मैत्रिणी तिच्याकडे बघत राहिल्या. तेवढ्या वेळात महाजनांनी तिचा हात धरून तिला लॅबबाहेर नेलंही होतं.

मध्येच त्यांनी एका छोट्याशा रेस्टॉरेंटसमोर गाडी थांबवली. ‘आपण इथे आईस्क्रीम खाऊया’ म्हणाले. तिनं नकार दिला.

तिच्या मनातल्या अंत:पटलावर विचारांची खूपच आवर्तनं गोलाकार उमटत होती. ती भयभीत झाली होती. आपल्या हुशारीबद्दल, आपल्याबद्दल प्रचंड कौतुक असणाऱ्या महाजन सरांना आपण गंगाजमुनातून आलोय, म्हटल्याबरोबर एवढा तिरस्कार वाटावा आणि आपल्या सगळ्या अस्तित्वाचा संबंध केवळ पुरुषांशी येणाऱ्या संबंधाशीच जोडावा. छी. तिच्या चेहऱ्यावर कडवटपणा पसरला. प्रा. महाजनांचा तिला रागच आला. आणि स्वत:च्या दुर्दैवाचाही. म्हणून आई आपल्याला कुणाजवळ काही बोलू देत नाही. आपणच मूर्ख. पटकन कुणावरही विश्वास ठेवतो.

a

"सर, मी इथून जाईल रिक्षा करून. तुम्ही नका माझ्यासाठी त्रास घेऊ."

"मैत्रेयी, राग अजूनही नाही गेला? सॉरी म्हणालो ना मी. मैत्रेयी, अग मनिध्यानी नसताना, भलतंच काहीतरी ऐकलंय ना मी. त्यामुळे एकदम नको ते तोंडातून निघून गेलं. त्या बस्तीची तेवढीच ओळख आहे गं मला. त्यापलीकडलं तिथलं जग मला काहीच माहीत नाही. त्यामुळे मनात प्रथम अगदी तोच विचार आला."

"सर. राग काय यायचा. पण एकदा माहीत झाल्यावर कशाला माझ्यासारख्या मुलीशी तुमचा-सुसंस्कृत घराण्यातल्या मुलाचा संबंध असावा? जाईल मी."

"मैत्रेयी, कान पकडून उठाबशा काढू? प्लीज यार. जरा माझ्या बाजूने विचार करून बघ. आणि मुख्य म्हणजे आपण रस्त्यावर उभे आहोत, याचं भान ठेव."

मैत्रेयीला याचं भान होतं. पण तिच्या मनाला झालेल्या वेदना तर व्यक्त होणारंच ना. प्रा. महाजनांसारख्या प्रगल्भ विचाराच्या पुरुषाकडून तिनं हे अपेक्षिलं नव्हतं. म्हणून ती फार दुखावल्या गेली होती. पण सरांना त्यांच्या बोलण्याचा आता पश्चात्ताप होतोय हेही तिला समजून चुकलं होतं. तिनं स्वत:ला सावरलं. हातातल्या रुमालाने तोंड पुसलं. आणि त्यांच्याकडे बघत म्हणाली, "चला, मम्मी वाट बघत असेल घरी."

"चल, पण मला माफ केलंस नं?"

"....."

"मैत्रेयी....सॉरी."

"सर, विषय संपला. चला आता."

“खरं?”

“अगदी खरं.”

“गुड गर्ल. केवढा डोंगर उतरला माझ्या मनावरून. चल घरीच सोडतोय तुला आता पटकन.”

महाजनांनी तिच्या खांद्यावर थोपटत तिला धीर दिला. वैदेही मॅडमच्या कामाचं स्वरूप प्रा. महाजन जाणून होते. कदाचित मैत्रेयी हे त्या कामाचंच फळ असावं, असा निष्कर्ष आता ते काढू शकत होते. विपरीत परिस्थितीतून आलेल्या मैत्रेयीने मॅडमच्या मदतीने इथवर मजल मारणं, लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसून एका सशक्त स्वप्नाची वाटेकरी होणं हे सारं त्यांना कौतुकास्पद वाटलं. त्याच कौतुकात त्यांनी गाडीला किक मारली. क्षणभर का होईना, पण आपण मघा मैत्रेयीबद्दल इतका घाणेरडा विचार कसा करू शकलो याचं त्यांना आता नवल वाटलं.

वैदेहीला जेव्हापासून सायना परत त्या गटारात गेल्याचं कळलं होतं, तेव्हापासून तिच्या मनात प्रचंड राग धुमसत होता. गेली ही वेडी मुलगी परत तिथे. चांगली नोकरी लावली, वसतिगृहात प्रवेश मिळवून दिला. लोकल गार्डियन म्हणून स्वतःचं नाव दिलं. आणखी काय हवं होतं हिला. ‘चांगलासा पोरगा पाहून त्याच्या प्रेमात पड आणि लग्न कर’ हाही फुकटचा सल्ला दिला. पण ही पोरगी शेवटी गेली त्या खातेऱ्यातच. त्यामुळे आज प्रचंड पाऊस कोसळत असूनही तो जर सायंकाळपर्यंत थांबला तर सायनाच्या आईकडे जायचं तिने ठरविलं. हातातली कामं

पटापट आटोपली. दशपुत्रेला नवीन ऑर्डरची कल्पना दिली. या दोन-तीन दिवसांत चेक न केलेले मेल बघितले. छोट्या-मोठ्या ऑर्डर्स दशपुत्रेला फॉलोअप करायला सांगितल्या. काही नवीन कस्टमर्सला बजेट हवं होतं, तेही पाठवलं. दोन-तीन ठिकाणी छोट्या मशिन्सबद्दल चौकशी केली. मि. राय आणि मि. जॅक्सनला मेल पाठविले. आजच्या लिस्टमधली सगळी कामं आटोपून तिने सुहासला मोबाईल लावला.

"हॅलो, काय करतोस?"

"सिगारेट ओढतोय" थंडपणे सुहास उत्तरला.

"व्वा. कित्ती मोठं काम करतोय."

"आता ऑफीसमध्ये बसून काय करणार दुसरं. मला काय तुझ्यासारखी कामं थोडी असतात ऑफीसात. मी आपला गंमत करायला तर येतो. वेळ घालवायला."

"काय झालं राजे. एवढे काय रागावलात?"

"माझी काय बिशाद आहे तुझ्यावर रागावण्याची."

"मग हे तिरकं बोलणं का?"

"आता तेवढंच तर माझ्या हातात आहे ना."

"सरळ सांग काय झालं ते."

"किती दिवसांनी फोन करतेस? माझ्या एसएमएसचं उत्तर का नाही दिलंस."

"त्या फालतू एसएमएसला मी काय उत्तर देणार?"

"फालतू? मी पाठवलेले एसएमएस फालतू?"

“सुहास, तू पाठवतोस, तशा प्रकारचे एसएमएस पाठविण्याचं आता आपलं वय राहिलंय का?”

“सतत तू वय का लक्षात ठेवतेस गं?”

“ठेवावं लागतं बाबा. ठेवावं लागतं. आम्हाला ठेवावंच लागतं.”

“वैदेही. अगं जरा वय विसरून स्वतःसाठी कधीतरी जगायला शिक.”

“आता जी गोष्ट या जन्मात शक्य नाही, त्याचा अट्टहास कशाला करायचा? जेव्हा मूड होता, तेव्हा नाही तुला त्याची दखल घ्यावीशी वाटली?”

“दखल घ्यावीशी वाटली नाही असं नाही; तर मी दखल घेऊ शकलो नाही. माझ्याही काही मर्यादा आहेत वैदू. तू मला समजूनच घेत नाहीस.”

“आता आणखी किती समजून घ्यायचं? बंगलोर टूर तू रद्द केल्यापासून मी तर तुला अजिबात त्रास देत नाही. स्वतःहोऊन फोन सुद्धा करीत नाही. तुझी बायको ही तुझी पहिली प्रिऑरिटी आहे. त्यानंतरही काही महत्त्वाच्या प्रिऑरिटीज आहेत. मलाही समजतं बाबा. आमचं आयुष्य वाऱ्यावर आहे म्हणून तुम्हीही वाऱ्यावर यावं, अशी अपेक्षा आमचीपण नाहीये.”

“आता किती ताणणार आहेस? काय शिक्षा द्यायची ती तू मला एकदा देऊन टाक. पण हे सारखं असं त्या बंगलोरसाठी टोचू नकोस.”

“सुहास तुला काय शिक्षा द्यायची? मी कोण शिक्षा देणारी? विषय बंगलोर हा नव्हताच रे. चार दिवस सारं विसरून एकत्र राहणं, एकमेकांना समजून घेणं, काही शेअर करणं. पण तू मला पार गारच केलं. बायकोचं नाव पुढे केलंस खरं पण त्याचवेळी रमा इथे आली होती, म्हणून तू माझ्यासोबत बाहेर आला नाही हे खरं कारण आहे. सुहास, आपण किती जवळ आहोत, असं वाटायचं मला. माझ्या किती

हक्काचा माणूस होतास तू. आपलं नातं खूप पारदर्शक आहे, असं वाटायचं. कोणी काहीही सांगायचं, पण माझा विश्वास होता तुझ्यावर. मुख्य म्हणजे माझा माझ्यावर, माझ्यातल्या प्रेयसीवर विश्वास होता. माझ्यासारखी स्त्री तुझ्या प्रेमात असताना तू कधीकाळी एका स्त्रीवर केलेलं प्रेम अजूनही लक्षात ठेवशील, असं वाटलंच नव्हतं मला."

"वैदेही, तू काय बोलते आहेस, हे तुझं तुला तरी कळतंय का? काय वेड्यासारखे तर्क लावत बसलीस?"

"तर्क? तर्क नाहीयत हे. रमा इथे आली आहे, हे तू मला सांगितलंस काय? नाही. बायकोला वेळेवर काय सांगू हे समजत नाही, तिनं ओरिसाचा टूर ठरवला वगैरे भरपूर थापा मारून तू माझ्यासोबत बंगलोरला यायचं टाळलंस. तुझ्या न येण्याने दुखावल्यामुळे मीही माझं जाणं रद्द केलं. चार दिवसांनी शीला तिच्या कॉन्फरन्ससाठी आली आणि तिला सोडायला मी एअरपोर्टवर गेले तेव्हा तू चक्क मला एयरपोर्टवर रमासोबत दिसलास. दिल्लीच्या फ्लाईटने आलेला. त्यावेळी फक्त दिल्लीचंच फ्लाईट आलेलं होतं आणि तुम्ही आतून येताना मला बाहेरच्या काचेतून दिसलात. माझं काहीतरी कन्फ्युजन झालंय वगैरे मला समजवण्यासाठी काही बोलू नकोस."

सुहास गप्प होता. त्याला आता ऐनवेळी काय बोलावं काही सुचत नव्हतं. खरं तर वैदेहीचा हा स्टॅन्डच त्याच्या आकलनापल्याडचा होता. जेव्हा तिने खूप चिडून गोंधळ घालायला हवा होता, तेव्हा ती शांत होती. आता मात्र अधूनमधून ढुश्याऽऽऽ मारत असते.

"हॅलो, हॅलो सुहास. ठेवू का फोन? काही बोलायचं नाहीये का तुला?"

"काय बोलू? तू बोलते आहेस. मी ऐकतो."

“तू माझ्याशी असं का वागलास?”

“वैदेही, हे सारं फोनवरच बोललं पाहिजे काय?”

“मग तू आता ऑफीसला ये. मला सायनाच्या आईकडे जायचं आहे. पाच मिनिटांत तिच्याशी बोलणं आटोपून आपण लाँग ड्राईव्हला जाऊया. आज मला तुझ्याशी बोलल्याशिवाय चैन पडणार नाही.”

“मला सायनाच्या आईकडे यायचं नाहीये. तुझे हे असले कामं तुलाच लखलाभ. सारखं आपलं त्या फालतू बायांसाठी मरमर करणं. आयुष्यातला चांगला वेळ त्या घाणेरड्या बायांसाठी वाया घालवतेस आणि दुसरं, मी चर्चेसाठी लाँग ड्राईव्हला येणार नाही. अशावेळी तू रफ ड्राईव्ह करतेस. रागात तू गाडी चालवत जाऊ नकोस.”

“का? माझ्यासोबत मरायची भीती वाटते? काहीही झालं तरी अपघात नाही होऊ शकत माझ्या हातून. गाडीवर माझा पूर्ण कंट्रोल असतो सुहास. जसा माझा माझ्या आयुष्यावर आहे. मी बेधुंद जगतही नाही आणि गाडीही बेधुंद चालवत नाही. काळजी करू नकोस. शिवाय तू गाडीत असताना तर मला काळजीपूर्वक गाडी चालवली पाहिजे ना. माझं ठीक आहे. पण माझ्यासोबत तुझी जर गडबड झाली तर बिचाऱ्या किती स्त्रियांना मानसिक वैधव्य येईल.”

“वैदेही, ठेवू का फोन?”

“माझ्याशी बोलायचा तुला कंटाळा आला असेल तर ठेव.”

“उद्या भेटतो.” असं काहीसं पुटपुटून त्याने घाईतच फोन बंद केला. बाजूला ठेवलेली फाईल आरामात सवड असताना उघडली की त्याचं किती बारकाईनं वैदेही डिसेक्शन करते आणि जीव नकोसा करून सोडते, हे त्याला चांगलंच माहीत होतं.

a

पण सुहासला आता त्याच्या ओरिसा टूरचं डिसेक्शन अजिबात नको होतं. रमाच्या सहवासाच्या उबेबाहेर तो अजूनही आलेला नव्हता. खूप वर्षांनी त्यांनाही हा असा एकांत मिळाला होता. अलीकडे वैदेहीच्या सहवासामुळे रमाकडे त्याचं तसं दुर्लक्षच झालेलं होतं. पण जुन्या प्रेमाने परत उचल खाल्लीच. तळाशी शांतपणे जाऊन बसला म्हणताम्हणता नदीतला एखादा मासा पटकन वर येऊन आपलं अस्तित्व बघणाऱ्याच्या डोळ्यात स्पष्ट करतो, तसंच झालं होतं रमाचं. सुहास आणि रमाच्या प्रेमाला रमाच्या घरच्यांकडून विरोध झाल्यामुळे त्यांना लग्न करणं शक्य झालं नाही पण एकमेकांना विसरणंही शक्य नव्हतं. लग्नानंतर संसारात हळूहळू रमा रमत गेली तरी आत कुठेतरी सुहास दडलेला होताच. माहेरी आली की मैत्रिणींना भेटायला जाण्याच्या निमित्तानं दोघंही भेटत राहिली. संसार जसजसा मुरत गेला तसतसा संसाराचा पूर्ण भार तिच्यावर टाकून तिचा नवरा आपल्या उद्योगाला भरभराटीला लावण्यात गुंतला. रमाच्या मनासारखं झालं. या ना त्या निमित्तानं सुहासचा सहवास ती मिळवतच राहिली. अधूनमधून वैदेहीच्या कानावर काहीबाही यायचं; पण आपल्या प्रेमात आकंठ डुंबलेला सुहास परत मागे वळेल, यावर विश्वासच नव्हता तिचा. आताही तिने प्रत्यक्ष त्या दोघांना एकाच ट्रॉलीत सामान घेऊन एकमेकांना खेटून येताना पाहिलं नसतं, तर नेहमीसारखंच याहीवेळी वेळ मारून नेण्यात सुहास यशस्वीच झाला असता. वैदेहीनं जेव्हा त्या दोघांना समोरून येताना बघितलं, तेव्हा तिच्या हृदयात चर्र झालं. क्षणभर तर आपण काय बघतोय, हेच कळलं नाही तिला. स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसला नाही तिचा. गेले चार दिवस हा बायको-पोरांसोबत ओरिसा टूरवर आहे, असंच ती समजत होती. दोनदा ते फोनवर बोललेत, तेव्हा हे गृहीत धरूनच की सोबत नमिता आहे. प्रचंड संतापाने, अपमानाने ती अक्षरशः थरथरायला लागली. तिच्या डोळ्यात आसवांनी गर्दी केली. एवढं कसं हा माणूस आपल्याला फसवू शकतो? समोर येऊन त्याचा तिथल्या तिथे गळा

a

आवळावा, असाही विचार तिच्या मनात येऊन गेला. पण तिनं स्वतःला आवरलं. संयम हाच तर तिचा खरा स्थायिभाव. चार लोकांमध्ये तिला स्वतःची शोभा करवून घ्यायची नव्हती. तिनं डोळे मिटले. स्वतःला सावरलं. बेभान झालेल्या आपल्या मनाला काबूत आणलं, आणि दारातून बाहेर पडून गाडीजवळ येणाऱ्या सुहास आणि रमाला सामोरे जात म्हणाली,

“हाय सुहास? कुठून येतो आहेस? दिल्ली? अरे सांगितलं पण नाही. नमस्ते मॅडम. कसा झाला प्रवास? मी वैदेही. सुहासची मैत्रीण.”

सुहास आ वासून तिच्याकडे बघतच राहिला. त्याच्या उत्तराची वाटही न बघता झपझप पावलं टाकत ड्रायव्हरनं तिच्या पुढ्यात आणलेल्या गाडीत ती जाऊन बसली आणि मनाचा सगळा बांध आता तिनं मोकळ्या मनानं कोसळू दिला. परत तेच. का माझा असा विश्वासघात करतात हे लोक? कोणत्याच पुरुषाला एकनिष्ठपणे कुठेच राहता येत नाही काय? का? का केलं सुहास तू माझ्यासोबत असं? का? सुहास तू तर खूप चांगला आहेस रे. मग हे असं का वागलास तू?.... का? माझ्यासोबत सारखंसारखं असं का होतंय? का? सुहासच्या संदर्भात तर असा कधी विचारच केला नव्हता. लोक बोलत होते तरी नाही. सतत त्याची चांगली बाजूच माझ्या मनात राहिली. सुहास... फार मोठा अपराधी आहेस तू माझा. माझ्या भावनांशी खेळलास तू. मला फसवलंस. किती खोट्या कल्पनाविश्वात जगत होते मी. ईशानला तू घरी आलेला आवडत नाही म्हणून त्याच्याशीही सारखी वादावादी करायचे. पण तू ...तू एवढा स्वार्थी असशील असं स्वप्नातही वाटलं नव्हतं.

वैदेहीच्या मनात रागाचा डोंब उसळला. प्रचंड अपमानाने ती उद्विग्न झाली. भयंकर चीड आली तिला सुहासची. त्याने मध्येच फोन बंद केला यामुळे तर ती आणखीच अपमानित झाली. ते काही नाही याने मला आत्ताच भेटलं पाहिजे.

सोडणार नाही मी त्याला आत्ता. तिने परत त्याला फोन लावला. तो एंगेज्ड लागला. तीन-चारदा प्रयत्न केल्यावर एकदाची रिंग गेली.

"तुला माझा मिस कॉल दिसला नाही काय?"

"दिसला. पण आता आणखी काय बोलायचं?'

"अच्छा. म्हणजे तुझ्याजवळ आता माझ्यासोबत बोलण्यासारखं काहीच नाही राहिलं. होय ना?"

"तसं नव्हतं मला म्हणायचं. बोल काय?

"मला आत्ताच भेटायचं आहे तुला."

"पण मला वेळ नाही. एक अपॉईंटमेंट आहे आत्ता."

"आता कोणत्या बाईला भेटायला बोलवलंस?"

"बायांशिवाय माझी दुसरी काही कामंच नाहीत काय?"

"ते तुलाच माहीत. पण मला आत्ता म्हणजे आत्ताच भेटायचं आहे. तू मला नाही म्हणू शकत नाहीस." वैदेही जोरात ओरडली. केबीनबाहेर आपला स्टाफ आहे, हेही याक्षणी ती विसरून गेली.

"ठीक आहे. पण मी गाडीत बाहेर येणार नाही. सांग कुठे येऊ?" ती आता सोडणार नाही हे लक्षात घेऊन तो म्हणाला.

"मीच तुझ्या ऑफीसमध्ये येते."

"इथे? नाही. नाही. तू इथे नाही यायचं. हवं तर मी तुझ्या ऑफीसला येतो."

"नाही. माझ्या ऑफीसमध्ये नको. तुला एकतर माझ्यासोबत गाडीत बाहेर यावं लागेल, अन्यथा तुझ्या ऑफीसमध्येच."

“ओ.के. ये बाबा मी कितीही नाही म्हटलं तरी तू ऐकणार थोडीच आहे. प्रत्येक गोष्ट स्वतःच्याच मनाने करणारी आहेस ना तू.”

“होय. पण मर्यादा सोडून नाही तुझ्यासारख्या.”

“आता इथे भांडायलाच येते आहेस ना. मग आणखी फोनवर कशाला?”

“सुहास, भांडणभांडण म्हणून मला भांडकुदळ ठरवू नकोस. स्वतः कसा वागलास ते बघ आधी.” बोलताबोलताच तिच्या आवाजाला कंप सुटला. म्हणून तिनेच ‘आलेच’ म्हणून फोनच कट केला. लगेच खुर्चीतून उठून गाडीची किल्ली आणि पर्स हातात घेतली, आणि वेगातच केबीनच्या बाहेर आली. गाडी सुरू करण्यापूर्वी स्वतःला किंचित शांत करण्याचा प्रयत्न तिने केला आणि मगच गाडीची किल्ली फिरविली.

सुहासच्या केबीनमध्ये जायला तिला कुणाच्या परवानगीची कधीच गरज नव्हती. आजही ती सरळ त्याच्या केबीनमध्ये गेली, तेव्हा तो हसतहसत कुणाशी तरी फोनवर बोलत होता.

a

**स**काळी साडे-दहा अकराची वेळ. बाहेरच्च्या बारीक धारेनं पाणी येणाऱ्या नळावर बायांची गर्दी, काही बायका आपआपल्या दारात बसलेल्या, यमुनाच्या मांडीवर लहान दहा अकरा महिन्याचं तिचं मूल चिपाड झालेल्या छातीतलं न निघणारं दूध पिण्याचा अट्टहास करीत होता. लहान मुलं गल्लीत खेळण्यात दंगा करणं, भांडणं करून लगेच 'माय बहिणी' च्या शिव्यांवर येणं सुरू होतं. पिल्लीच्या घरातली कोंबडी येन्ट्याच्या घरात घुसून तिनं फर्शीवर घाण केली म्हणून दोघीत जोरजोरात जुंपलं होतं. रात्रीचा गिऱ्हाईक नेहमीचा लक्ष्मीचा होता पण काल तो राधाकडे गेल्यामुळे राधा तुळशीला पाणी देत आहे हे पाहून लक्ष्मी राधाच्या अंगावरचा पदर ओढून तिच्यावर ओरडत होती. तिच्या आरडाओरडीकडे दुर्लक्ष करून तिनं तांब्यातलं पाणी तुळशीला अर्पण केलंच. तोंडानी मंत्र पुटपुटत. इकडला हा सारा गोंधळ आंटी आपल्या माडीसमोरच्या अंगणातल्या खाटेवर बसून बघत होती.

"ए साली कुत्तेकी औलाद, लक्ष्मी, तेरा गिऱ्हाईक राधाके पास जा घुसा, उसमे राधा क्या करेगी? उस दिन आया था, तब तुनेही उसको बराबर गरम नही कियेला होगा. साला वो जवान तगडा, उसका खंबा इत्ता बडा. और तेरा अब बचाही क्या है? फोतरीपरके बाल भी सफेद होने लगे ना. छोड उसको."

"आंटी, कुछ भी मत बको. तुमने देखी क्या मेरी फोतरी. बडी चली सफेद बाल की बात करनेवाली."

आंटीच्या अंगावर खेकसून आणि राधाला धक्का देऊन लक्ष्मी तिथून चालती झाली. जाताजाता आंटीच्या खाटेजवळ पचकन थुंकायला मात्र ती विसरली नाही. खाटेजवळचं तिचं थुंकणं बघून आंटी तिच्यावर जोरात खेकसली, "लक्ष्मी, मै देख रही हू, आजकल तू जरा जादाही शायनी बनती जा रही है! क्युरी मरतुकडी, बहुत उपर आयेली क्या? उसकी गांड चाटने का इत्ता शौक है तो जा ना अपना धापोडा दिनभर खुला रखते जा उसके इंतजार में!"

"आंटी, कुछ भी मत बको. तुमने ये राधाको जरा जादाही सरपे ले रखा. लेकिन मै बताये देती हू, अगर बारबार मेरा गिऱ्हाईक वो खिचेगी तो....."

त्याचवेळी वैदेहीनं तिथं पाऊल टाकलं. शेवटचे दोन-तीनच वाक्य जरी वैदेहीच्या कानावर पडले असले तरी त्या वाक्यांवरूनच नेमकं काय चाललं असेल, याची तिला कल्पना आली.

"अग काय बडबडतेस लक्ष्मी. या कामात पडून वीस-पंचेवीस वर्षे झाली असतील तुला तरी तुझी भांडणाची वृत्ती काही जात नाही."

"ताई मीच भांडतो काय? या-या राधाले सांग ना काही."

"कोई किसीको कुछ नही बतायेगा." आंटी जोरात गरजली."बाई, तू कायले आली इथं? तुले कितीयेळ सांगलं, यहा आनेका नही म्हून."

"आंटी, सोड गं माझ्यावरचा राग. मी तुझ्याकडेच आले. माझं काम तुझ्याकडेच आहे."

"तेरा कोनताच काम मै नही करूंगी."

a

“कोणतं ते तर विचार.”

“नाही विचारनार.”

“मग मीच सांगते. आधी हा निरोधचा बॉक्स घे. माझ्या गाडीत आणखी तीन डबे आहेत. ते कुणालातरी गाडीतून आणायला सांग. या पोरींना निरोध वापरल्याशिवाय कुणाशीही संबंध ठेवू नका, हे सतत सांगत रहा आंटी तू. गर्भपात करूनकरून त्या नकोशीसारख्या अनेक पोरींची काय अवस्था झालीय, हे माहीत आहे ना तुला. कायकाय रोग जडतात ते.”

“हो गई मेडम तेरी बात?”

“नाही. महत्त्वाचं तर राहिलंच. अगं, मला असं वाटतंय, आपल्या बस्तीत आता किमान चार-पाच पोरं अशी आहेत की जी नव्यानं शाळेत जायला सुरुवात करू शकतील.”

“देख बाई, वो अरुणभाऊ काय गोंधळ घालायचा तो या पोट्ट्यायच्या शिक्षनासाठी घालूनच रायला. आता तू और माह्य डोकं फिरवू नको. पहिले तू बाहेर व्हय. लंगड्या, किधर मर गया रे तू. ये बाईको पहले बाहर निकाल.”

“आंटी, मॅडम सुनती नही. मैने तो गल्लीमेच बोला था, पानठेले के पाससेही वापीस जाओ करके. ती सुनत नाय.”

“बाई, बाहेर व्हा तुम्ही. बिनावजह लंगड्या तुम्हाले हाताले धरून बाहेर काढन. तुम्ही इथं येऊन आमच्या जिंदगीत फुका गोंधळ घालू नका.”

“आंटी, अगं मी गोंधळ नाही घालत आहे. उलट तुम्ही लोक आणखी चांगलं कसं जगाल, हाच नाही का मी सतत प्रयत्न करत?”

“नका करू. वो प्रयत्न भी नको आन् तुमची मदत बी नको.”

"आंटी, शिकू दे या लहानलहान पोरांना."

"कायले शिकवाचं? म्या म्हनतो कायले शिकवाचं. पोट्टे शिकून काय व्हनार? बाहेर निघणार इथून. पुढं इथलं दादाचं, पहिलवानचं, लंगड्याचं काम कोन करनार. बाई, तू काहून आमचा धंदा बंद कराले लागली. पोट्ट्यायच्या शिक्षनाची त गोष्टच नाय पन त्या सायनाकडं बी आता पाह्यचं नाय. हे का लावलं बाई तुनं, पुन्हा पुन्हा-पुन्हा तेच ते. आता मी शेवटचं सांगतो, आता तुनं इथं काही गडबड केली का माह्यासारखी खराब बाई नाय. मानुस जरा मानूसकीनं घेते त तू त लंबीच चालाले लागली. चाल व्हय बाहेर. आम्हाले तुहा कॅम्प नको, आन तुही कोनतीच मदत नको. कौनसे मोहरतपे पहलेच तेरा पाँव यहा लगा तूच जाने."

"आंटी, जरा माझं ऐकून त घे. अगं मी तुमच्या भल्यासाठीच धडपडते आहे ना?"

"आमाले नाय पायजे ना आमचं भलं, आन आमचं भलं ठरवनारी तू कोन? आम्हाले आमचं समजत नाय? चाल बाहेर हो. लंगड्या, पहिले बाईले बाहेर कर.

वैदेही नाइलाज झाल्यासारखी उठली. आत्ता यावेळी आंटी ऐकणार नाही, हे तिच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. हातात पर्स घेऊन पाठमोरी होऊन ती बाहेरच्या रस्त्याला लागली, तोच आंटीने परत तिला आवाज दिला.

"बाई, पुन्हा इधर आना नाही. मांगल्यावेळेसच तुला सांगलं व्हतं. मुन्नीला तू घेऊन गेली हे आम्हा साऱ्यायलेच माहीत हाय. म्हनलं त आजही आम्ही तिले उचलून आनू शकतो. पन दिल आमच्यातबी हाय. तिच्या बापानं तिले आमच्याजवळ विकली होती. तू तिले इथून नेनारी कोन होती? पन तुनं तिले नेलं. आमचे लोक तुह्या घरावर लक्ष ठेवून होते लय दिस. पहिलवानले ते पोट्टी पायजेच होती. केवढा बफरला व्हता तो. आम्ही मुन्नीले दोन येळा पळवून नेन्याचा परयत्नबी

केला. पन भगवानने नही सुनी. बाई, मनात आनलं असतं तं तुह्या दोन्हीय पोट्टयायले नासवाले आमाले काही लागलं नसतं. पन या बस्तीसाठी तुनं लय जीव टाकला. माह्या पोरीले बिमारीतून तुह्या डाक्टरनं बरा केला. पहिलवानले तुह्यामुळं जीवनदान भेटलं. तुवा येळेवर डॉक्टर नसता आनला तं पिलियानं त्यानं इथच जीव टाकला असता. म्हून... बस म्हूनच आमी तुले बक्षलो. यल्लम्माले पोरी सोडनाऱ्याची औलाद हावो आम्ही. असं समज, आमच्या बस्तीसाठी आजपातोर तुनं जे काय केलं त्याच्या बदल्यात आम्ही तुह्या दोन पोरी बक्ष दिया. म्हून मुन्नी आनं सायनासाठी तुनं ज्या दोन चुका केल्या तरी तुह्या दोन्ही पोरीले आम्ही बक्षवलं, पर अब नही. अब इसके बाद अगर तू यहा पांवभी रखेगी तो पहिलवान तेरेकोच नासवेगा. नही तेरी साडी उसने खिची और इसी माडीपे नही तेरे फोदरेपे वो नचा तो मेरा नाम भी जमुना नही.''

वैदेही मघापासून मन घट्ट करून तिचं बोलणं ऐकत होती. पण आंटीचं शेवटचं वाक्य वैदेहीनं ऐकलं आणि तिच्या सर्वांगातून एक वीज चमकली. सगळं शरीर घामाने ओथंबून वाहू लागलं, सगळं जग आपल्याभोवती गरगरा फिरतंय असं काहीसं अस्पष्ट तिला जाणवलं.. डोळयासमोर अंधारी आली.. शरीर जडजड व्हायला लागलं. चारी बाजूने जणू पाण्याचे लोंढे येत आहेत आणि ते एकमेकात मिसळून तिच्या सभोवताल पाणीच पाणी झालंय की काय, आणि त्या लोंढ्यात ती गटांगळया खात आहे... अंधार.. पाणी.. आकाश.. अंधार.. तिची शुद्ध हरवली आणि धाडदिशी ती रस्त्यावर पडली.

a

वैदेहीला जाग आली, तेव्हा ती दवाखान्यात होती. तिच्या शेजारी ईशान आणि देवयानी बसल्या होत्या. गौरी थोडी बाजूला स्टुलवर बसली होती. आणि दूर पलीकडे मुन्नी उभी होती. डोळे उघडल्याउघडल्या मिनिटभर तर तिला लक्षातच आलं नाही, ती कुठे आहे ते. पण आजूबाजूला नजर फिरवली, डोळे मिटले नि हळूहळू तिला तो प्रसंग आठवला, आणि ती परत भयग्रस्त झाली. तिच्या चेहऱ्यावर लक्ष ठेवून असलेल्या ईशाननं तिचा हात हातात घेतला. तिच्या केसांतून हात फिरवला,

"मम्मी, कसं वाटतं आता तुला? आणि घाबरतेस काय? कसा झाला तुझा चेहरा? हे बघ आम्ही सगळे तुझ्या जवळ आहोत. तुला बरं वाटतंय ना?"

"दादा, डॉक्टरला सांगून येऊ? मम्मी शुद्धीवर आलीय ते?"

"होय. डॉक्टर पाठकांना सांग."

"ईशान, काय झालं मला? मी इथे कशी आले? मी तर...."

"तुला काही झालेलं नाही मम्मी. फक्त थकवा आला. आणि आता तू काहीही आठवण्याचा प्रयत्नही करू नकोस."

"पण मला इथे कुणी आणलं?"

"गुड इव्हिनिंग मॅडम. काय म्हणतोय आमचा पेशंट." देवयानीसोबत डॉक्टरांनी तिच्या रूममध्ये प्रवेश करतच विचारलं. "कशा आहात मॅडम?" वैदेहीची नाडी पाहण्यासाठी तिचा हात हातात घेत डॉक्टरांनी वैदेहीलाच पृच्छा केली. नाडी बघितली. स्टेथो लावून तपासलं. शिवाय डोळ्यांना तर्जनीने थोडे खाली खेचल्यासारखे करून डोळेही तपासले. सिस्टरने त्यांच्या समोर केलेल्या

केसपेपरच्या फाईलवर औषधं लिहून दिलीत. वैदेहीला लावलेल्या सलाईनबद्दलही काही सूचना केल्यात आणि ईशानकडे वळून म्हणाले,

"काळजी करण्याचं काही कारण नाही. आजच्या दिवस इथे आराम करू देत. उद्या मॅडमला सुट्टी देऊया."

"नको नको. डॉक्टर, मला काहीही झालेलं नाहीय. जरा थकवा आला होता एवढंच. झालंच तर थोडसं ब्लडप्रेशर लो झालं असेल. डॉक्टर, रात्रभर इथे थांबायची गरज नाही. चला देवयानी चल घरी जायला हवं आपल्याला लवकर."

"मम्मी, डॉक्टर कोण आहे? तू का ते? आता इथे तरी तू तुझंच म्हणणं नको रेटूस ना. ब्लड प्रेशर लो झालं का हाय, हे तू कशी ठरवणार? अगं, काही गोष्टी तर इतरांना ठरवू देत? आणि तू आता अजिबात काही बोलायचं नाहीये. पूर्ण आराम कर. होय ना डॉक्टर?"

"अगदी बरोबर, ईशान बोलतोय, ते अगदी बरोबर आहे. मॅडम तुम्हाला विश्रांतीची खूप गरज आहे. प्रचंड मानसिक दडपणामुळे तुम्हाला लो बी.पी. चा अटॅक आला होता. चार तास अनकॉन्शस होतात तुम्ही."

"बापरे आणि मला इथे आणलं कुणी? मी तर गंगाजमुनात गेले होते."

"तू तिथे चक्कर येऊन पडल्यापडल्या तिथलेे सगळे खूप घाबरले. भैयाने आपल्या घरी फोन केला. तेव्हा घरात मुन्नी एकटीच. बाईसाहेब तर रडायलाच लागल्यात. पण लवकरच तिने मला मोबाईल केला. मग मी डायरेक्ट डॉक्टरांना फोन करून त्यांची ॲम्बुलन्स घेऊनच आम्ही तिथे पोचलो. आज कळलं मला तू कसल्या घाणेरड्या वातावरणात तिथे जातेस ते. आता यानंतर तिथे पाय सुद्धा टाकायचा

नाहीस मम्मी तू. आणि ती मुन्नी बघ कशी चोरासारखी अवस्था झालीय तिची. 'माझ्यामुळेच आईची तब्येत बिघडलीय' अशी म्हणतेय सारखी ती."

"कुठे आहे ती?"

"ती काय त्या दारामागे लपलीय."

"मुन्नी. इकडे ये."

वैदेहीनं आवाज देताच मुन्नी लगेच वैदेहीजवळ आली आणि तिच्या कुशीत शिरून रडायलाच लागली.

"मम्मी, तू कशाला जातेस तिथे? आज काही झालं असतं तर!"

"काही होत नाही. तू एवढी धीट मुलगी आणि अशी मुळुमुळु रडतेस काय वेडाबाई. यू आर माय ब्रेव्ह बेबी."

"पण मम्मी, खरंच तू यानंतर तिथे पाय टाकायचा नाहीस. कसले घाणेरडे लोक, त्यांचं ते घाण बोलणं, काय त्या बायका छी. किळस...किळस आली मला तर. तुला काय धाड पडलीय गं. कामच करायचं आहे, तर बाहेरचं जग काय ओस पडलंय का? तुला ना मम्मी नसतं लचांड मागे लावून घ्यायची भलतीच हौस आहे." मुन्नीच्या केसात प्रेमाने हात फिरवत ईशान म्हणाला.

"ईशान, हे बाकी सगळं आत्ताच बोलायला हवं आहे का? मॅडम, आता महत्त्वाचं एवढच आहे की आज दिवसभर तुम्ही दवाखान्यात आराम करा. उद्या तुम्हाला सुट्टी देतो."

"डॉक्टर आरामंच करायचाय ना, तो मी घरी खरंच करते. एकही काम मी घरी करणार नाही. ऑफीसचाच काय कोणताच फोन मी घेणार नाही. घे देवयानी आत्ताच माझा मोबाईल तुझ्या ताब्यात. शिवाय सलाईन वगैरे जे काय मला लावायचं

a

असेल ना, तर ते तर तुम्ही घरीही अरेंज करू शकता. प्लीज डॉक्टर, ट्राय टू अंडरस्टॅन्ड मी. मी दवाखान्यात राहूच शकत नाही. इथे माझी आणखी तब्येत खराब होईल.'' वैदेहीनं एवढं व्याकूळ होऊन डॉक्टरांना ही विनंती केली की त्यांचाही चक्क नाइलाजच झाला. ते क्षणभर अस्वस्थही झाले.

''ईशान, नाइलाजास्तवच मी सुट्टी देतो आहे मॅडमला. पण घरी काळजी घ्या. औषधं वेळच्यावेळी पोटात जायलाच हवीत. शिवाय चार-पाच दिवसतरी बेडरेस्ट. थकवा आला आहे त्यांना प्रचंड.''

''होय. आम्ही घेऊ तिची काळजी. तिच्या मनाविरुद्ध आपण नाहीच तिला इथे ठेवू शकत. तिला दवाखान्याचा फोबिया आहे.''

''गुड. गुड ईशान. माझं छानछान बाळ आहे हे. डॉक्टर मी खरंच घरी आराम करेन. ईशान एवढी सलाईन संपेपर्यंत तू बिल पे करून ये.''

''ठीक आहे. देवयानी, मम्मीकडे लक्ष ठेव. मुन्नी आता हसा.''

''दा...दा'' मुन्नी लडिवाळपणे ईशानकडे बघून हसली.

**सा**यनाच्या मनात आज फार काही काम करावं असं नव्हतंच. मस्त आरामात उठून तिनं सोबतच्या मैत्रिणीला शुभाला आवाज देऊन चहा ठेवायला सांगितला. सायना, शुभा आणि मेघा या दोन मैत्रिणींसोबत फ्लॅट शेअर करून रहायला लागल्यापासून तिचे भाव जरा वधारले होते. कारण या दोनही पोरींचा शोध तिनं घेतला होता. त्यांना रस्त्यावर उभं राहून धंदा करण्यापेक्षा एका घरात राहून आपल्याकडे सरळ आलेल्या गिऱ्हाइकांकडून आपण जास्तीतजास्त पैसे कसे लुटू‌ू शकतो, हे तिनं पटवून दिलं होतं. शुभा आणि मेघा या तिच्या शुक्रवारी तलावाच्या काठावर उभं राहून गिऱ्हाइकांना पटवणाऱ्या मैत्रिणी. हळूहळू तिघींचं आपआपसात मेतकूट वाढलं. शुभा मॅट्रिक नापास झाल्यावर घर सोडून पळून आली होती. तर मेघाची सावत्र आई तिला खूप छळते म्हणून तिने घर सोडलं होतं. रेल्वे स्टेशनवर रायपूरच्या गाडीनं दुपारी उतरल्याउतरल्या घाबरलेले तिच्या चेहऱ्यावरचे हावभाव पाहून आस्थेनं चौकशी करण्याचं नाटक एकाने केलं. जवळच एका बस्तीत फक्त बायाच राहतात, तिथे तुझी राहण्याची व्यवस्था करून देतो म्हणून रेल्वे स्टेशनवरून तिला घेऊन बाहेर पडला. कॉटन मॉर्केटमध्ये खूप फिरवलं आणि कांदे-बटाट्याच्या व्यापाऱ्याकडे जाऊन वीस रुपयांत गोडाऊनमध्ये त्या पोरीला नेऊन आपली भूक मनसोक्त भागवून घेतली. मेघानं आरडाओरड केली, त्याला बोचकारलं पण कशाचाच काही उपयोग होत नाही म्हणता, तिनं त्याच्यासमोर शरणागती पत्करली. ‘‘काही पण म्हण यार, पण फक्त त्याच्या हावरटपणाचा राग

a

आला, आतमध्ये गेल्यावर मस्तच वाटलं. साला पाणी पण काय लवकर सुटलं ना.” अशी पहिली आठवण सांगतांना आजही ती नक्कीच खुलते. पहिल्यांदा वापरून घेतलेल्या माणसानं तिला परत स्टेशनरोडवर सोडून तो पसार झाला. आता कुठे जायचं हे कळेचना म्हणून परत ती त्याच व्यापाऱ्याकडे आली. त्यानं खूपवेळ दुर्लक्ष केलं, पण शेवटी दया आली म्हणून आपल्याच डब्यातली भाजीपोळी दिली. रात्र व्हायला लागली, तेव्हा त्याने तिला जायला सांगितलं, पण जाणार कुठे हा प्रश्नच, म्हणाली, मी इथेच झोपते. तू सांगशील ते काम करत जाईन. झाडझुडीचं वगैरे. रात्री घरी जाताजाता व्यापाऱ्यानेही आपल्या अंगाखाली तिला घेऊनंच घेतलं. पोरींनी नकार दिला नाही. तो गेल्यावर हमाल आला. दुसऱ्या दिवसापासून तिनं या परिस्थितीत स्वत:ला झोकून दिलं. जाताना प्रत्येकानं तिला दहा-वीस रु. दिले न मागता आणि काहीही काम न करता आपल्याला पैसे मिळाले, याचं तिला अप्रूप वाटलं. शिवाय कांदे-बटाट्याचा व्यापारी तिला जेवायला घालतच होता. मायाही करत होता. पण पोरगी सारखी त्याच्या जवळपासच राहते म्हटल्यावर कांदे घ्यायला येणाऱ्यापेक्षा मवालीच वाढले, ते राजरोसपणे तिला मागच्या गल्लीत,कधी सार्वजनिक शौचालयात तर कधी एखाद्या रिकाम्या ट्रकमध्येही घेऊन जायला लागले, मंडीत चर्चा वाढली. एक दिवस व्यापाऱ्याने सरळ तिला शुक्रवारी तलावाच्या पाळीवर सोडून दिलं. तिथून ती गंगाजमुनात गेली. एव्हाना गंगाजमुनात खोलीला द्यावे लागतील, एवढे पैसे तिचे जमलेले होतेच. त्यामुळे आंटीला तिने पटकन पैसेही दिलेतच. गंगाजमुनात सायना, शुभाशी मैत्री झाली. समवयस्क म्हणून तिघीचं जास्तच मेतकूट. सायनाने तर दरम्यान बराच पल्ला गाठला होता, बाहेरचं जग तिला चांगलंच माहीत झालं होतं. गंगाजमुनातली खोली न सोडता बाहेर राहायचा विचार त्या करू लागल्या होत्या. गंगाजमुनात एका गिऱ्हाइकाकडून पन्नास-शंभर रुपये मिळतात तिथे फ्लॅटवर पाचशे-सहाशे रुपयांना मरण नाही, हे ती

ओळखून होती. सायनानं शिताफीनं माधव नगरसारख्या सोफिस्टिकेटेड परिसरात फ्लॅट मिळविला. त्या फ्लॅटच्या मालकाला भाडेकऱ्याशी काही देणघेणं नव्हतं. आजूबाजूला राहणारे सगळेच नोकरीवाले. त्यामुळे कोण कोणाला ओळखतही नव्हतं. कोणताही गोंधळ न करता राहायचं, गोंधळ घालणाऱ्या गिऱ्हाइकाला इथे थारा द्यायचा नाही, रात्रीची वर्दळ जास्त नको वगैरे काही नियम सायनाने तिघींमध्येही कायम ठेवले. हुशार सायना आता या व्यवसायात चांगलीच रुळली होती. तिच्या शब्दावर या पोरींचा विश्वास होता. त्या फ्लॅटची कॅप्टनच होती सायना. पोरी तिचा शब्द मानत होत्या. तिची हुकूमत चालवून घेत होत्या. म्हणूनच चहाचं काय काहीही तिने सांगावं, आणि यांनी ऐकावं हे साधारण धोरणच होतं तिथलं.

शुभाने चहा आणून सायनाच्या हातात दिला. तेव्हा मेघा बाहेर जाण्याच्या तयारीत होती.

“आज फॅक्ट्रीवाला पे◌े◌ंचप्रकल्प दाखवायला घेऊन जातोय.”

“व्वा. बढिया. गाडीने का?”

“होय. तेही मोठ्ठ्या गाडीने. ती काळी लांब.”

“बघ. जरा जास्त मस्ती करू नको हं. रात्री परत येणार का तिकडेच?”

“ते तर त्याच्या मर्जीवर आहे. आपलं काय सायना, जायचंही तेच ठरवणार यायचंही तेच ठरवणार.”

“हो पण रात्री राहणार असलीस, तर जादा पैसे घे. डबल रेट.”

“हो हो तेवढं भान आहेच. शिवाय आज मुर्गा खायला मिळणार. साला फॅक्ट्रीवाला मुर्ग्याशिवाय बातच करत नाही.”

“तुझं काय मेघा?”

“सध्या तर काही नाही. पण लावते एक-दोघांना फोन. फोन लावले की येतातच धावत.”

“बढिया. चला मग आज मी वैदेही मॅडमकडे जाऊन येते. खूप दिवस झालेत, मुन्नीची पण भेट नाही. मॅडमची पण नाही.”

“सायना, तुझ्या मुन्नीला आण ना इकडे. फार मस्त आहे यार ती.”

“ए, तिचं नाव नाही घ्यायचं हं. ती इकडे येणारी पोरगी नाहीये. वैदेही मॅडमची जान आहे ती. तिच्या नखाला लागलं तरी मॅडम ऑफीसचं काम सोडून धावतात. मुन्नीचं विश्व वेगळं आहे आता. साली अच्छा नसीब लेके आयी. चल मी जातेच तिला भेटायला.”

सायना हातातला चहा संपवून फ्रेश झाली आणि खाली उतरून चौकातून ॲटोरिक्षा पकडून वैदेही मॅडमकडे आलीही. मॅडमची किंवा मुन्नीची एकदा आठवण आली की त्यांना भेटल्याशिवाय ती राहू शकत नाही. त्यांच्याकडे कधीही यायला तिलाही अटकाव नाही. आजतर आल्याआल्या समोरच मॅडम असल्यामुळे आधी मॅडमशीच गप्पा सुरू झाल्या.

“काय सायना, कशी आहेस?”

“छान मॅडम. छान चाललं.”

“छान चाललंय, म्हणजे काय गं ं नेमकं?”

“म्हणजे काय मॅडम, छानच चाललंय ना.”

“तू तो हॉस्पिटलचा जॉब सोडलास म्हणे.”

“होय. दोन महिने झालेत.”

“का गं? पगार नव्हता देत का रेग्युलर?”

“मॅडम, फार कमी पगार द्यायचा तो डॉक्टर.”

“अगं, कमी काय? तीन-साडेतीन हजार रु. द्यायचा ना?”

“त्यात काय होतं मॅडम. त्यापेक्षा जास्त मी इकडे कमवते.”

“छी. वेडी आहेस सायना तू. कसली तुलना करतेस तू. दोन कामं किती भिन्न आहेत. इकडे तुला मान होता. तिथे काय मान.”

“कसला मान मॅडम. तिथेही तेच होतं. इथे किमान आम्ही आमच्या जगात असतो सगळ्या सारख्या. सगळ्यांच्या मान-मर्यादा सारख्या. तिथे काय? त्यांच्यात आम्ही वेगळे पडतो.”

“अगं आपण वेगळे आहोत हे सांगायचंच कशाला? त्यांच्यातलंच एक होऊन राहायचं नं. तुला चांगलं राहायला का आवडत नाही?”

“मॅडम चांगलं राहायचं म्हणजे काय, हेच कळत नाही मला. कोणी चांगलं राहू देतं का आम्हाला?”

“कुणी अडवलंय तुला चांगलं राहण्यापासून?”

“सारेच अडवतात. सारेच. साला तुमचा समाज.”

“सारखंसारखं हे ‘साले’ म्हणणं जरुरी आहे काय?”

“सॉरी मॅडम.”

“सायना, खरं म्हणजे तू इतकी चांगली मुलगी आहेस गं. हुशार आहेस. चांगली शिकली सवरली तर कुठल्या कुठे गेली असतीस एव्हाना. मुन्नी बघ. ग्रॅज्युएट होऊन यूपीएससीच्या परीक्षेला बसायला निघाली. चांगली ऑफीसर होईल

ती आता लवकरच. तुही शिकली असतीस तर... कितीदा म्हणायची मी तुला. पण नाही ऐकलंस तू माझं.”

“मॅडम, तिथे राहून शिकणं होतं काय? प्राध्यापकही हेच सांगत राहतात.”

“खरं सांगतात प्राध्यापक. माणसाला करायचं असेल ना तर सारंच करता येतं. कुठेही. इच्छा पाहिजे माणसाची बस.”

“तुम्हाला वाटतं, तेवढं सोपं नाही मॅडम. एकदा माणसाच्या अंगावर डाग लागला, की निघतो थोडाच. दवाखान्यात मी किती प्रामाणिकपणे काम करीत होती. काय झालं शेवटी?”

“काय झालं? तूच डॉक्टरांशी भांडलीस ना. माझ्या शब्दाखातर बिचाऱ्यांनी आधीच्या मुलाला तिथून काढून तुला लावलं◌ं. काय केलंस तू? भांडणं?”

“नाही. खोटं बोलतात ते.”

“मग खरं काय आहे!”

“.....”

“सायना, मी तुला विचारते. काय झालं?”

“मॅडम, जाऊ द्यानं.”

“नाही. मला कळायलाच हवं. त्यांनी माझ्या शब्दाखातर तुला कामावर ठेवलं. तू त्यांना न सांगता नोकरी सोडलीस. आता परत मी त्यांच्याकडे कुणासाठी शब्द खर्च करू शकेन काय? सांग, करू शकेन? काय समजतेस काय गं तू स्वत:ला, चांगलं आयुष्य जगायचं सोडून त्या खातेऱ्यातच का तुला पडून राहावं◌ंस वाटतं? म्हशीला जसं शेणातच लोळायला आवडतं ना, तसं आयुष्य करून टाकलं आहेस तू स्वत:चं. मी मूर्ख तुझ्यासारख्या वेड्या मुलीसाठी सारखी जीव टाकत राहते.

a

उनाडक्या करत फिरण्याची सवय झाली ना तुम्हाला, पक्ष्यासारखं. या झाडावरून त्या झाडावर उडत राहा, अशीच आयुष्यभर. धड आयुष्याला वळण म्हणून नाहीच. दवाखान्यात कसं शिस्तीत राहावं लागत असेल ना. डॉक्टर तुझा फालतूपणा थोडीच खपवून घेणार होता. सायना, का तू आपलं आयुष्य असं वाऱ्यावर सोडतेस? का तुला चांगलं जीवन जगावंसं वाटत नाही? बंद कर हा फालतूपणा आता. जिथंतिथं कुत्र्यासारखे हुंगूनहुंगून गिऱ्हाईक शोधत बसण्याचा. आताही वेळ गेलेली नाही. परत एकदा मी तुझ्यासाठी डॉक्टरकडे शब्द टाकते. जा तू तिथे. दवाखान्यात काम करतेस, म्हणून प्रतिष्ठा मिळेल तुला. आताही डॉक्टर सांभाळून घेईल तुला. चांगला माणूस आहे बिचारा तो.''

''मला त्यांच्याकडे जायचं नाही मॅडम. मला नाही आवडत तो.''

''का? का नाही आवडत? तुला तुझ्या मनाप्रमाणे वागू देत नाही म्हणून?''

''तसं नाही. तो चांगला माणूस नाही आहे.''

''आता हे तू मला सांगणार? काय समजतेस काय गं तू स्वत:ला? त्यांनी तुझ्यासारखीला त्यांच्या दवाखान्यात थारा दिला आणि तू त्यालाच चांगला नाही म्हणतेस? व्वा. काय नं पण न्याय. चांगलं राहायला नको. दहा माणसांच्या सहवासात राहायची सवय झाली ना तुला. चार नव्या गोष्टी शिकायला नको. दहा ठिकाणी तोंड मारून झाल्यावर आता बसल्या जागेवरची नोकरी कशी करू शकशील तू. चांगली शिक म्हणते तर तेही ऐकायला नको.''

''मॅडम, आता शिकून काय करू? सगळ्या आयुष्याचा पार चिखल झाला.''

“तुला चांगलं काही करायलाच नको आहे. फक्त रोज नव्या माणसांचे बिस्तरे गरम करायचे. शिकून चांगली नोकरी मिळवायला नको की कष्ट करायला नको.”

वैदेही तिच्यावर जाम भडकलीच.

“आयला, काय नेहमी बकबक मॅडम ही तुमची. बस लय झाली आता मला अक्कल शिकवणं. मॅडम, साबनी मला त्यांच्याजवळ ठेवलं असतं त हा विषयच नसता आला. आता आपण नोकरीपानी करून नाय जगू शकत. बस अब अपनी येच दुनिया. साला, रोज नया खंबा.”

“छी. काय बोलतेस सायना तू. लाज नाही वाटत?”

“लाज? लाज वाटली असती त कपडे कसे उतरवले असते? आणि कपडेच नसते उतरवले तर धंदा कसा चालला असता? पोट कसं भरलं असतं? मॅडम, लई झाला आदर्शवाद. ज्या दवाखान्यात तुम्ही रिसेप्शनिस्ट म्हणून मला लावून दिलं होतं, तिथं काय वेगळं होतं? तो डॉक्टर तुमचा मित्र आहे ना? मॅडम, रोज रात्री तो मला त्याच्यासमोर उतानं व्हायला लावायचा ना! तुम्हाला जो देवमाणूस वाटला पण नंबर एकचा लफंगा आहे तो. त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या सिस्टरला नाहीच सोडत पण पेशंटवरही डोळा ठेवतो तो. तुमच्याबद्दल काय बोलतो तो ते सांगू तुम्हाला? म्हणतो, ‘या भटकभवानीला वेश्यांबद्दलच एवढा पुळका का बॉ. साली ही पण वेश्याच आहे ना म्हणून’ ....”

“सायना ऽ ऽ ऽ चूप सायना ऽ ऽ”

“नाही. थांबा मॅडम, मला आता बोलून घेऊ द्या. मी त बोलूनचालून धंदेवालीच. दहा घरचे भांडे घासून गुजरान करणाऱ्या बाईच्या पोटची पोरगी मी. पण

हा धंदा ना माझ्या अम्मानं पाहिला होता, ना मला यातलं काही समजत होतं. तुमच्या चांगल्या समाजातल्या माणसांनीच मला या धंद्यापाण्याला लावलं, हे तुम्ही जाणताच. नाहीतर मी पण माझ्या अम्माच्या खोपड्यात सुखानं राहिली असती. डॉक्टरचं ऐकून तुम्हाला कमाल वाटली ना, पण तुमचा खास माणूस... सुहास काका त्याचं काय वेगळं आहे?"

"आता या विषयाशी सुहासचा काय संबंध? काय तोंडाला येईल ते बडबडते आहेस तू."

"सांगू....ऐकू शकाल मॅडम तुम्ही? आजपर्यंत कितीदा त्यांनी मला हॉटेलात नेलं. किंवा मित्राच्या फ्लॅटवर नेलं."

"सायना"... आगीचा लोळ अंगावर पडल्यासारखी भयग्रस्त होऊन वैदेही किंचाळलीच. "काय...काय बोलतेस तू हे. वेड लागलं का तुला? आता एक शब्द जरी बोलशील तरी थोबाड फोडीन मी तुझं. चल चालती हो माझ्या डोळ्यासमोरून...चल.."

"फोडा...फोडा...मारा...मारून टाका मला तुम्ही. माराच मला.. मी तरी सुटील साली याच्यातून.. मला तरी कुठं आवडते हे.. सुहासकाकानं आंगाला हात लावला तर आंगावर काटा उभा राहतो. अल्ला आठवतो अल्ला. त्यांचा हात आंगावरून फिरायला लागला का अंगावर हजार साप एकाचवेळी फिरल्यासारखे वाटतात मॅडमजी. पण काय करू. साली धंदेवाली कुत्ती आहे ना मी."

"सायना..."

"असं तेच म्हणतात. 'तू धंदेवाली आहेस. तुझं काम फक्त तुझ्यापुढे पुरुष आला की सलवारचा नाडा सोडून चड्डी खाली सरकवणं."

a

“चूप..चूप बस. एक शब्दही बोलू नकोस. कसं बोलवतं तरी कसं गं तुला हे असलं, तेही सुहासबद्दल. तुला जायचं तर जा बाई तू. जिथे जायचं तिथे जा. हरले मी...हरलेच. वाटलं होतं, मुन्नीसारखं तुलाही त्या गटारातून बाहेर काढून एक चांगलं आयुष्य द्यावं..पण..नाही..नाही माझ्या हातात काही..सुहास..सुहास तर.. तू सुहासबद्दलच... बोला... ऽ ऽ ऽ” बोलताबोलताच वैदेहीला हुंदका फुटला. तिचं शरीर अक्षरश: अपमानाने, दु:खाने गदगदा हलायला लागलं. घामाने गच्च ओली झाली ती. तिच्या कपाळावरूनच काय संपूर्ण शरीरातून मांड्यांमधूनही घामाचे ओघळ वाहायला लागले. आता तिला सोफ्यावर बसणंही कठीण झालं. तिला गुदमरल्यासारखं झालं. ती उठली. पण क्षणात डोळ्यासमोर काजवे चमकल्यामुळे अंधारी येऊन खालीच बसली.

मघापासून पडद्याच्या मागे उभं राहून या दोघींची चर्चा गपचूप ऐकणारी मुन्नी मम्मीची अशी अवस्था बघून वेगात पुढे आली आणि तिला पकडून म्हणाली. “मम्मी, तू मनस्ताप करून घेऊ नकोस. वेडी आहे ही.”

“मुन्नी...” मुन्नीला बघताच खूप मोठ्ठा आधार मिळाल्यासारखा ती तिचे दोन्ही हात हातात पकडून आणि अतिशय व्याकूळ नजरेनं तिच्याकडे बघत म्हणाली, “मुन्नी..मुन्नी काय ऐकतेय गं मी हे.. मुन्नी..” तिला पुढे बोलवेचना. ती सगळं आयुष्य जुगारात हरल्यासारखी हतबल... दरिद्री झाल्यासारखी तिनं स्वत:ला मुन्नीच्या स्वाधीन केलं. आणि तिच्या खांद्यावर डोकं ठेवून ती ओक्साबोक्सी रडू लागली.

“उगी. मम्मी उगी. रडू नकोस प्लीज मम्मी.” मुन्नी तिला सावरण्याचा प्रयत्न करीत राहते, पण नेमकं काय बोलावं, हे तिला कळतच नाही. आपल्या शब्दांचा आता मम्मीला समजवण्यासाठी काहीच उपयोग होणार नाही, हे तिला कळून

चुकलं. मम्मी नुसतीच गदगदते आहे. आणि हळूहळू तिचं गदगदणं कमीकमी होत बंद झालं आणि ती थंड पडायला लागली. ‘मम्मी ऽ ऽ मम्मी’ असा दोन-तीनदा तिने आवाजही देऊन बघितला. पण वैदेही बोलत नव्हती की हालत नव्हती. आता मुन्नीही घाबरली. “मम्मी” ती जोरात किंचाळली. तिनं मम्मीला सरळ झोपवलं. प्रचंड घाबरलेल्या मुन्नीला मम्मीची ती अवस्था बघून क्षणभर काय करावं ते कळेच ना. ती मग सायनावरच ओरडली, “काय केलंस तू हे? कशाला सांगितलंस तू तिला भलतंसलतं काही. आता मम्मीला काही झालं तर? नुकतीच ती दवाखान्यातून घरी आली होती, हे माहीत आहे ना तुला. मम्मीऽ ऽ मम्मी ऊठ ना गं.” तिनं मम्मीला हळूच उठविण्याचा प्रयत्न करून बघितला. पण वैदेही काहीही प्रतिसाद देईना. मुन्नीला काहीतरी सुचलं आणि तिने पटकन फोन हातात घेतला.

“सोहम, डॉक्टरांना घेऊन ताबडतोब घरी ये. मम्मी अनकॉन्शस झालीय.”

“काय? कशा? कुठे? केव्हा?”

“जास्त प्रश्न विचारू नकोस. घरी ताबडतोब डॉक्टरांना घेऊन ये. लगेच.” बहुतेक त्या दिवशीसारखंच काहीतरी झालंय तिला.” रडवेल्या आवाजात ती म्हणाली.

“ओके. ओके. लगेच आणतो. पण तू रडू नकोस. मी लगेच येतोय. पंधरा मिनिटांत.”

“ये. लवकर. आणि डॉ. पाठकलाच घेऊन ये.” तिनं फोन बंद केला.

सायना तेव्हाची काष्ठवत उभी होती. हे काय भलतंच झालं. मॅडमला दुखवण्याचा आपला अजिबात हेतू नव्हता. ती वैदेहीची अशी अवस्था बघून घाबरूनच गेली.

a

“मुन्नी...मुन्नी काय हे भलतंच झालं?”

“घाबरू नको. कधीतरी हे होणारंच होतं. पण तू असं एवढं रफली सांगायला नको होतं. तू मुर्ख आहेस सायना.” तिच्यावर ओरडून मुन्नीच रडायला लागली.

“मुन्नी, आता घरात कुणीच नाही आणि मॅडमला हे असं झालं. आता काय करायचं?”

सायनाही रडायला लागली.

“सोहम डॉक्टरला घेऊन येतोय. मला काही सुचत नाही. शेजारच्या काकूंना आवाज दे. आणि पटकन पाणी आण. मम्मीच्या तोंडावर पाणी मारूया.” मुन्नीनं डोळे पुसत सायनाला सांगितलं.

“हो, मला कसं नाही सुचलं हे.” सायना धावतच किचनमध्ये गेली. तिनं माठातलं पाणी आणि सोबतच टोपलीतला कांदा आणला. तो हातानेच धाडकन फोडून वैदेहीच्या नाकाजवळ नेला. मुन्नीने ओंजळीत पाणी घेऊन त्याचा फटकारा तिच्या तोंडावर मारला. तीन-चार पाण्याचे सपकारे आणि कांद्याच्या सुंगणीने वैदेहीने थोडी चाळवाचाळव केली, पण तिच्या अवस्थेत फार फरक पडला नाही. मुन्नी कितीही धीर एकवटण्याचा प्रयत्न करीत होती तरी ते आता तिला शक्य नव्हतं. “मम्मी ऽऽ मम्मी उठ ना गं. मम्मी प्लीज... मम्मी.”

ती वैदेहीला गदगदा हलवायला लागली. पण वैदेहीने जणू घट्ट डोळे निग्रहाने मिटून घेतले होते. ती ते उघडायला तयारच नव्हती.

“काय गरज होती गं तुला इथे येऊन कडमडायची. मम्मी सारखी तुमच्यासाठी धडपडते आणि तुम्ही असे तिचे पांग फेडता. कशाला भलतंसलतं मम्मीजवळ सांगत होतीस.” मुन्नी एकीकडे रडत होती, आणि एकीकडे सायनावर

ओरडत पण होती. मम्मीला सारखं हलवत होती. सायनाला नेमकं आपण आता काय करावं, हेच सुचत नव्हतं. उभं राहावं की बसावं हेही न सुचल्यामुळे शेवटी तिनं घरात जाऊन आणखी एक कांदा आणून फोडला, आणि त्याचा रस ती मॅडमच्या पायाला लावायला लागली.

"मॅडम, उठा ना तुम्ही. उठाना."

"सायना, काकूंना बोलव शेजारच्या. हा सोहमही माहीत नाही कधी येतो तर डॉक्टरांना घेऊन. आणि देवयानीताईला फोन लाव. लवकर लाव. माझा जीव जातो आहे सायना आता. मम्मी, उठ ना गं. उठ ना. मम्मी उठ. मम्मी मी काय करू गं. काय करू... मम्मी... मम्मी उठ ना गं... मला काही सुचत नाहीये मम्मी ऽ ऽ.."

तेवढ्यात सायना काकूंना घेऊन आली.

"काय झालं गं मुन्नी मॅडमना?"

"काकू, बघाना मम्मी कशी पडलीय ते. हलत नाही.... डुलत नाही. बघा...बघा मला काही सुचत नाहीये."

"अरे असं कसं अचानक पण. आत्ता एक तासापूर्वी तर मी त्यांना येताना बघितलं. त्या खाली कार पार्क करीत होत्या, तेव्हा मी गॅलरीत कुंड्यांना पाणीच देत होते. वैदेही, अहो वैदेही. उठाना. उठा काय झालं तुम्हाला."

त्यांनी आवाज देतादेता वैदेहीच्या अंगाला हात लावून बघितला.

"अगंबाई, या तर अगदी थंडगार पडल्यायत. ईशान... ईशान कुठाय? त्याला फोन लाव. अगं यांना ताबडतोब डॉक्टरांकडे न्यायला हवं. अगं कसं करायचं. हे पण नाहीत बाई घरात. शेजारचा मनीष आहे का ते तरी बघा.

a

"काकू, डॉक्टरला घेऊन सोहम येतोच आहे. आणि ईशानदादा तर मुंबईला गेलाय."

तेवढ्यातच दारावरची बेल वाजते. सायना दार उघडताच दारात सोहमला डॉक्टरला घेऊन आलेलं बघताच मुन्नी जागची उठून सोहमकडे पावलं टाकत ओरडतेच, "सोहम, बघ रे मम्मीला काय झालंय ते." आणि ओक्साबोक्सी रडायलाच लागते.

"मैत्रेयी, अगं काही झालेलं नाहीये काकूंना. अशी रडतेस काय वेड्यासारखी. उगी. आता डॉक्टर आले आहेत ना. थांब बैस तू इथे." तिला हाताला धरून तो सोफ्यावर बसवतो आणि डॉक्टरकडे वळत. "डॉक्टर प्लीज..." म्हणून वैदेहीकडे इशारा करतो.

मुन्नी समजूतदार मुलीसारखी डोळे पुसून मम्मीच्या डोक्याशी परत येऊन बसते. डॉक्टर तिला शांतपणे तपासतात. तिच्या पल्स घेतात. तिचे डोळे बघतात. बी.पी. चेक करतात.

"लो ब्लडप्रेशरचा अटॅक आहे हा. काहीतरी प्रचंड ताण आलाय त्यांच्या मनावर. मी इंजेक्शन देतो. त्यांना भरपूर आरामाची गरज आहे. कुठल्याही प्रकारचा ताण त्यांच्या मनावर आता यायला नको. त्यांच्या मनाविरुद्ध काहीही होता कामा नये. त्यादिवशी मी सांगितलं होतं, तुम्हा साऱ्यांना. त्यांची नीट काळजी घ्या म्हणून, त्यांच्या मनाला कुठल्याही प्रकारचा ताण सहन होत नाहीये."

"आम्ही काळजी घेऊ डॉक्टर."

"ईशान कुठाय?"

“दादा गावाला गेलाय. देवयानीताई येतेच आहे. घरात आम्हीच होतो म्हणून मी एवढी घाबरले ना. सोहम बरं झालं तू तरी पटकन फोनवर सापडलास ते. त्यामुळे तू डॉक्टरांना लवकर घेऊन येऊ शकलास. पण मम्मी आता लवकर शुद्धीवर येईल ना डॉक्टर?”

“आत्ता दोन मिनिटांत.” डॉक्टर उद्गारले. त्यांनी वैदेहीला इंजेक्शन दिलं. काही औषधं लिहून दिली. दीड-दोन मिनिटांनी परत पल्स घेतल्यात आणि शेजारच्या टिपॉयवरचं ग्लासातलं पाणी ओंजळीत घेऊन तिच्या चेहऱ्यावर पाण्याचा फटकारा मारला. पाण्याच्या गार स्पर्शाने वैदेहीने लगेच डोळे उघडले. बावरल्यागत प्रथम इकडेतिकडे बघितलं आणि क्लान्तपणे परत मान उशीवर टाकून डोळे मिटले. तिच्या क्षणभर उघडलेल्या डोळ्यात प्रचंड विषण्णता आणि थकवा होता.

“मॅडम, काय हे? काय झालं? उठा.”

“अरे यांना कशाला बोलवलंस? मुन्नीबेटा काय हे?” पडल्यापडल्या शांत-थकलेल्या आवाजात वैदेही म्हणाली.

“काकू, मैत्रेयी किती घाबरली होती. तिने मला फोन केला म्हणून मी पटकन डॉक्टरांना घेऊन आलो. पण तुम्हाला झालं काय असं अचानक? फॅक्टरीत काही गडबडी की मैत्रेयी, तू भांडलीस आईसोबत....ऽऽ?”

“सोहम... मी कशी भांडेल, मम्मीसोबत? ऑफीसच्या कामाचा ताण आलाय तिच्या मनावर. बाकी काही नाही. काही झालेलं नाहीये मम्मीला. होय ना ग मम्मी? मम्मी, मी भांडते होय तुझ्या सोबत कधी?”

मम्मीला उठवत मुन्नी लाडेलाडे म्हणाली.

“चल उठ मम्मी. तुझ्या बेडरूममध्ये जाऊया. आराम कर तू तिथे.”

“होय चल.” तिचा आधार घेत उठत ती म्हणाली. बेडरूमकडे जाताजाता, “यांच्या चहाचं बघ गं.” म्हणायला मात्र ती विसरली नाहीच. सोहमनी सोफ्यावरून उठून पटकन आधारासाठी तिला हात दिला. “काकू, चला आधी तुम्ही आराम करा. डॉक्टरांच्या चहाचं बघायला आम्ही आहोना ना.” तिला बेडरूममध्ये पोचवेपर्यंतच परत बेल वाजली. मम्मीला सोहमच्या स्वाधीन करून मुन्नी बाहेर कोण आलंय हे बघायला आली. मम्मीच्या तब्येतीबद्दल भलतंच कुणाजवळ काही सायनाने बोलायला नको याचं वेगळंच दडपण होतं तिला. मुन्नी बाहेर येईस्तोवर हॉलमध्येच असलेल्या सायनाने दार पण उघडलं होतं. दारातच देवयानीला बघून मुन्नी लगेच तिच्याजवळ गेली.

“ताई, घाबरू नकोस. मम्मी आता अगदी ठीक आहे.”

“अगं, पण झालं काय मम्मीला?”

बोलताबोलता दोघीही वैदेहीच्या खोलीत पोचल्या. वैदेहीची अवस्था अवघ्या अर्ध्या तासातच पंधरा दिवसांच्या आजाऱ्यासारखी झाली होती. तिच्या चेहऱ्यावर प्रचंड ताण सोबतच थकवाही जाणवत होता. चेहरा पार काळवंडून गेला होता, ओठ शुष्क आणि डोळ्यात एक जीवघेणी वेदना. देवयानी तर तिला बघून स्तब्धच झाली. आणि लगेच दुसऱ्याच क्षणी तिच्याकडे झेपावत म्हणाली, “अगं हे काय, मम्मी काय झालं तुला? काल अगदी ठणठणीत बरी होतीस ते आज काय झालं? कुठल्या कंडिशनमध्ये बघतेय मी आज तुला?”

“काहीही झालं नाही बेटा. बस जरा चक्कर आली तर आपल्या मुन्नीबाईंनी सगळ्यांना फोन लावलेत.”

एवढं बोलतानाही वैदेहीला धाप तर लागलीच, पण तिचा थकलेला आवाज स्पष्ट जाणवत होता.

a

“असं कसं काही झालेलं नाही? बघ कशी दिसतेस ती. जशी महिन्याभरापासून आजारी आहेस. सारखं कानीकपाळी ओरडतो आम्ही, आराम कर आराम कर. तर तुला नुसतं पायाला चक्र लावल्यासारखं धावायला पाहिजे. बाहेर सायना दिसतेच आहे. असेल काहीतरी नवा उपाद्व्याप तुमचा.”

“देवू जरा शांत बसतेस का?” हळू आवाजात वैदेहीने देवयानीला समजवण्याचा प्रयत्न केला. “अगं काही झालेलं नाही मला. जरा थकवा आला बस. बैस तू अशी माझ्याजवळ.”

पण तिला स्वत:लाच स्वत:तला थकवा चांगलाच जाणवत होता. अंगावरची शॉल नीट करण्यासाठी तिनं उठण्याचा प्रयत्न करताच बाजूलाच उभ्या असलेल्या सोहमनी ती शॉल व्यवस्थित त्यांच्या अंगावर टाकली, लाईट बंद केला, एसीची स्पीड कमी केली आणि वैदेहीकडे बघत म्हणाला, “काकू, तुम्ही आराम करा आता. डोळे मिटून पडा. झोप लागली की बरं वाटेल तुम्हाला. मी डॉक्टरला सोडून आलोच. देवयानीकडे बघून त्यानी ‘तू शांत राहा’ अशी डोळयांनीच खूण करून दार ओढून तो दाराबाहेर पडला. बाहेर मुन्नीने चहाबिस्किटं आणून ठेवलीच होती. डॉक्टर मुन्नीशी बोलत होते.

“काळजी करू नकोस आता. त्यांना मानसिक ताण आलाय. तो कमी झाला की त्यांना बरं वाटेल. पण तो वाढला तर त्या डिप्रेशनमध्ये जाऊ शकतात, काळजी घ्या. त्यांना नको असलेले विषय काढू नका. नको असलेल्या लोकांना त्यांच्यासमोर येऊ देऊ नका. ऑफीसमध्येतर दोन-तीन दिवस जायलाच नको आहे त्यांनी. एका आठवड्यात दुसऱ्यांदा त्यांना हायपर टेंशनचा अटॅक आहे. असं वारंवार होणं बरोबर नाही.

“आम्ही खूप सांगू हो तिला. पण ऐकायला हवं ना. तिला तर तिच्या ऑफीसमध्ये गेल्याशिवाय चैनच पडत नाही.”

“मैत्रेयी, तू नकोस त्याची काळजी करू. मी डॉक्टरांना सोडून आलो की काकूंना नीट समजवून सांगतो. चला डॉक्टर.”

“चला. टेक केअर बेटा.”

“थांबा डॉक्टर. फी राहिलीय.”

“मैत्रेयी....काय हा वेडेपणा.” सोहम नाराजीच्या सुरात म्हणाला.

“अरे मम्मी मला रागावेल. तुला फी देऊ दिली तर.”

तिच्याकडे नाराजीचा एक कटाक्ष टाकून तो बाहेर पडला. त्याच्या मागोमाग डॉक्टरही.

मघापासून स्तब्ध उभ्या असलेल्या सायनाला आता तर कळेचना की आपण आता नेमकं काय करायला हवं ते. तिने अपराधी नजरेनं मुन्नीकडे बघितलं. मुन्नीलाही सुचत नव्हतं, सायनाला आता कसं ट्रिट करावं ते. वादळात सापडलेल्या झाडाच्या पानासारखीच गत झालीय सायनाची. तिनं आता इथे जास्त वेळ थांबू नये असं तिला मात्र वाटलं.

“सायना, मला असं वाटतं, आता तू तुझ्या कामाला लागावं. तेच बरं होईल. नाही का?”

“होय मुन्नी. मलाही तेच वाटतं. मुन्नी चुकलंच माझं. सॉरी.”

“नाही गं. पण एवढ्या रुडली मम्मीला हे माहीत व्हावं, असं वाटत नव्हतं आम्हाला.”

a

“आम्हाला? म्हणजे?”

“मला आणि देवूताईला.”

“तिला माहीत आहे?”

“होय. अगदी रेवादीदीलासुद्धा.”

“काय सांगतेस काय?”

“अगदी तू म्हणतेस, तसंच नाही. हे तर आम्हा साऱ्यांनाच धक्कादायक आहे. पण सुहासकाका नीट नाहीत, हे माझ्याही लक्षात आलं होतं, तसं मी बोलले होते देवूताईजवळ. तिचंही तेच मत होतं. पण आईला कसं सांगायचं, हा प्रश्नच होता आमच्यापुढे. ती तर सुहासकाकांबद्दल एक अवाक्षरही ऐकू शकत नाही, हे माहितीय आम्हाला. ईशानदादाशी त्यांच्यावरून कितीदा वाद होतात. पण...”

“काय झालं काय पण आत्ता असं?”

हळूच दार लोटून बाहेर आलेल्या देवयानीने तिला विचारलं. तेव्हा लक्ष नसल्याने आधी मुन्नी केवढ्यांदा दचकलीच. “मम्मीला पंधरा दिवसांत बी.पी.चा दुसरा अटॅक आहे. त्यादिवशी आंटी घाण काहीतरी बोलली म्हणून. पण आज घरातच असं काय झालं? सुहासकाका आला होता का इथे? त्याच्याशी भांडण झालंय?”

“नाही गं. ते नव्हते आले इथे. या सायनाने खूप फालतू बडबड केली आज. काका तिच्याशी कसे घाण वागतात, हेच सरळसरळ सांगून बसल्यात मॅडम.”

“माय गॉड. मूर्ख. गाढव आहेस का सायना तू? एवढी हिंमत केलीच कशी तू? आणि सुहासकाका तुझ्याशी वाईट-साईट वागतात? तुझ्याशी?”

a

काळी ठिक्कर पडलेली सायना खाली बघत डाव्या पायाच्या अंगठ्याने खाली फरशी-सोबत अस्वस्थपणे चाळे करत नुसती उभी राहिली.

“कशाला सांगितलंस? काय गरज होती तुला? सुहासकाकाविरुद्ध ती ब्र ऐकायला तयार नसते. का सांगितलंस तू?”

“जाऊ दे ताई आता. जे व्हायला नको होतं ते होऊन गेलं. मम्मी तिला सारखं रागावत होती, त्या डॉक्टरच्या दवाखान्यात परत जा म्हणून. तर चिडून सायनाने तो डॉक्टर किती वाईट आहे आणि सुहासकाकाही तिच्याशी किती वाईट वागतो हे चिडून सांगितलं.”

“माय गॉड. कठीण आहे. बापरे. मम्मी केवढं टेंशन घेणार आता या साऱ्या गोष्टींचं. आणि त्या सुहासकाकाची तर काही धडगतच नाही आता. तिच्या साऱ्या नाजूक विश्वाचा तू चक्काचूरच केलास गं. काकावर तिचा केवढा विश्वास आहे.”

“पण ताई. तो माणूस खोटा आहे. तो माझ्यासारखीला....”

“आता गप्प बैस. एक शब्दही बोलू नकोस. आणि इकडे तर अजिबात येऊ नकोस आता. तू दिसलीस तरी ती अपसेट होईल आता. आणि यातलं सुहासकाकाला तर काहीच सांगू नकोस.”

“ताई. सॉरी. माझं चुकलंच. मी नको होतं सांगायला.”

“ओ.के. जाऊ दे म्हटलं ना. जा. ती उठायच्या आत तू निघून जा.”

“जाते. पण ताई, माझ्यावर विश्वास ठेवा. मॅडमला दुखवण्यासाठी नाहीच सांगितलं मी. त्या साऱ्यांवर का असा विश्वास ठेवतात? आम्हाला सांगतात, माणसांवर विश्वास ठेवू नका आणि स्वत:? त्या बदमाश डॉक्टरलाही त्या देवमाणूस समजतात. पण तो त्यांच्याबद्दल वाईट बोलतो. माझ्यासोबत संग करताना तो

मॅडमच्या न पाह्यलेल्या उघड्या शरीराचं वर्णन करकरून हसतो. नालायक. सुहासकाकावर किती जीव आहे मॅडमचा. तरी ते माझ्याजवळ येतात. इतर बायकांवरही प्रेम करतात. ताई, रागराग आला या साऱ्यांचा मला. त्या रागाच्या भरात...'' पुढे सायनाकडून बोलवेचना. खूप रडायला आलं तिला. अगदी गदगदून.

''आता रडतेस कशाला? चूप बैस. जा तू. मम्मी उठण्याच्या आत तू जा. हा विषय इथेच बंद. यानंतर या विषयावर कुठेही बोलायचं नाही.''

मुन्नीने समोर होऊन दार उघडलं. सायना एकक्षण मुन्नीकडे आणि एक क्षण उघड्या दाराकडे बघत राहिली. आणि लगेच तिथून बाहेर पडली. देवयानी बाहेर कोसळणाऱ्या पावसाकडे खिडकीतून बघत राहिली. एक तासापूर्वी स्वच्छ दिसणाऱ्या आकाशात पावसाचे एवढे ढग अदृश्यावस्थेत कुठे लपून बसले होते याचा विचार तिच्या डोक्यात आला. मागमूस नसलेला पाऊस असाकसा वेड्यासारखा कोसळतोय!!

“वैदेही, मी हे काय ऐकतोय? मला का सांगितलं नाहीस तू?” सुहास कळवळून म्हणाला.

“कशाला सांगायचं?”

“कशाला? कशाला म्हणजे काय?”

“होय. कशाला सांगायचं?”

“म्हणजे आता तेवढीही गरज उरली नाही?”

“संबंधच काय तुझा-माझा.”

“वैदू, नको ना असं बोलूस.”

“मॅडम...मॅडम म्हणायचंस. बाकी शब्दांवरचा अधिकार संपलाय तुझा.”

“ए. जादा डोकं खराब नको करूस बाबा माझं. आधीच मला डॉ. पाठकांनी हे सांगितल्यापासून माझा जीव नुसता वरखाली होतोय. आठवड्यातून दोनदा तुला हायपर टेंशनचा अटॅक. मी आत्ता येतो आहे तुला भेटायला.”

“नाही. मला भेटायला तू यायचं नाहीस. डॉक्टरांनी मला कुठल्याही प्रकारचा ताण घ्यायचा नाही, असं बजावलंय.”

“मी तुला ताण देतो?”

“नाही देत?”

“वैदू, तू आता सारखी अशी वाकड्यातच शिरणार आहेस काय?”

“आताही नको शिरायला?”

“शट. तुझ्याशी कसं आणि काय बोलावं हेच कळत नाहीये मला.”

“बोलूच नकोस. प्लीज. आता आणखी त्रास नको देऊस. पहिल्यांदा त्या मूर्ख बाईमुळे तब्येत बिघडली. आज तुझ्यामुळे; पण माझ्या मनावर प्रचंड ताण आल्यामुळे. दोन्हीमध्ये साधर्म्य एकच. माझ्या प्रामाणिक भावनेचा पोतच तुम्हा लोकांना कळला नाही. त्याच्याच चिंधड्याचिंधड्या केल्या तुम्ही. ती तर काय रे बाहेरचीच बाई. बोलूनचालून गटारातच आयुष्य गेलंय तिचं. सौदे करण्यात. रोज ती बाई कित्येकांच्या आयुष्याचे कोंबड्या-बकऱ्यांसारखे सौदे करते. तिच्याकडून माझ्या काय अपेक्षा असणार? पण तू...तू तर माझा होतास ना. माझा...किती फसवा शब्द. बरं झालं तूही परत एक धडा शिकवलास मला. आयुष्यात दर टप्प्याला एक अनुभव हीच जर का माझी नियती असेल, तर त्याला मी तरी काय करणार? पण बस. आता बस. तू परत मला फोन करू नयेस आणि माझ्याकडे येऊही नयेस.”

“वैदू प्लीज.”

“तुझी हिंमत कशी होते आहे रे माझ्यासोबत बोलण्याची? ये..येच तू. आज सगळा लेखाजोखाच तुझ्यासमोर ठेवते. सायना..सायनासारख्या पोरीला सोडलं नाहीस तू. नालायक. माणूस आहेस का डुकराची अवलाद. कुठही तोंड मारायला. बाईचा वास हुंगतच असतो का?”

“मी तुला हात लावलाय आजपर्यंत?”

“ते तुझं क्रेडीट नाही, माझं आहे, आणि बंगलोरला गेलो असतो तर तू काय सोडलं असतंस होय मला?”

a

"ते केवळ त्या क्षणांना जिवंत करणं राहिलं असतं. कायम तुझ्या-माझ्यात ते नातं कधीच नव्हतं. तुझ्या इच्छेविरुद्ध आजपर्यंत मी तुला हात लावला का कधी? वैदू आपलं नातं त्या संबंधाच्या फार पलीकडचं आहे गं."

"सांगितलं ना, ते तुझ्या स्वभावाचं यश नाहीय. मला हात लावण्याची तुझ्यात हिंमतच नाहीये, हे मलाही माहीत आहे. पण तुझी नजर सायनावर.. सायनावर जावी. सायना... जिला मी माझ्या मुलीसारखं जपण्याचा प्रयत्न करते."

"कुणी सांगितली तुला ही बकवास?" सुहास जोरात खेकसलाच.

"खुद्द सायनाने."

"ती गावभवानी तुला काय वाट्टेल ते सांगेल, आणि त्यावर तू विश्वास ठेवशील. मी सांगतोय ते खोटं." तो चिडलाच आता.

"जी मुलगी माझ्या मुलीसारखी आहे, या घरातली कौटुंबिक सदस्य आहे, हे तुला माहीत आहे. आधीचे जाऊ दे पण काही क्षणापूर्वी मी तुला ते सांगितलं तरी तू माझ्याचसमोर तिला गावभवानी म्हणतोस? मग तिच्यासोबत अभद्र व्यवहार करायला तू काय कमी करणार आहेस? ती पोरगी खोटं कशाला सांगेल? सगळे-सगळे पुरुष तुम्ही एकजात बदमाश आहात. सुहास फार मोठी फसवणूक केलीस तू माझी. श्रावणातील आभाळाप्रमाणे क्षणाक्षणाला रंग बदलणारा चेहरा आहे तुझा."

"बोल. काय वाट्टेल ते बोल. पण असं काहीही झालेलं नाहीये. तू उगाच माझ्यावर खोटे आरोप करते आहेस."

"बरं, सायना असं मला खोटं का सांगेल?"

"तिचा त्यात काहीतरी डाव असावा."

"काय?"

“ते मला कसं माहीत असणार?”

“पण काही लॉजिक लागतंय का बघ. खोटं बोलून तुझ्या माझ्यात दरी निर्माण करून तिला काय मिळणार? सुहास तू केलेल्या पापांवर पडदा टाकण्यासाठी तू त्या पोरीला खोटं ठरवू नकोस.”

“आणि एवढ्या वर्षांपासून तू मला ओळखतेस, आपण एकमेकांवर प्रेम करतोय, एकमेकांना समजून घेतोय, तू म्हणशील तेव्हा, तू म्हणशील तिथे तुझ्या प्रत्येक कामात मी तुला सहकार्य करतो, ते सारं खोटं. एवढ्या वर्षांचा आपल्यातला तंतू एका सायनाच्या बोलण्याने असा संपला?”

“बरोबर. हेच तर मलाही म्हणायचंय. एवढ्या वर्षांच्या तुझ्यामाझ्या प्रेमात सायना नावाची ही वासना आलीच कुठून? आधीचं काय ते तुझं बालपणचं प्रेम... हातातून निसटून गेलेलं समजून घेतलं मी. तिच्यासोबत ओरिसा ट्रीप केलीस, म्हणून माझ्यासोबत बंगलोरला यायचं टाळलंस. त्रास झाला मला. खूप त्रास झाला. पण मला ती गोष्ट समजून घेता आली, लग्नाच्या आधीपासूनचं प्रेम होतं ते. मला कितीही त्रासदायक असलं तरी कुठेतरी मला मन मोठं करणं भाग होतं. पण हे...हे काय? सायना... चक्क सायना... म्हणजे अशीही बस्ती लागते तुला?”

“काय बोलतेस वैदेही तू? अगं काही तर विचार कर.”

“खूप झाला विचार करून. आता नाही. यानंतर तू माझ्यासोबत बोलायचं नाहीस, माझ्याकडे यायचं नाही.”

“तू अन्याय करते आहेस माझ्यावर.”

“तू केलास त्यासमोर हा अन्याय काहीच नाही.”

“वाजवीपेक्षा जास्त ताणते आहेस तू.”

“हे कुणी ठरवायचं? वाजवीपेक्षा जास्त पातळी तू सोडलीस, तेव्हा हा विचार केलास?”

“प्लीज... वैदू.. प्लीज. मला समजून घे गं.”

“खूपदा, खूपदा समजून घेतलंय मी तुला. नको तेवढं. कदाचित त्यामुळेच हा दिवस माझ्यावर आला असावा. मागे एकदा घरात कुणी नसताना बाईला तू डोकं चेपायला लावलं होतंस, बाईची तक्रार होती, तुझ्याबद्दल तेव्हा. पण मी साफ नाकारलं. अरे, माझ्यासारखी सर्वगुणसंपन्न स्त्री तुझ्यावर प्रेम करत असताना तू अन्य क्षुद्र गोष्टींकडे लक्ष देऊ शकशील, ही कल्पनाच करू शकत नाही मी. माझा कदाचित माझ्यावर वाजवीपेक्षा जास्त विश्वास आहे.. अहं. होता. माझ्या सहवासात असलेला पुरुष इतका डावीकडे झुकू शकतो, यावर मी विश्वासच ठेवू शकत नाही. माझा माझ्या व्यक्तिमत्त्वावर प्रचंड विश्वास होता. घरात काम करणारी तुझ्यापेक्षा वयानं मोठी असणारी बाई, शंभर पुरुषांच्या सहवासात येणारी तुझ्या मुलीच्या वयाची सायना, लग्नाआधीची प्रेयसी रमा, सगळ्या गोष्टींत काकणभर सरसच असणारी आणि उधळून प्रेम करणारी मी... काय, नेमकी टेस्ट काय आहे तुझी? मी प्रेमाची भुकेली होती. माझ्या अधिकाराचं, माझं स्वत:चं म्हणून प्रेम मला कधीच मिळालं नाही. तू माझा आहेस आणि माझ्यावर माझ्याइतकंच तुझं प्रेम आहे, ही भावना माझ्या आयुष्यात हिरवळ आणायला पुरेशी होती. पण संपलंच ते सारं. काय समजून घ्यायचं. माझ्या सहनशक्तीच्या पल्याडचं आहे हे सारं. प्लीज, मला अजून खूप जगायचंय. खूप कामं करायचीत, मला जास्त त्रास देऊ नकोस.”

“वैदेही, तुला त्रास होणार नाही, याचीच ना मी सतत काळजी घेतली?”

“मलाही आतापर्यंत हेच वाटत होतं. तुझ्यासारखा समजूतदार माणूस माझा मित्र आहे, याचा मला अभिमान होता. पण तुझं खरं रूप एवढं ओंगळवाणं असेल,

असं वाटलं नव्हतं मला. मला तू हवा होता सुहास. माझा म्हणून. पण तुझ्या माझ्या संबंधाचा ‘अफेयर’ म्हणून उल्लेख व्हावा, त्यावर काही चर्चा व्हावी असा नाही. आपल्यामध्ये प्रत्यक्ष सहअस्तित्वाची भाषाच नको होती मला. आपल्यामध्ये आणखी कुणी असावं, असू शकतं हे तर कल्पनेतही नव्हतं माझ्या. तुझ्या अस्तित्वाने मला एक दिलासा होता. एक आश्वासन असायचं. न बोलता, मी ते गृहीत धरलेलं. मला वेळोवेळी रितं करणाऱ्या माझ्या आयुष्यात तुझ्या ‘असण्याने’ एक बळ यायचं. एक शक्ती होतास तू माझी. मला वाटायचं, माझं एकटेपण मी तुझ्या अंत:करणात लपवून ठेवतेय. ते स्वत:लाही दिसू न देण्यासाठी. पण खोटं. सारं खोटच ठरलं ते शेवटी.

“एवढी वर्षे तुझ्या सहवासात आहे, तुझ्या आयुष्यातल्या प्रत्येक वळणावर मी तुझ्या सोबत आहे, ते तुझे सगळे अनुभव खोटे आणि कोण ती कामवाली बाई आणि सायनासारखी वेडी पोरगी तुला जे सांगते ते खरं.”

“तेच...तेच तर कळत नाहीये मला.” कसंतरी चिरक्या आवाजात शेवटचं वाक्य ती बोलली आणि परत एकदा तिच्या भावनांचा उद्रेक झाला. मघापासून तिनं आपल्या भावनांना काबूत ठेवण्याचा प्रयत्न केला होता. तो लोंढाच जणू बाहेर पडला. प्रचंड वेगाने. धरणांचे दरवाजे धरण तुडुंब भरल्यावर सोडावेत आणि रौद्र स्वरूपात आतल्या पाण्याने बाहेर पडावं, की त्याचा वेग बघणाऱ्यालाच भीती वाटावी, अशाच वेगाने मघापासून दाबून ठेवलेल्या सगळ्या भावना वैदेहीच्या बाहेर पडल्या. तिला खूप रडू येत होतं. त्या कडवड रडण्याने तिचं सगळं शरीर गदगदा हलायला लागलं. छाती फोडून दु:ख बाहेर येईल इतक्या जोराने ती रडू लागली. तिच्या तोंडून शब्द फुटेना. हुंदक्यांना जणू आता शब्द नकोसे झाले होते. तिच्या हातातून बाजूला पडलेल्या मोबाईलमधून हॅलो....हॅलो चा आवाज येतच राहिला.

वैदेहीच्या बेडरूममधून येणारा रडण्याचा आवाज समोर हॉलमध्ये बसून टीव्ही बघणाऱ्या ईशानच्या कानावर पडला आणि तो तडक तिच्या रूमकडे धावला. पाहतो तर मम्मी पालथी पडून ओक्साबोक्सी रडतेय.

"मम्मी, अगं मम्मी काय झालं तुला."

"मम्मी प्लीज. शांत हो बघू. काय झालंय काही त्रास होतोय का? रेवाची आठवण आली काय.. ऊठ..ऊठ.. सरळ बैस बरं तू. ..." तिला समजवत आणि हाताचा आधार देऊन उठून बसवण्याचा प्रयत्न करीत असतानाच त्याचं लक्ष मोबाईलवर गेलं. अजूनही त्यात हॅलोहॅलोचा आवाज येतच होता. कुणाचा फोन सुरू आहे? कुणासोबत बोलताना मम्मी रडतेय, म्हणून एका हाताने मम्मीला आधार देत त्याने कानाला मोबाईल लावला आणि 'हॅलो' म्हणाला.

"हॅलो... कोण?"

"ईशान मी सुहास बोलतोय. कशी आहे रे मम्मी."

"मम्मी दोन मिनिटांत ठीक होईल. पण तुमच्याशी बोलताना मम्मी धाय मोकलून रडतेय, परवापासून तिची तब्येत बिघडण्याचं कारण आत्ता मला उमजलं जे मला मुन्नी किंवा देवूने सांगितलं नव्हतं. लिसन मॅन, यू डोन्ट डिस्टर्ब टू माय मदर अगेन इन हर लाईफ. अंडरस्टॅन्ड? आफ्टर दिस मोमेंट यू टॉक विथ मी डायरेक्टली. कळलं तुला? तुझ्यामुळे माझी आई माझ्यापासून दूर...दूरच राहिली. मी तिला तुझ्यासकट निर्मळ मनाने स्वीकारूच शकत नव्हतो. तू तिला एक चांगली कंपनी दिलीस, याची मला जाणीव आहे, तुझ्यामुळे तिचं मनोधैर्यही वाढलं. पण तुझ्यामुळेच आम्हा दोघांच्या नात्यात कायम एक ताण राहिला. एक अस्पष्टशी

बारीक रेष. आज ती रेष मी नष्ट करतोय. यानंतर तू तिला मानसिक वेदना देणार नाहीस. समजलं?"

त्याने फोन बंद केला. बाजूला ठेवला. आणि दोन्ही हाताने मम्मीला घट्ट आवळून तिच्या छातीवर डोकं विसावलं. "मम्मी.... माझी मम्मी..." नकळत त्याच्या डोळयातून घळघळा आसू वाहायला लागले. सावध झालेल्या वैदेहीने ईशानला घट्ट मिठीत घेतलं. जणू खूप वर्षे आपण याच्यावर अन्यायच करतोय, आता नाही, याच भावनेनं तिनं त्याला थोपटलं, त्याच्या केसांमधून हात फिरवला. "ईशू... ईशू..." उद्विग्नता आणि उद्वेग दोन्ही तिच्या डोक्यात थैमान घालीत असताना ईशानचा आश्वासक स्पर्श तिला खूप धीर देऊन गेला...

"**ओ**टीपोटात खूप दुखतं. पांढरं पानी त लय जाते. नुसता चिखल साला. या मानसायच्या धिं◌ंगाण्यानं जांगत जशा उवा पडल्यासारख्या झाल्या. काल त साला पू निघाला केवढा मोठा तिथून. कावला बापा आता माहा जीव. यक मानूस म्हून धड सापडत नाय" नकोशी चिडून बोलत होती.

दुपारचा नेहमीसारखा तीन-चार जणींचा गप्पांचा अड्डा जमला होता. नकोशीची तब्येत बरी नाही, म्हणून तिच्याच कमऱ्यात साऱ्या बसल्या होत्या.

"खरंच नकोशे, कधीकधी वाटते, एखादा तरी चांगला यार भेटाले पाहिजे होता. पन सारे मेले आपल्या आंगाची खाज जिरवायलाच येत्यात."

"नकोशे तू आपल्या तब्येतीची चांगली काळजी घे. तुला सारखा हा ताप येनं आणि तू आता म्हने तसा पू जानं हे काही चांगलं लक्षन नाय. कुठं येवून फसलो सालं आपन"

"काय व किरन तू त चांगली शिकली सवरली व्हतीस. तू गुमान बाहेर राहूनंच हे काम कराचं त तू कशा पाई या खातेऱ्यात आलीस ते." नकोशीनं किरणलाच विचारलं.

"हा प्रश्न मीच मले हजारदा विचारत राहते. चांगली बी.एससी झाली. आश्रमशाळेत राहून शिक्षन घेतलं. तिथला मास्तर मस्त होता. त्यानेच प्रथम मले नादी लावलंय ना. आम्हा निर्धन मुलींना फुकटात राहण्या-जेवणाची व्यवस्था, पन

आठवड्यातून एकदा त्या लोकांसाठी बाहेर जावं लागायचं. कधी छान वाटायचं कधी त्रास व्हायचा. मुख्य म्हणजे पाळीत बी साले सोडत नसत."

"ते काय नवीन हाय आपल्यासाठी? साले, तिकडं बायका यायले हात लावू देत नाही, म्हून आपल्या फोतरीवर नाचायले येतत." बाजूलाच तोंडातल्या तंबाखूची पिचकारी सोडत नकोशी फुत्कारली.

"ए नकोशे, जरा नीट बोलत जा बाई. उबग आला मले आता इथे राहून. पळून जावसं वाटतं आता इथून. आंटीला चाट मारून पळण्याच्या विचारात आहेच मी. पाहते काही जमते काय ते."

"लगन करून टाक तू किरने." स्वत:च्या डाव्या हाताच्या पंजावर उजव्या हाताच्या पंजाने टाळी मारत नकोशी म्हणाली.

"आपल्यासारख्यांनी लग्नाची स्वप्न बघू नयेत."

"सायनीचं मस्त जमलं बॉ, नाही?"

"हो तिनं तं नशीबच काढलं. तिचा अल्ला तिच्यावर मेहरबान झालाय. आपला देव कुठं लपला त समजत नाय." कोपऱ्यातल्या शंकराच्या आणि साईबाबाच्या फोटोकडे नमस्कार करत किरण म्हणाली.

"मी किती उपासतापास करतो, गुरुवार-मंगळवार, पन कुठं दडी मारून बसला देव जाने हा देव. चाळिशी पार झाली किरन या धंद्यात. सोळा वर्षांची व्हती तव्हापासून आली. मानसं मानसं मानसं. वकारी येते आता मानूस म्हटला का. जमीन आपली वलीच्या वलीच. रातचे सात वाजत नाही त सारा गावचा लोंढा का इकडंच येते का त देव जाने बापा. यक गेला का बुहारा दुसरा तयारच रायते. फडक्यानं पुसून कोरडं कराले वेळ नाही देत भोसडीचे. साल्यायच्या आंगाचा वास, तोंडाचा वास.

देवा कुठं लपला रे तू. आनं भोसडीचे हे गिऱ्हाईक निरोधबी वापरत नाय. हजारदा सांगा तरी. कायबी फायदा नाय. कितीक येळा पोटशी राहा नं कितीकच येळा मच्छरदानी साफ करा. कट्टाळा आला आता.'' बोलताबोलता चंचीतल्या तंबाखूची पुडी काढून डाव्या हाताच्या पंजावर तिनं तंबाखू घेतला. त्याच्यातल्या काड्या काढल्या, कचरा काढला, त्याला थोडासा चुना लावला आणि उजव्या हाताच्या अंगठ्याने तो चोळला. तिच्या पद्धतीनं मन भरेपर्यंत मस्त चोळून त्याच्यावर उजव्या हाताने थापटी मारली. परत डाव्या हाताचा पंजा चाळणीसारखा हलवून सगळा तंबाखू बरोबर पंजाच्या मध्यभागी आणला आणि तोच हात तिनं किरणसमोर केला. किरणनं चिमूटभर तंबाखू उचलला आणि तोंडात डाव्या भागावर दाढेखाली ठेवला. उरलेला सगळा तंबाखू नकोशीनं आपल्या ओठाखाली दाबला. आता दोघीही तोंडातला तंबाखू चघळत गप्पा करायला लागल्या. तंबाखूची आवडती नशा मिळाली की नकोशीला दारूची हमखास आठवण होतेच.

''किरने, माराचा का एकएक पेग?''

'' आत्ता? बह्याड आहे काय? अजून माझी आंघोळ नाही. तुळशीला पानी नाही टाकलं अजून मी. अन् गिऱ्हाईक आल्यावर स्टॅमिना लवकर संपल ना. जरा दिवे लागू दे. आज काय तुला एकदम दुपारीच दारूची तल्लफ आली.''

''साली, तंबाखूची पट्टी मस्त जमली. त्याची नशा आल्यामुळं आता मोठी नशा. तुही नशा साली या तुळशीच्या मुळातच.''

''मला नको बा आता. संध्याकाळी आपण आपले दोन ग्लास रिचवतो म्हनजे सात-आठ गिऱ्हाईक सहज खपवता येतात मले.''

a

“हाय बापा तू अजूनही तरनीताठी. जोर हाय तुह्यात. आमचं झालं आता चिपाड. साले हे कालेजातले पोट्टे तरी. लहान-लहान पोरीयकडे जाव त येतात आपले माह्यासारख्या बुढ्ढीकडे.”

“अगं, त्यांना काय डायरेक्ट तुझ्याकडे थोडी यायचं असतं. माहे, सायना-निमाचे दरवाजे दोन वाजेपर्यंत कायम बंद असतात. हे पोरं आपले नऊ-दहा वाजेपासून आलेले असतात, ते कुठं एवढावेळ थांबत बसणार. शिवाय बिचारे भीतभीत येतात. लपत-छपत. पटकन आटोपून त्यांना बाहेर पळायचं असतं. मग काय जो दरवाजा उघडा दिसला तिथे घुसतात ते.”

“हो ना. समजत काहीच नाही. काही करता येत नाही. आता या चाळिशी गाठलेल्या माह्यासारख्या बुढीजवळ ते अठरा-वीस वर्षांचे पोट्टे आले का लेकरू जवळ आल्यासारखं वाटते वो माय. यक गालफडात मारून हाकलून द्याव वाटते. पन ते पंचेवीस-तीस रु. दिसत रायते. काय कराचं. आपली पैशाची मजबुरी, त्यायची आंगाची मजबुरी. त्यायले झोपाची खाज सुटली रायते पंधरा वर्षांचे होत नाहीतं.”

“प्रत्येकाच्या आपआपल्या गरजा आहे नकोशे. आपल्या आयुष्याचं भाग्य हेच आहे हे कोन बदलवू शकनार? जाऊ दे. याच्यावर कितीही चर्चा केली तरी बदलनार नाहीच. सायनासारखं आपलं आयुष्य एखादवेळी बदललंच तर नशीब आपलं. पन खरं नशीब काढलं ते मुन्नीनं. ती आली, त्यादिवशी बिचारी सगळयांच्या दयेचं पात्र होती. आपल्याला तरी अनोळखी मानसायनं त्रास दिला होता गं. पन ती बिचारी दुर्दैवी पोरगी. या...या इथे चक्क तिच्या मामानेच...मामा..आणि बापाने त काय म्हणे घरातच...आई मेली त्याचदिवशी...बापरे.. उहं. नाही गं. नाही सहन होत. मामा?...अगं मामा...तिचा सख्खा मामा, त्याने वडिलांना फूस लावून तिला आपल्याच सोयीसाठी इथे विकलं, म्हणजे तो केव्हाही इथे यायला तयार, त्यानेच

a

तिची इथली पहिली रात्र भोगली. दहा-बारा वर्षांची ती पोरगी, धड काही कळत नव्हतं. आडदांड मामाच्या तडाख्यात सापडली तेव्हा ढोरासारखी ओरडत होती. तो एक नालायक माणूस आणि हा पहिलवान आणि आपली आंटी, हे लोक तर कसाईच आहेत. हजार रुपयांत पोटची पोर विकताना यांच्या हृदयाच्या छिलक्या कशा होत नाही, कळतच नाही गं. हैवानासारखा तो मामा तिच्या आंगासोबत खेळला तेव्हा पोट्टी केवढी ढोरासारखी बोेंबलत होती. दगडाला सुद्धा पाझर फुटला असता, पन त्या मसन्याउदाला नाही फुटला. तो खोलीचं दार उघडून बाहेर गेल्याबरोबर मी गेली होती तिच्याजवळ; त काय, सारी चादर रक्तानं भरली होती. आनं ती पोट्टी उठू शकत नव्हती का बसू शकत नव्हती. गरमगरम पाण्यानं मीच तिले आंघोळ करायला लावली होती. जखमांना गरम पानी लागून झोंबताच परत तिचा आरडाओरडा. खूप भोगलं व बिचारीनं त्या मेल्या मामाचं पाप. पन वैदेही मॅडममुळे तिचं नशीब फळफळलं.”

“हो ना. मी त आइकलं, खूप शिकली म्हने ती. आनं आता त काय मोठी सायबीन होनार हाय म्हने.”

“हो. यूपीएससीची परीक्षा दिली म्हने तिनं.”

“म्हनजे वं काय?”

“आता तुला काय समजनार आहे नकोशे. जाऊ दे. तुझ्यापुरतं तू एवढंच लक्षात घे की मुन्नी खूप शिकली आनं आता ती खूप मोठ्ठी साहेब झाली.”

“बरं झालं बापा. तिच्यातरी आयुष्याचं भलं झालं. देव पावला तिले.” नकोशीला देवाला नमस्कार करताना पाहून किरणने तिला टोकलंच. “काय गं सारखीसारखी त्या देवाले नमस्कार करून त्रास देतेस. अगं बाई, मुन्नीसाठी खरी देव आहे वैदेही मॅडम. मॅडम त्या रात्री जिवावर उदार होऊन आल्या नसत्या, आपल्या

a

दोन-दोन पोरींची काळजी न करता मुन्नीला इथून घेऊन गेल्या नसत्या तर जे आपलं होत आहे तेच तिचंही झालंच असतं.”

“खरं हाय किरने तुहं” उसळून नकोशी म्हणाली. “अवं, आपलं अख्ख आयुक्ष या गटारात गेलं. तिच्या नशिबानं लवकरच इथून बाहेर पडण्याची संधी तिले मिळाली आनं तिच्या जिवाचं सोनं झालं. तू बी लय शिकली हायस किरने. तू कायले इकडं आली हे मात्र मले समजतच नाय.”

“सांगितलं ना मघाच. नशीब दुसरं काय. मॅट्रिकपर्यंत आश्रमशाळेत राह्यली. त्या नंतर मात्र तिथे राहायची परवानगी नव्हती. पन आश्रमशाळेत काम मिळालं. तिथल्याच मास्तरनी माझी सायन्समधली प्रगती पाहून बी.एससी ला प्रवेश घ्यायला लावला. नाइलाजानं सावत्र आईनं घरी ठेवलं. पन पूर्ण पगार तिच्या हातात. सकाळचं कॉलेज, दिवसभर आश्रमशाळेची नोकरी. झोपायला डोक्यावर छप्पर. मात्र बी.एससी झाल्यावर ज्या चांगल्या नोकरीचं मी स्वप्न पाहत होती ती काही मला मिळाली नाही. खूप प्रयत्न केले. उलट आश्रमशाळेतली होती, तीही नोकरी गेली. नंतर सावत्र आईही घरात राहू देईना. जानार कुठे? एकदिवस भर पावसात रात्री आठ वाजता रमन सायन्स सेंटरच्या समोर आपल्याच विचारात उभी होती. आयुष्याचा वैताग आला होता. आत्महत्येचे विचार मनात घोळत होते. समोर शुक्रवार तलाव दिसत होता. दुसरीकडे आग्याराम देवीचं मंदिर. एक घोळका माह्यासमोर उभा होता. चार-पाच पोरी, दोन-तीन मानसं-त्यांच्यात त्यांचं आपआपसात काय बोलणं चाललं होतं माहीत पन नाही, पन जरा वेळाने पोलीसची लॉरी आली, साऱ्यांना गाडीत कोंबलं, मलेही बसवलं. मले तर कळलंही नाही, नेमकं काय झालं ते. पोलिसांशी बोलन्याचं भानही नव्हतं. दोन दिवसांपासून घरात कुनीही मला खायला दिलेलं नव्हतं. चक्कर येत होते. गाडी कुठे फिरली, कुठे गेली माहीत नाही. पन जेव्हा मला

काही समजलं तेव्हा मी या इथे आपल्या बस्तीत एका खाटेवर झोपली होती आणि माह्यासमोर आंटी बसलेली होती. डोळे उघडले तेव्हा तिने मला थंडगार पानी आनं गरमागरम चहा दिला. त्या वक्ती माह्यासाठी ती प्रेमदूत होती. तिथलं वातावरन माह्या लक्षात आलं, पन वापस जायला माह्याजवळ घर नव्हतं. कुणीही माझं वाट पाहनारं नव्हतं. इथे माझ्या डोक्यावर छप्पर होतं, जेवायला अर्धकच्च कसं का असेना पन होतं. आधी पुरुषाला जवळ येऊ द्यायला मन कचरत होतं. पन हा अनुभव मला काही नवा नव्हता. आश्रमशाळेत अधूनमधून हे कर्म आम्हाला करावंच लागायचं. याशिवाय पर्याय नाही, हे न समजण्याइतपत मी काही बाळबोध नव्हती. मला हे सारं माहीत होतं. आश्रमशाळेत संचालकाला माह्या नोकरीसाठी डोनेशन द्यायला कुनाजवळ पैसा नव्हता. माझ्या स्कॉलरशीपवर मी शिकली, हेच खूप होतं. सावत्र आईनं आश्रमशाळेत निराधार म्हणून ठेवलं, तेव्हा माझ्या नशिबाचा राग यायचा, पन तिथं राहिली, म्हणून शिकू तरी शकली. माझी आई वारल्यानंतर आजोळच्यांपैकी कुणीही माझ्यासोबत संबंध ठेवलेला नव्हता. मले मामा- मावशा कोनी-कोनी माहीत नव्हतं. काय करणार मी? ट्रकड्रायव्हरपासून सुरुवात झाली. पुढे जो येईल तो. मन मारून पैसा कमवनं मी शिकली. हेच माहावालं भाग्य आहे हे मले समजून चुकलं होतं.''

''जाऊ दे. आपल्या आयुष्याची चित्तरकथा कितीही वाचली तरी फायदा काय आता. चाल जरा चौकात जाऊन दोसा खाऊन येऊ.''

''चाल तेवढाच चेंज.''

a

जसजसं उन्ह कलायला लागलं, तसतशी गंगाजमुनातली हालचाल वाढायला लागली. या बस्तीला सुद्धा तीन चेहरे आहेत. माणसांना अनेक चेहरे असतात, हे वेगळं. पण चक्क एखाद्या बस्तीलाही असे वेगवेगळ्या वेळचे वेगवेगळे चेहरे असावेत, याचं तिला नेहमीच आश्चर्य वाटायचं. सकाळी दहा वाजेपर्यंत ही अख्खी बस्ती झोपेतच असते. किंबहुना चंद्रास्त झाला, म्हणजेच, त्यांच्या झोपेला सवड मिळते. शेतकरी जसा बैल दिसला की त्याला रिकामा न सोडता, शक्य तेवढी कामं पटापट त्या बैलाकडून घाण्याला जुंपल्यासारखा त्याच्याकडून काढून घेतो, तशी आंटी या साऱ्या बायांना रात्री अजिबात स्वस्थ बसू देत नाही. काय झोपायचं ते दिवसभर. तिची स्वत:चीही सकाळ साडेदहा अकरालाच सुरू होते. सगळ्याच बायापोरी रात्रीची कसर दुपारपर्यंत झोपून काढतात. त्यांची चिल्लीपिल्ली आपली आपणच उठून खोलीच्या बाहेर येऊन लगेच गल्लीत खेळायला लागणार, आपली आपणच जेव्हा वाटेल तेव्हा आणि जिथे वाटेल तिथे घाणही करणार. स्वत:चं ढुंगण स्वत: धुण्याच्या लायक नसलेल्या लक्ष्मीचा बल्ल्या ती घाण हातानं चिवडतच बसतो. कधीकधी मनसोक्त पोटातही रिचवतो. सतत शेंबूड गळणारी यशोदेची पिंकी तर मनगटाने जमेल तेवढा शेंबूड पुसते, नाहीतर प्राशन करते. आयांना या पोरांची खाटेवर काही खबरबात नाही. हळूहळू एकएक करून उठू लागतात. त्यातल्या त्यात नकोशी जरा लवकर उठते. पण उठून स्वत:चं आवरून लुंग्याच्या कळकट टिनपाटातला चहा प्यायली की तिला प्रश्न असतो, आता काय करायचं? क्वचितच तिचा कॉलेजातला गिऱ्हाईक दुपारचा येतो, पण तो तिचं आवडतं गिऱ्हाईक. त्यामुळे तो जेव्हा कधी येईल, त्याच्यासाठी आपण तयार असलंच पाहिजे, ही भावना तिच्या मनात कायम ठाण मांडून बसलेली असते. ज्यादिवशी खूप वाट बघावी आणि तो आला नाही की तो सारा राग ती या गल्लीतल्या पोरांवर काढते. आज साऱ्या बाया थकून झोपी गेल्यायत. काल नागपंचमी होती, त्यामुळे साऱ्यांचीच रात्र जरा जास्त

रंगीन झाली. कोणताही सण असो, या बायांची सणाच्या दिवशी मात्र चांगली चंगळ असते. सण असला की आपलं पुरुषत्व जणू बाहेरच सिद्ध करण्याची खुमखुमी येते की काय पुरुषांना.

हळूहळू मात्र आळसावलेली दुपार सावरायला लागते. एव्हाना अख्खी बस्ती पूर्ण जागी झालेली असते. न्हाणीच्या नावाखाली साड्या लटकवून जी काय आडोशाची जागा आहे, तिथे आपआपल्या सोयीने त्यांच्या हळूहळू आंघोळी, कुणाचे केस सुकवणं तर कुणाचा भडक मेकअप अशी तयारी संथ गतीने चालते. मध्येच कुणी नाश्ता नाहीतर जेवणाच्या मागे लागते. एखादीने जेवणाची आठवण काढली की सहजच दोन-चार जणींचा कळप एकामागोमाग एक बाहेर पडतो. जेवणाची गडबड छत्तीसगडी गल्लीत फारशी नसतेच; पण केरळीयन गल्लीतला पोऱ्या कधीच रिकाम्या हाताने त्या गल्लीत वावरत नाही, काही ना काही ऑर्डर इकडल्या तिकडल्या सुरूच असतात, महाराष्ट्रीयन गल्लीतल्या किरण देशमुखला प्रत्येकदा त्या पोऱ्याला विचारायची हौस.

“क्यू चिपक्या, किधरका?”

“ग्वाल्हेर गल्ली के नऊ नंबर का” चिपक्या डोळे मिचकावत आपल्या कामाला निघून जातो. हळूहळू जसजसा सूर्य कलायला लागतो, गल्लीचा रंग बदलायला लागतो. आता तिथला जडपणा जाऊन जरा उत्साह येतो. जो तो आपआपली गल्ली साफ करण्याच्या मागे लागलेला असतो. कळकटलेल्या, उदासलेल्या बोळीत परत संध्याकाळ होताहोता आपोआप उत्साही वातावरण यायला लागतं. लाईट लागले, की चहावाल्या पोऱ्याच्या आवाजाला तर एकदम धारच येते. आंटीसुद्धा खाटेवर सजूनधजून बसते. डोक्यात गजरा माळून. लंगड्याची लगबग चालू आहे. सायना आपली खोली स्वच्छ करून, चादर बदलवून, नवे

a

कपडे, डार्क रंगाचं लिपस्टीक, मोकळे केस आणि हातात मोबाईल घेऊन दारात उभी आहे. खरं तर सायनाने शहरात फ्लॅट घेतला आहे. आपल्यासोबत दोन पोरीही नादी लावल्या. तीन पोरी मिळून एक फ्लॅट शेअर करून धंदा करण्याइतपत आता सायना या दहा वर्षांत तरबेज झाली आहे. आणखी फार काळ आपण हा व्यवसाय करू शकणार नाही याची जाणीव तिला आहे. चाळिशी नंतर कोणतीच बाई इथं टिकू शकत नाही. आताच आपल्याला कधीकधी खाज सुटायला लागली. तिला इथं जास्त दिवस राहायचचं नाही आहे. पण तिला या बस्तीचा, आंटीचा मोह सोडवत नाही. तिचा प्राध्यापकही इथेच येतो. हॉटेलचा मॅनेजरही तिचा इथलाच गिऱ्हाईक. फ्लॅटवरचे गिऱ्हाईक एकदम वेगळेच. ते कधीच इकडे फिरकत नाही, इकडले तिकडे फिरकत नाही. दोन्ही बाजू सायना छान सराइतासारखी सांभाळते. आंटीला तिचं मोठं कौतुक आहे. आणि आंटीचा सायनाला आधार. वैदेहीनं दाखवलेला रस्ता सायनाला पसंत नाही. आता हेच आपलं आयुष्य हा तिचा विश्वास आहे. तिच्या मते वैदेहीला व्यवहार कळत नाही. ‘साब’ ने नेलं तरच ती घर थाटणार, अन्यथा आता हेच आपलं जीवन. साब भित्रा निघाला, बायकोला, मित्रांना घाबरला म्हणून ती त्याला फत्रू म्हणते. मात्र प्राध्यापक तिला खूप आवडतो. आज सायंकाळ होताहोताच आलेल्या प्राध्यापकाला घेऊन ती पलंगावर बसली. लाथेनंच तिनं दार ढकललं. कारण प्राध्यापकानं तिला उठायची संधीच दिली नाही.

“बस गं. अशीच माझ्याजवळ बैस.”

“दार तर लावू दे.”

“कशाला? दार लावून करण्यासारखं मी काहीच करत नाही.”

“का करत नाही. कपडे न उतरवता इथून कुणी जात नाही.”

“मी फक्त कपडेच उतरवायला येत नाही.”

“मग येताच कशाला? कशाला स्वत:ची बदनामी करून घेता?”

“इथे आल्यानेच फक्त बदनामी होते काय? सतत बायकोकडून अपमान करवून घेण्याने नाही होत?”

“का करते ती तुमचा अपमान?”

“तिला मी आवडत नाही.”

“का आवडत नाही?”

“मी तिच्या लायक नाही. तिला मी संपूर्ण सुख देऊ शकत नाही, असं ती म्हणते.”

“तिला सुख म्हणजे काय हे तरी कळतं काय. कसम से साब, या आठ-दहा वर्षांत एवढे मर्द मी पाहिले, अनुभवले, पण जे सुख मला साबनी दिलं, त्यानंतर फक्त तुम्हीच. नाहीतर मानसं म्हणजे नुसते हैवान. त्यांना फक्त बाईचं शरीर पाहिजे असते. ती थकली आहे, ती तयार नाही, हे शब्दही त्यांच्या गावी नसतात. सर, तुम्ही तर देवमाणूस आहात. पैसे खर्च करून येता, पण हातही लावत नाही. उलट माझे पाय चेपून देता. माझ्या कमरेला तेल लावता. माझे आसू पुसता. मला चांगला सिनेमा दाखवायला नेता. पुस्तकं वाचायला लावता. सर, देव याच्यापेक्षा वेगळा काय असतो हो. का करता सर, तुम्ही माझ्यासाठी हे सगळं? माझं दु:ख तुम्ही कसं काय समजून घेऊ शकता?”

“सायना, मी वेगळं असं काहीच करत नाही. तुला उगाच तसं वाटतं. तुझे पाय चेपून द्यावेसे वाटतात, म्हणून मी चेपतो, तुझ्याशी गप्पा माराव्याशा वाटतात, म्हणून मी येतो. तुला खरं सांगू का, पहिल्या दिवशी मी आलो होतो ते माझं पौरुषत्व

a

सिद्ध करायला, हे खरं आहे. माझ्या बायकोने बेडमध्ये माझा अपमान केला होता. 'तुम्हाला सुख देता येत नाही' असं ती मला म्हणाली होती. माझ्या शिक्षणाची, माझ्या प्राध्यापकीची, माझ्या बुद्धिमत्तेची तिनं टवाळी केली होती. मला खूप राग आला होता. त्यादिवशी मी ठरविलं होतं, दिसेल त्या स्त्रीला आज बिछान्यात लोळवायचं. तिचं मन भरेस्तोवर आपण मर्दानगी सिद्ध करायची. इथे त्यापूर्वी क्वचितच आलो होतो. पण तू भेटली. ती रात्र या बस्तीतली तुझी पहिली रात्र होती, आणि मीही तसा नवखाच होतो. आंटीला माझ्यातला बुजरेपणा लक्षात आलेला होता. म्हणूनच तिनं तुझ्याजवळ पाठविलं मला. त्या मुरलेल्या धटिंगण बायकांपर्यंत मी त्यादिवशी पोचलो असतो ना, काही खरं नव्हतं माझं. माझी शारीरिक मर्दुमकी दाखवायची आहे, हे जरी मला वारंवार वाटत होतं तरी खरी गरज माझी वेगळीच होती गं. मला व्यक्त व्हायचं होतं. माझी आतल्या आत होणारी जी घुसमट आहे, त्याला वाट करून द्यायला हवी होती मला. माझ्या बायकोने केलेल्या अपमानाने मी भयंकर जखमी झालो होतो त्यादिवशी. मला कुणीतरी कुरवाळणारं, समजून घेणारं, माझे अश्रू पुसणारं, माझ्या पौरुषत्वाच्या अहंकाराला कुरवाळणारं कुणीतरी हवं होतं माझ्याजवळ. स्वत:च्या हृदयाशी धरून मला जपणारं हवं होतं. आणि नेमका मी तुझ्या वाट्याला आलो. जी स्वत:च पार उद्ध्वस्त झाली होती, जिला हे जगही माहीत नव्हतं. जिनं कुणाच्यातरी प्रेमाखातर घर सोडलं होतं, आपल्या प्रियकरावर तिचं प्रचंड प्रेम होतं पण जी फसवल्या गेली होती, नागवल्या गेली होती. जिला आधाराची, विश्वासाची गरज होती. सायना, तुला पाहिलं, तुझी कथा थोडीशी ऐकली, तरी लक्षात आलं, आपण किती वेडे आहोत, आपलं कसलं दु:ख. एका वेड्या स्त्रीनं मला नामर्द आहे म्हटलं म्हणून मी नामर्द होत नाही. आपण दोन अनोळखी जीव त्या रात्री दोन-चार तासांच्या सहवासातच एकमेकांच्या एवढे जवळ

आलोत की आपला एकमेकांना आधार वाटायला लागला. कालांतरानं तर तुझ्या आयुष्यातला मी महत्त्वाचा भाग झालो. तुला आत्महत्या करण्यापासून मी परावृत्त करू शकलो, तुझी मी मानसिक 'गरज' झालो. मला तुझ्याकडे येताना लोकांची, बायकोची पर्वा वाटेनाशी झाली, तुझ्याकडे येताना मला तुझ्या शरीराची नाही, तुझ्या भेटीची ओढ वाटायला लागली. मला कळलं; मी नामर्द नाही, मीच खरा पुरुष आहे, सायनाची गरज आहे मी. माझी गरज सायना आहे. सायना, रिअली आय लव्ह यू"

"सर..."

"खरंच सायना, चल आपण एकत्र राहू या. या बस्तीतून बाहेर जाऊ या. तुझ्या फ्लॅटवर नाही आणि माझ्या घरी पण नाही. वेगळंच कुठेतरी."

"आणि तुमची ती कजाग बायको?"

"तिला माझ्या पगारातले जास्तीत जास्त पैसे तिच्या हातात पडले की तिची काळजी मिटली. तिला माझ्याशी काही देणंघेणं नाही, माझ्या पैशाशी आहे. ते घरही तिच्याच नावावर आहे. शिवाय पोरंही तिच्याजवळ. आणखी काय हवं तिला? शिवाय जगाच्या दृष्टीनं मी तिचा एवढा मोठा अपराधी असेल, की ती मला सतत उघडपणे शिव्या द्यायला मोकळी, शिव्या देऊन तिचं पोट भरणार, लोकांच्या सहानुभूतीनं तिचं मन भरणार, आणखी काय हवं तिला."

"सर, तुम्ही हे सारं मनापासून बोलता व्हय?"

"होय."

"अल्ला कसम?"

"होय सायना, अगदी मनापासून. शपथ"

"तुमची किती बदनामी होईल."

"मला त्याची काळजी नाही."

"लोक तुम्हाला वाईट म्हणतील."

"तू छान म्हणशील नं."

"स....र" त्याच्या गळयात हात टाकून ती लाडेलाडे त्याच्या कपाळाचं चुंबन घेते. "माणसांचा गराडा माझ्याभोवती खूप आहे सर. पण तुम्ही माझ्या आयुष्यात वेगळेच आहात. उधळून प्रेम करण्याची ताकद तुमच्यात आहे. सर तुम्ही पहिल्याच दिवशी मला भेटलात आणि आयुष्यावर प्रेमच करायला लागली मी. नाहीतर आत्महत्येशिवाय माझ्यासमोर पर्याय नव्हता."

"सायना, लोकांचा मी विचार करत नाही. माझ्यासोबत राहून तू सुखी होशील ना?"

"हे काय विचारता बॉ. मला तर एकदम स्वर्गच मिळेल."

"एकदम स्वर्ग वगैरे नाही मिळणार. इथे तुम्ही सगळया सारख्या स्तरातल्या स्त्रिया एकत्र राहता, बाहेरच्या जगाशी तुमचा फारसा संबंधच येत नाही. येतो तो फक्त त्या गिऱ्हाइकापुरता. आपण बाहेर राहू, तेव्हा कुठेतरी भाड्याने घर घेऊन राहू. काही दिवसांनी लोक तुला ओळखायलाही लागतील. तू कोण कुठली, काही चोंबड्या नजरेतून हे सुटणारही नाही. मी तुझी खरी ओळख नाकारणार नाही. काल ती गंगाजमुनातली मुलगी होती, आज माझी मैत्रीण आहे, सखी आहे, आज आम्ही एकत्र राहतो. लग्न वगैरे करण्याच्या भानगडीत आपण पडणार नाही आहोत, बायकोलाही खरं काय ते सांगेन. आज माझ्या हातात जो काय पगार पडतो, त्यातले काही बायकोला देईन, आपण दोघं सुखाने राहू शकू एवढे पैसे आपण ठेवूया. कार तिला देईन, मोटरसायकल आपल्याजवळ राहील. चालेल?"

“या अल्ला, तुम्ही काय बोलता, मला काही कळत नाहीये. तुम्ही खरं बोलता आहात?”

“होय. अगदी खरं.”

“माझा त विश्वासच बसत नाही आहे”

“माझ्यावर विश्वास ठेव. पण माझ्यासोबत राहावंसं वाटत असेल तरच आपण राहूया.”

“आणि आपण एकत्र राहायला लागल्यावर माझ्या धंद्याचं काय?... तो कुठे करू मी?”

“तो बंद. आपण दोघं राहायला लागल्यावर तुझा व्यवसाय बंद. मग असं कुणीच तुझ्याकडे येणार नाही. ही तयारी आहे तुझी?”

“मग दिवसभर मी काय काम करायचं?”

“घरातली कामं करायची, वाचायचं, छानछान सिनेमे बघायचे, नाटकं पाहायची. अगं घरात करण्यासारखं खूप असतं, बाकीच्या बायका कायकाय करतात ते आपणही करायचं.”

“म्हणजे माणसाला घरात येऊच द्यायचं नाही?”

“येऊ द्यायचं. पण ओळखीची माणसं. गिऱ्हाईक म्हणून आलेली माणसं नाही.”

“आणि आलेल्या माणसांपैकी एखादा माझा गिऱ्हाईक होऊ म्हणाला तर...”

a

“आपल्या घरात आल्यावर आपल्या ओळखीचा माणूस असं वागणारच नाही. आणि असं तो म्हणालाच, तर मी त्याला त्याची जागा दाखवून देईल, आणि तुझंही तिथलं आपल्या घरातलं स्थान त्याला सांगेल. त्याची नको तू काळजी करूस.”

“हे लई वेगळं वाटते सर मला.”

“विचार कर. अगदी आजच नाही आपण बाहेर निघत आहोत.”

“हा जरा विचार करू द्या.”

“मी पण माझ्या बायकोला सांगेन. सगळं स्पष्ट करूनच आपण एकत्र राहूया. आणि सायना आपण सोबत राहायला लागल्यावर तू हा व्यवसाय बंद करायचा. मी म्हणतोय, त्यात तुझ्यावर मला मालकी हक्क गाजवायचा आहे, म्हणून नाही. पण या घाणेरड्या व्यवसायाचा तुलाही तिटकाराच आहे ना. तुला यात जबरदस्तीने, धोक्याने कुणीतरी फसवून आणलंय. तू किती तळमळत होतीस इथून बाहेर पडायला. आईवडिलांच्या, तुझ्या साबच्या आठवणीने तू किती रडायचीस माझ्या छातीवर डोकं टेकून.”

“होय ना. पण साब तर आलेच नाहीत मला घ्यायला. किती वाट पाहिली मी साबची सर. पण मी त्यांच्या लायकच नाही ना. आणि वैदेही मॅडम त्यांना सांगायला गेल्यात, तर त्यांनी पार नाकारलंच मला घरात घ्यायचं. का केलं असेलहो असं साबने. त्यांचं त माझ्यावर लई प्रेम होतं. मला ते फ्लॅटमध्ये वेगळं ठेवणार होते. छानछान कपडे घेऊन दिले होते त्यांनी मला. पण अचानक अल्ला का रुसला माझ्यावर माहीत नाही.”

“त्यांच्या काही मर्यादा असतील.”

“काय मर्यादा असू शकतात? घाबरले ते चावला आंटीला. जाऊ द्या. माणसं अशीच असतात. पण तुम्ही लई चांगले आहात.”

“तसं नाही सायना. एकदम कुणाबद्दल असं आपलं मत व्यक्त करू नये. साबचं तुझ्यावर प्रेम होतच. आजही असेल. पण प्रत्येकदा कराव्याशा वाटणाऱ्या सगळ्या गोष्टी जमतातच असं नाही. अगं पुरुष असला म्हणून काय झालं, नाही वागता येत त्याला त्याच्या मनासारखं. त्यातच त्याचा एकुलता एक लहानसा मुलगा वारला. वडील म्हणून त्याला ते प्रचंड दु:ख पचवताना काय यातना झाल्या असतील. पाण्यासारखा पैसा ज्या बापाजवळ आहे, त्याला नियतीपुढे झुकावं लागलं. त्याचं ते दु:ख वेगळंच. आणि डोळ्यादेखत गेलेल्या मुलाच्या मातेला सांभाळणं केवढी कसरत करावी लागली असेल, त्यावेळी त्यांना. आईला मुलाच्या मृत्यूचं दु:ख पचवणं सोपं नसतं राणी. मुलाच्या मृत्यूनं किती कोसळल्या असतील तुझ्या त्या चावला आंटी. अशावेळी केवळ स्वत:पुरता विचार करणं कसं सुचणार गं त्यांना. त्यांनी त्यावेळी आपल्या पत्नीला जपायलाच हवं होतं. त्यांनी त्यावेळी योग्य तेच केलं. स्वत:च्या व्यक्तिगत दु:खाचे कढ पिऊन चावलाने आपल्या पत्नीला सांभाळलं.”

“पण मग वैदेही मॅडम तर आत्ताआत्ता गेल्या होत्या ना त्यांच्याकडे माझ्यासाठी. आता गुड्डूला जाऊन तर लई वर्षे झालीत. आता त्यांना दुसरं बाळ पण आहे म्हणे. तो देशपांडे येतो ना माझ्याकडे साबच्या घराजवळचा. तो तर सांगत होता. तरीही त्यांनी कुठे मला त्यांच्याजवळ ठेवून घेतलं.”

“सायना, साबला दहा वर्षांपूर्वी जे आवडत होतं, ते आजही आवडेलच असं आपण कसं समजायचं?’

“अरे वारे वा. त्यांचं प्रेम होतं ना माझ्यावर. आणि चावला आंटी कशी आवडते अजूनही मग त्यांना.”

“अगं ती बायको आहे त्यांची. बायको आवडावी नाही लागत. आपल्याकडे एकदा पत्नी म्हणून जी घरात आली, ती आली. आवडली काय, न आवडली काय. प्रेयसीचं तसं नाही, ती आवडते तोवरच प्रेयसी असू शकते.”

“नाही. मला नाही समजत तुमचं बोलणं. प्रेम आहे तर ते आयुष्यभर असलंच पाहिजे.”

“लहानपणी तुझ्या भावावर-बहिणीवर प्रेम होतं ना तुझं? तुझ्या आईवर किती प्रेम होतं तुझं. तिला कष्ट कमी पडावेत, म्हणून तू एवढ्या लहान वयात लोकांकडली धुणीभांडी करायला घराबाहेर पडलीस ना. मग आईपेक्षा जास्त प्रेम साबवर केलस ना. साबसाठी घर सोडलंस ना.”

“नाही. साबनी माझ्याशी खोटं बोलून मला सिनेमाच्या निमित्ताने घराबाहेर बोलवलं. मग रात्रभर मी साबसोबत राह्यल्यावर....”

“होय. ते सारं मला माहीत आहे. तू खूपदा सांगितलंस मला. पण आईपेक्षा साबवर प्रेम केलंस. आता माझ्यावर करते. करतेस ना? की अजूनही साबवरच प्रेम करतेस?”

“तुमच्यावर प्रेम करतेच. पण मला अजूनही साबची आठवण येतेच. मला साब आठवतात. खूप आठवतात. त्यांनी खूप शिकवलं सर मला. खूप लाड करायचे ते माझा. खूप चांगला. मला हवाहवासा. साब...साब.”

a

बोलताबोलता सायना भावनाविवश झाली आणि त्याला बिलगली. प्राध्यापकाने तिला एकदम जवळच घेतलं. तिच्या केसांमधून अतिशय हळुवारपणे हात फिरवला.

"उगी सायना. उगी राहा. अगं किती विचार करशील. कर तू साबवर प्रेम. हवं तेवढं कर. पण आता आपण दोघांनी एकत्र राहण्याचा विचार कर. हे सगळं जुनं आयुष्य धुऊन पुसून स्वच्छ करूया आपण. नव्या कोऱ्या पाटीसारखं आयुष्य जगूया. माझ्या आयुष्याला घेऊन मी किती गंभीर होतो गं. खूप काहीतरी वेगळं करायचं होतं मला. भगतसिंग माझा आदर्श होता. रवींद्रनाथांच्या कादंबऱ्यांमधल्या नायकासारखं जगावंसं वाटायचं. कधी कुसुमाग्रजांचं आकर्षण वाटायचं. काहीतरी करायचं. एकदम वेगळं. पण काहीच झालं नाही. लग्न न करता समाजासाठी काहीतरी करावंसं वाटायचं, एखाद्या गावात राहायला जाऊन त्या गावाला आमूलाग्र बदलून टाकावंसं वाटायचं, त्या गावातलं एकही मूल शाळेशिवाय राहू नये, आरोग्याचे प्रश्न, पाण्याचे प्रश्न, गावातले रस्ते, दिवे सारेसारे प्रश्न तिथे राहून निकालात काढून टाकावेसे वाटायचे. पण काय करू शकलो मी? काहीच नाही. प्रेमात पडलो, लग्न केलं आणि एका स्त्रीचा गुलाम झालो. समाजातला बदल हा असा एकट्या-दुकट्याचा विषयच नाही. कधीकधी वाटतं, सालं लग्न केलं, तेच चुकलं. माझे लग्नाबाबतचे समज फार वेगळे होते. पण लग्नप्रकरण फार भयानक निघालं. निदान माझ्याबाबतीत तरी. हे करू नका, ते करू नका. कुणाला मदत करायचीच नाही. सारखी ओरडत राहायची. चार पिरेड घेतले की सरळ कॉलेजातून घरी यायचं. पार माझ्या स्वातंत्र्यावरच गदा आली गं. त्यानेच विटलो मी. सारखी मला कमी लेखायची."

"भांडणं होतात का तुमचे?"

"फार होतात, फार म्हणजे काय की आम्ही एकमेकांसोबत बोलतो कमी आणि भांडतोच फार. भांडायला माझी काही हरकत नाही गं. पण त्यातही जरा डेप्थ असावी ना. तात्त्विक भांडावं. पण आमच्या मॅडम म्हणजे....बरं जाऊ दे. तिच्याविषयी बोलायला लागलो तरी मला चिडचिडायला होतं. ते जाऊ दे. तू सांग, कधीपासून आपण एकत्र राहायचं?"

"सर, तुम्ही खरंच बोलता का?"

"अरे मग काय गंमत वाटली तुला? अगं बाई तू मला सांग की आपण येत्या आठ दिवसांत एकत्र राहायला लागू. घर बघायला जो काय वेळ लागेल, तेवढाच वेळ मला दे तू. माझ्या दोन-तीन मित्रांचे फ्लॅट्स आहेत, जे त्यांना भाड्यानेच द्यायचे आहेत. त्यांचे राहते मोठमोठे बंगले आहेत. अर्थात आपलाही बंगल्याशिवाय एक फ्लॅट आहेच. पण तो बाईसाहेबांच्या नावाने आहे. शिवाय तिथे भाडेकरू आहेतच. त्यामुळे त्यांना बाहेर काढून आपण तिथे राहायला जायचं आणि त्या कजाग बाईच्या हातात कोलीत द्यायचं, हे नकोय मला. त्यापेक्षा आपण आपलं स्वतंत्र घर बघायचं."

दोघांमधला संवाद ऐन रंगात आला असताना दाराजवळच धपकन काहीतरी पडल्याचा आवाज आला. त्यामुळे दचकून सायनाने त्याच्या छातीवर असलेला आपला चेहरा उंचावून दाराकडे बघितलं. तिच्या डोळ्यात भीती बघून तो मनाशीच हसला. दोन्ही हातांनी सायनाला बाजूला करत तो खाटेवर उठून बसला. "कोण आहे रे?" तोच परत दारावर थाप मारल्याचा आवाज.

"अरे कोण आहे? इधर नही दुसरी देख."

कुणी गिऱ्हाईक आलंय हे लक्षात घेऊन प्राध्यापक आतूनच बोलला.

“अबे भाडे, कबसे गयेला बे अंदर. पुरी रातभरके लिये खरेदी क्या. चल निकाल बाहर. मेरेको जाना है. साला मै सायनाके लिये आता हू. कित्ता देर हुआ बे. राह देख देखके एक निंदकी झपकी भी हो गई मेरी. कित्ते बार बैठेगा बे खुटीउपाट. चल निकल बाहर.”

“उठ सायना. बघू दे मला. कोण हा वेडा तर.”

“नको नको सर. हा शाहू लई वाईट मानूस आहे. असाच कधीही येऊन त्रास देतो.”

“अगं तो प्यायला आहे. बघ त्याचा आवाज.”

“सर इथे प्यायलेलेच लोक येतात. तो तर पिऊन तर्र होऊनच येतो.”

“आणि तू त्याला येऊ देते?”

“गिऱ्हाईक आला आणि खटिया रिकामी असली तर घ्यावंच लागते ना अंगावर. इथे आमच्या आवडीनिवडीचा प्रश्न नसतो.”

“ए सायना, दरवाजा खोल. निकाल साले वो भोसडेको बाहर. साला कित्ते बार मारे गा बे दम. दो घंटेसे बैठा हू ना च्युत्या मै यहा.”

प्राध्यापकाने सायनाला झटक्यात बाजूला केलं आणि वाघाच्या चपळाईने तो उठून एका ढांगेतच दाराजवळ येऊन त्याने खाडदिशी कडी काढून तो दाराबाहेर आला. खालच्या पायरीजवळ असलेल्या माणसाचा मागून शर्ट पकडून त्याला सरळ उभा केला आणि त्याच्या मुस्कटात सणसणीत लगावली. झणझणीत गालावर बसलेल्या या झापडीने तो आधी पार भेलकांडत जवळच्या मोरीजवळ जाऊन पडला. इतक्या त्वेषाने प्राध्यापकाने त्याला गालफाडात लगावली होती, की त्याच्या

नाकातून रक्तच निघालं. तरीही मागे न फिरता प्राध्यापकाने परत त्याला खांद्याला उचलून उभा केला आणि दरडावून म्हणाला,

"आता गपचूप जातो आहेस का परत लगावू? आणि पुन्हा या खटियावर यायचं नाही. या गल्लीतच दिसायचं नाही."

"तेरे बापका राज है क्या?" मनगटाने नाकात आलेलं रक्त पुसत समोरचा गरजलाच.

"बापका नही मेरा राज है. ये खटिया मेरी है. यहा आनेका नही."

"इथं कोनाचीच कोनती खटिया नसते. लई जुना गिऱ्हाईक हावो मी इथचा. मले माहीत हाय."

"ही खटिया माझी आहे. हा दरवाजा यानंतर तू चढायचा नाही."

"अबे ए, चार पैसे जास्त देतं तर तुले काय वाटते तुनं खरीदलंच तिले. ते काय तुही रखेल हाय?"

"रखेल नाय. बायको."

"मंग घरी ने नं. घरातल्या बायका कव्हापासून गंगाजमुनात येऊन बसाले लागल्या बॉ. हे बी मस्त. तुही बायको तू गेल्यावर आता आमचं बिस्तर गरम करन."

"ए साला... मादरचोद..."

"सर...सर.. थांबा तुम्ही...थांबा..लंगड्या..लंगड्या...आंटी..दौडो."

प्राध्यापकाचा अवतार बघून सायना घाबरली. हा काही आता शाहूला सोडत नाही, याचा अंदाज आल्याने तिने एकदम आरडाओरडाच करायला सुरुवात केली. बाहेरचा गलका ऐकून आजूबाजूचेही दरवाजे उघडल्या गेले. कुणी टॉवेल

लावून, तर कुणी तसेच चड्ड्यांवर बाहेर आले. कुणाचा गाऊन उलटा त कुणी ब्लाऊझच्या बटन्स अर्धवट उघड्या टाकलेल्या. क्षणात तिथलं चित्रच बदललं. त्या देखाव्याची एवढी किळस प्राध्यापकाला आली की तिकडनं धावत आलेल्या लंगड्याकडे दोन्ही हातांनी शाहूला उचलून फेकला आणि जवळच उभ्या असलेल्या सायनाचा हात झटक्यात करकचून पकडून ओढतच तो म्हणाला,

"चल सायना, इथे आता एक मिनिटही तू थांबायचं नाहीस. चल."

"कहा?"

"माझ्यासोबत. चल."

आणि तिच्या उत्तराची वाटही न बघता तो त्या कोंडाळयातून बाहेर पडला सायनाला जवळजवळ ओढतच. पाच-दहा पावलं टाकल्यावर त्याच्या लक्षात आलं, आपण पायात बूटही घातलेले नाही. म्हणून तो थबकला. सायनाने त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेनं बघितलं, त्याने खुणेनंच पायाकडे लक्ष वेधवलं. तिला हाताला धरूनच परत वापस आणलं. तिच्या खोलीसमोरची गर्दी अजूनही हटली नव्हती. उलट आपआपसात चांगली चर्चा सुरू झाली होती. शाहू चिडून काहीतरी बोलत होता. प्राध्यापक वापस आल्याबरोबर लंगड्या समोर आला "अब क्या हुआ साब?" त्याने त्याच्याकडे पार दुर्लक्ष केलं. खोलीत दोघंही गेले. आपआपले चपला-बूट घातले. प्राध्यापकाने आपला बेल्ट पॅन्टला लावला, तिथे खाटेवर काढून ठेवलेलं व्हॅलेट, गाडीची चाबी घेतली, एक नजर खोलीवरून फिरवली आणि तो सायनाच्या हाताला धरूनच बाहेर पडला. तेवढ्या वेळात तिनेही आपली पर्स हातात घेतली होती. आपण याच्यासोबत कुठे जातो आहे, हे तिला माहीत नव्हतं. पण आत्ता त्याला काहीही विचारण्यात अर्थ नाही, हे ती समजून होती. तो जाईल, तसं त्याच्यामागे जायचं. बस एवढंच तिनं मनाशी ठरवलं होतं. वेगाने जाणाऱ्या या

दोघांनाही मध्येच आंटीने आवाज दिला, 'किधर लेके जा रहे हो मेरे छोकरी को?' आणि बाजूलाच ती पचकन थुंकली. तिला उत्तर देणंही त्याला गरजेचं वाटलं नाही. पण सायना परत येतेच हा विश्वास असल्यामुळे आंटीने तिच्या जाण्याकडे फार लक्ष दिले नाही. एवढ्या रात्री एखाद्या हॉटेलातच तो आपल्याला नेऊ शकतो, एवढीच अटकळ तिनं बांधली होती. रात्रीचा अडीच तीनचा सुमार. बाकीच्या गल्ल्यांमधील खोल्यांचे जवळजवळ सगळे दरवाजे बाहेरून बंद होते. पण आज ही महाराष्ट्र गल्ली मात्र शाहूच्या गोंधळामुळे पार जागी झाली होती. आपआपल्या खोल्यांतून कपडे सावरत बाहेर कसला गलका झालाय, हे बघायला दाराबाहेर डोकावत होते. दोन-चार आंबटशौकीन दारूडे भेलकांडत येणाऱ्या जाणाऱ्या गिऱ्हाईकापेक्षा त्याच्यासोबतच्या बाईला थोडासा तरी स्पर्श कसा करता येईल, या प्रयत्नात गलंडतही होते. एखाददोन रिक्षावाले गिऱ्हाईक बाजूलाच पाच-दहा रुपये वसूल करून आपली रिक्षा लावून त्यातच झोपले होते. एक हमाल आपल्या ढक्कलगाडीला गल्लीतल्या ट्यूबलाईटखाली लावून त्या ढणढण उजेडात झोपी गेला होता. एक किरटं कुत्र मध्येच प्राध्यापकाच्या पायात आलं. त्याबरोबर कारण नसताना त्याचा सारा राग उफाळून येऊन त्याने तो त्या मरतुकड्या कुत्र्यावरच काढला. त्याच्या पेकाटात एक लाथ हाणली. त्याबरोबर विव्हळत ते कुत्रं पार पळूनच गेलं. प्राध्यापक भयंकर चिडला आहे, हे तिच्या लक्षात आलंच होतं, पण त्याचं डोकं अजूनही गरम आहे. म्हणून तिला थोडी भीतीही वाटली. तिनं आपल्या हातातला त्याचा हात दाबला आणि आणखी त्याच्या जवळ सरकली. त्याने आणखीच आपली चाल वाढवली. लवकरात लवकर या बस्तीपासून त्याला दूर जायचं होतं. गल्लीच्या टोकाला येऊन झाडाखाली लावलेल्या आपल्या मोटरसायकलजवळ जेव्हा तो पोचला तेव्हा त्याला एकदम हायसं वाटलं. मात्र ट्यूबलाईटचा प्रकाशही आता त्याला भेसूर वाटला. त्याने खिशातून चाबी काढून

a

लगेच गाडीला लावली, गाडीला किक मारली आणि सायना गाडीवर बसताच गेअर बदलवून त्याने पहिल्याच क्षणी गाडी एवढी दामटवली की सायनाचा झोक जाताजाता ती एकदम सावरली.

“सर हळू ना.”

“सॉरी.”

सायना मागून त्याला बिलगली. दोन्ही पाय आजूबाजूला टाकल्यामुळे त्याला अगदी खेटून तिला बसता आलं. हळूहळू आपल्या दोन्ही हातांनी तिने त्याच्या पोटाला आवळलं आणि तिच्या सवयीप्रमाणे शर्टवरूनच त्याच्या बेंबीभोवती ती वर्तुळं काढायला लागली. क्षण-दोन क्षणतर त्याने तिच्या याही कृतीकडे लक्ष दिलंच नाही, पण ती तिच्या स्टाईलने त्याच्याशी खेळत राहिली. बेंबीभोवतीची बोटं हळूहळू जरा वर येऊन छातीशी खेळायला लागली आणि त्याने आपला गाल तिच्या गालावर किंचित मागे झुकून दाबला, त्याक्षणी सायनाने मागून त्याला गच्च आवळलं. आणि त्याचा राग कमी झाल्याचं तिच्या लक्षात आलं. त्यानंतर गांधीबाग रोडवरून वेगात पळणारी गाडी रेल्वेस्टेशन चौकात येऊन पुलावर चढली तेव्हा गाडीनं शंभरची स्पीड क्रॉस केली होती. शहरातल्या पुलांवरून फूलस्पीडने गाडीला पळवणं हा प्राध्यापकाचा सायनासोबतचा खास शौक. बर्डी पुलावरून गाडी खाली हितवाद चौकात आली आणि दीक्षाभूमी रोडने माधवनगरच्या तिच्या फ्लॅटसमोर थांबवली, तेव्हाच सायनाने त्याच्या खांद्यावर टेकवलेली आपली मान उचलून डोळे उघडले, तो आपण आपल्याच फ्लॅटच्या दारात. तिनं मनाशीच हुश्श केलं, आणि गाडीवरून खाली उतरली. प्राध्यापकाने गाडी गेटच्या बाहेरच उभी केली. हळूच गेट उघडलं, दुसऱ्या मजल्यावरच्या

a

आपल्या फ्लॅटच्या दारासमोर उभं राहिल्यावर कळलं की दाराला कुलूप आहे. सायनाने सोबत चाबी घेतलेली नव्हती.

"अब क्या करे?" सायना स्वत:वरच वैतागत म्हणाली.

"काय करायचं. बसा दारात. सकाळ होण्याची वाट बघत."

"दारात? बाहेर? नको त्यापेक्षा तुम्ही तुमच्या घरी जा, मी माझ्या माडीवर जाते."

"नाही. मुळीच नाही. आता तू त्या माडीवर जाणार नाहीस. आज नाही आणि कधीच नाही. तिथला तुझा संबंध संपला."

"बरं बरं. शांत राहा. नाही जात मी तिथे. किती चिडता सर. मी थांबते इथेच. पण तुम्ही तर जा घरी."

"शहाणीच आहेस. तू रात्रभर इथे बसशील आणि मी घरी जाऊन झोपू?"

"त्यात काय एवढं? मला जागायची सवय आहे."

"मला रात्रभर जागत राहून तुझ्या आठवणीत रमायची सवय आहे."

"मग काय आता दारासमोर बसायचं? वेड्यासारखं."

"वेडेच आहोत आपण. चल टेरेसवर जाऊ."

आणखी दोन जिने चढून दोघंही वर गेले तेव्हा चाळिशीला आलेल्या प्राध्यापकाला धाप लागली होती.

"सर तुम्ही थकला, मी नाही."

"होय. मी आता म्हातारा झालो. तू काय बाबा. तरुण आहेस अजून."

a

“छ्या. तुम्ही पण म्हातारे नाही झालात हं अजून. चाळीस वर्षांचा माणूस काही म्हातारा होत नाही. तुमची ही पाच फूट दहा इंच ऊंची आणि गोरा रंग. काय चिकने दिसता सर तुम्ही अम्मा कसम.”

“तुझ्यासाठी नाही ना म्हातारा. मग उत्तम. इतरांचं मला काय करायचं.”

टेरेसवर कठड्याला टेकून दोघंही बसले होते. एप्रिलच्या भर उन्हाळ्यातली पहाट. पहाटेच्या वाऱ्यातही थंडावा जाणवत नव्हता. प्राध्यापकाला दोन जिने चढल्यामुळे धाप तर लागलीच पण घामाच्या धारा वाहायला लागल्या होत्या. त्याने रुमालाने तोंड पुसत सायनाशी बोलणंही सुरू ठेवलं होतं. कठड्याला रेलून बसल्यावर तर त्याला मस्तच वाटलं. वर निळं स्वच्छ आकाश. त्यात मध्यरात्रीनंतर प्रचंड गर्दी केलेल्या चांदण्या. कितीतरी चांदण्या मध्यरात्रीनंतर अधिक टवटवीत दिसतात, असं त्याचं स्वत:चं मत होतं. शेजारच्या घरासमोरचा गुलमोहर यांच्या टेरेसपर्यंत पोचला होता. कठड्यातल्या दोन खांबामधल्या जागेतून एखादी फांदी आतही घुसली होती. ओणवं होऊन हात लांब करून त्यातली लहानशी फांदी त्याने तोडली आणि याच्या मांडीवर डोकं ठेवून पाय लांब करून लेटलेल्या सायनाच्या केसांशी तो त्या फांदीने चाळे करायला लागला. तिच्या कानांमागून, मानेवरून ती फांदी फिरली की तिला गुदगुद्या व्हायच्या आणि ती ‘उई मॉ’ म्हणून दोन्ही हातांचा विळखा करत त्याला आणखीच बिलगायची.

“सर, तुम्ही काय असे रात्रभर बसून राहणार?”

“चार वाजलेत बाईसाहेब आता. आता असा कितीसा वेळ राहिलाय सकाळ व्हायला. तुझ्या मैत्रिणी येतीलच ना सकाळीसकाळी.”

a

“हो. मेघा तर आत्ता येईन पाच-साडेपाच पर्यंत. ती त्या अवचटसोबत जाते ना, त्याची बायको रात्रभर ढाराढूर झोपलेली असते. तो रात्री अकरा वाजता तिला झोपवून घराबाहेर पडतो आणि साडेपाच-सहा पर्यंत घरात पोहचून कपडे काढून पलंगावर झोपतो. बायको उठते, त्यावेळी हा तिच्या शेजारी झोपलेला. तिला कानोकान खबर नसते, याच्या गायब राहण्याची.”

“एवढं बिनधास्त कसं गं कुणी झोपू शकतं? पण स्वस्थतेचं लक्षण आहे हे. एका दृष्टीनं चांगलंही आहे.”

“सर, तुम्हाला मागे नव्हतं का सांगितलं, वैदेहीमॅडमची तब्येत माझ्यामुळे खूप बिघडली होती, डॉक्टर आणावा लागला, त्यावेळी मात्र खरंच माझी झोप पार पळूनच गेली होती.”

“मला आजही तेच वाटतं सायना की त्यावेळी तू खूप मोठी चूक केली होती. अगं, आयुष्यात असे खूप विचित्र अनुभव येत असतात, म्हणून काय असं कुणी पटकन बोलतंच काय? त्यातल्या त्यात वैदेही मॅडमने तुझ्यासाठी खूप केलंय. मुन्नी जरी त्यांनी घरातलीच एक म्हणून वाढवली असेल, तरी तुलाही त्या परकं मानतात, असं नाही. शिवाय तू बोलली तेही कशाबद्दल? तर चक्क त्यांचा विकपॉईंट. सायना बोलताना जरा विचार करून बोलावं. बुद्धिमान, तत्त्वशील, करारी, निर्भय, असे अनेक पैलू असलेली ही स्त्री, कारण नसताना तुझ्याकडून दुखावल्या गेली. त्या माणसाने मॅडमला असं अंडरएस्टीमेट करायला नको होतं. सायना, आपलं कुणीतरी आहे. केवळ आपलं ही भावना माणसाला कष्टाचे सारे पर्वत ओलांडायचं बळ देत असते. मायेच्या माणसाचं आपल्याजवळ असणं, कुणाचा तरी जीव आपल्यासाठी तिळतिळ तुटतो आहे असं वाटणं ही जगण्याची ऊर्मी असते. तुझ्या बोलण्यामुळे मॅडमचं सगळं बळ नष्ट झालं.”

a

“सर, मला नंतर लई वाईट वाटलं. त्यांना सांगायचा माझा उद्देश एवढाच होता की तुम्ही ज्याच्यावर एवढा जीव टाकता, तो माणूस काही धड नाही. सर, सुहास काका असं कसं करू शकतात? मॅडमसारखा एवढा हिरा त्यांच्याजवळ असताना त्यांनी या नजरेनं माझ्याकडं पाहावं.”

“अगं, हिरा त्यांच्या हाताशी आहे, हातात नाही. कुणी काहीही म्हणो, मला नाही वाटत सुहासचे आणि मॅडमचे तसे संबंध असतील. प्रेम आहे त्यांचं. पण मॅडमचं जरा वेगळंच आहे आणि समजा त्यांचे तसे संबंध असले तरी माझ्यापुरतं बोलायचं झालं तर काही गैर नाही. पण सुहासला तिथे हवं ते मिळत नाही, म्हणूनच त्याने तुझ्यावर डोळा ठेवला. मॅडमला दुखवण्यासाठी. ‘तू नही और सही’ या वृत्तीनं. मॅडमच्या समोर वावरणारी, मॅडमचा जीव असणाऱ्या मुलीचा असा फायदा घेणं म्हणजे अप्रत्यक्षपणे त्यांच्यावर सूड उगवण्यासारखंच आहे ना. मॅडमला दुखवायचं, त्यांचा अपमान करायचा आणि स्वत:ची मर्दुमकी सिद्ध करायची. ‘तू नाही म्हणतेस काय? घे मग तुला मुलीसारखी असलेली मुलगीच मी माझी करतो’ असा खुनशी प्रकार आहे हा.”

“पण मला लई वंगाळ वाटलं ना ते.”

“सायना, हीच या व्यवसायाची शोकांतिका आहे. एकदा तुम्ही त्यात उतरलात की तुम्हाला त्यात चॉईस राहत नाही. जो येईल, त्याला एन्टरटेन करणं क्रमप्राप्त आहे. ‘नाही’ म्हणण्याचा अधिकारच राहत नाही. पण बस झालं आता. मॅडमने तुझ्यासाठी तुला या चिखलातून बाहेर काढण्याचे भरपूर प्रयत्न केले. त्यात त्या अपयशी ठरल्या. अर्थात त्याला तूही कारणीभूत आहेसच. पण आता आपलं ठरलंय ना आपण दोघं एकत्र राहायचं ते.”

“पण सर, मला जमेल का?”

“कां नाही जमणार? अगं, सारे राहतात तसं आपण राहायचं.”

“राहायचं कुठे पण?”

“दोन दिवसांत काहीतरी व्यवस्था करतो. पटकन घर बघतो. घर मिळालं की लगेच आपण तिकडे राहायला जाऊया.”

“तुम्ही हे सारं खरं बोलता?”

“मग तुला काय गंमत वाटली, मी एवढ्या दिवसांपासून बोलतोय ते.”

“तुम्ही खूप हिंमत करता आहात बरं.”

“त्याची काळजी तू करू नकोस.”

“आणि तुमची बायको? तिचं काय? तिला काय सांगणार? आणि लोक. ते किती नावं ठेवतील तुम्हाला.”

“लोक मला काय नाव ठेवायचेत ते ठेवू देत. पण मी मात्र आपण जिथे राहायला जाऊ त्या घराचं नाव ठेवणार ‘सायना सदन.’ व्वा मस्त नं?”

“सायना सदन आता हे काय नवंच? सदन म्हणजे काय?”

“सदन म्हणजे घर. आपण ज्या घरात राहू ते घर तुझं घर नाही का होणार? म्हणून त्या घराला आपण आपल्यापुरतं सायना सदन म्हणायचं. आमचा महाल असणार तो. आपल्या त्या घरात आम्ही राजे आणि तुम्ही आमच्या राणी सरकार. सायना तुला माहित आहे तुमच्या या बस्तीचं नाव गंगाजमुना कसं पडलय ते?”

“नाही बॉ. हे असलं काही आमच्या डोक्यात बी येत नाही.”

“हं. डोकंच नाही नं तुला.” तिच्या डोक्यावर टपली मारत सर म्हणाले.

“सऽऽर.” लटक्या रागात सायनाने रोखून त्याच्याकडे बघितलं आणि म्हणाली ते जाऊ द्या. मला डोकं नाही तर नाही तुम्ही भेटलात ना डोकं नसूनही. पण ते सांगा ना नावाचं काय ते.”

“अगं गंगाजमुना या नागपूरच्या भोसलेकालीन राजाच्या किप होत्या.”

“किप? म्हणजे काय हो.”

“ओहो मी पण वेडाच आहे. अगं रखेल. रखेल होत्या त्या. म्हणजे आजच्या आपल्या भाषेत प्रेयसी. दुसऱ्या शब्दात अंगवस्त्र. त्या राजाला दोनदोन प्रेयसी होत्या. त्या दोघींचे बंगले त्यांनी गावापासून दूर म्हणून तिथे बांधले होते. त्यावेळी तिकडे नागपूर शहर पसरलेलं नव्हतं. त्या बंगल्यांच्या शेजारी आणखी काही नागपुरातल्या श्रीमंत लोकांनी आपल्या प्रेयसींसाठी बंगले बांधले. म्हणजे ती एक वेगळी बस्तीचं झाली. पण राजे गेले त्यांच्या सोबत वैभवही गेलं आणि आता त्या जागेला एवढं बकाल घाणेरडं स्वरूप प्राप्त झालं.”

“बापरे अशी आहे होय गंगा-जमुना नावाची कथा? तरीच आम्हाला वाटायचं एवढ्या पवित्र गंगा-जमुना नद्यांची नावं आमच्या सारख्या घाणेरडं काम करणाऱ्याच्या बस्तीला कशासाठी बॉ. आज उलगडलं हे कोडं मला. म्हणून तुम्ही त्या भोसले राजासारखं नाव देणार का सायना सादन?”

“सादन नाही माझी माय. सदन. सायना सदन. बरं आता बाकीच जाऊ दे.” तू उद्या-परवामध्ये स्वत:ची तयारी कर हे घर सोडण्याची. बाकी गोष्टींत लक्ष घालू नकोस, आणि त्याचा विचारही करू नकोस. कळलं? फक्त आवश्यक काय हवं ते बघ. बाकी कशाचंही टेंशन घ्यायचं नाही. माझं, माझ्या बायकोचं तर अजिबात नाही. कळलं? आणि लोकांचा काय विचार करायचा? तो तू मुळीच करू नकोस. लोक निमित्तमात्र असतात. त्यांना किती महत्त्व द्यायचं, हे आपलं आपण ठरवायचं असतं.

a

अगं तू दु:खात होतीस, माझे भोग मी भोगले तेव्हा हे ‘लोक’ आपलं दु:ख हलकं करायला आले होते काय? मग आपल्याला आपल्या सुखाचा शोध लागलाय तर कशाला त्यांचा विचार करतेस?

प्राध्यापकाने ‘कळलं’ ? म्हणून त्याच्या मांडीवर असलेलं तिचं डोकं आणखी जवळ ओढलं, आणि आपला उजवा हात तिच्या केसांमधून मस्त आवळला. त्यासरशी ई ऽ ऽ ऽ करून पटकन तिनं आपली मान उंचावली, स्वत:च्या हाताच्या विळख्याने त्याची मान खाली आणली आणि पटकन आपले ओठ त्याच्या जाड ओठात रुतवले. त्यासरशी त्याने तिला छातीशी प्रेमाने कवटाळलं.

गच्याच्या कठड्यावर दोन पक्षी चिवचिव करत उंच झेपावले.

वैदेही आज घरात अगदी एकटी होती. मुन्नी कॉलेजमध्ये काही कामासाठी गेलेली होती. वत्सलाही सुट्टी टाकून कुठे गावाला गेलेली. बाहेर पाऊस कोसळत होता. उभा-आडवा पाऊस असल्यामुळे मघापासून बंद केलेल्या खिडक्या एका लईत पाऊस पडतो हे पाहून तिनं उघडल्या. खिडक्या उघडताच सुखद गार थंडावा आणि सोबतच पावसाचे तुषार आत आले. खिडकीतून दूरदूरचे दिवे दिसत होते. लांबवरच्या पुलावरचे मोठमोठे दिवे दुरून सुंदर वाटत होते. ती त्या पुलाकडे आणि पुलावरच्या दिव्यांकडे एकाग्रतेनं पाहत होती. त्या पुलाकडे पाहताच तिला केव्हाही सुहासची आठवण यायची. हा पूल तयार झाला आणि तो वाहतुकीसाठी खुला झाला याची बातमी वर्तमानपत्रांत येताच त्याने संध्याकाळी वैदेहीला गाडीतून त्या पुलावरून मस्त फिरवून आणलं होतं. पावसात भिजणं हा आपला केवढा आवडीचा कार्यक्रम. पण सुहासला पावसात भिजायला मुळीच आवडेना. पण आपल्यासाठी तेही तो करायचा, पण दुसरीकडे तो इतकं फ्लर्ट आपल्यासोबत कसं वागू शकतो, हेच कळत नाही. आपण अनेक प्रकारच्या कटू अनुभवातून आयुष्यात गेलो. उपाशी राहिलो, अपमान सोसले, अनेकदा सगळं मनात कोंडून जगावं लागलं. पण माणसावरचं प्रेम, विश्वास, प्रामाणिकपणा आपण कधीच कमी नाही होऊ दिला. ना तर कधी कुणाचा विश्वासघात केला. कुणासोबत साधा खोटेपणाही नाही करता आला. मग सुहास आपल्यासोबत असा कसा वागू शकतो? कां? कोणतं रूप खरं आहे त्याचं....

a

सुहासच्या नुसत्या विचारानेच वैदेहीच्या मनात कसलीतरी विचित्र अस्वस्थता व्यापून राहिली. इतक्या प्रचंड वेगानं इथवर पोचलेलं आयुष्य तिच्या डोळयापुढं आलं तोच वाऱ्याचा जोरदार झोत आला. त्यासरशी पावसाचे तुषार जास्तच अंगावर आले. ती पटकन खिडकीपासून दूर झाली. बेडरूममध्ये जाऊन जरा वेळ टेबलशी खुर्चीवर बसली. टेबलवरची पुस्तकं उगाचंच उचकटवली. कित्येक दिवसांपासून आपण यातल्या एकाही पुस्तकाला हात लावला नाही, हे तिच्या लक्षात आलं. ओशो रजनिशांचं 'मित्र कौन' , मारियो पुझोचं 'गॉडफादर' , सुलोचना देशमुखांचं 'कुमारी माता' अशी काही आठ-दहा न वाचलेली पुस्तकं रांगेत टेबलवर तिची वाट बघत पडलेली होती. आपल्याला वेळ मिळेल तेव्हा वाचायला हाताशी हवी असलेली काही पुस्तकं आधीच वेगळी काढून ठेवण्याची तिची सवय होती. त्या पुस्तकांना फार काळ असं ताटकळत पडून राहावंही लागत नसे कधी. पुस्तकांची उपेक्षा तिच्याकडून होतच नसे. पण गेल्या दोन महिन्यांपासून तिचा विस्कटलेला मूड जागेवर येत नव्हता. स्वत:ची तब्येत, स्वत:चं मन:स्वास्थ्य जपण्याचा ती बराच प्रयत्न करीत होती. कार्यालयातल्या कामातही स्वत:ला व्यस्त ठेवण्याचा ती प्रयत्न करीत होती. घरी तर मुन्नी तिला स्वस्थच बसू देत नव्हती. ईशान, देवूही आपआपल्या परीने तिचा मूड जपण्याचा प्रयत्न करीतच होते. पण सुहासनी तिच्यावर केलेला आघात ती विसरू शकत नव्हती. सुहासने आपला फार मोठा अपमान केला या भावनेनं ती घायाळ पक्षिणीसारखी व्यथित होत होती, आणि त्याचवेळी त्याच्या आठवणीनं व्याकूळही होत होती. सुहासपासून आपण दूर राहू शकत नाही, हे त्याच्यापासून दूर झाल्यावर नव्यानंच तिला लक्षात आलं होतं. त्याच्याशिवाय आपलं आयुष्य थांबलेल्या पाण्यासारखं वाटलं तिला. दहा-पंधरा वर्षांपासूनचा त्याचा सहवास, अनेक टप्प्यावर त्याची असलेली सोबत-नि:शब्द

a

सोबत. कित्येक गोष्टींवर त्याच्यासोबत केलेल्या चर्चा, अवघड गोष्टी त्याच्या 'असण्याने' अनेकदा सहज झाल्या होत्या. सुहास आयुष्यातला एक महत्त्वाचा भाग झाला होता. आपल्या सगळ्या कार्यकर्तृत्वाचा तो एक महत्त्वाचा साक्षीदार होता; तसाच आपल्या एकाकी आयुष्यात आलेल्या अनेक ताणतणावांचाही मुख्य भागीदार होता. सुहासचं चारित्र्य धुतल्या तांदळासारखं स्वच्छ नाहीय, याची जाण आपल्याला आधीपासूनच होती, कदाचित म्हणूनच आपण त्याच्या प्रवाहात वाहत गेलो नाही; भावनिक गुंतवणूक त्याच्यात कितीही असली, तरी राहिलो एका अंतरावरच. पण तरीही त्याच्या आयुष्यात आपलं स्थान खूप वरचं, काहीतरी वेगळं आहे, याच भ्रमात राहिलो आपण. सुहास, एक मित्र म्हणून तू मला अनेकदा समजून घेतलंस, अगदी मनकवडा बनून समजून घेतलंस हे मान्यच आहे मला; पण तू स्वत:ला मात्र माझ्यापासून एका विशिष्ट अंतरावरच ठेवलंस ना! हेच तर दु:ख आहे माझं. 'स्वत:सकट तू माझ्या अंतर्मनात शिरलाच नाहीस रे.' ती अस्पष्टशी पुटपुटली. जणू समोर सुहास उभा आहे. सायनाच्या रूपात त्याने आपल्या भावविश्वाच्या पार चिंधड्याच केल्या. लक्तरंलक्तरं झाली आपल्या भावनिक विश्वाची. 'ही कोणती रे पातळी सुहास तुझी.' स्वत:च्या नकळत वैदेहीच्या तोंडून शब्द बाहेर पडले. 'नाही, असं नकोच होतं वागायला तू माझ्यासोबत. सुहास माझ्या जगण्याचं बळ होतास रे तू. पण हे काय करून बसलास तू. तू असा सरळसरळ मला सांगून माझ्यापासून दूर गेला असतास, त्या रमासाठी तू माझ्यापासून दूर गेला असतास तरी चाललं असतं. पण हे काय. तुझी मजल गंगाजमुनापर्यंत....? सायना.. मला माझ्या मुलीसारखी असलेली, वयानं लहान असलेली.. चक्क व्यावसायिक मुलगी तुला तुझी तृष्णा भागवायला कमी पडली? काय...काय म्हणू मी याला? कसं समजून घेऊ मी तुला?...कसं... नाही सुहास.. माझ्या आकलनापल्याडचं आहे रे हे सारं. खूप

वर्षांपासून एका गतीत..लयीत चाललं होतं आयुष्य. अगदी सुखात. पण आयुष्यात काही वादळच नाही तर माझ्या जगण्याला चैतन्य कसं येणार? काहीतरी हलचल हवीच. नाही का? दुसऱ्या कुणी माझ्या सुखी-समाधानी आयुष्याला ढवळून काढण्यापेक्षा ही जबाबदारी तूच पार पाडलीस. बरं झालं. यातूनही कदाचित मला जगण्याला नवी ऊर्जा मिळू शकेल. तरीही...सुहास तरीही मनापासून वाटतंय, तू असं वागायला नको होतंस. सायना.. अहं. सायनाला....

खरं म्हणजे काल कालपर्यंत तू माझं जीवन होतास. माझ्या आयुष्यावर माझं जेवढं प्रेम आहे तेवढं प्रेम माझं तुझ्यावर होतं. पण माझं दुर्दैव हे आहे, की माझ्या याच जीवनाने मला असला जीवघेणा अनुभव दिला. काय म्हणू मी याला? सुरुवातीला हाती लागलेल्या काही चांगल्या क्षणांचं देणं फेडतेय मी आता. पण तू माझा गुन्हेगार आहेसंच सुहास.

चारा नही कोई जलते रहने के सिवा
सांचे मे फना के ढलते रहने के सिवा
ऐ शमा तेरी हयाते-फानी क्या है
झोंका खाने संभलते रहने के सिवा.

मनाशी या ओळी पुटपुटत तिनं स्वत:ला पलंगावर झोकून दिलं.

“मम्मी, कुठे आहेस? किती वेळ आहे घरी यायला?” मुन्नी विचारत होती

a

“कां गं बाळे? काय विशेष?”

“मम्मी माझ्यासाठी एक छान मेल आलाय. तो तुला दाखवायचा आहे.”

“मग वाच ना, मी ऐकते.”

“तसं नाही, वाचून नाही, प्रत्यक्ष दाखवायचा आहे.”

“बरं, मग आता मी ऑफीसमध्येच बसले आहे. माझ्या मेलवर तू पाठव. मी इथे वाचते.”

“नाही. मला तुला तू प्रत्यक्ष माझ्यासमोर असतानाच वाचून दाखवायचा आहे.”

“अरे बापरे. काय तरी विशेष दिसतंय. मुन्नाबाई ऑर्डर आली का काय ट्रेनिंगची?” आनंदाने वैदेही चीत्कारलीच.

“मम्मी, तू तिथून एकएक कयास करू नकोस. तू लवकर घरी ये. जे काय सांगायचं ते मी घरी आल्यावर माझ्याच मेलबॉक्सवर दाखवणार.”

“बरं बाई येते. पण एक सांग, हे माझ्यासारखं आतापर्यंत कुणाकुणाला सांगून झालंय?”

“कुणालाच नाही. पहिल्यांदा तुलाच.”

“नक्की?”

“नक्की काय. तुझी शपथ.”

“अगदी सोहमला सुद्धा नाही?”

“म ऽऽऽ म्मी.”

“व्वा. व्वा. लाजलं वाटतं आमचं बाळ. ठेवा आता फोन. येते मी लगेच.”

a

“ये लवकर. ठेवते मी फोन.”

मुन्नीने फोन ठेवला आणि तिच्याच शेजारी बसलेल्या सोहमकडे बघत म्हणाली, “ऐकलं काय मम्मी काय म्हणाली ते?”

“ऐकलं नाही, पण अंदाज आला. तुझ्या लाल झालेल्या चेहऱ्याकडे बघून.”

“सोहम, आता तू आणखी मला चिडवू नकोस हं.”

“बरं बुवा राहिलं. पण काकू काय म्हणाल्या ते तर सांग.”

“अरे, मम्मी म्हणाली, खरंच मलाच पहिल्यांदा सांगितलंस की आणखीही कुणाला.”

“मग काय खोटं म्हणाल्या काकू ऽ”

“अरे... काय हे...सोहम, मी तुला सांगितलेलं नाही हं, तू मला सांगितलंस.” त्याच्या पाठीवर गुदलत ती म्हणाली.

“पण मी कुठे काय वेगळं म्हणालो? काकूंच्या आधी मला माहीत आहे, हा त्यांचा अंदाज बरोबर आहे, एवढंच मी म्हणतोय.”

“तसं नाही, मम्मीचं म्हणणं होतं, मी तिच्याआधी आणखी कुणाला सांगितलंच असणार. आणि कुणी म्हणजे तू.”

“इट इज बट नॅचरल.”

“नो. इट्स नॉट बट नॅचरल. मी माझ्या आयुष्यातली कोणतीही विशेष घटना सर्वप्रथम मम्मीलाच सांगणार. हेच माझ्यासाठी नॅचरल आहे.”

“अगदी प्रेमात पडलीस, तेही.”

“होय तेही.”

“तू सांगितलंस काकूंना आपल्याबद्दल?”

“मी कशाला सांगायला पाहिजे, ते तिला आपोआपच कळलं.”

“कसं काय?”

“कसं म्हणजे, आई आहे ती माझी. तिला माझं सारं न सांगताच कळतं.”

“तरीही सांग ना, नेमकं कसं कळलं ते.”

“ज्यादिवशी तिची घरी तब्येत बिघडली होती, आणि डॉक्टर पाठकांना घेऊन यायला मी तुला सांगितलं, तुला फोन केला, तू ज्या पद्धतीनं त्यादिवशी या घरात वावरलास, ईशान दादा आणि जिजूची कमी पूर्ण केलीस, तू आल्याआल्या मला मिळालेलं बळ, डॉक्टरांची तू दिलेली फी...वगैरे वगैरे. सारंच. त्यादिवशी रात्री तिनं मला जवळ घेऊन प्रत्यक्ष सांगितलं, “मुन्ने, चांगलं आहे हं तुझं सिलेक्शन.”

“व्वा. बढिया. काकूंना कसं जमतं गं तुम्हा साऱ्या मुलांचं सुख-दु:ख स्वत:त सामावून घेणं. खरंच त्या वेगळयाच आहेत.”

“अरे हे काहीच नाही. तुला सांगू, ईशानदादा जेव्हा एका मुलीच्या प्रेमात पडला होता, आणि ऐनवेळी ती तिच्या वडिलांच्या भीतीपायी नाही म्हणतेय, म्हणून दादाचा आक्रोश होता, तेव्हा तर मम्मीनं सरळ त्या मुलीची भेट घेऊन तिला आश्वासन दिलं होतं, ‘तुला ईशानसोबत लग्न करायचं असेल, तर मी तुझ्या वडिलांशी बोलते, त्यांचा नकार असला तरी मी तुम्हा दोघांचं लग्न लावून देऊन त्याला सेटल करून देईन.’ पण नंतर त्या मुलीलाच मुळी दादाशी लग्न करायचं नव्हतं.”

“च्यायला. म्हणजे तिने फसवलंच म्हणायचं ईशानला.”

“होय. चक्क फसवलंच. आता तिचं नावही घरात कुणी घेत नाही. दादाला त्रास होऊ नये म्हणून. नाहीतर आमच्या घरात सर्वांची ती फार लाडकी होती. विशेषत: देवयानीताईची.”

“मैत्रेयी, एकीकडलं टेंशन तर आपलं गेलंच गं लग्नाचं. पण दुसरीकडलं कठीण आहे.”

“लग्न? कुणाचं?”

“आपलं.”

“काय? आपलं लग्न...? वेडा आहेस काय?”

“आत्ताच नाही बाईसाहेब. पण कधीतरी तर आपण लग्न करूच ना.”

“वेळ आहे त्याला.”

“होय. खूप वेळ आहे. आय नो, पण जेव्हा कधी आमच्या घरात हा विषय निघेल, तेव्हा तर भयंकर वादळ येणार आहे.”

मैत्रेयी सोहमला काही विचारणार, तेवढ्यात दारावरची बेल वाजली आणि मैत्रेयी ‘मम्मी आली’ म्हणून दाराकडे धावली.

“मम्मी ऽऽ.”

वैदेहीनं दारात पाऊल टाकताच, मैत्रेयीनं तिला कडकडून मिठी मारली. आणि ‘मम्मी’ म्हणून लडिवाळपणे तिला बिलगली. वैदेहीनंही तिला प्रेमानं जवळ घेतलं आणि म्हणाली, “मुन्नी बाळा, अग सांगतरी काय झालंय ते एवढं. ऑर्डर आलीय ना ट्रेनिंगची?”

a

“होय मम्मी. माझी ट्रेनिंगची ऑर्डर आली. मुंबईला माझं ट्रेनिंग आहे. मला पंधरा तारखेलाच रुजू व्हायला सांगितलंय.”

“काय पंधरा? म्हणजे परवा. अग कसं शक्य आहे? परवा मध्ये फक्त एक दिवस. कशी तयारी करून देऊ मी तुझी एका दिवसात. सोहम, तूच सांग एका दिवसात हिची तयारी कशी होणार माझ्याकडून?” त्याच्याकडे कटाक्ष टाकत वैदेही म्हणाली.

“काकू, ती काय आता लहान आहे? तिची तयारी तुम्ही कशाला करून द्यायला हवी? करेल तिची ती.” सोहम म्हणाला.

“म्हणे करेल तिची ती! तिला काय कळतं?”

“मम्मी तू समजतेस तेवढी खरंच मी लहान नाही राहिले. आणि आता बाकी कशावर चर्चा करण्याचा प्रश्नच नाही राहिला. ऑर्डर आलीय ना, जायचं. माझ्यापेक्षा तुलाच किती उत्सुकता होती माझ्या युपीएससीच्या निकालाची. पास झाल्यावर तुलाच केवढा आनंद झाला. आता सारं झाल्यावर ऑर्डर तर येणारच ना!”

“खरंय रे सोहम तुझं. माझं पिल्लू खरंच खूप मोठं झालंय आणि शहाणंसुद्धा.”

वैदेहीशी बोलताबोलताच मैत्रेयीने लॅपटॉप सुरू करून तिला आलेली ऑर्डरची मेल ओपन केली आणि वैदेहीपुढे लॅपटॉप नेत म्हणाली, ‘आई, बघ ही मेल. मला आलेली ऑर्डर.’

“व्वा! ग्रेट मुन्नी, मला अभिमान वाटतो तुझा. आय ॲम प्राऊड ऑफ यू ॲन्ड आय रिसपेक्ट यू बाय ऑलमिन्स बाळा.”

“छी मम्मी रिसपेक्ट वगैरे काय म्हणतेस. मी मुलगी आहे तुझी.”

a

“सोहम, गेल्या बारा-तेरा वर्षांपासून तिनं घेतलेल्या श्रमाचं आज शेवटी चीज झालंय रे.” बोलताबोलताच वैदेहीचा आवाज भरून आला.

“काकू, तिनं तर कष्ट घेतलेतंच, पण तिच्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त कष्ट तुम्ही घेतलेत. तुम्ही तिच्यावर एवढी मेहनत घेतली नसती, तिला प्रत्येक गोष्टींत सतत मार्गदर्शन केलं नसतं, तर काहीच शक्य नव्हतं ना. तुम्ही तिच्या आयुष्याचा आराखडा तयार केला, तिचं दिवसभराचं वेळापत्रक तुम्ही आखलं, म्हणून हा सोनियाचा दिवस आज तिच्या हातात आला. अहो, आम्ही प्राध्यापक झाल्यावर युपीएससी म्हणजे काय, न् त्या परीक्षा द्यायला हव्यात हे आमच्या टाळक्यात आलं. ती चक्क बी.एससीच्या पहिल्या वर्षालाच त्याची तयारी सुरू करते. तुमच्यामुळेच काकू हे. आम्हाला तर सांगणारंही कुणी नव्हतं, आणि आमच्या डोक्यातही हे कधी त्या वयात आलं नाही, म्हणून तिच्या या सगळ्या करिअरचं क्रेडीट गोज टू यू.”

“अहो सोहमराव एवढा मसका नका हं मारू आत्तापासनं. वेळ आहे, तुमच्या मनात जे आहे, त्याची प्रस्तावना करायला. अहो असं असतं तर आमच्या देवयानीबाई नाही का काहीतरी झाल्या असत्या? आपण कितीही सांगितलं, तरी पुढच्याने ऐकायला हवं ना. रेवाने ऐकलं, आज ती कुठल्या कुठे जाऊन पोचली. मुंबईसारख्या क्षेत्रात गारमेन्ट फॅक्टरीत नाव कमावणं सोप नाही सोहमराव. पण देवयानीबाई साधी बी.ए. ची डिग्री हातात घेता घेताच प्रेमातही पडल्या आणि लग्न करून मोकळ्याही झाल्या.”

“ए. मम्मी, लग्न करून ती मोकळी नाही झाली बरं. ती प्रेमात पडली म्हणून दोन वर्षांत तूच त्यांचं लग्न लावून त्यांना बंधनात अडकवलंस.”

“मग काय करायला हवं होतं? मोकाट हुंदडू द्यायला हवं होतं? दिवसदिवसभर नुसतेच हॉटेलात बसून चहाचे कप तरी पोटात रिचवायचे, नाहीतर

a

त्याच्या बाईकवर गावभर हुंदडायचे. आपण आपल्या कामात व्यस्त आणि लोक सांगताहेत आपल्याला, 'तुमची पोरगी इकडे दिसली नि तिकडे दिसली.' असे हुंदडत बसण्यापेक्षा लग्न करून हिंडा नं किती हिंडायचं आहे ते."

"पण मम्मी त्या बिचाऱ्या जिजूला एवढ्या लवकर तू एवढ्यामोठ्या जबाबदारीत अडकवलंस, असं नाही का वाटत तुला?"

"मुन्नाराजा, तरुण मुली आपल्या प्रियकरासोबत खुलेआम हुंदडताना आणि लोक तिला नाव ठेवताहेत हे ऐकताना त्या आईची परिस्थिती कशी असेल, याची कल्पना तुम्ही नाही करू शकत मॅडम. जबाबदारी पडल्यापडल्या जिजूत केवढा फरक पडलाय. तुमचंही आता लवकरंच बघायला हवं आम्हाला. काय सोहम?"

"काय..काय..कसलं? मैत्रेयी.. हे..हे.." अचानक झालेल्या गोड हल्ल्याने सोहम आणि मुन्नी दोघंही गांगरूनंच गेले. त्यांना काय बोलावं सुचेचना. काहीतरी बोलावं म्हणून सोहम तिच्याकडे आशेनं बघत राहिला; पण मैत्रेयीची तर बोबडीच वळली होती. मम्मी असं डायरेक्ट एवढ्या लवकर काहीतरी बोलेल, असं वाटलंच नव्हतं तिला. तिच्याकडून अचानक आलेल्या या संकेताने मुन्नीलाही सुचेचना. पण काहीतरी बोलून हा विषय टाळायलाच हवा होता. विषय आपल्याला कळलाच नाही, असा भाव चेहऱ्यावर आणत मैत्रेयी म्हणाली, "मम्मी, अगं मी तुला सांगायलाच विसरले. दादा येतोय आज रात्री."

"हो. अरे वा. कधी आला त्याचा फोन?"

"जरा वेळापूर्वी"

"व्वा. फारच छान. आणि देवूचं काय? तिला कळवलं की नाहीस?"

“व्वा. असं कसं. ती आणि जिजू रात्री इकडे मुक्कामालाच येताहेत. आणखी एक गुड न्यूज आहे आमच्याजवळ तुम्हाला देण्यासाठी.”

“होय? सांगा. कोणती ती?”

“ओळख”

“ए बाई पटकन बोल बुवा. काय ते.”

“अगं रेवादीदी पण येतेय रात्रीच्या विमानानं.”

“काय सांगतेस काय? आणि ती तुला इकडे निरोप द्यायला कशाला येते आहे? तूच आता तिच्याकडे मुंबईला जाणार ना ट्रेनिंगच्या आधी?”

“अगं..अगं.. रिलॅक्स. असं काय करतेस तू. अगं मला ताबडतोब परवा ट्रेनिंगला हजर व्हायचंय, राहणारही मी त्याच कॅम्पसमध्ये, आता दोन महिने आम्हाला ते चांगलं पदवून घेणार. मी दीदीला भेटायलाही जाऊ शकेल की नाही, शंकाच आहे. म्हणून आज दीदी गप्पा मारायला येणार आहे. आज आम्ही पाचही जण रात्रभर गप्पा मारत जागणार आहोत, धम्माल करणार आहोत, खूपखूपदा चहा पिणार आहोत. दीदीनं फोनवर सांगितलंय, खूप सारं दूध घेऊन ठेव म्हणून.”

“कायकाय नि कधी प्लॅन करता गं हे सारं तुम्ही. मला तर काही पत्ताही लागू देत नाही. आणि हे पाच जण काय म्हणालीस गं तू? सोहम पण रात्री इथे राहायचेत?”

“नाही.. नाही.. नाही. मी काय हा आत्ताच चाललोय.”

“अगं मम्मा, आम्ही तिघी बहिणी, दादा आणि जिजू.”

“जिजू? जिजू रात्रीचा थांबणार? हे कसं बुवा शक्य झालंय?”

a

“ये कमाल हमारा है! हम कल जा रहे है, इसलिये हमारे वास्ते आज रातको वो ससुराल रहेंगे.”

“पण तुम्हा चौघा भावंडांना तर तुमच्यात रात्रीच्या गप्पांमध्ये पाचवं कुणी चालत नाही ना गं, ईशान ओरडेल ना.”

“नाही ओरडणार दादा. आता एकदा मी इथून ट्रेनिंगसाठी गेले की मला कुठे जॉईन व्हावं लागतं, काय माहीत. बहुतेक नागपूरबाहेरच ना. रेवादीदी आणि ईशानदादा बाहेरच. मग आम्हाला रात्रभराचा असला गोंधळ कधी घालायला मिळणार? आणि मुख्य म्हणजे, जिजू फक्त तुझ्यासमोर गप्प असतात, एरवी आमच्या-आमच्यात तेही केवढा दंगा करतात. आताशा तर दादासमोरही करतात.”

“चला हे एक बरं झालं. पण रेवा किती दिवसांसाठी येतेय?”

“दिवसांसाठी? अग उद्या संध्याकाळी सातच्या फ्लाईटनं आम्ही दोघीही जाणार.”

“फ्लाईटनं? तू पण फ्लाईटनं जाणार?”

“होय. रेवादीदीनंच ठरवलं. तिला परवा सकाळी आठ वाजता मिटींग आहे. मला परवा सकाळी ठाण्याला ट्रेनिंगसाठी पोचायचं आहे. ती म्हणाली, ‘मी फ्लाईटने जाणार, तू ट्रेनने जाणार; ये बात कुछ हजम नही हो रही.’ केलंही असेल तिनं माझं तिकीट बुक.”

“बापरे बाप. खरंच. सोहम, ही सारी पोरं खरंच खूपंच मोठी झालीयत रे बाबा. मम्मीसाठी आता काही कामंच नाही राहिलंय. आणि काय गं शहाणे, तू तर मारे म्हणत होतीस, ‘सगळ्यात पहिल्यांदा ही आनंदाची बातमी तुलाच दाखवायची

बरं का मम्मी' आणि हे काय, मी घरी पोचण्याच्या आत साऱ्या जगाला सांगून मोकळी."

"अगं, सोहम इथे बसलाच होता, तेव्हाच मी मेल चेक केला. त्यामुळेच ते त्याला कळलं. त्याने लगेच तोच मेल रेवादीदीला फॉरवर्ड केला. ती तेव्हा ऑनलाईन होती. रेवादीदीने ईशानदा आणि देवूताईला सांगितलं. परस्पर सर्वांचं सर्वांशी बोलणं झाल्यावर तू इथे पोचलीस. त्याला मी काय करू? मला तर हे सारं आधी तुलाच सांगायचं होतं, नव्हे तो मेल दाखवायचा होता."

"जाऊ दे. त्याने काय फरक पडतो बेटा. अगं आता तुम्हा चौघांचाच परस्परांमधला संवाद महत्त्वाचा आहे. तुम्हा साऱ्यांच्या आयुष्यातलं माझं कर्तव्य संपलं. बस तू एकदाची चांगल्या ठिकाणी जॉईन झालीस की माझ्या आयुष्यातलं एक फार मोठं स्वप्न पूर्ण होईल."

"असं कसं? रेवादीदीचं लग्न हे तुझं आणखी एक स्वप्न नाही काय?"

"छे. लग्न हे काही स्वप्नात नाही येत. आणि "ती तर लग्नच करत नाही म्हणते. काय तरी एक-एक भूत घेता बाबा तुम्ही डोक्यात. एवढी चांगली पोरगी. चांगला पगार आणि म्हणे लग्नच करत नाही. काय करायचं सोहम आता तूच सांग. तो शार्दूल बिचारा कितीदा समजवतोय हिला लग्नासाठी."

"करेल हो ती लग्न. तुम्ही कसली काळजी करता. सध्या छान ती आपल्या बॅचलर लाईफचा आनंद उपभोगतेय ना, असू देत. लहान आहे ती अजून."

"होय? आणि आमची मुन्नी मोठी झाली?"

सोहम दचकून वैदेहीकडे बघायलाच लागला. 'आज आपलं काही खरं नाही,' असं मनाशीच पुटपुटत, पण वरपांगी तिच्याकडे बघत आणि आपण काही

ऐकलंच नाही; असं दाखवत तो म्हणाला, "काकू खूप उशीर झालाय मला. मी येऊ का आता? बाबांना दवाखान्यात न्यायचंय आज."

"का रे काय झालं तुझ्या बाबांना? एनी प्रॉब्लेम?"

"नो. नथिंग. विशेष काहीच नाही. चष्मा फुटला. म्हटलं फुटलाच आहे तर एकदा डोळे पण तपासून घ्यावेत; एवढंच."

"मग ठीक आहे. चला घ्या काळजी. आणि या साऱ्या पोरांसोबत रात्री तू पण ये मग इकडेच जेवायला. काय गं मैत्रेयी, सोहमला जेवायला बोलवायचं नं?"

"मैत्रेयी आतून 'आले-आले' चा आवाज देत आली आणि जाण्यासाठी दारात उभ्या असलेल्या सोहमला म्हणाली, 'निघालास' ?

"होय. बाय."

"बाय."

"बाय काय; मी म्हणाले, रात्री याला पण बोलव ना तुम्हा साऱ्यांसोबत जेवायला."

"याला? याला कशाला? आजची रात्र आमची आमची आहे. याचा काय संबंध?"

"संबंध? याचा काय संबंध, हे तू मला विचारतेस?"

"नाही. नाही. हा नको. सोहम बाय. उद्या भेटूया."

"बाय."

मैत्रेयीने आपल्याला रात्री जेवायला का बोलवलं नाही, याचा विचार करत त्याने खाली येऊन गाडीला किक मारली, तेव्हा त्याला मनाशीच हसू मात्र आलं.

a

मैत्रेयीने जेवायला आज नाही बोलवलं, याने काय फरक पडतोय, पण वैदेही मॅडमने अप्रत्यक्ष आम्हा दोघांच्या संबंधावर शिक्कामोर्तब केलंय, हे त्याच्यासाठी फार महत्त्वाचं होतं. पण दुसऱ्याच क्षणी, त्याच्या चेहऱ्यावरचं हसू लोप पावलं. कारण ज्यादिवशी आपल्या घरी ही बातमी कळेल, त्यादिवशी आपले कर्मठ विचारांचे आईवडील किती गोंधळ करतील, आणि कोणत्याही परिस्थितीत मैत्रेयीची पूर्ण कथा ऐकल्यावर ते आपल्या लग्नाला तयारच होणार नाहीत, याची त्याला पूर्ण कल्पना होती. त्यांच्या विरोधात जाऊन मैत्रेयीसोबत लग्न करण्याची आपली तयारी होऊ शकेल काय? या विचारासरशी त्याच्या गाडीचा वेग आपोआप कमी झाला. आपल्या पायातलं बळच गेल्यासारखं वाटलं त्याला. त्याने गाडी चालवताचालवताच, एका हाताने आपल्या केसातून हात फिरवत वर बघितलं, तेव्हा आभाळ गच्च भरून आलेलं होतं. काळे ढग जमा झालेले होते, ते कधी गरजतील, याचा नेम नव्हता. प्रचंड वादळाचं चिन्ह सुटलेल्या वाऱ्यावरून सहज लक्षात येत होतं, येणाऱ्या वादळाला तोंड देण्याची आपली तयारी आहे, की नाही याबद्दल तो साशंक होता...

a

नाव : अरुणा सबाने

**संपादक : आकांक्षा मासिक,**

**संचालक : आकांक्षा प्रकाशन**

**प्रकाशित पुस्तके**: * जखम मनावरची (कथासंग्रह) 1994

**(एकूण१९)** * अथांग (कथासंग्रह) 1996

* स्त्री : नाते स्वत:शी (ललित) 1999
* अनुबंध (कथासंग्रह) 2000
* बहिणाबाई चौधरी (संपादन) 2002
* आंबेडकर आणि स्त्री (संपादन) 2004
* साहित्यातून समाजाकडे2005
* विमुक्ता (कादंबरी) 2006
* स्त्रीवाद : एक दृष्टिकोन 2008-09 वैचारिक
* प्रतिभावंत 2008-09
* मुन्नी (कादंबरी) 2010(तिसरी आवृत्ती2018)
* जिवाभावाचे (ललित) 2011
* आक्रोश सामाजिकतेचा (वैचारिक) 2012
* स्त्री : एक बहुरूप दर्शन (2019)
* अनप्लॅन्ड ट्रिप (2020)
* आईचा बॉयफ्रेंड (2020)
* सात बारा (कथासंग्रह)2020
* सूर्य गिळणारी मी(आत्मचरित्र)मार्च 2022,
* दुभंग मी व्याकूळ मी(कादंबरी) 2024

a

**सन्मान/पारितोषिक** :

* पतंगराव कदम फाऊंडेशन (जखम मनावरची), कोल्हापूर 1994
* डॉ. गंगाधर अधिकारी वंचित मित्र पुरस्कार (पुणे) 2000
* डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक पत्रकारिता पुरस्कार, (लातूर) 2001
* स्मिता पाटील सामाजिक पुरस्कार (नागपूर) 2002
* सावित्रीबाई फुले पुरस्कार 2004
* राष्ट्रीय सामाजिक कार्य पुरस्कार 2005-2006 मुंबई
* अ.भा. मराठी पत्रकार परिषद राज्यस्तरीय उत्कृष्ट दिवाळी अंक 2006
* कस्तुरबा गांधी सामाजिक पुरस्कार 2007
* मैत्री पुरस्कार 2007
* इंदुमती शेवडे मराठी साहित्य पुरस्कार 2009
* रुक्मिणी पुरस्कार - यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक-2009
* समाजप्रबोधन, नागपूरच्या महाराष्ट्रस्तरीय उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती प्रथम पुरस्कार ‘युगंधर नेते यशवंतराव चव्हाण’

*सर्वोत्कृष्ट साहित्य पुरस्कार 2003-2004, बीड, स्त्री : नाते स्वत:शी अनुबंध

* समाजप्रबोधन महाराष्ट्रस्तरीय उत्कृष्ट कथासंग्रह अनुबंध 2004-05

*विमुक्ता : महाराष्ट्रस्तरीय साहित्य साधना व स्त्रीवादी साहित्य पुरस्कार 2006

* विमुक्ता : उद्धव शेळके पुरस्कार, अंकुर साहित्य संमेलन 2006
* विमुक्ता : जनसंवाद साहित्य पुरस्कार, नांदेड, 2007
* विमुक्ता : ना. ह. आपटे कादंबरी पुरस्कार,2007
* मुन्नी : प्र. के. अत्रे पुरस्कार (पुणे), 2011
* मुन्नी : समाजप्रबोधन, नागपूरचा सर्वोत्कृष्ट साहित्य पुरस्कार, 2011
* पद्मगंधा प्रतिष्ठानचा मालिनी बोबडे सामाजिक कार्य पुरस्कार2016
* मातृगौरव पुरस्कार रोटरी क्लब मुंबई 2015

* यशवंतराव चव्हाण सामाजिक कार्य गौरव पुरस्कार, नागपूर, 2017
* यशवंतराव दाते स्मृती संस्था वर्धातर्फे हरीश मोकलकर सामाजिक ऋण पुरस्कार 2019
* कमल के.पी. भागवत पुरस्कार म.सा.पा. पुणे 2019
* स्त्रीप्रतिष्ठा साहित्यिक सन्मान पुरस्कार 2019, सांगली
* डॉ. जया द्वादशीवार वैचारिक वाङ्मय पुरस्कार2020
* प्रसाद बन उत्कृष्ट साहित्य पुरस्कार, सूर्य गिळणारी मी 2023
* सोमेश्वर पुसदकर स्मृतीप्रित्यर्थ समाजगौरव पुरस्कार, कृषी प्रतिष्ठान, नागपूर (एक लाखाचा पुरस्कार)

**इतर**

* आतापर्यंत 5 विद्यार्थ्यांची अरुणा सबाने यांच्या साहित्याच्या अंगाने पी. एचडी.
* बी.ए. प्रथम वर्ष, नागपूर विद्यापिठाच्या अभ्यासक्रमात‘स्त्रीवादावर एक धडा’ समाविष्ट
* ‘मुन्नी’ कादंबरी गोंडवाना विद्यापीठ एम.ए. अभ्यासक्रमाला लागली.
* ‘ते आठ दिवस’ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे अभ्यासक्रमात लागले.

a

## विशेष सन्मान

* विदर्भ साहित्य संघाच्या सातव्या लेखिका संमेलनाचे अध्यक्षपद (2019)
* महाराष्ट्र फाउंडेशन(अमेरिका) समाजकार्यप्रबोधन पुरस्कार,2021
* लोकसत्ता दुर्गा पुरस्कार 2021
* फुले शाहू आंबेडकरी बहुजन महिला साहित्य संमेलन अध्यक्षपद 2021
* लोकमत साहित्य पुरस्कार, सूर्य गिळणारी मी 2023
* महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचा ज्येष्ठ साहित्य पुरस्कार.2023
* साहित्यप्रेमीभगिनी मंडळ, पुणेचा आत्मचरित्र पुरस्कार, 2023
* जवाहर वाचनालय, ठाणेचा गोपीनाथ पाटील स्मृती वाङ्मय पुरस्कार,2023
* कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्र समिती सल्लागार
* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या सल्लागार समितीवर नियुक्ती.

**विशेष कार्य** :

* पहिले अखिल भारतीय जल साहित्य संमेलनाचे नागपूर येथे आयोजन (2002) असे एकंदर नऊ संमेलनांचे आयोजन.

* 'पाणी वाचवा पाणी जिरवा', 'जल साक्षरता' या अभियानासाठी महाराष्ट्रभर सतत दौरे

* पाणी विषयावरील कार्यामुळे नेपाळ, स्टॉकहोम, स्वीडन, जपान येथील कॉन्फरन्समध्ये निबंधवाचन.

**स्त्री संदर्भातील कार्य** :

* कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय? या विषयावर जाणीव जागृतीसाठी विदर्भात विविध ठिकाणी 55 कार्यशाळा
* लैंगिक अत्याचार करणाऱ्यांविरोधात ठाम भूमिका

a

*        3 सेक्स वर्करचे पुनरुत्थान.

*        स्त्री अत्याचार पीडित स्त्रियांना न्याय मिळवून देण्यास सतत प्रयत्नशील.

अध्यक्ष :        *        माहेर सामाजिक व शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र राज्य

*        महिला पाणी मंच, महाराष्ट्र राज्य

सचिव :        *        प्रगतीशील लेखक संघ, नागपूर

* दलित मानवाधिकार समिती, बंगलोर 2004ते 2009

*        पुर्णा खोरे मित्र मंडळ, अकोला

सदस्य :        *        ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह विमेन्स ऑर्गनायझेशन

* यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान वि. के. नागपूर 2019 ते 2022

संपादक        :        *        दै. निर्मल महाराष्ट्र, नागपूर-2002-03

(विदर्भातील पहिली महिला संपादक)

कार्यकारी सदस्य : *        इंडिया वॉटर पार्टनरशीप, दिल्ली (आंतरराष्ट्रीय संस्था)

कार्यकारी सदस्य :        *        अखिल भारतीय जलसंस्कृती मंडळ, औरंगाबाद

मुख्य आयोजन :        *        11 वे अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनाच्या आयोजनात (2011) महत्त्वाचा सहभाग.

*        ‘वैदर्भीय लेखिकांची कार्यशाळा’ आयोजन (2012, 13, 15, 16, 17,21)

समन्वयक :        *        दक्षिणायनतर्फे राष्ट्रीय कन्व्हेंनशनची समन्वयक

*        प्रभावती सबाने सामाजिक कार्य पुरस्कार सुरुवात (2018)

सहभाग (पेपर वाचन) :   *जपान, नेपाळ, बँकॉक, सिंगापूर सह भारतात अनेक ठिकाणी व्याख्याने.

आगामी        :        बहुजन समाजातील स्त्रीची सद्य:स्थिती( वैचारिक

*        प्रिय आईस(ललित)